सं. हाणे.
निबंध
330९

जी. एं. [illegible]तील जी. ए.

जी. ए. च्या मृत्युविषयक कथा

जी. एं. च्या कथासृष्टीतील बालविश्व

जी. एं. च्या 'कथे'तील दाम्पत्यजीवन

कंसातील जी. ए.

REFBK-0026129

कालिजवेध

धनंजय आचार्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ा :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे र्माणी भरावी लागले.

19 OCT 1991

26 OCT 1991

JUL 1990

21 DEC 1991

AUG 1990

AUG 1990

15 FEB 1992

4 DEC 1993

8 AUG 1990

18 DEC 1993

1 FEB 1997

6 MAR 1991

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

५ संदर्भ
निबंध-
३३७९
२९२९
२२।५।९०



काळीजवेध

धनंजय आचार्य

REFBK-0026129

विमल प्रकाशन
पुणे ३०.

प्रकाशन क्र. २८

प्रथमावृत्ती : जानेवारी १९९०.

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी

© डॉ. सौ. कला आचार्य
पॉलिटेक्निक होस्टेल
सोमय्या विद्याविहार कॅम्पस
विद्याविहार, मुंबई - ४०० ०७७.

प्रकाशक :
विनोद सरपोतदार
विमल प्रकाशन
६९३ नारायण पेठ, जोशी भवन,
कुंटे चौक, पुणे - ४११ ०३०.

लेझर टाईपसेटिंग :
डाटा स्टेन्सिल कॉम्प्युटर सर्व्हिसेस
कासारवाडी पोस्टऑफिस जवळ,
पुणे - ४११०३४.
फोन - ८४२०५, ८६७३५

रोव्हर्स ॲडव्हरटायझिंग
प्लॉट नं. २८९,
जयहिंद हायस्कूल जवळ,
पिंपरी, पुणे - ४११ ०१७.

मूल्य : रु. ६५/-

गृहिणी सचिवः सखी मिथः
प्रियशिष्या ललिते कलाविधौ

प्रिय सौ. कलास

हृद्‌गत

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ।।

वस्त्राला केवडापानाचा सहजवास लागावा त्याप्रमाणे जी. एं.च्या कथासृष्टीच्या सानिध्यात ज्यांचे जीवन उजळून निघाले असा मी जी. एं.चा एक सामान्य भक्त आहे.

जी. ए. माझे दैवत आहे. आणि हे सांगताना मला कुठल्याही प्रकारे संकोच वाटत नाही, कारण अभिमान वाटावा असेच माझे दैवत आहे!

कृष्णचंदन. . . काळीजवेध. . . रक्तकाळिमा ही एक प्रकारे माझी मानसपूजा सुरु आहे, व त्यात मला सर्वतोपरी सहकार्य आहे ते श्री. विनोद सरपोतदार यांचे! जी. एं.च्या कथासृष्टीवर माझी एकापाठोपाठ एक पुस्तके काढणे हे खरे तर धाडसाचेच काम, पण ते काम श्री. विनोद सरपोतदार कुठल्याही प्रकारची व्यावसायिक तडजोड न करता एका विशिष्ट दर्जेदार निर्मितीमूल्यांना धरून करीत आहेत, याचेही मुख्य कारण ते स्वतः जी. ए. भक्त आहेत हेच होय. माझ्या लेखनावर त्यांचा जो असाधारण विश्वास आहे व मला जे त्यांचे प्रेम, सहकार्य लाभत आहे..... लाभणार आहे, त्याबद्दल मी कायम त्यांच्या ऋणात रहाणेच पसंत करीन. ह्याही ऋणानुबंधाच्या गाठी, अगोदरच कुणीतरी घालून ठेवलेल्या.

"जी. एं.च्या कथासृष्टीतील अविस्मरणीय व्यक्तिरेखा" ही माझी लेखमाला स्वीकारून मला पहिल्या प्रथम प्रसिद्धीची दारे उघडी करून दिलीत, ती श्री. मो. द. नांदूरकर यांनी. ऑगस्ट १९८७ ते ऑक्टोबर १९८८ या काळात "साहित्य सूची"तून सदर लेखमालेतील दहा लेख क्रमशः प्रसिद्ध झालेत. "साहित्य सूची"तून ही लेखमाला प्रसिद्ध होत असतानाच ती आवडल्याची पावती मला काही लेखक-लेखिकांकडून आणि सर्वसामान्य रसिक वाचकांकडून वारंवार मिळत राहिली. श्री. नांदूरकरांनी मला साहित्य विश्वात आणले, ही गोष्ट मी कधीच विसरणे शक्य नाही. त्यांच्या मी कायम ऋणात आहे.

"जी. एं.च्या कथासृष्टीतील अविस्मरणीय व्यक्तिरेखा" ही लेखमाला प्रसिद्ध होत असताना "विमल प्रकाशन" तर्फे ती पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याची इच्छा श्री. विनोद

सरपोतदार यांनी व्यक्त केली. आणि जी. एं.च्या प्रथम स्मृतिदिनी दि. ११ डिसेंबर १९८८ला "कृष्णचंदन" प्रसिद्ध झाले.

"कृष्णचंदन"च्या निमित्ताने सर्वश्री विनोद सरपोतदार, चंद्रमोहन कुलकर्णी, दिनेश चंदेल, सा. रा. भंडारी आणि मी एकत्र आलो. पुस्तकनिर्मिती हे एक टीमवर्क आहे. ही सर्व मंडळी जी. एं.ची भक्त असल्यामुळे व्यवसाय म्हणून ह्या पुस्तकनिर्मितीकडे त्यांनी कधीही पाहिले नाही. कृष्णचंदन, काळीजवेध आणि आगामी रक्तकाळिमा यांच्या निर्मितीप्रक्रियेत या सर्वांची भावनिक बांधिलकी मला अत्यंत मोलाची वाटते. या सर्वांचा मी सहकारी असल्यामुळे त्यांच्या मैत्रीपूर्ण बंधनात कायम रहाणेच मी अधिक पसंत करतो.

"कृष्णचंदन"साठी प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी तत्परतेने प्रस्तावना दिली, माझ्या काही लेखांचेही त्यांनी मोकळेपणाने कौतुक केले, त्यांचा आशीर्वाद माझ्या पाठीशी असाच कायम राहो.

"जी. एं.च्या 'कथे'तील जी. ए." हा लेख आवडल्याचे काहींनी पत्र लिहून, तर काहींनी समक्ष भेटीत आवर्जून सांगितले. त्या सर्व वडिलधाऱ्या मंडळींचा आशीर्वाद, त्यांच्या शुभेच्छा कायम मला लाभो. सर्वश्री रामदास भटकळ, पां. ना. कुमठा, आप्पा परचुरे, प्रा. प्रल्हाद वडेर, प्रा. स. गं. मालशे, शंकर सारडा, श्रीमती प्रभाताई आणि सौ. नंदाताई पैठणकर या सर्व वडिलधाऱ्या मंडळींना प्रस्तुत लेख आवडला, एवढेच नव्हे तर खुद्द जी. एं. नाही हा लेख वाचावयास मिळाला होता, व त्यांच्याही पसंतीस तो उतरला होता, त्यात मला सर्व काही पावले.

माझ्या लेखमालेमुळे मला अनपेक्षितपणे एक मित्र लाभला- श्री. अनिल बळेल! "साहित्य सूची"तून प्रसिद्ध झालेल्या माझ्या प्रत्येक लेखाचे त्यांनी कौतुक तर केलेच, पण काही लेखांना विषयही पुरविलेत. "कृष्णचंदन"चे जे उत्स्फूर्त स्वागत त्यांनी केले, त्याने तर मी अक्षरश: भारावून गेलो. त्यांचा स्नेह असाच वृद्धिंगत होत राहो.

"कृष्णचंदन", "काळीजवेध" आणि "रक्तकाळिमा" यातील लेखन उत्स्फूर्तपणे झालेले आहे. ही समीक्षा आहे, की ललित लेखन आहे, की हे निराळ्या पद्धतीने केलेले कथाकथन आहे, हे माझे मलाच अजून नीटसे कळलेले नाही. मग मी हे लेखन का केले? का करतो. . . . कशासाठी करणार आहे?

खरे तर हे जी. एं.चेच मी देणे लागतो, अशी माझी प्रामाणिक भावना आहे. हे लेखन मी करत नसून माझ्याकडून घडत आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे.

माझे हे लेखन प्रामुख्याने आहे ते सर्वसामान्य रसिक वाचकांसाठी! जी. एं.च्या कथेसंबंधी जे अनेक गैरसमज आहेत, जे कळत नकळत निर्माण झालेत, करण्यात आलेत, ते दूर करण्याचा हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. जी. एं.ची कथा गूढ,

अनाकलनीय, डोक्यावरून जाणारी आहे, जी. एं.ची कथा निराशावादी आहे, जी. एं.ना जीवनातली फक्त काळी बाजूच तेवढी दिसते, जी. ए. सातत्याने फक्त काळा रंगच तेवढा चितारतात, जी. एं.च्या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे जी. एं.च्या हातातील कळसूत्री प्यादी, जी. एं.ची कथा म्हणजे अर्ध्या तासाची करमणूक आणि महिनाभराची डोकेदुखी, जी. ए. म्हणजे भोवऱ्यात अडकलेला कलावंत, जी. एं.ची कथा ही सर्वसामान्य वाचकांसाठी नाहीच, जी. एं.चा विशिष्ट स्त्रीविषयक दृष्टिकोण, जी. एं.वर होणारा स्त्रीद्वेष्टेपणाचा आरोप, जी. एं.च्या कथेतील नियतीचे तांडव. . . . प्रतिमांनी लवथवलेली जी. एं.ची विशिष्ट शैली. . . . जी. एं.च्या कथेतील अस्तित्ववाद... एकूण काय, सर्वसामान्य वाचकाने जी. एं.च्या वाटेला जाऊ नये अशीच सर्व तटबंदी निर्माण झाली. सामान्य वाचक जेव्हा "कोण जी. ए.?"असा प्रश्न विचारतात, तेव्हा तर मन व्याकुळ होते. म्हणून जी. एं.च्या कथेबाबतचे गैरसमज दूर करून, जी. एं.ची कथा तळागाळापर्यंत, सर्वसामान्य रसिक वाचकांपर्यंत पोचविण्याच्या हेतूने मी ह्या लेखनाला एकाएकी प्रवृत्त झालो आणि झपाटल्यासारखे हे लेखन माझ्या हातून होत गेले.

माझ्या ह्या प्रयत्नात मी यशस्वी झाल्याची.... होत असल्याची पावती रसिकांकडून मला सतत मिळत आहे.

जी. एं.च्या कथेचा एक एक पैलू उघड करीत असताना, त्यातील सौंदर्य उलगडून दाखवीत असतानाच जी. एं.च्या व्यक्तिमत्त्वाचा शोध त्यांच्या कथा-विश्वातूनच घेण्याचा हा प्रयत्न आहे. लेखकाला, त्यातही जी. ए.सारख्या महान कलावंताला त्यांच्या लेखनातूच शोधण्याचा हा प्रयत्न आहे - आधाराला आहे ते जी. एं.चे स्वतंत्र कथाविश्व, "निळासांवळा" ते " पिंगळावेळ"! मूळातच जी. एं.ची कथा ऐसपैस दुहेरी पन्हयाची, तेव्हा त्यांच्या ९७ कथांतून प्रकट होणारा एखादा पैलू उघड करताना लिहिला जाणारा लेखही प्रदीर्घ होणार यात नवल ते काय?

माझी कुवत, माझा वकुब मी पूर्ण ओळखून आहे. मी कुणी विद्वान पंडित नाही, की प्रस्थपित समीक्षकही नाही. तरीही जी. एं.च्या कथासृष्टीच्या झपाटसंगतीत मला जे जी. ए. गवसलेत, जी. एं.च्या कथेचे जे आकलन झाले, जो अर्थ मला लागला आणि जी. एं.च्या कथेचे जे सूक्ष्म, तरल नवे नवे पदर माझ्या दृष्टीस पडत गेलेत, त्या अनुभवाला कवेत घेण्याचा हा प्रयत्न आहे.

जी. एं.च्या "कथे"चा एखादा घटक, एखादा पैलू स्पष्ट करीत असतानाच जी. एं.च्या व्यक्तिमत्त्वाचाही शोध घेण्याचा हा दुहेरी प्रयत्न असल्यामुळे लेखनाला घट्ट, गोळीबंद रूप आलेले नाही याची जाणीव मला आहे. सामान्य रसिक वाचकांना डोळ्यापुढे ठेवून उत्स्फूर्तपणे हे लिखाण घडत असल्यामुळे, जी. एं.च्या कथेतील उदाहरणे सविस्तरपणे आलेली आहेत. क्वचित काही वेळा तर मुद्दा स्पष्ट करण्यासाठी जी. एं.च्या

कथासृष्टीतून उदाहरणांचे संकलन दिले आहे, व त्यातील सौंदर्याची अनुभूती घेण्याचे काम रसिकांवरच सोपविले आहे. ज्यांना जी. ए. माहीत नाहीत, अशा वाचकांपर्यंत जी. ए. पोहोचविण्यासाठी हे असेच लिखाण मला आवश्यक वाटले, म्हणून ते तसे झाले. जे मूळातच जी. एं.चे भक्त आहेत अशा वाचकांच्या पसंतीसही माझे लेखन उतरेल, अशी आशा मी बाळगून आहे. जी. एं.च्या भक्तांना, रसिक वाचकांना "कृष्णचंदन", काळीजवेध", "रक्तकाळिमा" वाचताना पुन:प्रत्ययाचा आनंद निश्चितच होईल. ही शबरीची बोरे, रसिक वाचकांच्या हाती दिली आहेत, त्यांचे भवितव्य ठरविणारे खरे परीक्षक शेवटी रसिक वाचक आणि जी. एं.चे भक्तच आहेत. यात काही उणिवा, दोष आढळतील ते सर्व माझे असून, जर काही गुण असतील तर जी. एं.च्या कथासृष्टीचे आहेत!

"काळीजवेध" हे पुस्तक अत्यंत देखण्या स्वरूपात साकार केल्याबद्दल मे. डाटा स्टेन्सिल कॉम्प्युटर सर्व्हिसेस चे मन:पूर्वक आभार.

शेवटी भवभूती म्हणतो त्याप्रमाणे–

ये नाम केचिदिह न: प्रथयन्त्यवज्ञां
जानन्ति ते किमपि तान् प्रति नैष यत्न: ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो हययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।।

घनंजय आचार्य

अनुक्रम

जी. एं.च्या कथेतील जी.ए.	९
जी. एं.च्या मृत्युविषयक कथा	३०
जी. एं.च्या कथासृष्टीतील बालविश्व	५३
जी. एं.च्या 'कथे'तील दाम्पत्यजीवन	९६
कंसातील जी. ए.	१४४



जी. एं.च्या कथेतील जी. ए.

जी. एं.ची पहिली गाठ पडली त्यांच्या 'रक्तचंदन'च्या रूपाने. १९६६ साली प्रथम वर्ष बी. ए.त शिकत असताना वडिलांच्या टेबलावर 'रक्तचंदन' दिसला. सहज वाचावयास घेतला. फारसे कळण्याचे ते वय नव्हते, तरी 'राधी' मनात कुठेतरी घर करून गेली. त्यानंतर केव्हातरी 'हिरवे रावे' व 'पारवा' वाचनात आले. 'निळासांवळा' हातात पडायला १९७२ साल उजाडावे लागले. जी. एं.चे मी विकत घेऊन वाचलेले ते पहिले पुस्तक. केवळ योगायोगाने तो त्यांचा पहिला कथासंग्रह निघाला. १९७२ साली 'काजळमाया' विकत घेतले. 'कैरी'ची पहिली चव पाहिली ती 'सुगंध' दिवाळी अंकात, तर 'यात्रिक' भेटला 'सत्यकथे'त. मग मात्र जी. एं.नी वेड लावल्यासारखे झाले. जी. एं.चा प्रत्येक संग्रह, नवा कोरा करकरीत मिळो, वा दुर्मिळ झालेला, मिळेल त्या स्थितीत विकत घेऊन वाचण्याचा मी सपाटा चालविला. आज त्यांचे आठही संग्रह मजजवळ आहेत, एखाद्या मौल्यवान ठेव्याप्रमाणे. १९७७ ते १९८५ या काळात कळो न कळो जी. एं.च्या कथा मी वारंवार वाचत राहिलो. परिणामी १९८५ मध्ये पीएच्.डी.साठी 'जी. एं.च्या कथेतील प्रतिमासृष्टी आणि प्रतीकात्मकता' हा विषय घेऊन मी मुंबई विद्यापीठात नाव नोंदवले.

जी. एं.ना मी प्रत्यक्ष पाहिले नाही. त्यांना मी अजूनपर्यंत एकही पत्र लिहिले नाही. त्यांचा पत्ता मिळविण्यासाठी मात्र मला खूपच धडपडावे लागले. पत्ता मिळाला, पण अपुरा. तेवढ्या पत्त्यावर त्यांना शोधण्यासाठी पुण्यात ४-५ तास वणवण हिंडलो. योग नाही हे समजून परतलो. नंतर श्री. रामदास भटकळांना भेटलो. तासभर

मनमोकळ्या गप्पा झाल्या. पत्ता मिळाला, पण आता जी. एं.च्या समाधीचा भंग करण्याची इच्छा होईना. शेवटी त्यांच्या त्या म्हणजेच जी. ए. हे समजून घेऊन 'निळासांवळा' ते 'पिंगळावेळ' ह्या ९७ रे जाणण्याचा माझ्या परिने मी प्रयत्न आरंभिला. आज बकरी दिसली की सोनू आंगलीची 'शेळी' आठवते, तर लोकल कल्याणमध्ये शिरण्यापूर्वी तिने पत्री पूल ओलांडला की नकळत मान डावीकडे फिरते, कारण तिथे मोकळ्या जागेत पाचपन्नास गिधाडे बसलेली असतात.

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण मला व्यक्तिशः जी. एं.च्या कथांतून जसे जी. ए. दिसलेत, केवळ तसेच मी रेखाटले आहेत. हे कितपत बरोबर आहे ते फक्त जी.ए.च सांगू शकतात, वा 'जी.एं.'चे निकटवर्ती.

जी. एं.ना अभ्यस्त शब्द विशेष प्रिय दिसतात, बहुधा त्यांच्या नादमाधुर्यामुळे. प्रसंगी रूढ अभ्यस्त शब्दांच्या रूपात जी. ए. एक काना जादा देऊन बदल करतात व पूर्ण रूपच पालटतात. उदा० धपाधपा धापधाप, कचाकचा-काचकाच. गंमत म्हणजे दोन्ही रूपे जी. ए. आलटून पालटून वापरतात. प्रामुख्याने ह्या अभ्यस्त शब्दांचा वापर जी. एं.नी क्रियाविशेषणासारखा केला आहे. कधी ते विशेषण म्हणूनही येते. या अभ्यस्त शब्दांत जी. एं.चा सर्वात लाडका शब्द आहे-'दणादणा'. 'बंडाचार्याला पाहून ते वसावसा दोनदा ओरडले' (लई नाही मागणे). '...एका मोठ्या भांड्यात मासाचे तुकडे रटारटा शिजत होते.' (तळपट). 'दामू झपाझपा झाडाजवळ आला व दोन ढेंगात वर आला.' (कवठे). 'आम्ही काही बोलायच्या आतच तिने चवताळून जमिनीवर घसाघसा हात चोळले...' (मुक्ती). 'मग मला मात्र अगदीच राहवले नाही, व मी तिला सगळे भडाभडा सांगून टाकले' (कैरी). 'त्याने शेजारचा पाण्याचा तांब्या उचलून सारे पाणी घटाघटा पिऊन टाकले' (फुंका). 'गारुड्याने कमरेलाच बांधलेली टिमकी उचलली व तिच्यावर चटाचटा चार-सहादा हात मारला.' (इस्किलार). 'भाऊराव तरातरा चालत दवाखान्याकडे गेले, खडाखडा करत त्यांनी दवाखाना उघडला व दिवा लावला' (कैरी). 'तो दाराजवळ आला व त्याने चार लाथा दणादणा घालताच ते फळकुटाचे दार पाटलागासकट मोडून पडले' (फुंका). 'दणादणा काठी आपटीत, नाल मारलेले बूट बडवीत हा गुरखा रात्रभर हिंडे,....' (पुनरपि). 'काशीने चटचट दरवाजा लावला व बुट्ट्या दणादणा आत आदळल्या.' (शलॉट). 'गारुड्याने त्याच्याकडे वळून भूत पाहत असल्यासारखा चेहेरा केला व टिमकी दणादणा वाजवत म्हटले, 'शाबास!'' (इस्किलार). 'सद्या मूठभर गुलाल तोंडाला फासून घेतो व थोड्याच वेळात तसले अनेक चेहेरे मधूनमधून चड्ड्या वर ओढत दणादणा नाचू लागतात' (मुखवटा). 'मारत्याने गाडीच्या चाकाचे दोन मोठे खिळे उपसून काढले व दणादणा घराच्या छपरावर फेकले आणि हाताला लागलेले डांबर चाकांनाच पुसले' (जन्म). 'पावसाच्या धारा जाड दोराप्रमाणे दणादणा आदळू लागल्या' (वीज). 'येसूबाईने मुठी घट्ट आवळल्या व

दातओठ खात दणादणा पावले टाकत ती त्याच्या समोर आली' (कसाब). 'राधी, तू जा आता घरी. उगाच वडावडा बोलून काय करणार तू?' (राधी). 'वर चिंचेत कचाकचा दगड आपटल्यासारखा आवाज झाला च तो चमकला व बाजूच्या चौथऱ्यावर चढला' (फुंका). 'मुख्यप्रधान काचकाच तीन तास कसल्यातरी विषयावर बोलले.....' (माकडाचे काय, माणसाचे काय?). 'सैनिक पुन्हा घोड्यावर चढला व काडकाड आवाज करीत उरलेले सैनिक पुसून टाकल्याप्रमाणे नाहीसे झाले.' (इस्किलार). 'महारमांग दारात पैशासाठी वचावचा ओरडू लागले आणि दररोज एक तरी भांडण घेऊन शंकरू घरी येऊ लागला.' (राक्षस). 'इथं कुणी कुत्रं विचारेना म्हणून तिथं वणावणा हिंडलो महिनाभर.' (तुती). 'बकाबका गिळायला कधी वेळेवर न येणारी कमळी न चुकता शुक्रवारी, मंगळवारी शिवण-क्लासला जाऊ लागली.' (कसाब). 'मग पातेलेभर भात गदागदा उकडला' (शेवटचे हिरवे पान). 'त्याने दोन्ही खिसे खसाखसा चाचपून पाहिले आणि तो घाबरा झाला.' (जन्म). 'तिने जग्ग खाली उतरवताच माणसे गपागपा बाजूला झाली किंवा पांगली.' (फुंका). 'त्याने गबागबा दोन कबुतरे पकडली व सारी शक्ती ओढून वर फेकली.' (चंद्रावळ).

एका वाक्यात तीन विशेषणांचा वापर करणे हे जी. एं.च्या शैलीचे आगळे वैशिष्ट्य. त्यामुळे वाक्यातील आशयाला अधिक घनता प्राप्त होऊन वाक्य गोळीबंद होते. अनेक गोष्टी, बारीकसारीक तपशील एकाच वाक्यात सहजतेने आल्यामुळे वर्णनाचा फापटपसारा वाचतो. खरे म्हणजे जी. ए. अगदी मोजके, निवडक, फापटपसारा टाळून वर्णन करतात. ह्या लेखकापाशी सांगण्यासारखे भरगच्च अनुभवविश्व आहे, हे त्यांची कथा वाचताना पदोपदी जाणवते. जी. एं.च्या कथेत मध्येच 'कंस' का अवतरतात? बरेचदा ते रसभंगही करतात. पण त्या कंसातूनही जी. एं.मधील लेखकाची उफाळून येणारी अभिव्यक्तीच आढळते. बरेच काही सांगून, सुचवून जाते. फार मोठा आशय, अनुभवविश्वातील अनेक पदर त्या विस्तीर्ण भासणाऱ्या पण वस्तुतः छोटेखानी असलेल्या कथेत पकडण्याचा जी. एं.चा प्रयत्न सदोदित जाणवतो. जी. ए. कथेवर प्रचंड मेहेनत घेतात हे उघडच आहे. त्याशिवाय हेवा वाटण्यालायक कथा व असाधारण शैली जन्मलीच नसती. शिल्पकाराच्या तन्मयतेने, चिकाटीने, दीर्घोद्योगाने व विचारपूर्वक जी. ए. कथा घडवितात. त्यामुळे ती बांधेसूद, बोलक्या शिल्पाप्रमाणे परिणाम साधते. 'राघवेंद्रला वाटले, उद्या जर आपण नाहीसे झालो तर आपली एकही खूण येथे राहणार नाही. दुबळे, अपंग, आंधळे आयुष्य.' (पाळणा).

'अद्याप खूपच अवकाश होता. पण आत्ताच तिचे मन उत्कंठेने, हुरहुरीने, केस मोकळे सोडल्याप्रमाणे अवखळ, मोकळे मोकळे झाले होते.' (भेट). 'पण सण्णाचा आनंद शब्दांपलीकडचा होता. त्याचा पसरट, ओबडधोबड, काळ्या आळूच्या पानासारखा चेहेरा ओलसर झाल्यासारखा दिसत होता.' (चंद्रावळ).

'तलवार जास्त शुद्ध होत जात शेवटी निखळ, केवळ धार उरावी तशी आहे ती. अधीर, अतृप्त, उसळती धार!' (इस्किलार).

प्रवासी उद्वेगाने उद्‌गारला, 'हेच असं शेवटी होणार, हे जर मला माहीत असतं तर सारा जंजाळ तरी मी स्वीकारला नसता.... विशेष म्हणजे माणसांच्या खऱ्या, मलिन, भीषण दर्शनाच्या प्रायश्चित्तात सापडलो नसतो.' (प्रवासी).

'मी फक्त वदंताच ऐकत असतो सेनानायक-सत्य नाही. एकदा काही तरी सत्य झालं की ते स्थिर, जड, चैतन्यहीन होतं, तर वदंता ही सदैव नवनवोन्मेषशालिनी असते (विदूषक).'

'ती भजी मऊ, गरम, मसालेदार असावीत' (कैरी).

'बाळ हा त्यांच्या मनावरचा मळकट, हिरवा, घाणरेडा पडदा होता.' (पडदा)

'तुळसाने पाने घेतली व कमरेला खोचलेल्या लाल चंचीत खुपसली. पाने मुळीच वाळली नसून स्वच्छ, चांगली, राघूच्या पंखासारखी होती.' (कैरी).

'त्या शुभ्र सळसळीत निर्दय वाळूत त्यांचा प्रवास सुरू झाला.' (गुलाम).

'मुशाफिराने आता चौथऱ्यावर मान ठेवली, पण त्याला अगदी राहवेना.... आणि त्याच्या हसण्याचा आवाज आता अगदी कुबड्याच्या आवाजाप्रमाणे होता- चिंबलेला, शरण, उमज पडलेला.' (गुलाम).

जी. एं.ची शब्दकळा प्रसंगानुरूप अस्सल गावरान मराठमोळ्या स्वरूपात प्रकट होते तेव्हा तिचे 'दर्शन' बघण्यालायक असते. तिच्या अस्सलपणात मग कुठलीही तडजोड नसते. त्या रांगड्या दर्शनाने, तिच्या शिवराळपणाने दूधभात आणि भेंडीच्या भाजीवर वाढलेल्या कोंबडीमनांना कदाचित बिचकायलाही होत असेल, पण जीवनाचा हाही एक रांगडा भाग आहेच. ह्या रांगडेपणाला बिभत्सपणाचा उपसर्ग पोचलेला नाही हे विशेष. मेंदूपर्यंत झिणझिण्या पोचविणाऱ्या लसणाच्या ठेच्याप्रमाणे ही जी. एं.ची झणझणीत शब्दकळा खास मराठी मातीतील आहे.

गारुडी प्रवाशाला म्हणतो, 'येथे जमलेल्या माणसांनी माझा खेळ शंभरदा फुकट पाहिला. एखादा दगड हगेल, पण त्यांच्या हातून कवडी सुटायची नाही!' (इस्किलार)

रामण्णा पोलिसाने मारत्याला पुढे ढकलले व म्हटले, 'असले धंदे करायला लागलास काय रे माकडा! आता पळ ढुंगणाला पाय लावून. इथं पुन्हा सापडलास तर खबा करतील ते लोक.' (जन्म)

यमनीने त्याच्यासमोर वर्तुळाकार हात नाचवले. ती म्हणाली, 'गावजेवण घालणाऱ्या घुबडाचं तोंड बघ! तुझ्या घरी दगडाचं जातं उपाशी मरेल! मग हा भोपळा काय तुझ्या ढुंगणातनं पडला व्हय रे सोदया?' (फुंका). मल्हारी मुलाला समजावून सांगतो, 'भैऱ्या, सगळं इतकं सरळ केळीच्या सोटासारखं असतंय होय कधी! तो शामराव पेटला, त्याने तळतळाट केला. वचावचा करून ढुंगण हापटलं हे खरं. पण

ते सगळं तेवढ्यापुरतंच. तो माणूस मुळात अगदी डरपोक आहे. शेंबूडकिड्याने शिंगे दाखविली, तर धोतरात पच्चदिशी मुतणारा माणूस तो!' (अंजन)

'तो काय ब्रेड खातोय बोकडलेंडीचा!' सगळ्यांकडे वळून सदूभाऊ म्हणतो.

'..... घरी गेल्यावर बायको त्याला बाटलीत घालून बूच घालते की काय कुणास ठाऊक!' (गुंतवळ)

'जारे, माझा सब्जी नर घेऊन ये' पदमजी म्हणाला, 'आणि बघ जर तुझ्याकडून निसटला बिसटला तर कुल्लेच कापीन!' (चंद्रावळ)

दानय्याला मनापासून वाटते, 'मी गेलो तर वस्तीतला कृष्णगोल्लच संपला. मग राहिला सगळा रांडावळा. गवत कापणारी, मोलमजुरी करणारी, मोटरीची ढुंगणे धुणारी सगळी किरडू कुणबटे!' (तळपट)

दादूभट म्हणतो- 'चला रे पोरांनो, आता शेंगदाणे संपले. पळा बघू एकेकजण ढुंगणाला पाय लावून!' (अंजन).

गणेशवाडीभट गणु शिंप्याला म्हणाला- 'तू चिंधीचोर तेवढा उपटसुंभासारखा मला शिकवायचा बाकी राहिला होतास बघ! अरे, त्या कुत्र्याला काही खायला दिलं, तर ते जाणेल तरी. मी मरायला लागलो तर एकदा येऊन जाईल, घसा ताणून ओरडेल तरी. पण तुमच्यासारख्यांची ढुंगणं धूत जन्म काढला, तर करंगळीवर तुम्ही मुतायला तयार होणार नाही, डुक्करचंदानो! अरे लडदू, चार कुत्री भोवती ठेवून फोटो काढून घ्यायला दत्ताला लाज वाटली नाही. एक कुत्रं बरोबर घेऊन हिंडायला मला सोट्या रे कसली लाज?' (राघी)

कुणी तरी म्हणाले, 'आला रुमालवाला मोठा बाजीराव! बकरं हागल्यासारखं बोलला आणि लेंड्या टाकून बीळ बंद करून बसला.' (तळपट).

फाटक्या तोंडाचा गणेशवाडीभट ऐन दत्तजयंतीच्या दिवशी शेजारच्या खेड्यात जत्रेला जातो, तेथे कुस्त्यांची दंगल पाहून धोतराचा काचा मारून तासभर मातीत हुंदडतो. त्या लोकांनी कौतुकाने दिलेले लाल फडके घेऊन दत्ताच्या पूजेसाठी तो येतो पाच वाजता.

'भटजी, दत्तजन्म करण्याची ही वेळ आहे की काय?' भुकेने तळमळत असलेल्या परशाने धीटपणं म्हटले.

'अरे जारे जा फुसकीच्या! मला आलाय विचारायला!' गणेशवाडीभट खवळून म्हणाला, 'दत्तारामाचा जन्म अमुक वेळी झाला, अशी त्यांच्या आयांनी काय येऊन तुमच्या कानात कुजबुज केली होती काय रे भडव्यांनो? दत्त जन्मतही नाही, संपतही नाही. संपतो तो दिवस. तुम्हाला लेको खादीला उशीर झाला, म्हणून तुमची ही ओरड! जा आता घरी आणि पिंडाएवढे गोळे गिळून पडा मढ्यासारखे! म्हणे ही वेळ की काय!' (राघी)

संताप व्यक्त करताना जी. एं.च्या व्यक्तिरेखा 'मसण' शब्द वापरतातच, पण जी. एं.ची सहानुभूती, त्यांचे प्रेम जेव्हा त्यांच्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून व्यक्त होते तेव्हाही 'मसण' हाच शब्द येतो.

'पुनरपि' ह्या कथेत दादांचा मृत्यू होतो. निरोप द्यायला हाताशी कुणी नाही. एकाकी माई पलंगावर अंग थोडे सैलावतात. पावलांखालचे मऊ हलू लागताच त्या भेदरून दिवा लावतात. त्यांची 'लाडकी' मांजरी व तिची चार पिले पाहून माईच्या मनात कोमल आपुलकी जागी होते. दादांच्या मृत्यूच्या आठवणीने लाडलीचा विलक्षण संतापही येतो. 'तिला वाटले, सटवे! अगदी पांढऱ्या पायाची आहेस बघ! तुझ्याविषयी त्यांनी दोनदा चौकशी केली, तेव्हा तू कुठे मसणात जाऊन बसली होतीस कुणास ठाऊक?' पण या संतापात, त्राग्यात आहे ती निखळ माया. लाडलीला शोधण्यासाठी माईनी सारे आवार पालथे घातले होते. आणि ती उगवली ती आता दादांचे सारे संपल्यावर.

'पण मग ती कुठलीतरी मसणी ग्रामोद्योग संस्था निघाली. त्या ठिकाणी दररोज एक रुपया देऊन शिवणकाम शिकवत.' परवा परवापर्यंत मळके परकर नेसून लोकांच्या घरी भांडी घासणारी कमळी नजमाबरोबर शिवण क्लासला जाऊ लागली. पुंघरवड्याच्या आत तिच्या अंगावर झकपक पातळे दिसू लागली. पाठीवरचा पदर खांद्याच्या टोकाला ठेवून ती पाठ उघडी दाखवत, निर्लज्जपणे मांड्या मोडत रस्त्यावरून चालू लागली. ज्या शिवणक्लासमुळे कमळीचे हे असे रूप पालटले तिच्याबद्दलचा संताप आणि त्याचवेळी सोनू आंगलीबद्दलची जी. एं.ची सहानुभूती इथे 'मसणी'तून व्यक्त होते. (कसाब)

'ती कुठली मसणी गिरणी सुरू झाली, तिची घरेदारे उभी राहिली, आणि मैलच्या मैल गवत संपून गेले. काल-परवापर्यंत गावरान असलेली जमीन बघताबघता कोणा ना कोणाच्या तरी मालकीची होऊन बसली, आणि या घळईतील आयुष्यच संपून गेले.' रामण्णा आणि त्याच्या जमातीबद्दलची जी. एं.ची सहानुभूती इथे व्यक्त होते ती 'मसणी गिरणी' ह्या शब्दप्रयोगातून.(ठपका)

जी. एं.चा मनपसंत शब्द म्हणजे 'लडदू'! 'अरे सदूभाऊ, आरसा आणल्यावर त्या भीम्याला लुगडं नेसव, आणि नाचव त्याला आरशासमोर. म्हणावं तुमचा तो बालगंधर्व, तर हा आमचा लडदू गंधर्व!' साळवेकर मास्तर म्हणाले व मिशा फुरफुरत अर्धा तास हसत बसले. (माघारा)

दाण्यांवर हात मारणाऱ्या पोराचा हात नेमका पकडून काशी पिरगाळते. पोर रागाने पाहू लागते. 'का रे लडदू, हाडंच सैल करीन की!' काशी चिडून म्हणाली. (शलॉट)

जे मेल्याने कोणाचाही डोळा ओलावणार नाही, असेल कुठले माणूस चांदगावात

आहे सखारामला समजेना. घुम्म बसलेल्या गावकऱ्यांवर तो ओरडला, 'काय सर्व्यांचीच तोंडं गेली काय लडदूंनो, बोला की! का मीच जाऊ मान कापून घेऊ हणमंतभावीत?' (बळी)

'पण केशवरावाविषयीचा संताप अद्याप त्याच्यात घुमसत होता. या लडदू गलपोजीला त्याने पूर्वी कधी पाहिलंसुद्धा नव्हते.' (कसाब)

वाटवे वकिलाच्या बायकोने आपल्याला मुद्दाम खिजवले तर नाहीना अशी शंका राधाबाईला येते आणि कमलचे हसणे बघून तर ती चिडून स्वत:शीच पुटपुटत चालू लागते. '... तूच स्वत: आहेस लडदू दुधी भोपळा! तीन तुकडे केले तर वडारांचे देखील होईल एक गावजेवण!' (व्यथा)

'गिजबिज' हा त्यांचा दुसरा आवडता शब्द. 'त्याच्या प्रकाशाने ताटाला गिजबिज प्रकाशरेषा दिसत होती.' (अंजन)

'आता संगा निर्धास्तपणे खाली टेकला तेव्हा त्याला जाणवले की, चेहरा घामाने ओलसर झाला आहे. व हातपाय ओरखड्यांनी गिजबिज जळत आहेत.' (फुंका). 'डांबरी रस्त्याचा पट्टा काळ्या रिबनप्रमाणे ठिकठिकाणी झळझळीत दिसू लागला, अणि पाटीवर गिजबिज करावी तशी त्यावर दिव्यांच्या प्रतिबिंबाच्या वेड्यावाकड्या रेषा दिसू लागल्या.' (निरोप). 'प्रमुख आदेशात काहीतरी गफलत झाली नाही ना?' अंगावर अनेक खोल जखमा असल्यामुळे अगदी गिजबिज दिसणारा एक माणूस धैर्याने म्हणाला. (कळसूत्र).

'झाडांची दाटी वाढू लागली व अंधारावर गिजबिज होत असल्याप्रमाणे रातकिड्यांचा आवाज उमटू लागला. (प्रवासी)

'दिक्काला' हा तिसरा आवडता शब्द. 'शेवटी रामण्णानेच घोगऱ्या आवाजात त्याला म्हटले, 'जा बाबा आता! यापुढे तुझी भाकरी दुसऱ्या दिक्काला!' आणि त्याला पुढे ढकलले. (ठिपका). 'त्यावेळी वस्ती त्या दूर दिक्काला मल्लिकार्जुनाच्या माळावर होती.' (तळपट). 'कुवेट? कुठे दिक्काला आहे ते गाव की तो देश?' (पुनरपि). 'कधी आपल्या गावाची वेस न ओलांडलेला माणूस.... कारवा पाहताच आपल्या माणसांचा निरोप देखील न घेता त्याच्याबरोबर चालू लागतो, ... आपल्या जादूच्या रस्त्याने भटकत कोठेतरी दिक्कालापलीकडे विरून जातो.' (इस्किलार)

याशिवाय जाणवलेले त्यांचे आवडते शब्द म्हणजे गुंतवळ, मुडदूस, मिटकी हे होत.

जी. ए. पैशाची किंमत पूर्ण जाणून आहेत, पण त्याबरोबरच अकादमी पुरस्कार त्यांनी परत केला हेही लक्षणीय. त्यांच्या अण्णारावांना पूर्ण माहीत आहे की, 'पैसा हेच एक लक्षण सगळ्यांनी स्वीकारले आहे. काही जणांनी उघडपणे तर काहींनी व्यभिचारी स्त्रीच्या अंधारवृत्तीने, एवढाच फरक!' (तक्षक). 'या नोटा. यांना किंमत

आहे, त्यांना पाहिल्यावर लोकांच्या तोंडावर हसू दिसते.' हे नाना जाणून होते. (अखेरचा दिवस). शिकवण्या घेणाऱ्या शिक्षकांचा उल्लेख जी. ए. उपरोधाने 'शिकवणीलक्ष्मीधर' असा करतात. (माणूस नावाचा बेटा). त्याबरोबरच अखेरच्या क्षणापर्यंत प्रामाणिक निष्ठेने काम करणाऱ्या नाडगौडा मास्तरांची उत्कट व्यक्तिरेखाही जी. एं.नी 'सांगाडा' ह्या कथेत रेखाटली आहे.

'माझा देश येथून हजारो कोसांवर आहे. तो अतिशय घरंदाज आहे व त्याला अनेक शतकांची कुलिनता आहे. इतर माणसे फक्त आयुधेच म्हणून दगड वापरत असता आम्ही त्यावर देखण्या आकृत्या कोरल्या, अक्षरे खोदली; इतर माणसे जनावरांची शिकार करताना केवळ ओरडण्यासाठीच आवाजाचा उपयोग करत असता, आमच्या कवींनी सागरांची गर्जिते गायली, सौंदर्यस्तोत्रे लिहिली. तेथील आभाळ वितळलेल्या नीलमण्यासारखे आहे, आणि तेथील एखाद्या घरात सूर्यप्रकाशाचा कवडसा उतरला तर त्यांत अणूरेणू दिसणार नाहीत. माझ्या त्या देशांत, संगमरवरी सुबक खांबांची अनेक मंदिरे आहेत. तेथील आरसपानी तलावात हंस पोहतात आणि तेथील स्त्रिया सुरेल संगीतासह नृत्य करत असता त्यांच्या पावलांखाली कमळ ठेवले तर त्याच्या पाकळ्या दुमडणार नाहीत.' (गुलाम). देशप्रेमाने, देशाविषयीच्या सार्थ अभिमानाने ओतप्रोत भरलेला हा उतारा जी. एं.ची ह्या मातीवरील असाधारण निष्ठा व्यक्त करावयास पुरेसा समर्थ आहे. जी. एं.च्या 'निळासांवळा' ते 'पिंगळावेळ' ह्या आठ कथासंग्रहातील ९७ कथांत फक्त मंदिरांचाच वारंवार उल्लेख येतो, मशीद वा चर्चचा उल्लेख येत नाही. काही कथांतून मंदिरांची सविस्तर वर्णनेही आली आहेत. या मंदिरांची विविधताही मन थक्क करणारी आहे. वैजनाथ शाकंबरी, बन्सीधराचे देऊळ, नारायणाचे देऊळ, जखणाई, दत्ताचे देऊळ, कपिलश्वर, प्राचीन भग्न मंदिर (रत्न), विरेश्वराचे देऊळ, शैलेश्वराचे मंदिर, महादेवाचे देऊळ, शिवालय, हणमंताचे देऊळ, काळम्माचे देऊळ, भग्न शिवलिंगाचे देऊळ, रानमारुतीचे देऊळ, श्री शैलश मंदिर, रक्ताक्षी मंदिर, प्राचीन उपमंदिरे, गृध्रराज मंदिर, हरिमंदिर गणपती, वीणापाणीचे देऊळ, मुरलीधराचे देऊळ, 'बाधा'तील प्राचीन देऊळ, रामाचे देऊळ, बसवण्णाचे देऊळ, विठोबाचे देऊळ, मारुतीचे देऊळ, रुद्रकाली मंदिर, 'इस्किलार'मधील शुभ्र संगमरवरी मंदिर, सुताराची लक्ष्मी, नवस्या मारुती, वेताळाचे देऊळ, नाथाचे देऊळ, हरेश्वर, गणेशाचे देऊळ, रामलिंग, मरगाई, शिवनाथ, माळमारुती, रामतीर्थ, दुर्गाई, बैरागी मारुती आणि शंभू देऊळ. जी. एं. च्या कथेचा विचार करताना, तिच्यात मंदिर हाही एक महत्त्वपूर्ण घटक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कुठल्याही प्रकारच्या प्रचारकी थाटापासून अलिप्त असलेल्या जी. एं.च्या 'कथे'तील वरील उतारा व मंदिरांचे हे संपन्न विश्व जी. एं.च्या धार्मिक वृत्तीवर प्रकाश टाकून जाते.

जी. एं.च्या 'कथे'तील प्राणीविश्व समृद्ध आहे. पण त्यातही जी. एं.चे सर्वाधिक

आवडते प्राणी दोन. गाय आणि कुत्रा. गाय आणि कुत्रा ह्यांच्यावरील जी. एं.ची माया त्यांच्या व्यक्तिरेखांच्या द्वारा अनेक कथांतून पाझरताना आढळते. जी. एं.नी 'गाय' एवढ्या ताकदीने रेखाटली आहे की जी. एं. ची कथा म्हटली की गायीची आठवण यावीच. 'तुती' मधील 'कृष्णी' गाय आणि 'वीज'मधील 'गंगी' गाय मनात कायमच्या घर करून बसतात. नाना आणि कृष्णी, बळवंत मास्तर आणि गंगी यांच्यामधील माया मन हेलावून सोडते. नानांच्या आजाराचे कृष्णीला कसे समजते कोण जाणे, पण दोन चार दिवसांतच ती हबकते. रात्री टाकलेल्या तीन पेंढ्यांपैकी मूठभर गवत देखील ती संपवत नसे. डोळ्यांतून पाणी पाझरवत एक दिवस ती संपून जाते. डोळे पाणावणारा हा प्रसंग गंगी गाय विहिरीत पडल्यावर बळवंतमास्तर जी धडपड करतो, सिद्रामला उठवतो, स्वत:च्या दुबळेपणाने मुडदुसाप्रमाणे रात्रभर विहिरीजवळ बसून राहतो आणि गंगी खड्ड्यात कायमची आडवी झाल्यावर ती माळ्याची विहीर बुजवण्याचा एकाकी, दुबळा प्रयत्न करतो, ते सगळेच मन हेलावून सोडणारे आहे. कुत्रा, ठिपका, अंजन, 'वंश', 'माणूस नावाचा बेटा', 'गुंतवळ', 'राधी', 'वस्त्र' या कथांमध्ये प्रामुख्याने नजरेत भरतो. इतरही काही कथांमध्ये 'कुत्र्या'चे उल्लेख येतात. 'राधी' या कथेत गणेशवाडीभट गणू शिंप्याला 'काळे' कुत्र्याबद्दल जे खडसावतो, त्यातून जी.एं. चे 'कुत्र्या'बाबतचे मत स्पष्ट होते. 'तक्षक'मधील अण्णारावांना देखील वाटते, 'आपले सारे व्यवहार माणसांशी झाले हेच चुकले. त्यापेक्षा एखादे कुत्रे पाळले असते, तर ते या वेळी भुंकून हैराण झाले असते. इथे उंबऱ्यावर आपल्यासाठी धडपडत मेले असते!' करेव्वाची तिच्या कुत्र्यावरील माया, त्याला मुन्सिपालिटीच्या लोकांनी विष घालून मारल्यावर तिचा झालेला तडफडाट, मिस् डिसोझा आणि तिचा टॉमी यांच्यातील भावबंध, नाईकवर प्रेम करणारा त्याचा किंग, राधीने पाळलेले 'काळे', काळेवर प्रेम करणारा छोटा कथानायक, गणेशवाडीभट, काळेला लोकांनी मारले हे कळताच उग्र अवतार धारण करणारी राधी, रामण्णा आपल्याबरोबर का येत नाही हे न समजून, त्याच्या पायात घुटमळणारे कुत्रे– या सगळ्यातून कुत्र्याची आपल्या मालकावरील अकृत्रिम माया, त्याची असाधारण निष्ठा व्यक्त होते.

'यात्रिक'मध्ये डॉनच्या रूपाने जी. ए. म्हणतात, 'म्हणजे बघ, समोर जे दिसते ते एकपदरी कधीच असत नाही. तू जितकी रुपके वापरतोस, तितके त्याला जास्त पदर सुटत जातात. जिच्यामुळे एकही रुपक सुचत नाही ती वस्तू नव्हे; ज्याला एकही रुपक सुचत नाही तो माणूस नव्हे' शब्दाचे सामर्थ्य जी.ए. जाणून आहेत, म्हणून 'विदूषक'मध्ये ते म्हणतात, 'शब्द म्हणजे स्वर-व्यंजनांचा क्षुद्र शृंगार नव्हे. परमेश्वराप्रमाणं प्रतिसृष्टी निर्माण करण्याचं सामर्थ्य शब्दांमध्ये असतं.' कथा आणि त्या कथेतील शब्द कसे असावेत? जी. ए. 'घर'मध्ये 'माई'च्या माध्यमातून सांगतात, 'आता शिवलीलामृताचंच उदाहरण घे. त्या कथा मी फार आवडीनं वाचे. काही वेळा

तर पुढं वाचू नये असा माझा गळा भरून येत असे, आणि ते शब्द तरी किती माहेर घरगुतीपणानं येतात, माहीत आहे? बोटांतून झरझर रांगोळी पडत जावी, अगर गाईला पान्हा फुटावा तसे कथांना शब्द येत जातात.' 'हिरवे रावे'ची अर्पणपत्रिका इथे आठवते. जी. एं.चे बालपण, त्यांच्या कथेतील अंतस्थ स्त्रोत आणि त्यांची 'आई' इथे दर्शन देऊन जाते.

कै. तीर्थरूप ताईस
रात्री उशीरा घरकाम करताना
तुला सोबत व्हावी म्हणून
लहानपणी मला समोर बसवून
तू पुष्कळ कथा सांगितल्यास
आता तू गेल्यावर
मला त्या कथांची सोबत आहे.

चंद्रसेनेचे रामाला उद्देशून, 'माहीत नव्हते थोर होऊनी असे फसवाल,' लक्ष्मीपार्वतीच्या भांडणाचे, 'भोळा ग माझा सांब, लक्ष्मी, उगीच निंदू नको.' (भोवरे). कृष्णाचे गाणे 'अवकाळी मृग आला, करुणा आली त्या म्हातारीला', 'गाय-वाघाचे' गाणे, (राधी). बालकवींच्या कविता, विशेषतः औदुंबर, (माणूस नावाचा बेटा). सावळ्या तांडेलची नाट्यमय सुरुवात, चिपळूणकरांचे अरेबियन नाइट्सचे भव्य भाषांतर, मोरोपंतांची कविता (अखेरचा दिवस). ही आहे जी. एं.ची आवड! तुकारामाच्या अभंगाबद्दल जी. ए. लिहितात- 'शबरीने गोड फळे निवडली तसा तुकोबाने रसाळ शब्दांचा संसार मांडला. त्यातील चोखपणा निराळाच. त्यांचाच आनंद बावनकशी.' (सांगाडा). जी. एं.चा इंग्रजी वाङ्मयाचा जबरदस्त व्यासंग प्रकर्षाने जाणवतो तो 'पडदा'मध्ये.

'कोड' हा रोग जी. एं.ना कुठेतरी तीव्रतेने खटकत असावा. त्यामुळेच स्तनांच्या खाली वीतभर रुंद असा पांढरा निर्जीव अमंगळ डाग पाहून, सहजप्राप्त असलेल्या मालतीचा भोग बुभुक्षित श्वापदाच्या निखळ रानभुकेने तिच्यावर तुटून पडलेला सदानंद घेत नाही. उलट त्याची वासना क्षणात ओसरते व त्याला मलिन वाटू लागते. (स्वप्न). तर मानेवर कोड दिसताच सर्पाचे तोंड दिसल्याप्रमाणे माधव दचकतो आणि कर्कशपणे बोलून मेधाला तोडून टाकतो. माधवचे सारे प्रेम क्षणात आटते. मेधाकरता एक फुललेला, पूर्ण अनुभव संपतो. (रातराणी).

'इस्किलार'मध्ये क्रिसस म्हणतो, 'मित्रा, ज्याने मद्य कधी घेतले नाही, त्याने आयुष्यातील एक अद्वितीय अनुभव यावा म्हणून ते घेतले पाहिजे. ज्याने ते घेतले आहे त्याने तो आनंद पुन्हा मिळावा म्हणून ते घेतलें पाहिजे. द्राक्षधर्म असा एकच एक धर्म आहे की ज्याच्या संस्थापकाला अनुयायी मिळवण्यासाठी चमत्कार करून दाखवावे लागले

नाहीत की शब्दांच्या अवडंबराचे तत्त्वज्ञान निर्माण करावे लागले नाही. तो एकच धर्म असा आहे की ज्याचे अनुयायी धार्मिक होताना चार दिवस पाण्यात पडलेल्या प्रेतासारखे दिसत नाहीत.'

'पातळ तपकिरी जाळाप्रमाणे रम अंगावर पसरली.' 'पहिल्या घोटानंतर तांबूस उष्ण पट्टी साऱ्या अंगभर पसरली, आणि गळ्यात धारदार चव राहिली. पण ती सुखाची होती.' रामदास दिवगी डॉ. फाटकांच्या खिशात 'डॉक्टर्स' व्हिस्की ठेवतो.(सोडवण).

'ती जळजळीत पातळ आगीची रेषा घशातून उतरत खाली पोहोचताच त्याचे सारे अंग सुखाने सैलावते.' (अंजन). 'जणू याच क्षणासाठी सारा दिवस जागवल्याप्रमाणे त्याने 'ओल्ड स्मगलर'ची तीन बाजूंनी चेपलेली बाटली काढली. तिच्यात अद्याप दोन पेग तरी धग होती. त्याने ग्लासात थोडी व्हिस्की घेतली, तिच्यात होय की नव्हे एवढे पाणी घातले आणि बाटलीकडे पाहात मोठ्या उत्साहाने म्हटले, 'चीअर्स, ओल्डबॉय!' तो कुठला कोण स्कॉटलंडमधला इरसाल म्हातारा, पण त्याच्या बाटलीने त्याला येथे पंधरा दिवस तगवले होते.' (स्वप्न). 'डायनायसस'ची ही मानवाला मिळालेली देणगी जी. एं.ना अपरिचित नसावी.

दादासाहेब 'प्लेअर्स' सिगरेट ओढतात. (पारधी). बापू काळुस्कर मुंबईला उंची सिगरेटचे डबे विकत घेतो. (गिधाडे). प्रिन्सिपाल ठकार सोन्याचे रेषाकाम असलेली पाइप वापरतात(पडदा). डॉ. देशपांडे साऱ्या आयुष्यभर एकाच व्यसनावर आसक्तीने प्रेम करतात- सिगरेटवर! (घर). 'सगळे डॉक्टर गेले खड्ड्यात! या अवस्थेतदेखील दादांनी विडी, तपकीर आणि वाचन ही आपली तीन व्यसने हट्टाने चालू ठेवली होती.' (पुनरपि). अण्णारावांना चालू क्षणाचा विसर पाडणाऱ्या सिगारेटच्या संगतीची फार जरूरी वाटते. (तक्षक). मुंबईत नवीन आलेला दामू आधी वेळ घालवण्यासाठी व नंतर सवयीने सिगारेट ओढू लागतो. (हिरवी मखमल, गोरा हात). 'माणूस नावाचा बेटा'मध्ये तर जी. एं.नी सिगरेटवर छोटेखानी गद्यकाव्यच दिले आहे. 'पण एकदा चारमिनार घेतल्यावर तिच्यातील कैफ दुसऱ्या कशातच येणार नाही. राग, निराशा, विषण्णता या कोणत्याही वेळी चालणारी एकच सिगरेट म्हणजे, बस्स, चार मिनार! चांगले जेवण झाल्यानंतर (जेवण म्हणजे अर्थात् कोंबडीचे. नाही तर बाकीचे जेवण काय, आहे आपले यज्ञकर्म!). प्लेअर्सला एक भावोत्कट गंध असतो. मन स्वप्नाळू होते. पण सुपरवायझर उगाचच मिशा फरफरू लागला की जेहेत्ते तेथे त्याचे काम नाही. तेथे चारमिनारच पाहिजे. एखाद्या वडारणीच्या आडदांड आलिंगनाप्रमाणे रासवट उग्र दर्पाने निदान सारे मन ब्रश मारल्याप्रमाणे होते. साऱ्या विषयावर निगरगट्टपणे वापरता येणारी चारमिनार हे सिगरेटमधील सुनीत आहे!' सिगरेट हे जी.एं.चे आवडते व्यसन आहे. १९८६च्या 'ललित' दिवाळी अंकात 'जी. एं.ची पत्रे' ह्या लेखात प्रा. म.द. हातकणंगलेकरांनी ह्याचा निर्वाळा दिला आहे.

जी. एं.ची चित्रकलेतील जाण, संगीतातील आवड 'भेट'मध्ये व्यक्त झाली आहे. जी. एं.ची रंगसंवेदना, त्यांची टापटीपेची आवड, चित्रकलेतील जाण, त्यांचा व्यासंग, त्यांचे चौफेर वाचन, त्यांचा नेटकेपणा 'पडदा' कथेतील प्रिन्सिपॉल ठकारांच्या रूपाने जाणवून जातो.'रंगसंगती ही एखाद्या गीताप्रमाणे आहे. एका बेसूर रंगाने सारे रंग कोसळून मृत होतात, ही गोष्ट या लोकांना समजणार तरी कधी?..... एखादा गोष्टीचा आग्रह धरून लोकांना पटवून द्यावी एवढा लोकांविषयी आदर त्यांना कधीच वाटला नव्हता.' 'त्यांनी स्वत:च्या साऱ्या सूटांचा रंग सूर्याच्या बदलत्या आकाशात दहा वेळा तपासूनच पसंत करण्याची पद्धत ठेवली होती.' 'थॉम्पसन्, फ्लेकर, बुर्टन, गॉटिए, लिओपार्डी, ग्रीक ॲन्थॉलॉजी, चिनी कविता, त्या साऱ्या पुस्तकांना काही विशिष्ट जागा होत्या. त्या त्या ठिकाणीच त्यांचे जग मूर्तीच्या डोळ्यातील माणकाप्रमाणे ज्वलंत तळपत असे. थॉम्पसन् कवीच्या बाजूला फ्लेकर कवीचे 'हसन' नाटकच हवे. आर्त, विव्हल मन, पौर्वात्य जीवनाच्या कल्पनेशेजारी, धुंद, रगेल, बेबंद लकेरीच्या बाजूलाच सारखे तळमळत आहे. या विरोधातच जीवनाची कलात्मक संगती आहे.' थॉम्पसन करड्या रंगाचा, तर फ्लेकर काळसर लाल रंगाचा. बर्टनच्या पुस्तकाला पिवळसर हिरवा रंग होता. सारी एकत्र असता मोरपिसावर लाल रंग टाकावा त्याप्रमाणे वाटे.' (डेगा, होकुसायची चित्रे). जी. एं. नी उलगडून दाखविलेले त्यांचे सौंदर्य मूळातून वाचणे इष्ट.

एक अप्रतिम गद्यकाव्य जी. एं.नी 'स्वामी'मध्ये रेखाटले आहे. जी. एं.चा सारा आशावाद, त्यांचे कोमल मन ह्या गद्यकाव्यातून शब्दागणिक पाझरत आहे. 'तू असाच वर जा' हे ते गद्यकाव्य, 'स्वामी' कथेचे आणि तिच्या निर्मात्याचे पताकास्थान होय.

जी. एं.ना कधीकधी मजेदार प्रश्न पडतात. त्यातूनही त्यांच्या मनाचे पदर उघड होतात. 'सारे तत्त्वज्ञ हडकुळे का असतात, हे गूढ मला कधी उलगडले नाही.' (इस्किलार). 'मुले झोपली असता मुठी का झाकतात?' (निरोप). 'या पाऊलवाटा नेहेमीच अशा तिढ्या वळणाने का बरे जातात? सरळ धाग्यासारखी एकही पाऊलवाट कधी दिसत नाही हे कसे?' (ठिपका). 'बातम्या काही नसतानाही हे शहाणे लोक दररोज चार सहा पाने जशीच्या तशीच कशी काय भरून काढतात....' (स्लीला). 'माणसाला काय आवडावे यालाही मर्यादा हवी. उदबत्तीचा वास; ताज्या दुधाचा वास; खाताना हात राडेराड करणारे ते थबथबीत कुरूप फळ आंबा; उसाचा रस; एखाद्या सभेला जाऊन घाणेरड्या घोळक्यात मढ्याप्रमाणे उभे राहणे; चिकट, गुळचट बासुंदी मोठ्या चवीने ओरपणे; अरबिंदोचे पिठाळ लेखन; शेंगदाणे, चुरमुरे खाणे; असल्या गोष्टी माणसांना आवडतात तरी कशा?' (पुरुष). एक प्रचंड अंडे उकडून ठेवले आहे अशा चमत्कारिक पद्धतीने लोणी दुकानात मांडायला पाहिजे की काय? (हिरवी मखमल, गोरा हात).

जी. एं.ची रंगांची जाण, त्यांची रंगसंवेदना त्यांच्या कथांतून सतत जाणवत

राहते. विविध रंगांची रंगपंचमीच त्यांच्या कथाविश्वात आढळते, पण तरीही त्यातल्या त्यात जी. एं.चा सर्वात प्रिय रंग कोणता? तर तो आहे- निळा! त्यांचा पहिला कथासंग्रह- 'निळासांवळा' आहे, हेही इथे लक्षणीय! जी. एं.वर बालकवींचा प्रभाव जाणवतो. जी. एं.नी 'औदुंबर'चे रसग्रहण 'माणूस नावाचा बेटा' ह्या कथेत केले आहे, ते मुळातून वाचणेच योग्य. बालकवींप्रमाणेच भाषाप्रभू गडकऱ्यांच्या शैलीची आठवण करून देणारे 'राणी' ह्या कथेतील भाऊचे स्वगत आहे. जी. एं.च्या मनावर निळ्या रंगाचे रेशमी वस्त्र सतत सळसळत असावे असे वाटते.

'निळ्या खड्याची आंगठी चंद्रज्योतीतील चांदणी निसटावी, त्याप्रमाणे झगमगली' (अंजन). 'तेथे धूर कुंद भरला होता व त्याची एक गुंडाळी डाव्या बाजूच्या खिडकीतून मळकट निळ्या वस्त्राप्रमाणे लांब पसरत होती.' (कांकणे). 'निळसर रंगाच्या संगमरवरी छतातून जाळीदार नळातून गरम पाण्याचे झरे अंगावर पडू लागताच सुखद अशा स्वच्छतेने तो भारल्यासारखा झाला' (स्वामी). 'आणि तेव्हापासून सतत उदबत्त्यांचा धूर मंद सुगंधी निळसर रंगाने त्यांच्याभोवती तरळत होता.' (प्रदक्षिणा). 'वास्तविक कावेरीला निळी रेशमीकाडी कांकणे फार आवडायची.' (कांकणे). कथानायकाला वाटते की तानीमावशीला निळे लुगडे छान दिसते. मोठा झाल्यावर तो तिला तसले नवे झगझगीत चमकणारे लुगडे घेवून देण्याचे ठरवितो. (कैरी). 'मोर काय असं वाटेल त्या वेळी दिसत्यात? अशी येत्यात, अशी जात्यात. हिरवी निळी वीज असत्येय राव ती वीज!' (कैरी). 'सोप्याला चंद्राप्रमाणे दिसणारा मोठा निळा दिवा लावला.' (रातराणी). 'पाय घसरून पडल्यामुळे कथानायकाचा आवडता पांढरा सदरा आणि निळी चड्डी चिखलाने भरली.' (तुती). 'आत रत्नपात्रात निळसर ज्योती उमटल्या.' (वीज). 'रेशमी गतीने स्वर, शब्द दाबीत, हलकाच निळ्या कबूतराप्रमाणे वर चढू लागला की मनात आर्त आठवणींचे भिंग लकलकू लागे.' (सूड).

अल्थीयाच्या मेण्याच्या वाहकांची चमकती निळी वस्त्रे, मेण्यातील निळी मखमली गादी व निळाच लोड. व्यापाऱ्याला निळ्या रंगाचा सदरा (भोवरे). अल-ए-दिनचे सर्वांग निळ्या वस्त्राने झाकलेले सैनिक, मुशाफिराजवळचे निळे रत्न. (गुलाम). मंगलच्या घरातील निळा तलम पडदा, तिने भिंगरीला दिलेले निळे रिबन. (मुखवटा). दामू जिच्या आकर्षकपणामुळे फसतो ती ढिगाऱ्यातील निळी चिठ्ठी. त्याच्या दिवास्वप्नात तो निळसर शार्कस्किनचा बुशशर्ट घालून हिरवा मखमली ब्लाऊज घातलेल्या तरुणीबरोबर हिंडतो. (हिरवी मखमल, गोरा हात). निळा रुमालवाला (तळपट). निळा पट्टा असलेल्या कपबशा. (भेट). लक्ष्मणचे गडद निळ्या-जांभळ्या मोटारी. (गिधाडे). निळे दिवे (स्वामी). सुम्मीच्या रगावरील निळे निळे कमळ. (तुती). शोभाचे निळ्या पडद्यावर जाईची फुले उधळल्याप्रमाणे दिसणारे पातळ (शिक्षा). धुरकट निळा प्रकाश. (लई नाही मागणे). शानभागच्या नव्या हॉटेलाच्या खिडक्यांचा झगझगीत निळा रंग (माघारा).

प्रा. निकमचा निळसर शर्ट (पुरुष). माधवचा मेधाने परत पाठविलेला निळा हातरुमाल (रातराणी). लीलाचा निळा फ्रॉक. (स्लीला).

'एकदा ती अबोली सळसळणारे पातळ नेसून आली. तिने गळ्याभोवती जळती निळी ज्योत' (डाग).

जयू बोलत असताना सीताक्काने तिच्या अंगावरील हिरवी शाल सरळ केली. जयूच्या मुलाचे बारसे होते म्हणून ती तयार झाली होती. आता जर सीताक्काच्या आठवणी जाग्या झाल्या तर तिची शाल निळी असणार हा आपला अंदाज अचूक ठरतो. सीताक्काची शाल निळी होती. (शेवटचे हिरवे पान).

धीवर प्रवाश्याला त्याच्या लहानपणाची, रेशमी निळ्या पक्ष्याची गोष्ट सांगतो; ती तर मनाला चटका लावून जाते. (इस्किलार).

जी. एं.ची फुलांची, त्यांच्या रंगांची आवड पारधी, रातराणी, शलॉट, अखेरचा दिवस, पुनरपि, व्यथा या कथांतून जाणवते. 'साकळलेल्या रक्ताप्रमाणे दिसावी इतक्या गडद लाल रंगाची नीग्रेटा रंगाची गुलाबाची कळी,' जिरॅनियम, निशिगंध, पाम (पारधी). 'आणखी पंधरा दिवसांत ॲस्टरचा विविधरंगी गालीचा उलगडणार, फ्लॉक्सच्या घोळक्याखाली ती झाडे अगदी ओझावून जाणार. निशिगंधामधून तर आताच उंच छड्या निघाल्या होत्या व त्यांवर छोटेछोटे हंस चिकटवल्याप्रमाणे फुलोरा जागा झाला होता. भिंतीच्या कोपऱ्यात लहान गेटाजवळ रातराणी माहेरवासिनीप्रमाणे सुखावली होती.' गुलाब, कोलियस, कोशिया, जिरॅनियम, (रातराणी). डेलिया, निशिगंध, बोगनविला, निळ्या तुतारीसारख्या फुलांचा वेल(शलॉट). जाळासारख्या लाल फुलाची कर्दळ' (अखेरचा दिवस). 'लालभडक पिवळ्या जिवंत रंगाने झळाळणारी अनेक कर्दळीची झाडे.' (व्यथा). चाफा (पुनरपि). ग्लॅडिओला (पुरुष). लिली, रातराणी, 'टपोरा, न्मत्र वाटणारा, पायाखाली तुडवलेल्या रानफुलाप्रमाणे गेल्या आठवणीकडे तुच्छतेने पहाणारा धुंद मॅग्नोलिया.' (पडदा). जी. एं.चे आवडते द्राशाळाचे फूल आपल्याला निरोप, जखम, रात्र झाली गोकुळी, व्यथा, कांकणे, माणूस नावाचा बेटा, वीज या कथांतून आढळते.

पादत्राणांमध्ये बूट, चपला, सँडल्स, स्लिपर्स, सपाता, मोजडी वगैरे सब झूट. जी. एं.ना प्रिय आहेत 'वहाणा!' शेवटी 'वहाणा' ह्या नावाचीच प्रतीकात्मक कथा लिहून एकाच कथेत त्यांनी खंड्याच्या पंखासारखा निळ्या रेशमी पट्ट्यांच्या वहाणा, काळ्या वहाणा, लाल वहाणा आणल्या. सुम्मीकडे जायला निघालेल्या नानांना ऐनवेळी एक वहाणच मिळेना. (तुती). नानांनी आईला नव्या वहाणा आणून दिल्या.(तुती). शांतू सुबक वहाणा घालून जरीच्या पातळात घरात आली. (भोवरे). श्रीपूमामाला सांगून तानीमावशीसाठी वहाणा आणायला हव्यात असे कथानायक ठरवतो. (कैरी). रुक्मिणी पायात वहाणा अडकवून स्वत:च कपडे आणायला निघाली. (पराभव). कथानायक

त्याच्या नव्या वहाणा शाळेतच विसरतो. (राधी). कधीकाळी दोन मोटारी ठेवणाऱ्या दादांसाठीही वहाणाच, चपला नव्हे. (घर). इथे निरोप घेताना डॉक्टरही वहाणातच पाय सरकविणार. (पारधी). पायातली वहाण निसटली म्हणून सरोज थांबते. (माणसाचे काय, माकडाचे काय?). मंगलसाठी साध्याच वहाणा. (भोवरे). आवारातील वाळूवर वहाणांचा आवाज करीत नाडगौडा मास्तर चालतात. (सांगाडा). दामूच्या अनेक वेळा टाचा लावलेल्या वहाणा. (हिरवी मखमल, गोरा हात). बाळूच्या चेहेऱ्यावर एक वहाण हाणावी असे सण्णाला वाटते. (चंद्रवळ). दादूभटाच्या वहाणा. (अंजन). म्हामू कासाराने पायांत कधी वहाणा घातल्या नाहीत. (फुंका). जाड चुरूचुरू वहाणा घातलेला निळा रुमालवाला. (तळपट). बंडाचार्याच्या तुटक्या वहाणा. (लई नाही मागणे). नाल मारलेल्या वहाणा. (माणूस नावाचा बेटा). शकी येते ती चटक चटक वहाणा वाजवीतच. (रात्र झाली गोकुळी). सरदारजीने पांड्याला एकदा वहाणा घेऊन दिल्या. (गुंतवळ).

याला अपवाद आहेत. प्रिन्सिपॉल ठकार घरात स्लिपर्स पायात चढवून वावरतात. (पडदा). शाळेत नवीन आलेल्या शिक्षिकेचे काळे, जुने, पॉलिश न केलेले सँडल्स. (सूड). देशपांडेला बूट आहेत, पण बुटांची सवय नाही. तर दचकलेला जोशी कुत्र्याला बुटाच्या टोकानेच लाथ मारतो. (गुंतवळ). कोपऱ्यात लताच्या सँडल्स उपड्या पडल्या होत्या आणि त्यातील एकीचा तुकडे लावलेला तळ निर्लज्जपणे उन्हात होता. (भेट). उंच टाचाच्या सँडल्सवर आपला रेखीव डौल सांभाळणारी तरुणी. (गिधाडे). बापू काळुस्कर किमती बूट विकत घेऊन टकटक वाजवत मरीन ड्राइव्हवर हिंडला. (गिधाडे). गुणीला भेटलेला हातातील छडी, चाळा म्हणून बुटावर आपटणारा माणूस. (राक्षस). पांगळ्या माधवसाठी नवे बूट, सँडल्स आणणारा त्याचा मामा गोपाळ. (भोवरे). खडावा. (स्वामी). नाल मारलेले बूट बडवित रात्रभर हिंडणारा गुरखा. (पुनरपि). सरदारजीच्या धाकट्या मुलीच्या, कुशवंतीच्या मूल्यवान सपाता. (गुंतवळ). प्रवाशाचे चढाव. (इस्किलार). हिंदमधील वहाणांबद्दल प्रवासी गारुड्याला सांगतो- 'तिथल्या वहाणा या एका चांगल्या बायकोसारख्या असतात. उबदार, टिकाऊ, बिन-नखऱ्याच्या आणि विशेष म्हणजे सतत कुरकुर न करणाऱ्या!' (इस्किलार). प्रवाश्याच्या रूपाने जणू जी. ए. आपल्या आवडीवर शिक्कामोर्तब करतात.

जी. एं.ना 'हुळहुळून हसणे' मनापासून आवडत असावे. त्यामुळेच त्यांनी रंगविलेल्या व्यक्तिरेखा हसतात तेव्हा हुळहुळूनच हसतात. साधे हसणे त्यांच्या गुणधर्मात बसत नाही, कारण त्यांचा निर्माता आहे जी. ए.! त्यांच्या या हुळहुळून हसण्यामुळे कथेतील गोडवा अधिकच वाढतो. लहान मुले-मुली तर हुळहुळून हसतातच पण ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावरील व्यक्ती आणि मोठी माणसे सुद्धा हुळहुळूनच हसतात. जी. एं.च्या कथा आहेत, स्वतःच्या निखळ आनंदाकरिता शिल्पकाराने निर्मिलेल्या शिल्पाप्रमाणे. त्या जी. ए.साठीच आहेत. शिल्प, चित्र रसिकांना आनंद देते,

तद्वत जी. एं.च्या खास वाचकवर्गाला त्यांच्या कथा अवर्णनीय, अजोड, असाधारण आनंद देतात. इतर मग काही वाचावेसेच वाटत नाही हा अनुभव अनेकांना येतो. त्यांचा वाचक त्यांचा नकळत भक्त बनून जातो. देहभान विसरून जी. ए.वर, त्यांच्या कथांवर आसासून बोलणारे वाचक मी अनुभवले आहेत. पण तरीही हे नमूद करावेच लागेल की, कुठलेही बंधन न पाळणारी, स्वत:च्याच मार्गाने, स्वत:च्याच गतीने जाणारी जी. एं.ची कथा मूलत: त्यांच्या सुप्रसिद्ध 'मौन' याचे सूचकच नव्हे का?

पाऊल बुडेल न बुडेल एवढे पाणी असलेल्या पाटात गुडघ्याच्याही वर लुगडे खोचून उभ्या असलेल्या कमळीचे गोरे गुडघे पाहताच दामू पेटल्यासारखाच झाला. 'त्याने आपली ओलसर बोटे त्यावर आवळताच कमळी हुळहुळल्यासारखी हसली आणि त्याचा हात झिडकारत म्हणाली, बस्स आचरटपणा करायचा नाही.' (कवठे)

कापसाच्या चेंडूप्रमाणे टुणटुण उड्या मारणाऱ्या कोंबडीच्या पिलाला भिंगरी धरण्याचा प्रयत्न करते, पण ते तिच्या हाताला घसटून निसटते. त्या मऊ गुलगुलीत स्पर्शाने तिला हुळहुळल्यासारखे होते, व ती खूप हसते.' (मुखवटा).

'ती कमरेवर गोऱ्यापान पोटाचा बारीकसा पट्टा दाखवायची आणि रमाने तेथे हळूच बोट लावले की हुळहुळून खूप हसायची.' (बाधा)

'पुन्हा एकदा शेपटीचा झुबका चेहेऱ्यावरून फिरणारे अंग हुळहुळले आणि ती सात आठ वर्षाच्या पोरीप्रमाणे अगदी अंग आवळून एकदम हसली.' (निरोप)

'बापूने ओबडधोबडपणे बटण लावले व झगा तिला देताना त्याने हळूच तिच्या पोटाला हात लावला तेव्हा झगा टाकून अशक्त हातानी अंग बांधून शैलू हुळहुळून हसली.' (गिधाडे)

'जिन्यावर आवाज ऐकताच आपल्या मनात काय कल्पना आल्या हे आठवून तिला हुळहुळल्यासारखे झाले नि ती हसली.' (पुनरपि)

'काळम्मा'च्या देवळात पायरीवर बसलेल्या गंगी गायीच्या अंगावर एका बाजूने चढून दुसऱ्या बाजूला लोळून पडणारी मुले, तिचे मऊ मखमली कातडे थरथरले की हुळहुळल्यासारखी होऊन खिंकाळत.' (वीज).

'तिच्या पोटाला हात लावताच हुळहुळून अंग मुरडत ती हसली.' (सोडवण).

काही गोष्टी जी. एं.ना बिलकूल पसंत नाहीत. केसांचा फुगा; चित्रविचित्र बुशशर्ट; घाणेरड्या रंगाचे कपडे; मुलींनी फॅशनच्या नावाखाली केस कापणे; पाठ, दंड दाखविणे; पॉनिटेल , पारदर्शक कपडे वापरणे; इत्यादी. ही चीड अनेक कथांतून वेळोवेळी त्यांनी त्यांच्या व्यक्तिरेखांच्या द्वारा व्यक्त केली आहे. 'तो दहावीमधला नवा विद्यार्थी कपाळावर केसांचा घाणेरडा झुबका, निबर कातडे, रोगट कातड्यासारखे दिसणारे चित्राचित्राचे बुशशर्ट.' (शिक्षा). 'अत्याधुनिक घाणेरड्या फॅशनप्रमाणे तिने कपाळावरचे केस कापून घेतले होते व उरलेले लांडे तुकडे कपाळावर अव्यवस्थित

झालरीप्रमाणे पसरले होते.' (पुरुष). हा त्या काळात लोकप्रिय झालेला 'साधना कट' होय. 'विजारीच्या खिशात एक हात अडकवून दत्तू उभा राहिला. त्याने पारदर्शक कपड्याचा सदरा घातला होता व केसांना पाणी लावून ते व्यवस्थित विंचरून कपाळावर त्यांचा उनाडटप्पू तुरा काढला होता.' (कसाब). 'बाळने ज्यावेळी त्यांना त्याचे खोलीत (घाणेरडा शर्ट, भडक काळ्या रंगाची कॉर्डुराय पँट-त्याला पाहाताच उग्र वास यावा, त्याप्रमाणे त्यांचे डोके दुखू लागले होते.). आपण कॉलेज सोडणार आणि मुंबईला जाणार असे सांगितले त्याच वेळी बाळ त्यांच्या आयुष्यातून निघून गेला होता.' (पडदा). 'परकरावरची फुले दाखवीत नायलॉनसारखे निर्लज्ज पातळ नेसणे, देवीच्या खुणा दाखवीत दंड खांद्यापर्यंत मोकळे टाकणे, रस्त्यावरच्या घोळक्यात डोळे उडवीत मुरळीसारखे खिदळणे बरे नाही, शोभत नाही', 'प्रेमा घोड्याच्या शेपटीसारखे केस बांधीत असे. आपले पुष्ट दंड दाखवीत सायकलवरून हिंडणे, बॅडमिंटनच्या निमित्ताने वाटेल त्याच्याबरोबर हिंडून रात्री-बेरात्री परतणे हे तर नेहमीचेच होते.' (तक्षक). शेवटी जी. एं.च्या 'मधूकाका'ना कडवट हसू येते. 'डोक्याचा उकिरडा करून रंगीत बुशशर्ट घालून शाळामास्तराने शाळेत जायचे हे दिवस! मग डॉक्टरानेच काय घोडे मारले आहे? आपल्या पायाखालून दिवस सरकत गेले, व आपण मात्र जुनाट विचारांना चिकटून राहिलो. रमेशने केस कसे स्त्रीपार्ट्यासारखे ठेवले आहेत. पूर्वी तसे केस भांडी घासणारे रामागडी आणि विहिरीत पडलेल्या बिंदगे-घागरी काढणारे जांगळी लोक तेवढेच ठेवत असत. शांतारामला तर विजार घालून खाली बसता येत नाही. त्यांची मुले पुढे कसले कपडे घालतील? शिंप्याकडून अंगावरच कपडे शिवून घेतील, की वाघ रंगवल्याप्रमाणे अंगावर कपडे न घालता कपड्याची चित्रेच रंगवून घेतील?' (घर).

'साले हरामखोर, सापाच्या हृदयाचे गाव!' हे आहे मुंबईचे वर्णन! 'कुठेही मसणात जा, तेथे बावळट चेहेरे करून उभारलेल्यांची बेंगरुळ रांग आहेच. जर एखाद्या वेळी लोकलखाली उडी घ्यायची वेळ आली तर तेथेसुद्धा अगदी नंबराप्रमाणे मरावे लागेल. साले हरामखोर आयुष्य! कंगाल!' जी.ए. नोकरीनिमित्ताने अल्पकाळ मुंबईत वास्तव्य करून होते. त्यावेळी मुंबई त्यांनी जवळून पाहिली, साहजिकच कथेत धारदार उपरोध ठासून भरला आहे. मुंबईतील जीवन काय जीवन आहे? हे कळत असूनही मनाविरुद्ध मुंबईतच जगणे ज्यांना भाग आहे, ज्यांच्या पोटापाण्याचा उद्योगच मुंबईत आहे, त्यांची व्यथा जी. एं.ना कोण सांगणार?

जी. एं.ची खाण्यातील आवड पुढील काही उताऱ्यांतून दिसून येते. 'कसं असावं? आमच्या गावची नदी. नदीकाठच्या वांग्याची भाजी, गाडगेभर घट्ट चुन्यासारखं दही, आणि शेतातूनच तोडून आणलेल्या ताज्या हिरव्या मिरच्या! वा, कशी गंमत येते माकडांनो!' (तुती). 'मऊमऊ ऊन भात असावा, त्यावर तूप, बरोबर लिंबाचे लोणचे आणि वर काकडीच्या फोडी तरंगत असलेली, खूप जिरे घातलेली कढी.' (रात्र झाली

गोकुळी). 'आज वांग्याची भाजी, भाकरी आणि लोणचं होतं. मला वांगी फार आवडतात.' (वीज). 'भाकरीला जाड लोणी माखावे, त्यावर लालसर लसूण चटणी पसरावी, आणि मग ताजे पाणी काढून येथल्या येथेच ते प्यावे. (कैरी). 'माई स्वैपाकघरात मुद्दाम त्यांच्यासाठी केळफुलाची भाजी करीत होत्या.' (घर). 'त्यात तिने नारायणरावांना विशेष आवडणारी खोबऱ्याची चटणी व वांग्याची भाजी केली होती.' (भोवरे). '.... रसरशीत निखाऱ्यावर भाजलेले मक्याचे कणीस, चिंचगुळात घालून ठेचलेला कागदी लिंबाच्या झाडाच्या कोवळ्या पानांचा पिकट गोळा काडीला चिकटवून, त्यावरून जीभ फिरवता येणारी, वास असलेली आंबटगोड चव....' (प्रदक्षिणा). 'आपल्यासमोर ढीगभर ऊन भात आहे, काळ्या वांग्याची तिखट भाजी आहे.' (तळपट). 'आईने मग भाऊरावांसाठी मुद्दाम केनाच्या पानांची भजी केली होती.' (कैरी). 'पुंडलीकजीची पातळभाजी गावभर प्रसिद्ध होती. तिचा एक चमचा जिभेवर ठेवला की ब्रह्मांड लालभडक होत असे.' (गिधाडे). 'पण त्या दुकानासमोरच केळकरांचे भाजीपुरी- प्रसिद्ध हॉटेलही होते...' 'ही अकराची वेळ. यावेळी केळकरांच्या हॉटेलात बदामी हलवा होतो. इतर ठिकाणाप्रमाणे तो तांबड्या खळीचा लगदा असत नाही. तर पारदर्शक, तपकिरी रंगाचे चौकोन तुपाने चमकत असतात.' 'श्रीकृष्ण कॅफेजवळ येताच त्याची पावले रेंगाळली. तेथे धगधगीत मसाल्याची उसळ फार मस्त होते. आणि त्यात जर शेवचुरा घातला की पाहायलाच नको. अगदी अर्धा तासभर पोटात अगदी गोविंद गोविंद भजन होते.' (लई नाही मागणे). 'मग कसं असावं माहीत आहे? बरोबर पुष्कळ भाकऱ्या आणि भरल्या मसाल्याची वांग्यांची भाजी!.... होय. अगदी मडकं भरून घट्ट दही..... शिवाय डांगराचं पीठ ..... ते एक पीठच. त्यात दही घालावं, बारीक चिरलेले कांदे आणि बरोबर कोवळ्या मिरच्या..... होय तर, चटणीशिवाय कसली रे भाकरी? ..... आणि देवळाच्या मागे झरा आहे. तिथलं पाणी घ्यायचं म्हणजे भांड्यातून नाही. तर बाजूला पालथं पडायचं व ओंजळीनं पाणी घ्यायचं. जाताना वाटेत आंब्याची झाडं आहेत त्यांना पानापानाबरोबर कैऱ्या लागतात. त्या फोडून आत मीठ, लाल चटणी घालून खायच्या. हां, कैऱ्या खाताना चटणी हिरवी चालायची नाही, लालच पाहिजे बरं का!' (कैरी).

तीर्थरूप आबास
डोळे उघडून उठून बसत मी तुम्हाला नीट
पाहण्यापूर्वीच तुमची पाऊले उंबऱ्याबाहेर
पडली होती.

(पिंगळावेळ)

सोनुमावशीस
तू आम्हाला आणखी एक आई होतीस.

(काजळमाया)

इंदु, सुशी
व
जाई
या तीन आठवणींना

(निळासांवळा)

बेळगाव नावाच्या गावास
पाउले जरी दूर भटकत गेली
तरी तुझ्या जुन्या आठवणींची बुत्ती
सतत जवळ राहिली आहे.

(रमलखुणा)

स्पर्धेच्या धुंदीत आपल्या हातांनी आभाळात सोडलेली,
पण जिचा मृत्यू असहायपणे खालून पहावा लागला, ती
गुलाब-पाकळ्यांच्या चोचीची चंद्रावळ .....
तुम्ही सगळेजण पुढे निघून गेलात. मी तुमच्याकडे येईन,
पण आता तुम्ही मात्र माझ्याकडे कधी येणार नाही.
आपण पुढे पुन्हा कधीतरी भेटू.

(रक्तचंदन)

प्रभावती आणि नंदा
यांस--
--तरी देखील तुमची माया
मला मिळते.

(पारवा)

राजास--
नवी माणसे घरात
येण्यापूर्वीचे
केवळ जुनेच दिवस आपण आठवू.

(साजशकुन)

कै. तीर्थरूप ताईस,
रात्री उशीरा घरकाम करताना
तुला सोबत व्हावी म्हणून
लहानपणी मला समोर बसवून
तू पुष्कळ कथा सांगितल्यास
आता तू गेल्यावर
मला त्या कथांची सोबत आहे.

(हिरवे रावे)

ह्या आहेत जी. एं.च्या कथासंग्रहांच्या अर्पणपत्रिका! बरंच काही सांगून, सुचवून जाणाऱ्या. स्वत:च निर्माण केलेल्या पोलादी पडद्याआड, व्रतस्थ जीवन जगणाऱ्या जी. एं.च्या भावव्याकुळ मनाचे कोवळे पदर हळूच उलगडून दाखविणाऱ्या ह्या अर्पणपत्रिका! यातील 'रक्तचंदन'ची अर्पणपत्रिका प्रदीर्घ आहे. व्यक्तींपासून प्राण्यांपर्यंत, प्राण्यांपासून झाडापर्यंत, पक्ष्यांपर्यंत, गावापर्यंत जी. एं.ची कृतज्ञता, माया ह्या अर्पणपत्रिकांतून पाझरते आहे.

'तुती' आणि कैरी' ह्या आहेत स्वतंत्र कथा, परंतु जी. एं.चे बालपण जाणून घेण्यासाठी त्या लागोपाठ वाचाव्यात. आई, वडील, बहीण, भाऊ, श्रीपूमामा, तानीमावशी या मायेच्या गोतावळ्यातील जी. एं.चे बालपण या कथांतून प्रतीत होते. आठवणीने नवा करकरीत रंगीत भोवरा आणून बॅगेत हळूच ठेवणारा प्रेमळ श्रीपूमामा इथेच आपल्याला भेटतो. जी. एं.च्या कथांतून येणारा मामा, मोठा भाऊ, 'प्रेमळ' असतो, बहिणीवर माया करणारा असतो, त्याचे हे मूळ. 'आई' हे तर जी. एं.नी रचलेले 'महाकाव्य' होय. अनेक कथांतून 'आई' विविध प्रेमळ रूपांनी प्रकट होते. जी. एं.ची 'आई' प्रकर्षाने जाणवते ती 'तुती', 'कैरी' आणि 'राधी' या कथेत. जी. एं.नी निर्मिलेली 'आई' ही व्यक्तिरेखा साधी, सरळ, प्रेमळ, मुलांच्या खस्ता खाणारी, संसाराच्या व्यापात गळ्यापर्यंत गुरफटून गेलेली, सर्वांवर मायेचे प्रेमळ वस्त्र पांघरणारी, संसारासाठी, मुलांसाठी अबोल वृत्तीने चंदनाप्रमाणे झिजणारी, उपदेशाचे डोसामृत न पाजताही संस्कार करणारी, अशी आहे. मुख्य म्हणजे ती दुर्मिळ दैवी चीज न वाटता हाडामांसाच्या सर्वसामान्य माणसाप्रमाणे 'साधी' आहे, स्त्री आहे. सामान्यातून असामान्य व्यक्तिरेखा निर्माण करण्याची ही जी. एं.च्या शैलीची किमया होय. बहीण-भावांच्या निर्व्याज, प्रेमळ भावविश्वाचे एक गहिरे दर्शन 'दादा-सुम्मी-मी'च्या रूपाने 'तुती'त घडते. 'सुम्मी माझी लहान आई होती.' असे असणे हा मायेचा परमोत्कर्ष. 'तानीमावशी' म्हणजे तर दुसरी आईच. 'तानीमावशी गेली व जाताना माझी मीठ तिखटाची कैरीच ती आपल्याबरोबर घेऊन गेली.' तानीमावशी 'मी'वर

जे मायेचे वस्त्र पांघरते, त्यामुळेच हे 'मी'चे उत्स्फूर्त निवेदन येते. इतकी प्रेमळ आतड्याची माणसे लाभायला पूर्वजन्मीची पुण्याईच लागते. ती जी. एं.ना लाभलीत. ते त्यांच्या तुती, कैरी आणि राधी ह्या कथांतून दिसते.

शेवटी जी. एं.च्या शब्दांचा आणि आवडीचा आधार घेतो. 'घर' ह्या कथेत जी. ए. म्हणतात-

'मग शेजारी सिगरेटचे एक पूर्ण पाकिट असावे. एखादा दरबारी छबिना चौघडे-तुताऱ्या वाजवत डौलाने यावा, त्याप्रमाणे वाटणारा मालकंस टेपरेकॉर्डवर तासभर उलगडत असावा. या दरिद्री जनता युगात नि:संकोच सरदारी दिमाखाने चित्रे आणि लेख छापणारे 'National Geographic' किंवा 'Realities'सारखे एखादे मासिक हातात असावे. मग बोलावणे घेऊन येणाऱ्या, तू कसाही ये. तू दार ठोठावून ये. अगर आडदांडासारखा आत शीर. असल्या एका सिगरेटमधून आलास तरी चालेल-नव्हे तू तसाच ये! ते मलादेखील फार आवडेल.....'

☆ ☆ ☆

'साहित्य सूची'
दिवाळी १९८७

जी. एं.च्या मृत्युविषयक कथा

O Death! the poor man's dearest friend–
The kindest and the best.

Burns

जी. एं.च्या जीवनदृष्टीला पडलेले स्वप्न म्हणजे त्यांची पुनर्निर्मिती 'ऑर्फियस'! जगप्रसिद्ध ग्रीक पुराणातील प्रेम-कथा 'ऑर्फियस' ची जी. ए.कृत पुनर्निर्मिती नवनिर्मितीचा आनंद देते, कारण त्यांनी तिच्यात नवीन आशय ओतला आहे. ग्रीक पुराणातील ऑर्फियस यूरिडिसी पृथ्वीवर पोहोचण्यापूर्वीच अधीरतेने तिच्याकडे पहातो आणि देवाच्या अटीप्रमाणे यूरिडिसीला मृत्युलोकात परतावे लागले, तर जी. एं.चा ऑर्फियस निर्णयपूर्वक यूरिडिसीकडे पाहातो. तिला माघारी जावे लागेल, हे माहीत असूनही पूर्ण विचारांती तो हा कटू निर्णय घेतो. मृत्यू भोगलेली व्यक्ती आणि मृत्यू घडतो हे केवळ माहीत असलेली व्यक्ती यांच्यातील दरी कधीच सांधता येणार नाही, ही जाणीव जी. एं.च्या ऑर्फियसला यूरिडिसीच्या बोलण्यातूनच होते. पत्नीला घेऊन जाऊ पहाणारा ऑर्फियस तिला प्रत्यक्षात नेत नाही. मृत्यूचा अर्थ शोधणारी ही कथा मराठी कथा वाङ्मयातली एक अपूर्व कथा आहे.

मूळ ग्रीक पुराणकथेत टारटॉरसचा स्वामी हेडीज यूरिडिसीला परत पाठविताना आर्फियसला अट घालतो, की त्याने टारटॉरसच्या मार्गातून माघारी जाताना मार्गात थांबायचे नाही, बोलायचे नाही आणि मागे वळून पहायचे नाही, अन्यथा त्याला यूरिडिसी

पुन्हा कधीही दिसणार नाही. जी. एं.नी पुनर्निर्मिती करताना घेतलेले स्वातंत्र्य सुज्ञास सांगणे नलगे. थ्रेसचा निवासी ऑर्फियसचा जन्म देव अपोलो आणि महाकाव्याची देवी कैलायेपीच्या महामिलनातून झाला. अपोलो काव्य आणि संगीत यांची देवता असल्यामुळे ऑर्फियसला संगीतकला अपोलोद्वारा वंशपरंपरेने प्राप्त झाली. आई कैलायेपी आणि वडील अपोलो यांच्याकडून संगीताचे शिक्षण ऑर्फियसला मिळाले. अपोलोनेच ऑर्फियसला एक वीणा भेट दिली आणि नऊ म्यूजेज देवतांनी त्याच्या गायनाचा आणि वीणेचा सुरेख मेळ घालून दिला. त्यामुळे गायन आणि वीणा-वादन यावर ऑर्फियसचा अभूतपूर्व अधिकार प्राप्त झाला. ऑर्फियसची पुनर्निर्मिती करताना जी. एं.नी ग्रीक पुराणातील हेडीज देव, त्याचे भूगर्भातील साम्राज्य, त्यातील नद्या, तिथले सेवक, तिथल्या देवता, हेडीजचा द्वारपाल-तीन तोंडाचा अतिविशाल कुत्रा सेब्रस, ज्याच्या गळ्याभोवती फुत्कारणारे हजारो सर्प वेटोळे घालून आहेत, टारटॉरसचे अंध:कारमय स्थान, देवसम्राट ज्यूस आणि कृषि-देवता डिमीटर यांची कन्या पर्सीफनी हिचे हेडीजने केलेले अपहरण, डिमीटर आणि पर्सीफनी यांच्यातील असाधारण प्रेमभावना, पर्सीफनीबाबत ज्यूसची शिष्टाई, हेडीज आणि डिमीटर यांच्यातील समझोता, आणि शेवटी पर्सीफनी हेडीजची महाराणी बनणे या वेगवेगळ्या कथांतून त्यांना हवा तो भाग घेऊन 'ऑर्फियस' या कथेचे रसायन तयार केले आहे. यातून जी. एं.चा ग्रीक पुराणकथांचा गाढा व्यासंग दिसतो तो निराळाच!

जी. एं.च्या जीवनदृष्टीने नवा आशय 'आर्फियस'मध्ये ओतल्यामुळे, व ही जी. एं.ची पुनर्निर्मितीच असल्यामुळे हेडीज (प्लुटो), ऑर्फियस आणि यूरिडिसी जी. एं.चाच आशय व्यक्त करतात. ज्या आशयामुळे ही पुनर्निर्मिती जी. एं.ची एक न विसरता येणारी श्रेष्ठ कथा बनली, त्याकडेच आता वळू.

टारटॉरसमध्ये प्रवेश करताच तेथील बंदिस्त मृतात्मे ऑर्फियसभोवती कुजबुजू लागतात- 'मला येथून सोडव. मला अद्याप जगायचे आहे.' 'जिवंत असता वैतागाने अनेकदा मृत्यूला साद घालणारी माणसे, मृत्यू खरोखरच आल्यावर पुन्हा त्याच दाहक आयुष्याकडे जाण्यासाठी हैराण होतात, हे पाहून त्याला फार विस्मय वाटला, व जे आहे ते मात्र नको, ही भावना मानवी जीवनाचा शापच आहे की काय, असे त्याला वाटून गेले... मृत्यूपूर्वी वेदना, मृत्यूत वेदना, मृत्यूनंतर वेदना—आणि तरीही हे सगळे ज्याचा परिणाम आहे, त्याच आयुष्याकडे पुन्हा परत जाण्याची एवढी आसक्ती, या साऱ्याबद्दल त्याला फार गूढ वाटू लागले पण या साऱ्यातून त्यांना मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे कोणाला?'

हे सामर्थ्य कोणालाही नाही. मृत्यू प्रत्येकालाच अटळ आहे आणि तरीही सर्वसाधारणत: मानवामध्ये जगण्याची, निरर्थक, अर्थशून्य, कवडीमोल जगण्याचीही चिवट आशा आढळते. म्हणूनच कुणी 'म्हातारा अगर म्हातारी' असा उल्लेख केला

की त्याचा अगर तिचा भयंकर तडफडाट होतो. कारण म्हातारपणानंतर अपरिहार्यपणे येणारा मृत्यू त्यांना भेडसावत असतो. 'सुख पाहता जवाएवढे, दु:ख पर्वताएवढे!' तरीही त्यांना ते हवेच असते, कारण जीवनाचा अर्थच त्यांना उमगलेला नसतो.

युरिडिसीला घेऊन ऑर्फियस टारटॉरसच्या अंधाऱ्या मार्गाने जात असता झालेल्या अत्यानंदाने मागे वळून न पहाताच पण यूरिडिसीशी बोलू लागतो. '..... आयुष्यातील प्रत्येक क्षण म्हणजे केवळ काळाचा एक कण न करता एक सुगंधी अनुभव, एक चिरंतन स्मृती होईल, अशा तऱ्हेने मला आता तुझ्यासह जगायचे आहे.'

यावर जी. एं.ची यूरिडिसी आर्त स्वरात सांगते,'पण, आर्फियस, त्या हिरवट दिवसांत आपण अगदी वेडे होतो. नाही?..... उत्कट आनंदाचे आपण गोळा करीत असलेले क्षण म्हणजे अखेर मृत्यूच्याच गळ्यात घालायच्या हारातील मणी आहेत, हे मला आता उमजत आहे.' 'आपण अनेक वृद्ध, जर्जर माणसे पाहिली, पण ती चित्रे म्हणजे आपलीच भविष्यातील प्रतिबिंबे आहेत, हे तुला काय, मला काय, कधी जाणवलेच नाही.'

ऑर्फियस भांबावून विचारतो, 'सगळ्यांनाच मृत्यू अटळ आहे, ही गोष्ट तुला मला पूर्वी कधी माहीत नव्हती की काय?'

'तू चुकलास. माहीत असणे निराळे आणि स्वत: हाडामांसात मृत्यू भोगणे निराळे. तू तो भोगला नाहीस, मी तो भोगला आहे..... ओंजळभर सूर्यप्रकाश घेऊन तो प्यावा, ही विलक्षण तहान आताच मला खरी समजली.'

दमून गेल्याप्रमाणे आर्फियस थांबतो. त्याला वाटले..... 'या क्षणाचा निर्णय माझा मीच घेतला पाहिजे. हे भयानक स्वातंत्र्य तू मला का दिलेस? कोणत्या आधारे मी माझा निर्णय घेऊ? असला प्रत्येक अनुभव अद्‌भूत, अद्वितीय असतो. त्यामुळे गाठीला पूर्वज्ञान नसते. आधाराला कसलेही मार्गदर्शन नसते. आणि काहीही निर्णय घेतला तरी एक असह्य शिक्षा आयुष्यभर कपाळी येतेच. देवा, या क्षणी मी काय करावे?'

जी. एं.चा आर्फियस जाणीवपूर्वक निर्णय घेतो आणि संथपणे वळून यूरिडिसीकडे पाहतो. खऱ्या अर्थाने ज्यांचे आयुष्य संपले आहे, त्यांच्या जगण्या-मरण्याला आता काहीही किंमत उरलेली नाही अशा व्यक्तींना, त्यांचे सगेसोयरे वा ते स्वत: पैशाच्या आणि वैद्यकीय सोईंच्या आधारे निष्कारण जगवत ठेवतात, तेव्हा त्यांचे वागणे, बोलणे, कण्हणे-कुंथणे, त्यांच्या अतृप्त इच्छा उबग आणणाऱ्या असतात. खरे म्हणजे जोपर्यंत जीवन जगण्यात मजा आहे तोपर्यंतच जगण्यात मजा आहे. भारभूत, उबग आणणारे, किळसवाणे जगणे हे काय जीवन आहे? या सर्वांतून सुटका करणारा मृत्यू हा म्हणूनच मानवाचा परम मित्र आहे.

प्रायश्चित भोगायला ऑर्फियस देव आणि देवतेपुढे येतो. त्यावेळचे ऑर्फियसचे निवेदन म्हणजे तर जी. एं.च्या जीवनदृष्टीने ओतलेला स्वतंत्र आशय आहे. 'मी एवढा

धोका पत्करून या ठिकाणी आलो ते यूरिडिसीला परत नेण्यासाठीच, हे पूर्णपणे सत्य आहे. पण येथून जाताना माझ्याबरोबर जी स्त्री आली ती, तिचे नाव यूरिडिसी असूनही, माझी, मला माहीत असलेली यूरिडिसी नव्हती..... मृत्यू भोगलेली व्यक्ती आणि मृत्यू घडतो हे केवळ माहीत असलेली व्यक्ती, त्यांच्यात फक्त एका काळ्या क्षणाचेच अंतर नसते..... मी फुलांकडे पाहत असताना तिला त्याच वेळी त्याच फुलांचा नाश दिसणार..... राजन, इतकेच नाही, तर पूर्वीप्रमाणे मी तिच्याशी कधी एकांतात बोलूच शकणार नाही. कारण त्यावेळी तिच्या शेजारी सतत उभे राहून एक सांगाडा आपली सावली आमच्यावर टाकत राहील..... सम्राट, आमचे मानवी जीवन पाहा. अद्याप त्या अंतिम क्षणाचा रोख, अनुभव नसताना देखील आमच्यावर दु:खाचा काळिमा असतो. आमचा आनंद ओल्या पावलांनी येतो आणि भिजल्या डोळ्यांनी संपून जातो. त्यात भर म्हणून मी प्रत्यक्ष मृत्यूची ही छाया शेजारी कशी बाळगू? मी आता सकाळच्या कोवळ्या उन्हातले प्रेम, डोळ्यांत सूर्यास्त आर्तपणे साठवत असलेल्या यूरिडिसीला कसे अर्पण करू?'

मूळ ऑर्फियस ही शोकांतिका वाचकाच्या मनात हळहळ निर्माण करते तर जी. एं.ची 'ऑर्फियस' ही पुनर्निर्मिती विचार करावयास भाग पाडते.

देव सांगतो, 'क्षणभंगुरतेने माणसाने विषण्ण का व्हावे हेच मला समजत नाही. अरे, तो तर तुमच्या आयुष्याचा बोधस्वर आहे. अमर, चिरंतन असले शब्द तुम्ही बिनदिक्कत वापरता. पण तुमच्या बाबतीत तसले शब्द वायफळ आवाज आहेत. त्यांचा खरा अर्थ कधी तुम्हाला रक्तात जाणवणे शक्यच नाही. देवांनी आतील बी स्वत:साठी ठेवून टरफल खाली टाकले. ते उचलून आतील बी कसे असेल याची तुम्ही निष्फळ चर्चा करीत बसता इतकेच!..... उलट असे पाहा, प्रत्येक सुंदर वस्तू संपणार किंवा तू स्वत: नाहीसा होणार हे जाणवताच तू जास्त उत्कटपणाने, हावरेपणाने तिचा भोग घ्यायला हवास. तुझा प्रवास अगदी तात्पुरता आहे आणि या वाटेने पुन्हा कधी येण्याची तुला संधी मिळणार नाही हे एकदा हाडात रुजले, की एखादे साधे रानफूल देखील स्वत:च्या गूढ, अद्वितीय सौंदर्याने तुला भारून टाकील.'

अमरत्व तर माणसाला प्राप्त नाहीच पण दीर्घायुष्यसुद्धा किती निरस, कंटाळवाणे, उद्वेगजनक, किळसवाणे होऊ शकते, हे विचारांती पटू शकते. पण स्कायलॅब कोसळणार म्हणताच खोट्या Medical leaveचे अर्ज सादर करून सुरक्षित मतदारसंघात धाव घेणाऱ्या मानवांना क्षणभंगुरतेमधील सौंदर्य काय कपाळ कळणार! मृत्यूच्या कल्पनेने धास्तावलेले, कानटोपी, स्वेटर घालून एरंडेल प्याल्यासारखा चेहेरा करून कण्हत-कुंथत बसलेले माकड कधी पाहिले आहे?

देव पुढे ऑर्फियसला म्हणतो, 'एखादी देवता आपले मूल कडेवर घेऊन त्याच्याकडे मातृप्रेमाने पाहात आहे असे तुला कधी दिसले आहे? नाही. कारण स्वत:

अमर असल्यामुळे आपल्यानंतर आपली खूण मागे ठेवण्याची इच्छा त्यांच्या मनाला शिवतसुद्धा नाही..... सौंदर्यासक्ती आणि संततिप्रेम या दोन भावना तुमच्या आयुष्यातून काढून टाका आणि मग पाहा, तुमचे आयुष्य मळक्या चिंधीसारखे होईल. आणि या दोन्हींचाही उगम क्षणभंगुरतेच्या जाणिवेतच आहे.

घटनेने स्वातंत्र्य दिलेले असूनही आपल्याला जन्माला येण्याचे स्वातंत्र्य नाही. मनाप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य नाही आणि मरण्याचेही स्वातंत्र्य नाही. अमर तर नाहीच, पण आयुष्य किती आहे याचीही खात्री नाही. याच क्षणभंगुरतेमुळे संततिप्रेम, परस्परांवरील माया,आला अनुभव उत्कटतेने घेण्याची वृत्ती निर्माण होऊन जीवनाला काहीतरी अर्थ प्राप्त होतो.

देव पुन्हा एकदा यूरिडिसीला परत पाठवयाला तयार असतो; पण आता तिला सहा महिने ऑर्फियसबरोबर पृथ्वीवर आणि सहा महिने टारटॉरसमध्ये घालवायची सवलत मिळालेली असते. जी. एं.ची यूरिडिसी ऑर्फियसला म्हणते, 'ऑर्फियस, मी सारे ऐकले व उमगले. तुझा निर्णय अतिशय कठोर होता. तो मला पाषाणहृदयी वाटला होता. पण तो अनिवार्यच होता. हे मला आता समजले..... पण आता या क्षणी मात्र मला तुझ्याइतकाच कठोर निर्णय घेणे भाग पडत आहे. देवाचे शब्द भव्य आहेत, पण माझ्यासारख्या सामान्य आवाक्याच्या स्त्रीला ते झेपणार नाहीत... ऑर्फियस, मी तुझ्याबरोबर येणार नाही.'

ऑर्फियस तिची समजूत घालण्याचा निष्फळ प्रयत्न करताना म्हणतो, '.....नाहीतरी अखेर सुख म्हणजे एक अटळ तडजोडच असते. परिस्थितीच्या पुढे पण आपल्या आकांक्षेच्या सदैव अलीकडेच कोठेतरी सुखाचे स्थान असते. तेव्हा पुन्हा विचार कर.'

यूरिडिसी म्हणाली, '.....तुला काय, मला काय, पूर्वीचे भाबडे, निरसे सुख कदापी मिळणार नाही. मानवाला मृत्यू अटळ आहे हे आपणा दोघांनाही माहीत होते. पण ती एक केवळ कल्पना असते. परंतु प्रिय व्यक्तीचा मृत्यू भोगल्यावर ती कल्पना जाणीव बनते. मी मृत्यूचा अनुभव घेतला आहे, तर तू प्रिय व्यक्तीचा मृत्यू अनुभवला आहेस आणि एकदा या कठोर दिव्यातून गेल्यावर पूर्वीची धुंद स्वप्ने पुन्हा कधीच सांधता येत नाहीत... तुझ्या आणि माझ्या मृत्यूचा क्षण काही तोच असणार नाही. ते भाग्य फार थोड्यांना लाभले..... जर तुला माझ्याआधी यावे लागले तर मला मात्र ते केवळ असह्य होईल आणि तसला मृत्यूच्या आधीचा मृत्यू मी उघड्या डोळ्यांनी स्वीकारू?.... तू आणि मी एक गोष्ट आता धीटपणे उमगली पाहिजे. मृत्यू हा एकच सत्य क्षण आहे व त्यावर रुपक-उत्प्रेक्षांची वस्त्रे क्षणभर देखील न टिकता तत्काळ जळून जातात....'

'आर्फियस भानावर आला व विषण्ण मनाने तो प्रकाशाच्या टिंबाकडे वळत वर गेलेल्या वाटेने परतू लागला.'

ही जी. एं.ची यूरिडिसी आहे! माणूस मात्र गोवऱ्या मसणात गेल्या तरी लाजिरवाण्या जगण्यासाठी जीव टाकत असतो. तिखटा-मिठाच्या पुऱ्यात वा मसालेदार झणझणीत जेवणात त्याची वासना शेणातील किड्याप्रमाणे लडबडतच असते आणि इंजेक्शने टोचून, नळ्या खुपसून निरर्थक आयुष्य तो अंथरुणात जगतच असतो. खरोखर आयुष्य संपल्यानंतरची ही माणसाची जगण्याची वांझोटी धडपड प्राण्यांनाही त्याची लाज वाटावी इतकी किळसवाणी असते.

देव देवतेला शांतपणे सांगतो, 'नाही देवते, ती दोघेही शहाणी आहेत. कारण त्या दोघांनीही आपल्या मर्यादा ओळखल्या आहेत. यालाच कदाचित ज्ञान देखील म्हणता येईल. वाट्याला अमर्याद दु:ख पण ते सहन करण्याची मर्यादित शक्ती; अपार आकांक्षा, पण त्या साध्य करण्यासाठी मर्यादित शक्ती; अपार आकांक्षा, पण त्या साध्य करण्यासाठी क्षीण सामर्थ्य, सावल्यांच्या जगात त्यातल्या त्यात कमी चंचल अशा सावल्यांचा आधार घेत जीवन जगण्याचा कपाळी आलेला शाप, अमृतबीज पेरूनही हाती विषफळच पडण्याची बाधा-असा हा मानव!'

जी. एं.नी ओतलेल्या आशयामुळेच ही त्यांची नवनिर्मिती एक असाधारण कथा बनलेली आहे.

म्हामू कासाराच्या रूपानं जणू जी. ए. वाचकांना सांगतात, 'आमच्यावर सगळ्यांवरच एक अस्मानी फुंका पडलेला असतोय उमरभर! संगा, तुला सांगू काय? अरे, बेवकूफ तुझी माझी सगळ्यांची उमर म्हणजेच फुंका हाय नव्हं? त्याला यमनी काय करणार, तू काय करणार आणि टिनपाट फाटका म्हाम्या तरी काय करणार?'

मानवाला मृत्यू अटळ आहे, तो निश्चित केव्हा कोणत्या रूपाने येणार हे त्याला ज्ञात नाही, आणि म्हणूनच मृत्यूच्या कल्पनेनी, जाणीवेनी मानव कसा हादरतो हे सांगणारी कथा म्हणजे 'फुंका'! 'मूठ मारणे', 'फुंका टाकणे' ही काळी अघोरी विद्याही इथे आहे, त्यामुळे कथेची भयावहता अधिकच वाढली आहे.

गंगूलीची बाहुली पळवून यमनी जोगतीण तिला मूठ मारते. का? या प्रश्नाचे उत्तर कथेत मिळत नाही. पण सकाळपासून खणखणीत असलेली गंगूली एकदम ओरडत आडवीच होते. तिचे पोट पहाता पहाता टमाम फुगते. संध्याकाळपर्यंत तिच्या डोळ्यांतील नजर हरवते. आणि करकरीत संध्याकाळी गंगूली मसणवटीत पोचते. हे असे का होते? ह्या अघोरी विद्येचा ज्यांना अनुभव येत नाही त्यांना ते 'थोतांड' वाटते. आणि ज्यांना दुर्दैवाने त्याचा अनुभव येतो, त्यापुढे ते हतबल होतात. गंगूलीचा एकाएकी काहीही कारण नसताना झालेला हा मृत्यू मानवी आयुष्याचे दुबळेपण ठसवून जातो. ज्यांना नियतीचे तांडवनृत्य मूळातून जाणवलेच नाही, ज्यांना देवाचे अस्तित्वच मान्य नाही, ज्यांना सुदैवाने अघोरी शक्तीच्या अस्तित्वाची जाणीव झाली नाही, असे लोक

'गंगूलीचा मृत्यू' एक अपघात, एक योगायोग म्हणून त्याची संभावना करून मोकळे होऊ शकतात. खुद्द जी. ए. स्वत: त्यांच्या कथांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांबद्दल काहीही बोलावयास तयार नाहीत.

गंगूलीच्या मृत्यूनंतर पार्वती अंगात आल्याप्रमाणे संगापुढे हात नाचवत किंचाळते, 'आता या घरात राहणार नाही मी! खणखणीत पहारीसारखी पोरगी! अगदी बघता बघता खलास झाली! कुठं घालशील असला हरामाचा पैसा? सगळं तुझ्यापायी घडलं. पापानं हात सगळे राडेराड! परटिणीच्या पोराच्या कानातले डूल काढलेस, देवळातली समई उचललीस-' नंतरच्या भांडणात पार्वती घर सोडून निघून जाते आणि संगा एकटाच उरतो. घराचे घरपणच संपते. लहानसहान चोऱ्या करणाऱ्या संगाच्या पापामुळेच मुलगी गेली ही पार्वतीची भावना, तर तिला यमनीने मूठ मारली म्हणून ती गेली हे नंतर पुढे संगाला कळते; यमनीच्या हातातील गंगूलीची बाहुली बघून.

तर स्वत:चे मरण आता जवळ आले आहे हे ओळखलेल्या म्हामू कासाराला वेगळीच काळजी लागली आहे. काळा बोका आता पायरीवरच वाट पहात बसला आहे हे म्हामूने ओळखले आहे, स्वत:च्या मरणाची त्याची मानसिक तयार झाली आहे; पण कावळ्या-घुबडाप्रमाणे मरायला तो तयार नव्हता. चोर असूनही शेवटी तो संगावरच विश्वास टाकतो; त्याला घरात घेऊन स्वत:जवळचा चांदीचा पानडबा आणि सोन्याची पातळ दंडपट्टी दाखवून कळवळून म्हणतो, 'हे अस्सल सोनं आहे. आता माझं कधी संपणार याचा भरोसा नाही. इथं, वाटेवर, वडाखाली, कुठंही विझून जाईल. मी आडवा होईन. आता बघ संगा, हिथं माझ्या जमातीचं कोण हाय? नाचणीला हैत दोन घरं! पण कुत्र्याच्या अवलादीसारखं मरायला मन तयार होत नाही. संगा, मी आडवा झालो म्हणजे ती माणसं बोलावून घे, हे सारं विक आणि कुठंतरी दफन करायला सांग' 'माघारा' या कथेतील सीताबाई नवऱ्याला, सदूभाऊला असेच सांगते, 'मी यातून उठून बसेन असं वाटत नाही. तेव्हा असे करा, मी जाताना माझ्या अंगावर पुरेपूर वस्त्र आहे की नाही बघा. आणि लाकडसाठी माझे पिशवीतील पैसे घ्या,' वास्तविक मेल्यानंतर त्या मृत व्यक्तीचा कसलाच हट्ट उरत नाही. पण जिवंत असताना आपल्या उत्तरक्रियेचाही तो किती विचार करतो नाही? मानव आणि प्राणी यांच्यात हाच फरक आणि त्यामुळे दु:खात आणखी भर!

यमनीच्या परसातला भोपळा संगा तोडतो, आत हालचाल नाही हे पाहून तो खिडकीतून यमनीच्या खोपटात डोकावतो. मुखवटा, पैशांनी भरलेली यमनीची सोळा मडकी हेरतो, एवढ्यात यमनी येते आणि दोघात कडाक्याचे भांडण जुंपते. 'अरं, तुझं मढं पडलं हाळ भावीत!..... आता खाली जाऊन गावात बोंबलून नाही आले तर यमनी जोगतीण नव्हं मी!....' 'जा ग जा थेरडे, मी कशाला घेऊ तुझा भोपळा! माझ्या परड्यात गावजेवण घालायला बक्कळ इतके भोपळे पडलेत!' यमनीने त्याच्यासमोर वर्तुळाकार

हात नाचवले. ती म्हणाली, 'गावजेवण घालणाऱ्या घुबडाचं तोंड बघ! तुझ्या घरी दगडाचं जातं उपाशी मरेल! मग हा भोपळा काय तुझ्या ढुंगणातनं पडला व्हयरे सोद्या?' संगा चिडून म्हणाला, 'माझं मढं घालतेय हाळ भावीत! बघ तरी, आधी तुझं मढं तुला पाठविल्याशिवाय मी कशाला जातोय इथून!'

संगा रात्री चोरासारखा येणार आणि आपला चेंदामेंदा करणार असलं स्वप्न यमनीला दोनदा पडते आणि ती हबकतेच. यावर उपाय म्हणून ती संगावरच 'फुंका' टाकते. यमनीने संगावर फुंका टाकल्यापासून सगळे गावकरी त्याच्याशी तुटक, फटकून वागतात. संगा जवळ येताच भुताची सावली पडल्याप्रमाणे पोरे गप्पगार बाजूला होतात. यामुळे संगा चांगलाच हादरतो. शेवटी बाबल्याला जेव्हा तो पकडतोच आणि हडसून खडसून विचारतो, तेव्हा त्याला बाबल्याकडून कळते. 'यमनी आली आणि गुडघे टेकून मातीतच बसली. तू तिच्या जीवावर उठला आहेस म्हणून तिने तासभर बोभाटा केला. मग घसाघसा माती घासून तीन तीनदा डोक्यात घातली आणि डोकं हळदीनं भरलं. हातात तीनदा भंडारा घेऊन तुझ्या नावाने तिने भंडारा उधळला आणि तुझ्यावर फुंका टाकला. फुंका अमाशेपर्यंत जारी आहे. संगा, मी सांगितलं म्हणून सांगू नको यमनीला..... नाहीतर माझ्यावरसुद्धा फुंका टाकील ती सटवी! आणि मग मी खुळ्या कुत्र्यासारखा मरून जाईन–'

संगाचे सर्वांग भीतीने थरकते, पण नंतर त्याच्यात निर्माण होतो निखळ द्वेष. 'अस्सं काय भूतबोडकं! माझ्यावर फुंका टाकतंय काय! आज तुझे गुडघेच मोडतो की नाही बघ तूरकाडीसारखं! आता माघार नाही. या गावात आता तू तरी राहशील, नाहीतर मी तरी! मग मी फासाला लटकलो तरी हरकत नाही.' त्या तिरीमिरीतच तो यमनीच्या खोपटाशी येतो, खिडकीतून पहातो. यमनी गंगूलीच्या बाहुलीला लहान मुलाप्रमाणे जोजवत होती. संगाचा स्वत:वरचा ताबा सुटतो. लाथा घालून तो दार तोडतो. 'आता तुझं मढंच निजवतो बघ!..... ती भावली चोरून गंगूलीला तूच मूठ मारलीस नव्हं?..... आणि रांडमुंड वरती माझ्यावरच फुंका टाकतंय भर बाजारात!' लाथेनेच तो तिला उडवतो, बेभानपणे मुखवटा तिच्या डोक्यावर हाणतो, स्वतंत्रपणे झपाटल्याप्रमाणे त्याचे हात वरखाली होत राहिले आणि तिची हालचाल संपल्यावरच तो थांबतो. 'फुंका' सार्थ होतो तो असा- संग्याची फाशी निश्चित करून आणि यमनीला संपवून!

मग गावकरी येतात. म्हामू तर ताडताड कपाळावर हात मारून घेतो. सगळे हतबुद्ध होतात. शेवटी संगाशेजारी म्हामूला बसवून पांगतात. हताशपणे म्हामू म्हणतो, 'आणि मी आजच तुला बेवकूफपणाने माझ्या दफनाचं सांगत होतो, नव्हं संगा! आता तुझंच बघायची आफत आली बुढ्या घोड्यावर..... आता कसलं दफन आणि काय घेऊन बसलास? रानात शेण पो पडतो, वाळून जातो, तसाच पडायचा मी कुठंतरी!

धडपड धडपड करून करणार काय, तूच सांग! ..... मीच फाटका माणूस. मोठ्या गुर्मीनं घरटं बांधायला निघालो मढ्यासाठी!..... पण संगा माझं ऐक. हे सारं झूट, बिलकूल झूट, डोंबाऱ्याचा खेळ नुसता! यमनीनं फुंका टाकला म्हणून ती काय दिल्लीवाली मुमताझ होती व्हय?..... तिचा फुंका जाऊ दे संगा खड्ड्यात. आमच्यावर, सगळ्यांवरच एक अस्मानी फुंका पडलेला असतोय उमरभर! संगा, तुला सांगू काय? अरे, बेवकूफ, तुझी माझी सगळ्यांची उमर म्हणजेच फुंका हाय नव्हं? त्याला यमनी काय करणार, तू काय करणार आणि टिनपाट फाटका म्हाम्या तरी काय करणार?'

एक विदारक सत्य जी. ए. इथे म्हामू कासाराच्या रूपाने उघड करतात. आपले आयुष्य हाच मुळी 'फुंका' आहे. ज्याचा अंत केव्हा, कुठे, कसा होणार हे आपल्याला अजिबात ज्ञात नसते, आणि तरीही त्या अस्मानी फुंक्याला दृष्टीआड करून जणू अमर असल्याच्या गुर्मीत आपण वावरत असतो.

जीवन आणि मृत्यू यांच्यातील विलक्षण झुंज जी. ए. साकार करतात ती 'तळपट'मध्ये. जणू नाग हातात घेऊनच जन्माला आलेला दानय्या आयुष्यभर शंभर-सव्वाशे जातीवंत सळसळत्या नागांना खेळवून संपतो, तोही केशरी नागाला पकडताना. 'सर्प' प्रतिमा ही जी. एं.च्या आवडत्या प्रतिमांपैकी एक प्रतिमा आणि त्यामुळेच कृष्णगोल्ल गारुडी दानय्याची अविस्मरणीय व्यक्तिरेखा गारुड्याच्या जीवनातील बारीकसारीक तपशीलासह जी. एं.च्या प्रतिभेने साकार करणे अपरिहार्यच होते.

'त्याने पाऊल टाकले की मांड्यांत बेटकुळ्या उडत, व जणू त्यांच्यावर झेप टाकण्यासाठी काळ्या दंडातले मस्तवाल साप उसळी घेत' अशा तरण्याबांड दानय्याला आपल्या पोरीसाठी विचारायला पंचवीस मैल अंतर तुडवून रावण्या येतो. रावण्यानंतर त्याची जमीन दानय्याचीच होणार, म्हणजे निदान दानय्याच्या पायावरील नक्षत्र तरी जाईल, म्हणून आई खूष होते. भेंडी फुटायला आल्यासारख्या दिसणाऱ्या रुकमीला दानय्याने एकदा जत्रेत बघितले होते. दानय्या रावण्याच्या घरी राहायला गेला खरा पण शेतीचे ते ढोरकाम त्याला पटले नाही. मुख्य म्हणजे रुकमीचे वागणे. लाडिकपणे कुणाशीही घटकान् घटका बोलत राहणारी, त्यात माणूस जर रुमालवाला वा चांदीची झगझगीत बटने मिरवणारा असला तर हनुवटी किंचित उंचावून तोंड फिरवत ती हसे, नुसते विचारले तर ती तश्शीच त्याचा हात धरून जायला तयार होईल असे वाटे.

दानय्या रावण्याला काहीही न सांगता परततो. पुरुषी काचा घातलेल्या रुकमीला आणि चार माणसांना बरोबर घेऊन रावण्या दानय्याची समजूत घालून त्याला नेण्यासाठी येतो. पण बोलाचालीत दानय्याचा सौम्यपणा संपतो. खुळ्या रागात हात हलवत तो ओरडतो, 'हे बघ, तुझ्याशी सोयरीक करायची म्हणजे दहा जणांत एक भाकरी खायची,

नव्हं? मला पाहिजे माझी हक्काची घोडी, मी करू काय घेऊन शंभर माणसांची आगीनगाडी?' भोवतालची माणसे खिंकाळतात. 'रुकमीचा लालबुंद चेहरा रागाने काळसर झाला व त्या शेजारी तिचे लाल लुगडे विटल्यासारखे दिसू लागले.'

'चार-चौघांत घुबडा माझं हसं केलंस,' 'तुझं मूळ मूळ खणून तुझं चंदन केलं नाही, तुझ्या चुलीत शिरं वाढवलं नाही, तर नाव सांगणार नाही मी रुकमी!'

रावण्या परत फिरण्यापूर्वीच रुकमी तेथून मोकाट धावत निघून गेली. गावात छी: थू झाल्याने रावण्या जमीन फुंकून रातोरात निघून जातो. सामान बांधून रुकमी लवकरच जाणार असते. पण ती तशी जात नाही. गावकऱ्यांच्यामार्फत ती दानय्याची वस्ती उठवण्यासाठी धमक्या देते. वस्ती उठत नाही. तेव्हा ठरवून, आखणी करून मध्यरात्री गावकऱ्यांच्या मदतीने वस्ती पेटवून देते, बार निघतात, झोपड्या पेटतात. 'दोन हातात दोन चुड्या घेऊन रुकमी अंगात आल्याप्रमाणे एवढ्या बाप्यांत एकटीच बया इकडून तिकडे नाचत होती.' आई-बापाला दानय्या ओढ्यापलीकडे नेतो. एक दिवटी हातात घेऊन रुकमी ओढ्याच्या काठावर येऊन म्हणाली, 'हे काय नव्हंच रे रेड्या, अजून काय काय बघशील! तुझं तळपट केल्याखेरीज कपाळाचं गोंदण झाकणार नाही. मग तू पाताळात जाऊन लप. मेले तर हडळ होऊन येते की नाही बघ. मग म्हणशील, जिती परवडली; मेली रुकमी नको.' दानय्याही त्वेषाने म्हणाला, 'आता तुला सोडतो. एक दिवस तुझा गळा चिरल्याशिवाय राहातो काय बघ!'

तेव्हापासून दानय्याच्या पायाला नक्षत्र लागते. आईबाप वारतात. पोटात आग घेऊन दानय्या पाचपंचवीस गावे भटकला. रावण्या मेला, पुढे सारे गप्पगार झाले. 'रुकमी अशी कुठल्याकुठे एकदम विझून गेली कुणास ठाऊक! ती आता जिवंत तरी आहे का याची त्याला खात्री वाटेना, पण मेली तरी खवीस होऊन आपल्या पाठीवर ती असणार याची त्याला खात्री होती. दुखवलेला नाग परवडला. तो झुंजताना काहीतरी नियम पाळील. पण पिंजारलेली उंडगी बया नको!'

शेवटी दानय्या थकतो, म्हातारा होतो. त्याला वाटते, '-सापाचे ठीक आहे, कात टाकली की पुन्हा तरणाबांड. आपल्यावर मात्र दर वर्षी कातेवर कात चढत जाते' जी. ए. इथे मानवी आयुष्याचे कठोर सत्य सांगून जातात. माणूस मात्र जास्तीत जास्त जगण्यासाठी, दीर्घायुषी होण्यासाठी वेडेपणाने धडपडत असतो. वास्तविक हातातून वाळू निसटावी तसे आयुष्य निसटून जात असते. शरीर थकल्यावर उरते ते फक्त निरर्थक जगणे. सगळ्या वासना शिल्लक, बळ मात्र संपलेले. तारुण्यातील उमेद, उत्साह-ताजेपणा गेलेला. आपल्या असण्या व नसण्यामुळे कोणाचेही काहीही बिघडणार नाही, चक्राची गती क्षणभरही थांबणार नाही, तरी जगण्याची वेडी आसक्ती सुटत नाही. स्वत:हून मृत्यूला कवटाळण्याची इच्छा होत नाही असे आपले अपंग, दुबळे जीवन. मृत्यूची चाहूल लागलेला प्राणी शांतपणे मृत्यूला सामोरा जातो, माणूस मात्र

वेड्यासारखा मृत्यूपासून पळण्याचा प्रयत्न करतो; त्याला हे कळूनही वळत नाही की आपले ठरलेले श्वास संपल्यावर ठरलेल्या अटळ क्षणाला मृत्यू येतोच आणि आपण संपतोच. देवाला न मानणाऱ्या, नियतीला न जुमानणाऱ्या दिग्गजांनाही त्यांच्या ठरलेल्या अटळक्षणी, मृत्यू गाठणार आहे. आपल्या जन्मावर, जीवनावर, कार्यावर, मृत्यूवर, कशावरही आपले नियंत्रण नाही.

म्हातारपणामुळे दानय्याची बुद्धी चळते. त्याच्याजवळ साप नसल्यामुळे पंचमी भागविण्यापुरती तो गोंदाची बुट्टी उचलतो, तो दारात लालभडक लुगड्यातील हुच्च म्हातारी उभी होती. तिच्या आरडाओरड्याने वस्ती गोळा होते, त्याची चोरी उघडकीस येते आणि वस्ती सोडून जायला त्याला सांगण्यात येते. अंगावर धामीण हगल्याप्रमाणे दानय्याला अतिशय मळके वाटू लागते. 'काल नाग मेला तेव्हाच त्याची येथली नाळ तुटली. एकदा सगळीकडे चुड्या नाचल्या म्हणून माळ सोडून कोट ओढत भटकावे लागले होते. चुड्या फिरल्या व त्यात पेटल्याप्रमाणे लाल लुगडे झळाळले. आता चुड्या नाहीत पण लाल लुगडे आहे. त्यावर ढोलीतल्या घुबडासारखे डोळे आहेत. म्हणून आता पुन्हा पायावर भिंगरी आली.....' त्याचा नाग मेला तोही हुच्च म्हातारीमुळेच. 'लाल लुगडे तर भुताप्रमाणेच मानेवर बसले आहे' असे दानय्याला वाटते. स्वत:चे जनावर आणून वस्तीला दाखवायचं आणि मग आपल्या वाटेने निघून जायचं अशा निर्धाराने दानय्या दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे निघतो. तर निंबाआडून त्याच्यावर नजर ठेवून असलेली हुच्च म्हातारी एकदम त्याच्या वाटेतच येऊन उभी राहते. तिच्या कपाळावर कुंकू होते आणि रक्तात भिजल्याप्रमाणे ओलसर लाल रंगाचे जुनेरे तिच्या अंगावर होते. ती पुन्हा निंबाआड गेली. हुच्च म्हातारी खरोखरच दिसली की आपल्याला भास झाला हेच दानय्याला कळेना. नेमक्या वेळी हे अभद्र भूत समोर दिसले म्हणून त्याने कपाळावर हात मारला.

थकून एका निर्गुडीच्या झाडाखाली बसल्यावर दानय्याच्या मनात शरम जागी होते. 'इतक्या वर्षांत हाताला शेण लावू दिले नाही, कालच अवदसा का आठवली? हुच्च म्हातारीने आपल्यावर तांदूळ तरी फेकले नाहीत ना? तिने कालच डेरके का नागावर टाकले? गोंदाच्या झोपडीवर त्याच नेमक्या वेळी ती कशी उगवली? आणि इतर सारी माणसे घोरत असता तीच का समोर आली? की हुच्च म्हातारी नव्हेच. आणखी कुणीतरी तिच्यात बसून तळपट करण्यासाठी.....'

वाटेने जाताना त्याला आपल्यामागून काही अंतरावरून सतत कुणीतरी येत आहे असा भास होतो. वळून पाहताच तो शहारतो. जांभळाच्या झाडाजवळ झुडपाआड त्याला लालभडक रंग दिसला. थोडे पुढे जाऊन तो पाहतो. 'लाल लुगडे स्पष्ट होते, आणि वर चेहेराही होता. त्याला एकदम चटका बसला. इतक्या दूर? आणि इतक्या वर्षांनंतर? दगड हातातच धरून तो मंतरल्याप्रमाणे निर्जीव अंगाने तिकडे गेला. तो

भास होता हे लक्षात आल्यावर तो सैलावून हसतो.

नंतर धगधगीत केशरी रंगाचा नाग दानय्याला दिसतो. पुटाप्रमाणे चढलेली वर्षे गळून दानय्याचे सारे अंग इशारा दिल्याप्रमाणे खडबडून जागे होते. दानय्याची आणि केशरी नागाची झुंज जी. एं.नी अतिशय तन्मयतेनी, प्रत्ययकारी रेखाटली आहे. हा तर कथेचा काळीजभाग. उजव्या हाताने पक्कड काढून डाव्या हाताने दानय्याने नागाला उचलले. ऊन आता उकळल्यासारखे झाले होते. एवढ्यात दानय्याचे लक्ष समोरच्या ढिगाऱ्यामागे गेले. तेथे झाडाला लपेटल्याप्रमाणे कुणीतरी उभे होते. दानय्या लक्षपूर्वक पाहतो आणि त्याच्या अंगावर काटा उमटतो. 'तांबडे लुगडे, लालकाळसर संतापलेला चेहेरा, नागाने त्यातीलच दोन थेंब आपल्या डोळ्यांसाठी उचलल्याप्रमाणे वाटणारे काळ्या विषाने भरलेले डोळे' दानय्याला सगळ्याचा विसर पडतो. डाव्या हाताची बोटे शरण गेल्याप्रमाणे दुबळी होतात; तर उजव्या हातातील पक्कड थरथरू लागते. लाल उसळत्या आवेगाने निसटलेला नाग दानय्याच्या उघड्या मांडीवर झेप घेतो आणि दात रुतवतो. नागाने जणू युद्धातला एक धर्मनियम मोडल्याप्रमाणे दानय्याचा संताप जागा होतो. दानय्याने झटक्याने नागाच्या रुतलेल्या डोक्यास हिसडा दिला, व कोयत्याने मांडीवरच त्या डोक्यावर वार केला. दानय्याने नाग ओढून जमिनीवर टाकला व बेभानपणे त्याच्या डोक्याचा लगदा केला. तोपर्यंत दानय्याच्या मांडीला चूड लागते. तो कोयत्याने मांडीवर रेघ ओढून बोटाने दाबून रक्त काढण्याचा प्रयत्न करतो, शेवटी कचाकच वार करतो. केशरनागाबरोबर दानय्या आणि दानय्याबरोबरच केशरनाग संपून जातो. दानय्याला वारंवार होणारा 'रुकमी'चा भास अखेर त्याचा बळी घेतो, आणि रुकमीला करावयाचे दानय्याचे 'तळपट' पूर्ण होते. दानय्याच्या मनात खोलवर दडलेली भीतीच त्याचे तळपट करते. इथेही मानव दुबळा आहे. भीतीने एकदा का ग्रासले की त्याला मग कुणीही, कितीही वाचविण्याचा प्रयत्न केला तरी वाचवू शकत नाही.

मानवाच्या आकलनापलीकडील नियतीच्या अतर्क्य खेळाचा शोध घेण्याचा प्रयत्न जी.एं.चा 'दूत' करतो. अंतर्ज्ञानी असलेल्या धर्मभूषण सम्राटांची आज्ञा घेऊन आलेल्या विशेष राजदूताला नगरीत पोहोचताच त्याची स्मृती निर्जीव, जड होऊन त्याला संदेशाचेच विस्मरण होते, आणि सत्तेच्या भीषण नाट्याचे विजेगत दर्शन वाचकाला घडते ते 'दूत'मध्ये. राजपुत्र उत्तराधिकारी होण्यासाठी; तर आर्यस्थवीर धर्मशासनाची धुरा स्वीकारण्यासाठी आतुर झाले होते. त्यामुळेच दूताला आपल्याला अनुकूल आज्ञेचे स्मरण व्हावे म्हणून राजपुत्र व त्याच्या पाठोपाठ आर्यस्थवीर दूताला डोंबाकरवी ज्या अमानुष यातना देतात, त्यांनी दूत मरणोन्मुख होतो. तर त्याच वेळी वाचकास दैदिप्यमान राजकारणामागील कुटील राजनीतीचे, किळसवाण्या स्वार्थाचे काळेकुट्ट दर्शन घडते.

प्रासादात अदृश्य आघात झाल्याप्रमाणे दूत विकलपणे बसून राहिला. आपल्याला आज्ञेचे स्मरण झाले नाही तर राजपुत्राच्या कठोर क्रोधास तोंड द्यावे लागणार, प्रसंगी प्राणासही मुकावे लागणार याची त्याला जाणीव होती, त्यामुळेच त्याला निद्रेनेही स्पर्श केला नाही. वास्तविक त्याने स्पष्टपणे आधीच सांगितले होते, 'या दासाला क्षमा असावी. माझी स्मृती अकस्मात निर्जीव, जड झाली आहे. सम्राटांची आज्ञा काय आहे, याचे मला पूर्ण विस्मरण झाले आहे, परंतु ती आज्ञा उत्तराधिकाराविषयी नव्हती, याचा मला पूर्ण विश्वास आहे..... आणि ती आज्ञा धर्मशासनाविषयी देखील नव्हती.'

दूताला राजपुत्राविषयीच सम्राटांची आज्ञा आठवावी म्हणून अमात्यांच्या आज्ञेवरून डोंब एका निमिषांत दूताच्या पाठीवरून तळहाताएवढे कातडे सोलून काढतो. आत्यंतिक वेदनेने पिळवटून दूत निश्चेष्ट होतो. थोड्या वेळाने वेदनेचाच दंश झाल्याप्रमाणे उठून बसत आर्ततेने दूत विनंती करतो, 'या संथ यातनेपेक्षा माझा पूर्ण वध करा. मी अति कृतज्ञ राहीन. मला सम्राटांची आज्ञा आठवत नाही, पण ती राजपुत्राविषयी नाही हे मात्र मी शपथपूर्वक सांगतो.' अनावर संतापाने राजपुत्राने दूतावर कठोर प्रहार केला आणि त्याला प्रासादाबाहेर फेकून देण्याची आज्ञा दिली.

भद्रानंद दूताला दोन भिक्षूंकरवी उचलून आणतो आणि आर्यस्थवीरांच्या अनुमतीने भिक्षूंच्या अरुंद कोठडीत बंदिस्त करतो. तो अत्यंत नम्रपणे सुचवतो. 'सम्राटांची आज्ञा आर्यस्थवीरांविषयीच होती, अशी स्मृती होणे आपल्या हिताचे होईल.' बिचाऱ्या दूताच्या चेहेऱ्यावरील निर्जीव भाव बदलत नाही. शेवटी संतप्त, अधिर झालेला भद्रानंद त्याला अनुतापगृहात नेऊन डोंबाकरवी तैलदिव्याची शिक्षा देतो. उकळत्या तेलाचा बिंदू अंगावर पडताच दारुण यातनेने दूत आक्रोशतो. 'असेच काही अंतराने तैलबिंदू पडत राहू देत.' भद्रानंद समाधानाने म्हणाला, 'नको, नको, खड्गाने माझा शिरच्छेद करा, तेवढी दया या क्षुद्रास दाखवा.' दूत याचना करत म्हणाला.

शेवटी निराश झालेल्या आर्यस्थवीरांच्या आज्ञेने दूताला स्मशानात फेकण्यात येते.

स्मशानात नेऊन टाकलेल्या मरणोन्मुख दूताला आसरा देण्यासाठी आलेल्या डोंबाशी बोलताना दूताला लख्खकन सम्राटाच्या आज्ञेचे स्मरण होते व ती आज्ञा आता डोंबापाशीच व्यक्त करण्यावाचून त्याला गत्यंतर नसते. सम्राटांचा पवित्र शब्द निष्फल होऊ देणार नाही अशी कालिकेची अत्यंत पवित्र शपथ घेऊन डोंब ग्वाही देतो. 'तर मग ऐक. सम्राटांची आज्ञा एका डोंबाविषयीच आहे..... त्या अतिपापी कालमुखास तीन दिवसांत देहान्ताचे शासन झाले नाही, तर साऱ्या साम्राज्यावर महान संकट कोसळेल, परचक्र येईल, जनांची भीषण हत्या होईल, व रक्ताचे पूर वाहतील, आणि स्वत: सम्राटांना जीवितास मुकावे लागेल..... कालमुख हे नाव तुझ्या स्मृतीत राहील ना?' नियतीच्या ह्या अतर्क्य खेळाचा डोंबाला आणि वाचकांना एकाच वेळी धक्का बसतो. 'होय, त्या नावाचा मला विसर पडणार नाही. राजदूत, या नगरात मीच एकटा

डोंब आहे आणि माझेच नाव कालमुख आहे.' आता धक्का बसतो बिचाऱ्या दूताला. तो त्याच्याकडे अविश्वासाने पाहतो आणि दुसऱ्याच क्षणी गतप्राण होतो.

'अल मख्तूब, मख्तूब!' जे लिहिले आहे, ते लिहिले आहे! अल मख्तूब, मख्तूब! मुशाफिराने ते शब्द आपल्या प्रवासात हजारदा तरी ऐकले असतील. वाळवंटाला एकच वाक्य उच्चारायला येत असल्याप्रमाणे, त्याच्याच विरळ विखुरलेल्या प्रत्येक गावात, प्रत्येक वाडीत हेच शब्द एखाद्या मंत्राच्या जपाप्रमाणे ऐकू येत– अल मख्तूब, मख्तूब! जे लिहिले आहे, ते लिहिले आहे..... कारवान निघाला असता नेमक्या त्याच वेळी एखादी सांड व्याली, नगद नाणी मोजून घेतलेला, डोंगराच्या कड्यासारखा वाटणारा धिप्पाड गुलाम अकस्मात एखाद्या मच्छरासारखा मेला, पाच फूट लांबीचा दुर्मिळ हस्तिदंत, उंट उधळल्यामुळे खाली पडून फुटला, किंवा भर वाळवंटात दुरून येणाऱ्या बंदूकवाल्या बेदुइन सैतानांचा दरोडा पडला, तर हे सारे का घडले हे न समजल्यामुंळे गोंधळलेला मनुष्य एकच वाक्य उच्चारून सारे सहन करत असे– अल मख्तूब, मख्तूब!

नियतीची अतर्क्य लीला 'दूत'प्रमाणेच 'गुलाम'मध्येही मृत्यूतांडव घडविते. अल मख्तूब, मख्तूब! अल एदिनच्या प्रदेशात कोठेतरी एमान नदी उगम पावते, तिच्या उगमाजवळच्या प्रदेशात शहामृगांच्या अंड्याएवढ्या तेजस्वी हिऱ्यांचा खच पडला आहे. उंट, मेंढ्या हुसकावण्यासाठी तेथील धनगर मुठीएवढी मोठी रत्ने दगडासारखी भिरकावतात. तेथे खळग्या खळग्यात मेंढीच्या मुंडक्याएवढे हिरे पडले आहेत. म्हणून रत्नांचा ध्यास घेतलेला रत्नवेडा मुशाफिर अल एदिनकडे ओढीने निघतो. अल एदिनला येणाऱ्या प्रत्येक गुलामाची तत्काळ हत्या करण्याची परंपरा असल्यामुळे मुशाफिराला कोणी गुलाम विकेना. अल एदिनला जायला निघायचे म्हणजे आधीच वाळवंटात हाडे पसरण्याची तयारी हवी. त्यामुळे त्याला तिकडे जायला कारवान मिळेना. लोकांनी तिरस्कृत ठरविलेल्या एमराकडून, मुशाफिराला बळी जाणारा गुलाम मिळतो, पण तो त्याच्या कमरबंदामध्ये असलेल्या लाल रत्नाच्या मोबदल्यात. आपल्याजवळ रत्न आहे हे एमराला आधीच कसे समजले ह्या गूढ जाणीवेने आघात झाल्याप्रमाणे मुशाफिर चमकतो, तर एमरा हसून त्याला सांगतो की त्याच्या दोन पांढऱ्या उंटावरील प्रत्येक वस्तू त्याला ज्ञात आहे. एमराबरोबर जो कुबड्या असतो, तो तर रमलज्ञ होता.

एमरा मुशाफिराला जो गुलाम देऊ करतो त्याची जीभ कोणीतरी आधीच छाटलेली, अन्नपाण्यावाचून चार दिवस चालू शकणारा, गूढपणे आधीच वादळाची जाणीव होणारा, प्रसंगी आपल्या आईच्या काळजात देखील कट्यार खुपसण्यास मागेपुढे न पहाणारा असा असतो. पण तोच अल एदिनचा सात वर्षांपूर्वी शिकरीला गेला असताना विश्वासघाताने गुलाम बनविला गेलेला सम्राट असतो. ही नियती! अल एदिनचा सम्राट विश्वासघाताने गुलाम बनविला जातो. अल एदिनला पोहोचल्यावर तो पुन्हा सम्राट

होतो आणि दिल्लीचा मोगल सम्राट हुमायून शेरखानाकडून पराभूत होतो. दिल्लीची गादी गमावून परागंदा होतो. इराणच्या शहाची मदत मिळवून काबूल कंदहार जिंकतो. शेरशहाच्या मृत्यूनंतर १५५५ मध्ये पुन्हा दिल्लीच्या गादीवर तख्तनशीन होतो आणि अवघ्या सात महिन्यात ग्रंथालयाच्या पायऱ्यांवरून पाय घसरून गडगडत खाली येतो. मृत्यू पावतो. ही नियतीची अतर्क्य लीला! असेच दुसरे उदाहरण भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधींचे! नियतीची अतर्क्य लीला मानवी आकलनापलीकडची आहे, हेच खरे.

अल एदिनच्या सिद्दीला भेट देण्याकरिता एमरा मुशाफिराला एक हस्तिदंती पेटी देतो. त्या पेटीत सिद्दीसाठी खास भेट असते. प्रवासात मुशाफिराच्या मित्राला वेड लागते व त्या झपाटलेल्या अवस्थेतच तो संपतो. कुबड्याचे शब्द आठवून मुशाफिर मात्र अंगात वीज झळकल्याप्रमाणे टरकतो. वेडाच्या भरात मित्राने वाळूतून ओढून काढलेल्या मानवी सांगाड्याचा त्याला क्षणभरही विसर पडेना. तो हाडांचा सांगाडा म्हणजे आपला भविष्यकाळ तर नसेल या कल्पनेने मुशाफिर कासावीस होतो. 'भविष्यकाल वर्तमान झालेला काही वेळा माणसाला पाहता येतो. पण वर्तमान भूतकाळ झालेला पाहण्यास तो बहुधा जगत नाही.' कुबड्याचे हे शब्द त्याला राहून राहून आठवतात.

रातोरात गुलाम उंटांची पोटे चिरून, हस्तिदंती पेटी घेऊन नाहीसा होतो. मुशाफिराच्या कमरपट्ट्यातून हस्तिदंती पेटी काढून घेणाऱ्या गुलामाला मुशाफिराला संपविणेही शक्य होते, पण तेवढे तो करत नाही. केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर एकाकी मुशाफिर कसाबसा अल एदिनला येऊन पोहोचतो. अल एदिनच्या सम्राटाला अभिवादन करून तो न्याय मागतो. त्याच्या गुलामाची मागणी करतो. लाल वस्त्रातील वृद्ध अधिकारी त्याला सांगतो, 'परंपरेच्या दडपणाखालून निसटून तू वाळवंटात आलास हे सत्य आहे. परंतु मग त्या ठिकाणी नीतिनियम करण्याचा तुला जसा अधिकार आहे, त्याचप्रमाणे तो गुलामालाही आहे म्हणूनच त्याने तुझे उंट मारले, व स्वत:ची मुक्तता करून घेतली. तुझी नीती व त्याची नीती यांच्या संघर्षात तू पराभूत झालास इतकेच. या परिस्थितीत तू स्वत: जर गुलाम असतास तर तूही हाच धर्म पाळला असतास.' मुशाफिराची हत्त्या निश्चित होते. शेजारी येऊन उभ्या राहिलेल्या काळ्या आकृतींच्या हातातील रुंद पात्यांचे कोयते बघताच ओळख पटल्याप्रमाणे त्याचे शरीर बधिर होते.

झळाळणाऱ्या आसनावर बसलेला अल एदिनचा सिद्दी पायऱ्या उतरून मुशाफिराजवळ येतो, मुकुट उतरवितो, बुरखा काढतो, अंग हलवून पायवोळ निळे वस्त्र सळसळत खाली टाकतो, आणि मुशाफिराला धक्काच बसतो! समोर त्याचा गुलाम उभा असतो! 'सारे यत्न सरल्यावर अनिवार्य ते स्वीकारताना येते ती असहायता मुशाफिरात आली. त्याला वाटले..... फासे खुळखळणे आपल्या हातात असते, पण दानावर मात्र आपली सत्ता नाही. इतक्या ठिकाणी, इतक्या वेळा ऐकलेले शब्द, बी

रुजल्याप्रमाणे त्याच्यात आता रक्ताच्या धगीने आपोआप उमटले-- अल मख्तूब, मख्तूब!' गुलामाच्या हातातली हस्तिदंती पेटी बघून, त्या अंतिम क्षणी मुशाफिराच्या मनात, पेटीतील एमराने पाठविलेली भेट पाहण्याची इच्छा निर्माण होते. पेटीतील कापडावरील चित्र बघून तो विस्मयाने गोठतो! चित्र हुबेहूब भोवतालचे त्याचाच मृत्यू दाखविणारे होते! तो कापड़ाची घडी घालायला लागतो, तोच थबकून विस्फारित डोळ्यांनी चित्राकडे पाहतच राहातो. आता चित्रात थोडा बदल होतो, लाल वस्त्रातील वृद्धाने आपली भीषण कट्यार पाठीत खुपसल्यामुळे गुलाम पायऱ्यांवरून खाली कोसळत होता. कापडाची घडी घालून मुशाफिर गुलामाला परत देतो. गुलाम ती पेटीत ठेवून मुशाफिराच्या मृत्यूची वाट पाहतो. मुशाफिर चौथऱ्यावर मान ठेवतो. पण न राहवून गुलामाकडे पाहात अनावरपणे मोठ्याने हसू लागतो. स्वत:च्या आणि आपल्या पाठोपाठ गुलामाच्या अटळ मृत्यूची जाणीव झालेला मुशाफिर वेड्यासारखा हसतच राहतो. अगदी कुबड्याच्या आवाजात. तो का हसतो हे माहीत नसलेला गुलाम त्याच्या हत्त्येची शांतपणे वाट पहात होता आणि त्याच वेळी लाल वस्त्रधारी वृद्धाच्या मनात एक गाठ बसत होती. अल मख्तूब, मख्तूब! एमराचे सूचक बोलणे, वा कुबड्याचे स्पष्ट उद्‌गार मुशाफिराला रोखू शकत नाहीत. त्याचा अटळ शेवट टाळू शकत नाही. हस्तिदंती पेटी आणि तिच्यातील कापडावरील स्वत:चेच भविष्य जवळ असूनही, पेटी उघडता येत नसल्यामुळे मुशाफिराला ते कळत नाही आणि पेटी उघडता येत असूनही गुलामाला त्याचा उपयोग होत नाही. कापडाची घडी तो निर्विकारपणे पेटीत ठेवतो. नियतीच्या अटळ खेळाला दोघेही असे बळी पडतात.

तर मनाचा थरकाप उडविणारी, विलक्षण अस्वस्थ करणारी कथा म्हणजे- 'स्वामी'. एका सामान्य प्रवाशाला महंत कपटाने फसवून तळघरात डांबतो. माणसाच्या सहवासालाच काय पण सावलीलाही पारखं करतो. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला 'स्वामी' बनवितो. उभे राहणे, सरपटणे, मांडी घालणे, आडवे होणे ह्या क्रिया जेमतेम करता येईल अशा टिचभर जागेत बंदिस्त करतो. मृत्यू येईपर्यंत दोन वेळच्या सुग्रास जेवणावर टिचभर जागेत एकाकी जगण्याची शिक्षा स्वामीच्या वाट्याला येते. तीही एक हाताच्या अंतरावर भिंतीतील चौकटीत, आधीच्या तीन स्वामींच्या सांगाड्यांच्या सहवासात. विलक्षण अस्वस्थ करणारा अनुभव ही कथा देते.

कथेत सर्वत्र असलेली लाल रंगांची उधळण; महंताच्या तपोनिवासातील एकसाची, एकसुरी दिनक्रम; अन्न, वस्त्र, निवारा यांच्या मोबदल्यात सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची गळचेपी; इतर सर्व शिष्यांनी त्यांची ठरलेली कामे यंत्रवत करणे; 'आता येथे प्रमुख आणि सेवक असा भेद नाही..... पण मी देखील त्यांच्या इतकाच सेवक,

त्यांच्याइतकाच अनुयायी आहे,' असे वरपांगी म्हणत प्रत्यक्षात महंत उपभोगत असलेली निरंकुश सत्ता, साम्यवादी राजवटीची प्रत्ययकारी जाणीव करून देते. 'स्वामी'च्या वाट्याला आलेली अघोरी एकांतवासाची शिक्षा, साम्यवादी राजवटीत साम्यवादी राजवटीच्या विरोधात जाणाऱ्या सर्वसामान्य माणसापासून विचारवंत, शास्त्रज्ञ यांच्या वाट्याला येते. त्याची विलक्षण थरारक जाणीव करून देण्याचे अंगभूत सामर्थ्य 'स्वामी'त आहे.

महंत आणि त्याने निर्माण केलेला सापळा म्हणजे आपले मानवी जीवन, सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असूनही प्रत्यक्षात कसलेही स्वातंत्र्य नसलेले दैवाधीन, दुबळे मानवी जीवन! जन्माला येण्याचे स्वातंत्र्य नाही, कठोर परिश्रमांनाही फळ मिळण्याची खात्री नाही, मृत्यूचेही स्वातंत्र्य नाही, अल मख्तूब, मख्तूब! जे लिहिले आहे, ते लिहिले आहे. अशा विपरीत, प्रतिकूल परिस्थितीवर स्वामी जी विलक्षण मात करतो, ती मात म्हणजे अर्थशून्य मानवी जीवनात लपून राहिलेला अर्थपूर्ण आकडा! जी.एं.चा सारा आशावाद, अर्थपूर्ण आकड्याच्या शोधातली त्यांची सारी धडपड 'स्वामी'त पूर्णत्वास गेली आहे.

त्या बिचाऱ्या सामान्य मुशाफिराला तळघरात बंदिस्त केल्यावर महंत त्याला सांगतो, 'कोणीदेखील तुझ्याकरिता खंगणार नाही. थोडे दिवस शोधाशोध होईल. कदाचित वर्तमानपत्रात जाहिरात येईल. पण माझे ऐक. आठवड्याच्या आत सगळ्यांच्या भुका ताज्यातवान्या होतील. तू नाहीसा झालास म्हणून काही लोकांना आनंद देखील होईल. तू आपल्यामागे काहीच कायदेशीर व्यवस्था केली नाहीस म्हणून झालेल्या गैरसोयीबद्दल काहीजण तुला दोष देतील. पण बहुतेकांना त्याचे काहीच सोयरसुतक वाटणार नाही. तू काय, मी काय, किंवा एखादा सम्राट काय, आम्ही जागा खाली केली की ती रिती न राहता, दुसऱ्या बुडबुड्याने लगेच भरून जाते.' एका कठोर कटू सत्यालाच इथे जी. एं.नी हात घातला आहे. राजकवी भा. रा. तांबे यांची 'जन पळभर म्हणतील' या मृत्यूविषयक गीतातही हीच जाणीव व्यक्त झाली आहे.

आधीच्या तीन स्वामींचे अवशेष तिथेच आणून जतन केलेले असल्यामुळे स्वामीला एकटे वाटायची जरुरी नाही असे महंत सांगतो, तेव्हा तो बावरून उठतो आणि समोरच्या भिंतीला ठेचाळून कळवळतो. महंत सांगतो, 'ओठावरील शांत ज्ञानी स्मित मृत्यूच्या समोर टिकत नाही; पण नाक, कान, डोळे इत्यादी इंद्रिये निघून गेल्यावरदेखील मृत्यूच्या तडाख्यातून एकच वाचून राहते. ते म्हणजे कवटीचे हास्य– आणि ते हास्य म्हणजेच आयुष्याबाबतचा माणसाचा अंतिम निर्णय होय.' त्याला महंताने 'स्वामी'का बनविले, त्याबद्दल महंत म्हणतो, 'स्वामी पाहिजेच कशासाठी म्हणतोस, अरे नाही म्हटले तरी माझा इतक्या माणसांशी संबंध येतो. मी स्वत: अमूक म्हणतो असे म्हटले तर ती आज्ञापालन करणार नाहीत असे नाही, परंतु तशी स्वामीची आज्ञा आहे असे म्हटले की, माझ्या शब्दांना दैवी झळाळी येते. माझ्याशिवाय स्वामींजवळ कोणीच जाऊ शकत

नाही. जेथे फक्त आपल्यालाच प्रवेश आहे आणि जेथे आपल्या शब्दांची रुजुवात करून घेणे इतरांना केवळ अशक्य आहे, अशी एखादी विभूती हाती असणे हे धर्माच्या बाबतीत अत्यंत जरूर व फार फायद्याचे असते.' या कपटी महंताने आतापर्यंत चार स्वामींना स्वत:च्या सत्ताकांक्षेसाठी वर पोहोचविलेले असते आणि आता ह्या सामान्य प्रवाशाला 'स्वामी' बनवून आधीच्या स्वामींच्या मार्गाने पाठविण्यासाठी तो तळघरात डांबतो. अगदी आद्य स्वामीदेखील त्याच्या तडाख्यातून सुटलेला नसतो. तो सांगतोच मुळी की नंतर सर्वच स्वामींची नावे 'शिवचरण' अशी असतात. शेतकरी, विक्रेता, जटाधारी बैरागी, कीर्तनकार आणि आता सामान्य मुशाफीर असे एकापाठोपाठ एक पाच स्वामी महंताने गाठलेले असतात. एक स्वामी वृंदावनाखाली आणि तीन स्वामींचे सांगाडे तळघरात चिरनिद्रा घेत असतात. याचाच अर्थ आद्य स्वामीलाही 'स्वामी' बनविले असते ते महंतानेच. बोलता बोलता महंत स्वामीला म्हणतोच मुळी, आद्य स्वामींनीही त्याला नेमका वरच्या नळाबद्दल हाच प्रश्न विचारला होता. सत्ताकांक्षा किती क्रूर असते याचे जिवंत प्रतीक म्हणजे हा महंत!

स्वामींच्या वाट्याला आलेली कैद भयानक, थरकाप उडविणारी, जीवघेणी होती. 'डाव्या बाजूच्या वर्तुळात सरपटण्याखेरीज प्रवेश नव्हता. तो अंग ओढत पुढे सरकू लागला तेव्हा तर त्याला वाटले– उभा असता, बसलो असता, निदान माणूस तरी होतो. पण आता ती अब्रूदेखील उरली नाही. आता माणूस नाही; तर अंधारात जगणारा, वाटणारा, संपणारा एक उरग! निळ्या लाल प्रकाशात उतरत आपण गर्भाशयात आलो, एवढेच नाही तर आता उत्पत्तिमार्गावरून उलट चाललो आहो- माणूस, मग उरग, मग अणुकीटक, मग- मग शेवटी शून्य, चिंतनाने शेवटी शून्य, शरीरानेही शून्य!' 'त्याला वाटले, बस्स आडवे, उभे आणि मांडी मुडपून घातलेली बैठक, याच आता आपल्या तीन अवस्था. आयुष्याच्या दांड्यावरील हा एक त्रिशूळ!'

मांड्यांची हाडे मुडपून बसवलेल्या तीन सांगाड्यांचे दर्शन स्वामीला ज्या अनपेक्षितपणे होते, त्यामुळे त्याचे अंग तर एकदम मेणाचे होतेच, पण त्याच वेळी वाचकही टरकतो. 'आणि ते सगळे रुंद मळकट दातांनी कानापासून कानापर्यंत हसत होते!..... वृंदावनाखाली थोडे दिवस राहाण्यापुरता त्यांनी वरचा प्रवास केला. पण पुन्हा ते परत आपल्या जागी आले होते आणि इतके दिवस मांसाच्या ओठाखाली दडवलेले हास्य आता मनमोकळेपणाने दाखवत होते आणि त्यांच्या शेजारी अद्याप दोन जागा रिकाम्या आहेत व त्यातील एक खास आपल्यासाठी आहे. अंथरुणाच्या फळीपासून तेथपर्यंत फक्त एका हाताचा प्रवास आहे.' एका हाताच्या अंतरावर ते तीन सांगाडे सतत पहारा करीत असताना झोपण्याची कल्पनाच त्याला सहन होईना. उभ्याने आंघोळ, आखडलेली मांडी घालून तास न् तास खुरडत राहाणे, निदान अंग पसरायचे तरी सुख होते. तेही या निर्जीव हाडांनी हिरावले, या जीवनाच्या जाणीवेने बिचारा

असहाय होतो. पण त्याचबरोबर त्याला बेभान चीडदेखील येते. त्याला वाटते, 'सगळ्यांच्याचकडून मी सांदरीत चेंगरला जाणार आहे की काय..... मी उद्याचा सांगाडा असलो, तर आज, आत्ता, पूर्ण जिवंत आहे..... अरे, वरचे कातडे फेकून दिलेस तर तू देखील त्या माणसासारखाच आहेस. आता आपल्यात फक्त कातडी-मांसाचाच फरक. तो देखील काही काळाचाच आणि नंतर मी देखील तेथे शेजारीच बसणार आहे!' दाराआड गेलेल्या त्या सांगाड्यांच्या दिशेने तो आवेशपूर्ण वेडसर डोळ्यांनी पहात राहिला.

आणि मग ध्यानीमनी नसताना, एक दिवस अचानक त्याला आधीच्या कोणा कीर्तनकार स्वामीने त्याच्याचकरिता ठेवलेली पत्र्याची चपटी डबी मिळते. तिच्यात त्याच्यासाठीच लिहिलेले पत्र, एक मोठी काळी अफूची गोळी आणि चांदीचा एक लहान त्रिशूळ मिळतो. तो अधिरपणे पत्र वाचतो; पत्राने त्याचे जीवनच कात टाकते. त्याला सुटकेचा मार्ग सापडतो. कीर्तनकार स्वामीने शेवटी लिहिले असते, 'आता तुला एवढाच निरोप आहे. माझा वाटा घेतल्यावर आता ही अफूची गोळी हवी असल्यास तुझ्यासाठी आहे. तू जरी माझ्यासारखाच अफिणी असलास तरी तुला ती पुरून उरेल. आता एकच शेवटची गोष्ट. ज्यातून सुटण्याचा मार्ग आपल्याच हातात आहे, ते आयुष्य कितीही निर्दय असले तरी ते आपणाला चिरडू शकत नाही. नमस्कार!' ज्याने आपल्याला मृत्यू दाखवून वाचवले, तो आपला उपकारकर्ता कोण? 'त्याला तीनही सांगाडे आठवले. पण त्या सगळ्यांच्याच चेहेऱ्यावर तेच उमजलेले, गूढ हास्य होते—तुझे उत्तर आम्हाला माहीत आहे, पण ते तुझे तूच ओळख.'

'हा गोलक आहे तरी कसला? की तो कसला आहे हे सांगता येत नाही हेच अखेरचे खरे उत्तर? फार तर त्याच्याकडे पाहत हाडे मुडपून सतत रुंद हसत बसता येते. किंवा डोळे भाजणाऱ्या या गोलकापासून निसटण्यासाठी निर्जीव काळ्या गोळीला शरण जाता येते. परंतु ही काही प्रश्नांची उत्तरे नव्हेत. ही तर त्या प्रश्नाने स्वच्छ गोल भिंगाप्रमाणे टिपलेली चित्रे आहेत. आणि शेवटी राहते काय? तर सगळे नोंदून, पण काहीच अंगाला लावून न घेता निर्लेप, निर्विकार राहणारे हे एवढेच भिंग. पूर्णात् पूर्णम् उदच्यते!' ह्या प्रश्नांनी व्याकुळ झालेली जी. एं.ची कथा सातत्याने अर्थपूर्ण आकड्याच्या शोधात आढळते. 'मुक्ती' आणि 'स्वामी' त्या दृष्टीने लक्षणीय कथा. शिवागांला बैरागी म्हणतो, 'आजच सुदैवाने न जगण्याला मला पटणारे एक कारण मिळाले— तू दिसलास! तू तुझ्या मुक्तीसाठी चालला आहेस. ती तुला मिळेल न मिळेल. पण जात असता खरी मुक्ती दिलीस ती मला!..... असल्या भेसूर व्याधीने शरीर इतके सडून गेलेले मी पूर्वी कधी पाहिले नव्हते. मला वाटू लागले, आपले नितळ स्वच्छ अंग झपाटण्याला अनेक अशा व्याधी टपून बसल्या असतील. मग त्यांचे भक्ष्य होण्यासाठी, खुशामत करण्यासाठी जगायचे कशाला? एक निरोगी शरीर आपणच नष्ट करून त्यांची

निराशा करण्यातच उलट आनंद आहे.' जगण्यासाठी काहीही कारण नसलेला जी.एं.चा बैरागी, निरर्थक जगण्याला तयार नव्हता आणि म्हणून देहत्याग करण्यासाठी प्रबळ कारण मिळताच, त्यानंतर जगत राहणे हा त्याला भेकडपणा वाटतो. पूर्ण विवस्त्र, दिगंबर बैरागी अगदी मोठ्याने नि:संग हसतो, आणि मग अर्धवर्तुळाकार धारेसारख्या काठावरून दरीत स्वत:चे अंग झोकून त्याला स्वत:लाच नको असलेले त्याचे निरर्थक जीवन संपवितो. समजून उमजून मृत्यूला सामोरा जातो. जोपर्यंत जगण्याला कारण आहे, जोपर्यंत जगण्याला काही अर्थ आहे, तोपर्यंतच जगण्यात मजा आहे, हेच खरे. कधी कधी योग्य वेळी जीवन संपवूनही जीवनाला अर्थपूर्णता देता येते. कर्तबगार, कर्तृत्वसंपन्न व्यक्तींचे अल्पायुष्य वा त्यांची आत्महत्त्या, आत्मत्याग त्यांच्या जीवनाला हीनदीन होण्यापासून वाचवितो. वेगळ्या अर्थाने त्यांच्या जीवनाला आगळी वेगळी पूर्णता प्राप्त करून देतो. काय करायचेय ते केविलवाणे, ओझे वाटणारे, जराजर्जर दीर्घायुष्य? आयुष्य कसे पूर्ण उमललेल्या, फुललेल्या अनुभवाप्रमाणे हवे, आणि ते तिथेच शिखरावर असतानाच संपायला हवे. उतार फार जीवघेणा, कंटाळवाणा, त्रासदायक अनुभव ठरतो.

आता स्वामीचा काही काळ फार उत्साहात गेला. 'कोणत्याही क्षणी ते खाली टाकता येईल अशी जाणीव असली की कोणतेही ओझे अवजड होत नाही, हे त्याला जाणवले होते व त्याच्या हालचालीत नवी कळा आली होती..... त्याला वाटले, शेवटच्या दिवशी आपण अंथरुणावर आडवे होऊ, तेव्हा आपल्यात काही हताश चिरडलेले दिसता कामा नये. त्यावेळी उलट महंतालाच फसल्याची जाणीव व्हायला हवी. त्याला वाटले पाहिजे, हा माणूस येथे देखील जिद्दीने जगला आणि आपण होऊन गेला. हा मेला अगर संपला नाही. तो केवळ थांबला- असा नेटकेपणा आपल्यावर दिसला पाहिजे!' स्वामी असा समजून उमजून मृत्यूला कवटाळण्याचा निर्णय घेतो आणि तेव्हापासून त्याचे जीवनच कात टाकते. बिनघोर झोप, यथास्थित भोजन, गोपीचंद स्नान. एवढेच काय त्या तसल्या काळ-कोठडीत तो त्याचा वाढदिवस साजरा करतो.

तो वाढदिवस साजरा करतो त्या दिवशी पावले कोरडी करण्यासाठी तो खाली वाकतो, तेव्हा पायाखाली स्फोट झाल्याप्रमाणे त्याचे आयुष्य पुन्हा एकदा हादरते. न्हाणीघराच्या बाहेर कोपऱ्यातील फटीतून बोटभर लांब रानवेलाची फांदी आली होती. इतक्या खोल पाताळात उतरत आलेले ते बीज, साऱ्याला तुच्छ लेखत, हिरव्या नम्र डौलाने बाहेर आले होते. हे पाहून त्याला स्वत:मध्येच नव्या जीवनाचे कारंजे फुटल्यासारखे वाटून तो आनंदाने हसतो. पूजेच्या त्रिशूळाने फांदीभोवतालची जागा कोरून काढतो, ओंजळभर पाणी घालतो आणि त्या पाच पानांकडे जणू ती आपलीच विजयपताका असल्याप्रमाणे, त्या रानवेलीकडे तो अभिमानाने पाहत राहिला.

झोप संपली की त्याची पहिली धाव वेलाकडे होऊ लागली. एवढ्या ईर्ष्येने वेल वाढत आहे याचाच आनंद होत होता. हवा येण्यासाठी असलेल्या पन्हाळाचे तोंड केवळ

एका हातावर होते. ते अंतर वेलाने तोडावे यासाठी तो अधीर झाला. अखेर वेल पन्हाळाच्या तोंडाजवळ आला. त्या दिवशी त्याला आनंदाने एका जागी बसवेना. त्रिशूळाचा उभा आधार देऊन त्याने पानांना हलकेच पन्हाळात सोडले. वेल वाढेल, पण त्याची फुले- फळे आपल्याला पाहायला मिळणार नाहीत. त्याला भविष्य आहे, तर आपल्याला साधे वर्तमान देखील नाही. पन्हाळात वेल वर चढू लागला की येथे खाली आपल्याला काहीच हिरवट दिसणार नाही हे जाणवून तो खिन्न झाला. 'एक दिवस सारा नळ भरून जाऊन वेगाने वर चढणाऱ्या प्रवाहाप्रमाणे वेल वर प्रकाशात जाईल.' ही कल्पना येताच त्याची धुंदी उतरली व मागून येऊन सांगाड्याने खांद्यावर हात ठेवल्याप्रमाणे तो भयभीत झाला. वेलावर सूर्यप्रकाशाचा शिडकावा होईल; पण खाली उतरत असलेली हवा एक दिवस बंद होईल. 'तू जगणार आहेस की वेल वाढणार आहे?' अखेर त्याचा निर्णय झाला. आणि इथेच त्याचे मोठेपण, त्याच्या जीवनातला अर्थपूर्ण आकडा आपल्याला दिसतो. कफनीचाच एक लांब रेशमी धागा तोडून त्याने नळाच्या तोंडावर चिकटविला. हवेच्या प्रवाहामुळे धागा जमिनीशी समांतर थरथरू लागला. 'त्याला वाटले आता अखेर आपण हे घटिकापात्र घातले आहे आणि मुहूर्ताचा क्षण आला की आपण तयार आहो.' पूर्वीप्रमाणेच नियमितपणे चार-सहादा तो थरथरणाऱ्या धाग्याकडे निर्विकारपणे पहात असे. एक दिवस त्याला जाणवते की आतील हवा कुंद झाली आहे. नळाच्या तोंडावर धागा निर्जीवपणे पडला होता. त्याने वेलाला पाणी घातले, मनगटाएवढ्या जाड झालेल्या मुळाला एकदा स्पर्श केला. मग समोरच्या भिंतीला नमस्कार करून तो स्वत:शीच म्हणाला, 'तुमच्यापैकी कोणीही जटाधारी असेना, पण तुमचे उपकार अनंत आहेत. ज्योत पूर्ण विझण्याआधीच आपणाला ती चिमटीने विझवता येते हे तुम्ही मला सांगितलेत व मार्ग दाखवला–

'त्याला वाटले–

तू असाच वर जा.

अंधाऱ्या सांदरीतून निघालेले तुझे आयुष्य न चिरडल्या जाणाऱ्या ईर्ष्येने वर वर जाऊन एका तृप्त क्षणी सूर्यप्रकाशाला भेटू दे.

तुला जर फुले येतील–

आणि तुला सोन्याच्या लहान पेल्यांसारखी फुले यावीत व त्यांच्या स्पर्शाने पराग सांडून बोटांची टोके पिवळी सुगंधी व्हावीत.

तुला जर फुले येतील, तर अशा सहस्र फुलांना घेऊन तू तुझ्यावर वाकलेल्या आभाळाला सामोरे जा व त्याच्या निळ्या साक्षीने तू त्यांच्यात सूर्यप्रकाश साठवून घे.

तुला जर फळे येतील–

आणि तुला दर पानाआड लहानसे लाल फळ यावे व ते इतके रसरशीत असावे

की त्या प्रत्येकाच्या लाल रंगात सूर्यप्रकाशाचा एक एक कण सतत सुखाने नांदत राहावा.

तुला जर फळे येतील,

तर त्यांच्यासह तू क्षितिजाकडे पाहा. कारण तू अशा अंधारातून त्याचाच शोध घेत त्याच्याकडे आला आहेस.

मग तुझ्या बीजांची फळे सर्वत्र विखरून त्या तुझ्या विजयाच्या खुणा सर्वत्र रुजू देत.

जर कणाएवढ्या प्रकाशाचा काजवा तुला कधी दिसला तर तू त्याचे स्वागत कर.

त्या कणाच्या अभिमानाने त्याने रात्रीच्या अमर्याद अंधाराला आव्हान देऊन त्याचा एक कण जिंकून प्रकाशित केला आहे.

आभाळात एखादे लहान पाखरू उडताना दिसले तर तू त्याला आतिथ्य दाखव.

कारण दोन कोवळ्या पंखांच्या आत्मविश्वासाने ते आभाळाला किंचित मागे रेटत आहे. जर कधी एखाद्या मुलाने तुझे एक रसरशीत पान घेऊन दुमडून ते पुन्हा आडवे उघडले व पानाचा आरसा केला; किंवा कधी तुझे पिवळे फूल तोडून बोटे पिवळ्या धुळीने माखून घेतली; अगर तुझे एक लाल फळ खुडून ते दोन बोटांत चेंगरत रसाचा लाल धागा काढला, तर तू त्याच्यावर क्रुद्ध होऊ नकोस.

कारण, कुणास ठाऊक, अब्जामध्येच एक आढळणारे असे ते मूल असून, ते देखील भोवतालच्या अंधाऱ्या अजस्र भिंती फोडून सूर्यप्रकाशाकडे येण्याची कधी तरी धडपड करणार असेल.

आणि तसे असले तर ते तुझ्या रक्तानात्याचेच आहे.

म्हणून तू त्याच्यावर क्रुद्ध होऊ नकोस.

एक पान गेल्याने तुला दारिद्र्य येणार नाही.

एक फूल गेल्याने तुझे सौंदर्य उणे भासणार नाही.

एक फळ नाहीसे झाल्याने तुझ्या आयुष्यात नैराश्य येणार नाही. इतके तुला वैभव आहे. इतक वैभव तुला मिळो!

या साऱ्यात मला विशेष सुख आहे, कारण तुझे एक पान म्हणजे माझा एकेक श्वास आहे. म्हणून तू म्हणजे मीच स्वत: आहे. मी संपलो नाही, तर मी केवळ बदललो आहे. तू आपले एवढे इतरांना समजू दे.

मी अंधारात, लाल प्रकाशात दडपून चिरडला गेलो नाही, तर मीच हिरव्या कारंजाप्रमाणे वर आलो आहे, हे देखील इतरांना कळू दे.

म्हणून तू असाच वर जा.'

प्रस्तुत गद्यकाव्य 'स्वामी' कर्त्याचे व तिच्या निर्मात्याचे पताकास्थान आहे. जी.

एं.चा सारा उत्कट आशावाद त्यातून हळुवारपणे पाझरत आहे.

नंतर अफूची गोळी तोंडात टाकून तो आपला मृत्यू निश्चित करतो. एक खंत मात्र त्याच्या मनाला लागते की आधीच्या स्वामीने त्याच्यावर उपकार केले; पण तो मात्र कुणासाठी मागे काहीही ठेवू शकला नाही.

When life is woe,
And hope is dumb,
The World says, 'Go !'
The Grave says, 'Come !'

–Arthur Guiterman

☆ ☆ ☆

इंद्रधनू
दिवाळी १९८७

जी. एं.च्या कथासृष्टीतील बालविश्व

जी. एं.चा जीवनविषयक दृष्टिकोण, त्यांचे विशिष्ट तत्त्वज्ञान, त्यांच्या कथेतील नियतीशरणता, त्यांच्या कथेतून वाचकांना बेचैन करणारा नैराश्यवाद, त्यांच्या व्यासंगाचा प्रत्यय देणाऱ्या त्यांच्या कथा, त्यांची वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा, त्यांची स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण शब्दनिर्मिती, कथेच्या प्रयोगात त्यांनी केलेली विविध प्रकारची कथानिर्मिती, पुनर्निर्मिती, त्यांच्या कथेतील अंगभूत स्त्रोत, मानवा-मानवातील माया, मानव आणि प्राणी यांच्यातील माया, त्यांची स्त्रीविषयक भूमिका; त्याचबरोबर आई, मावशी, बहीण-त्यातही मोठी बहीण-ताई; प्रेमळ, त्यागी, एकनिष्ठ पत्नी यांच्या त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखा; भाऊ, दादा, वडील, मामा यांची माया लक्षात घेतली तर एक लक्षात येते– जी. एं.च्या कथा एकसूरी, एकसाची, एकांगी नसून त्या जीवनातील विविधांगांचे प्रत्यय देणाऱ्या समर्थ कथा आहेत. अर्थशून्य, निरर्थक, दैवाधीन मानवी जीवनातील अर्थपूर्ण आकड्याच्या शोधात जी. एं.ची कथा प्रवास करते. हा कथाप्रवास नुसता लक्षणीयच नाही तर तो मराठी कथा साहित्यातील उंची गाठलेला महत्त्वपूर्ण टप्पा आहे; जागतिक पातळीवर मराठी कथेला तोलामोलाचे स्थान प्राप्त करून देऊ शकणारा टप्पा आहे. जी. एं.च्या कथेतील मानवी विश्वाचे, त्यातील आदिम भावभावनांचे, त्यांच्यातील मायेचे, मानवी प्रयत्नांचे आणि नियतीच्या खेळाचे चित्रणच जी. एं.च्या कथेला तिचे योग्य स्थान आज नाही उद्या मिळवून दिल्याशिवाय राहाणार नाहीत. कारण इथून तिथून सर्व जगात मानवाच्या भावभावना, त्यांचे रागलोभ, मानवामानवातील माया, मानव आणि प्राण्यांतील माया, नियतीचा अतर्क्य विलास

सारखाच आहे.

जी. एं.च्या कथेचे विराट दर्शन सर्वांनाच विस्मयचकित करणारे आहे. त्यामुळेच या विराट विश्वात एक सुंदर विलोभनीय, जिवंत बालविश्व दडलेले आहे त्याकडे लक्षच जात नाही. जी. एं.च्या बालपणापासून तो बालविश्वातील बारीकसारीक तपशीलापर्यंत; मुग्ध, कोवळ्या, अल्लड चिमुरड्यापासून तो खोडसाळ, उपद्रवी मुलापर्यंत; वेड्या, पांगळ्या मुलांपर्यंत; क्रूर, राक्षसी प्रवृत्तीच्या 'गुणी'पासून लोभसवाण्या 'स्लीला'पर्यंत; मावशीवर, आईवर, घरातील सर्वांवरच अकृत्रिम माया करणाऱ्या 'मी'पासून तो वडिलांना काडकन् चावून घराबाहेर पडणाऱ्या मारत्यापर्यंत परिस्थितीची जाणीव होऊन मोठ्या होणाऱ्या 'सद्या'पर्यंत हे बालविश्व पिंगा घालत आहे. इथे विविधता तर आहेच, पण जे आहे ते अस्सल आहे; वरवरचे, उथळ, पोरकट, उपचारापुरते नाही. इथले बालविश्व दणादणा नाचत आहे, गात आहे, खेळत आहे, खोड्या करत आहे, माया करत आहे, पिंगा घालत आहे, निर्विकारही आहे, विकारीही आहे.

जी.एं.चे बालपण ज्यातून प्रतीत होते, अशा कथा तीन. 'तुती', 'कैरी' आणि 'राधी' ! तीनही कथांचा निवेदक आहे एक लहान चिमुरडा- मी! तर 'मुखवटा' आणि 'जन्म' या दोन कथांत जी.एं.नी प्रामुख्याने बालविश्व चित्रित केले आहे. 'मुखवटा'मध्ये परिस्थितीची जाण होऊन 'सद्या' मोठा होतो. आपल्यावरच अवलंबून असलेल्या भावंडांवर– जोत्या व भिंगरीवर– मायेचे वस्त्र पांघरायला सज्ज होतो; तर 'जन्म'मध्ये 'मारत्या'चा नवा 'जन्म' होऊन या अफाट पृथ्वीवर स्वत:पुरती जागा शोधण्याकरिता, स्वत:च्या अस्तित्वाच्या शोधार्थ तो घराबाहेर पडतो. एकाकी 'बळी'मध्ये केंद्रस्थानी निष्कारण बळी जाणारी 'अमाशी' आहे, तर 'राक्षस'मध्ये राक्षसी वृत्तीची 'गुणी' आहे. 'मुखवटा'मधली पांगळी मंगल, 'भोवरे'मधला पांगळा माधव, 'जखम'मधला वेडा बापू, 'जन्म'मधला वेडा व्यंकू मनात घर करतात. त्यांच्या वाट्याला हे दु:ख का आले हा उत्तर नसलेला प्रश्न मन अस्वस्थ करतो. त्याच वेळी 'सोडवण'मधली वृंदा, 'स्लीला'मधली लीला, 'राणी'मधली राणी, 'शेवटचे हिरवे पान'मधली जयू मनात गोड पिंगा घालते. 'राधी'मधले पंचकल्याणी कारटे नाऱ्या, त्याच्या इरसाल खोड्या, 'कैरी'मधील 'बळवंत वाघा'ची पळापळ, 'मुखवटा'मधील आंबिलगाडा ह्या गोष्टी बालपणातील एका वेगळ्याच दालनात नेऊन सोडतात. 'रात्र झाली गोकुळी'मधील कृष्णा त्याच्या भुकेनी अस्वस्थ करून सोडतो, तर 'गुंतवळ'मधल्या पांड्याचे दु:ख कुठेतरी हलवून सोडते. 'सुम्मी माझी लहान आई होती' सांगणारा 'तुती' आणि 'कैरी'मधला मी तर आपल्या अंत:कोषात कायमचे घर करून बसतो.

'मुखवटा' या कथेत वकिलाच्या गॅरेजमधल्या आतल्या खोलीत, वकिलाच्या मोरीवर वाढलेले, कुणालाही नको असलेले दरिद्री आयुष्य सद्या, जोत्या आणि भिंगरी

या तीन भावंडात धडपडत होते. 'जोत्याशी काय खेळायचे टाळके, बिगनेशीच आहे हे कारटे! त्याला अद्याप बोथदेखील भरता येत नाही सरळ. आणि त्याच्यावर चार गंडे झाले तरी गोटी मिळायची नाही काही नाही, फ्फफ्याँ!' या विचाराने सद्याला जोत्याचा एकदम राग येतो. 'चड्डी तर वर ओढ की साल्या!' सद्या खेकसतो. जोत्या शास्त्रापुरती चड्डी वर ओढल्यासारखी करतो. मध्येच कराकरा अंग खाजवतो आणि मक्याच्या कणसात चुकून एखादा दाणा राहिला आहे की काय याचा शोध घेतो. 'रात्र झाली गोकुळी'मधल्या कृष्णाशी नाते सांगणारा हा जोत्या! त्याची वखवखलेली भूक जमेल तशी चरत असते. दुपारी वकिलाकडून आलेल्या शिळ्यापाक्यापैकी शिल्लक असलेले अन्न, रात्री सद्या जोत्या-भिंगरीपुढे ठेवतो व स्वत: अर्धी भाकरी हातावरच घेऊन खाऊ लागतो. भिंगरी गारगोटीसारखा भात चिवडता चिवडता पेंगू लागते. 'मी घेऊ व्हय रे तिचा भात?' जोत्या आधाशीपणाने विचारतो. उत्तराची वाट न पाहता खाऊ लागतो. दारिद्र्य फार वाईट आणि लहान मुलांना तर भूक धरवत नाही. जोत्याच्या प्रश्नाची तीक्ष्ण कट्यारीसारखी असलेली धार कधी ना कधी उपासमारीचा रोख अनुभव गाठीला असल्याशिवाय आणवणे कठीण! जोत्या संगीतप्रियही आहे आणि त्याची सद्या-भिंगरीवर निखळ मायाही आहे. गुलशीची छेड काढायला निघालेल्या सद्याला तो आपल्या परीने रोखण्याचा केविलवाणा प्रयत्न करतो, 'नको रे सद्या, लई आकसाची आहे कारटी ती!' तर सोनाराच्या काशीने देऊ केला रंगीत गोड बर्फ घ्यायला सरसावणाऱ्या भिंगरीला थोपवून तो सांगतो, 'भिंगरी, काशीला शिवून घेऊ नको. तिची आई मेली दुपारी. अंगदेखील भिजवलं नाही तिनं.' जोत्या हळवा आहे. त्याच्या हृदयात सहानुभूती पाझरत आहे. म्हणूनच पांगळ्या मंगलला पाहून तो मोठ्याने म्हणतो, 'मंगल पाप!' (बिचारी मंगल). गोप्या तोंडावर फडके टाकून ओरडू लागतो, 'मी फ्याटम हाय!' तेव्हा छाती अजस्त्र असल्याप्रमाणे जोत्या हात वळवून पंखासारखे वर उचलतो आणि म्हणतो, 'व्हय! पण मी किंगकांग आहे की तुझा काका!' तो आणि गोप्या मग एकमेकाला ढकलत पारावर लोळण घेतात. भोपळ्या गणू हसू दाबून विचारतो, 'तुला इंग्लिस महिने येतात? जानेवारी, फेब्रुवारी- ' तेव्हा जोत्या त्याच्याकडे चिडूनच पाहातो. 'थूत्तिच्या. तू तरी लई बालीस्टरच झालास की! म्हणे जानुवारी-फेबरूवारी! तू सांग, नरगिझ कोणत्या सिनेमात कोट घालते?' त्या गावंढळ पोरात एकुलता एक अभ्यासू, परीक्षेत पहिला येणारा, खेळण्यासाठी दुसरे कोणी नसल्यामुळे त्यांच्यातच खेळणारा, त्यांच्या खोड्यात दुरुनदुरुन भाग घेणारा लंगडा वासू भोपळ्याच्या जाळ्यात अलगद सापडतो. भोपळ्या गंभीरपणे सांगतो की 'वासू जानेवारीला' असं सगळे महिने ला ला म्हणत जा. वासू मोठ्याने म्हणू लागतो, 'वासू मार्चला, वासू एप्रिलला, वासू मेला.' भोपळ्या गणू खिंकाळतो, आनंदाने जोत्याच्या गळ्याभोवती हात टाकतो. जोत्याही त्या प्रकारावर निहायत खूष होऊन वासूकडे बोट दाखवून म्हणतो, 'हीऽ ही

वासू मेला म्हणे!'

'तेलाचे बोट क्वचितच लागलेल्या तिच्या उपाशी झिपऱ्या सारख्या तोंडावर येतात. फाटक्या झग्याची सारी बटने तुटल्यामुळे तिचे अर्धे अंग उघडेच आहे, व आत छातीच्या हाडांची अशक्त कमान दिसते.' अशी भिंगरी स्वत:शीच हसून सद्याला विचारते, 'दाद्या, आम्ही बाहेर जाऊ या? सिनेमाची चित्रं पाहात छान छान!' सद्याचा चेहरा एकदम कमावल्याप्रमाणे मऊ होतो. ही अशक्त विरलेली बहीण त्याची फार लाडकी होती. वकिलाच्या गड्याने तिला एकदा पायरीवरून खाली टाकले, तेव्हा सद्याने त्या घराच्या दोन खिडक्या फोडून टाकल्या होत्या. तिला कोणी मारले बोलले, तर सद्या वेड्या कुत्र्याप्रमाणे पिसाळत असे. सद्या उठताच दोन सावल्यांप्रमाणे जोत्या-भिंगरी त्याच्या मागोमाग चालू लागतात. तिघेही पारावर बसतात. लंगडा वासू गुडघ्यावर हात ठेवून बेडकाप्रमाणे उड्या मारत येतो. 'तो गप्प असला की अमृत कौरसारखा दिसतो, आणि हसू लागला की आपल्या लग्नाची बातमी समजलेल्या माकडासारखा हसतो. पण पोर मोठे इरसाल आणि तल्लख बरे का!' इथला जी. एं.च्या निवेदनातील उपहास गुदगुल्या करून जातो. गंगाई जेव्हा जोत्याच्या पाठीत एक धपाटा घालते तेव्हा जोत्या मटकन खालीच बसतो. 'काय हाणलं रे म्हातारडीनं! तिचं डोकं भादरलं' डोळ्यात पाणी आणून चिडून जोत्या म्हणतो. त्यावेळी वासू म्हणतो, 'तरी मी सांगत होतोच. ती म्हातारी पिसाट आहे म्हणून सांगत होतोच.' जी.ए. निवेदन करतात- 'वासूने वास्तविक तसे काहीच सांगितले नव्हते. हे याचे बोलणे तसे घडल्यावरचे आहे. कारट्याच्या नशिबी आणखी थोडे शिक्षण असेल तर वर्तमानपत्रात किंवा हवामानखात्यात चांगले नाव काढील पोर!' येथीस उपहास बोचरा आहे, पण त्याबरोबरच वाचकाला सुखद पुन:प्रत्यय देणारा आहे.

'पट्ट्यापट्ट्याचा भडक गंजीफ्राक घातलेला, सारवट गाडीवाल्याचा नामू खिशात एक हात घालून राजकपूरसारखा उभा आहे. हा सकाळी वर्तमानपत्रे विकतो, व त्यावेळी ओरडलेल्या बातम्या संध्याकाळी अगदी खासगी माहिती असल्याप्रमाणे गल्लीतल्या पोरांना सांगतो. आपले ज्ञान इतरांपेक्षा जास्त आहे हे माहीत असल्यामुळे, बोलताना तो हनुवटी उंचावून बोलतो, व ऐकणाऱ्याकडे पाहात नाही. 'साल्याची फुकट ऐटच की!' हे त्याच्याविषयी सार्वजनिक व प्रामाणिक मत आहे. पण कोणताही खेळ ऐन रंगात आला असता नेहेमी अशुभ वार्ता द्यायला तो नेमका एखाद्या गिधाडाप्रमाणे कसा उमटतो, हे मात्र कुणालाच समजत नसे.' आंबिलगाड्याचा खेळ रंगात येताच नामू आनंदाने बातमी देतो, 'अरे, आली रे बघ थेरडी ती.' खेळ मोडतो. काशीची आई गोरीपान होती असे गोप्या म्हणतो. तेव्हा तोपर्यंत गप्प असलेला नामू स्वत:शीच म्हणतो, 'हॅ! गोरीपिट्ट म्हणे. तिला अंगभर कोड होतं, कोड.' पांगळ्या मंगलाबद्दल त्या सर्व गावंढळ मुलांना सहानुभूती होती, फक्त नामूला कशाचेच काही सोयरसूतक नव्हते.

मंगल येऊन वरच्या पायरीवर बसते. 'लंगडी! लंगड मेरी ट्यँव ट्यँव! मागल्या जन्मी फुलपाखराचे पाय तोडले की या जन्मी लंगडं व्हायला होतं' त्याच्या ह्या हृदयशून्य स्वगतावर कोणीची काही बोलत नाही. लंगडा वासू मात्र वरमतो व पटकन आपल्या गुडघ्यावर हात ठेवतो. गवळ्याच्या गुलशीला येताना बघून नामू एक बारीक शीळ मारतो व एक मळके फडके गळ्याभोवती गुंडाळून सावासारखा उभा राहतो. गंमत पाहातो, गुलशीला न्याहाळतो. त्याची मजल इथपर्यंतच. गोप्याची आई येऊन गोप्याला घेऊन जाते तेव्हा नामू गरळ ओकण्याचे काम तत्परतेने बजावतो, 'गोप्याच्या आईची आणि अड्डेवाल्याची भानगड आहे.' कोणी ऐको न ऐको गिधाडाप्रमाणे सतत टोचा मारत बोलणारे, अशुभ वर्तमान देणारे, वाईट, घाणेरडे बोलण्यातच समाधान मानणारे असे हे कारटे– नामू.

'समोरून शेणाची बुट्टी डोक्यावर घेऊन गवळ्याची गुलशी ठुमकत येते, व दर पावलाबरोबर तिच्या पायातील साखळ्या खळक वाजतात..... गुलशी जरी अकरा-बारा वर्षांची असली तरी, आताच तिच्या पोलक्याचे दुसरे बटण टचटचीत ताणले आहे. तिच्या गोल रगेल चेहेऱ्याकडे पाहिले की एखाद्या गर्विष्ठ संत्र्याची आठवण होते. तिच्या गालावरील दोन टिंबिदार गोंदणी तर गालावरील खळीला नखरेल डोळे देतात. साखळ्या घातलेली पावले ती ठेक्यात टाकू लागली की तिच्या शरीराला कोरीव मिजास येते. ही गुलशी गल्लीतील साऱ्या पोरांची भीती होती, आकांक्षा होती, धाडसाचे टोक होते.' वासू भरीस घालतो आणि सद्या विचारात पडतो. सारी पोरे पांड्याविषयी आदराने बोलत आहेत, कारण त्याने काल गुलशीला दगड मारला. तेव्हा आता जर आपण काही केले नाही, तर लोणचे होऊन राहू ह्या कल्पनेने तो पेटतो. दंड थोपटतो. 'अरे, जा रे जोर नको पांड्याचा. पांड्या गेला उडत! माझी पावर तरी बघ!' सद्या म्हणतो. गुलशी पाराजवळ येताच टाळी वाजवून सद्या ओरडतो, 'पोरी, पोरी आंब्याची कैरी, तू माझी न्हवरी तू माझी न्हवरी.' सगळी पोरे गप्प. पण प्रत्येकाला वाटते, 'खरंच, सद्या म्हणजे फार टंच कारटं! कुठला पांड्या त्याच्यापुढं मांजराचं मढं!' गुलशी सद्याकडे हात धरून त्याला पुढे ओढते व त्याच्या वाकलेल्या पाठीत धुमका घालते. बुट्टी उचलून मागे न पाहता वरातीतल्या घोडीसारखी ती चालू लागते. जाता जाता चिडून ती म्हणते, 'न्हवरी म्हणे न्हवरी! कुत्रं तंगडी नाही वर करणार, घुबड कुठला?'

'फार लागलं का रे?' दात विचकत वासू विचारतो. सद्या त्याच्या पाठीत एक गुद्दा ठेवून देतो. 'एवढं लागलं बघ-' तो वेडावत म्हणतो. वासू रडण्याच्या बेतात येतो.

या साऱ्या प्रसंगातून डोकावणारे जी.एं. चे बालविश्वाबाबतचे अवलोकन अत्यंत सूक्ष्म आहे. अकरा-बारा वर्षांच्या वयातच गुलशीचे 'दिसणे', तिचे ठसक्यात चालणे, स्वत:च्या स्त्रीत्वाची तिला झालेली मिजासखोर जाणीव, तिचा कुर्रा यांचे मोजक्या शब्दात जी.एं. नी केलेले वर्णन आपल्या नजरेसमोर 'गुलशी' उभी करते. अशा नखरेल,

मादक गुलशीला दररोज बघितल्यानंतर सद्या चेकाळला तर त्यात कसले नवल. इतक्या लहान शाळकरी वयातही 'ती' जाणीव मुलांमध्ये निर्माण झालेली असते. आजूबाजूचा परिसर, घरातील संस्कार, वातावरण यामुळे ती नियंत्रित असते इतकेच. मुलांमधील वासनेचे जी. एं.नी इथे घडविलेले दर्शन निश्चितच वास्तववादी आहे.

बर्फाची गाडी येते. त्या पोरांच्या खिशात दमडी नसते, पण सारे गाडीभोवती फुकट गर्दी करतात. गाडीवाल्याचे लक्ष नाही असे पाहून भिंगरी हळूच पिवळ्या बाटलीला हात लावून खूष होते. कोणाच्या ध्यानीमनी नसताना गाडीवाला खच्चून ओरडतो, 'लालभडक, पैसा हुडक, पैसा हुडक!' डॉक्टरांचा मधू धावत येतो. गाडीवाला बर्फ किसून काडीवर दाबून बसवतो. रंगीबेरंगी बर्फाची किमया भिंगरी बावरून पाहते, पाहात पाहात पुढे येते. त्या काडीवरील एक ठिपका ओघळून तिच्या पायावर पडतो व बेभान होऊन ती त्या बर्फावर झडप घालते. धक्क्याने सारा बर्फ धुळीत पडतो. भिंगरी लगेच खाली वाकते व मूठभर बर्फ तोंडात कोंबते. गाडीवाला रागाने तिला लाथ मारतो, तिच्या झिंज्या ओढून तिला बाजूला ढकलतो. पण भिंगरीला त्याचे भान नसते. उरलासुरला बर्फ ती मातीसकट उचलते. गाडीवाल्याचा संताप पुन्हा उसळतो, तो तिच्या मुस्कटात भडकावतो. सद्या पुढे होतो, तिला ओढतच पारावर आणून बसवतो. त्या रानवट गाडीवाल्याकडे पाहून सद्याला फार असहाय्य वाटते. तो निमूटपणे भिंगरीशेजारी बसतो. भिंगरी अद्याप बोटे चाखते. तिच्या डोळ्यात टिपूसही नव्हते. ही भूक. ही बालसुलभ तीव्र इच्छा. आणि हे जीवघेणे दारिद्र्य!

सोनाराच्या काशीला कधी नाही तो आज पैसा मिळाला. ती लालभडक घेते, पारावर चढते, मोठा आ करून सू सू करीत बर्फावरचे गोड पाणी शोषून घेते. तिची आई दुपारीच मेलेली असते, पण त्याची तीव्र जाणीव तिला नसते. ती भिंगरीला बर्फ देऊ करते, पण जोत्या भिंगरीला थोपवतो. ती आल्यामुळे साऱ्या पोरांत थोडी घबराट निर्माण होते. भोपळ्या हादरून विचारतो, 'व्हय ग काशी, तू आंघोळ केली नाहीस?' एखादी साधी बातमी सांगावी तितक्या सहजतेने मान हलवून ती सांगते, 'अरे, ती तर दुपारी मेली न्हवं? जोत्याच्या आईसारखी काल न्हवं.' काशीचा बर्फ संपतो. 'मनगटाने तोंड पुसता पुसता तिला वाटते, कोड डोंबल! आपली आई खरंच गोरीपिट्ट होती– भट्टीच्या कापडासारखी.....'

आता ऊन उतरते. समोरच्या देशपांडे चाळीतील मंगल हळूहळू पावले उचलत बाहेर येते व वरच्या पायरीवर बसते. 'मंगल सात-आठ वर्षांची असेल, पण पाहिले की जाईच्या फुलाची आठवण होते. तिचे कपडे नेहमी शुभ्र रेशमाचे असत. आणि ती हसली (आणि ज्या वेळी ती खरोखर हसत नसे, त्या वेळी ती हसण्याच्या बेतात असे). की पाहणाऱ्याला उगाचच नाजुक हुरहुर लावणारा आनंद होतो. पण कातडी खोड्यात अडकलेले तिचे पाय मात्र वाळल्या पडवळासारखे आहेत, आणि त्यांच्याकडे पाहिले

की बराच वेळ काही सुचत नाही. खाली रस्त्यावर पोरे धिंगाणा घालू लागली, तंगडी पुढेमागे पिस्टनप्रमाणे हलवत लंगडी खेळू लागली की तिचा जीव गोळा होतो. अनेकदा हातावर हनुवटी ठेवूनच ती त्यांच्याबरोबर बेभान धावते, पारावरून खाली उड्या मारते, किंवा इतर मुलींप्रमाणे चित्कारत छोट्या सायकलीवरून अनिर्बंध हिंडते– हातावर हनुवटी ठेवूनच.' मंगलचे हे जीवघेणे दु:ख हृदय चिरीत जाते, अस्वस्थ करते.

एकदाच ती हळूहळू चालत पाराजवळ आली होती, तेव्हा पोरे पार लाजली. ती त्यांच्या खेळात सामील झाली. सद्या तेवढ्यात घरी जाऊन स्वच्छ तोंड धुवून त्यातल्या त्यात बरा शर्ट घालून आला. तिने भिंगरीला एक निळे रिबन दिले. खेळात मंगलने जेव्हा सद्याचे डोळे झाकले तेव्हा तिच्या अंगाच्या स्वच्छ सुगंधाने त्याला खेळाचा विसर पडला. तिची एवढीशी मऊ बोटे त्याच्या मनाला रेशमी धाग्याप्रमाणे कायमची चिकटून राहिली. खेळ रंगात आला असताना अचानक मंगलची आई येते व रागारागाने तिला घेऊन जाते. 'गाढवे, तसल्या पोरांत जाऊन काय डोक्यात उवा करून घ्यायच्या आहेत की काय? वेडपट कुठली!' मंगल आता वरच्या पायरीवरच बसते, पण ती आली की सद्या खेळातून गळतो व पारावर बसतो. अंधाराला प्रकाशाचे असावे तसे सद्याला मंगलबद्दल असे सुप्त आकर्षण होते.

आणि मग अवतरतो 'आंबिलगाड्या'चा अफलातून प्रसंग. जी. एं.च्या चित्रदर्शी शैलीने हा प्रसंग साक्षात् नजरेसमोर साकार केला आहे. तो मुळातून वाचणेच इष्ट. प्रसंग उभा करण्याचे जी. एं.चे सामर्थ्य खरोखरच असाधारण आहे, याचा हा प्रसंग बोलका नमुनाच ठरेल. बालपणातील ही गंम्मत, त्यातील गोंधळ, गडबड, धडपड व एकूणच या प्रसंगातील मुलांच्या उफाळलेल्या उत्साहाचे रसरसते चित्रण जी. एं.नी केले आहे. आडव्या गल्लीतून लडबडा आपटत, फेंगडी पळत एक लठ्ठशी शेळी येते काय, आणि सद्या, भोपळ्या, गणू, दिलीप आणि गोप्या मिळून शेळीला मोठ्या प्रयत्नांनी पकडतात काय! सद्याची आंबिलगाडा काढण्याची कल्पना मुले उचलून धरतात. भोपळ्या आपल्या डुरम्या पोटावर हात मारत ताशा वाजवतो, तर गोप्या पाय उडवत गोल नाचू लागतो, व हॅय! हॅय!' असे ठेक्यात म्हणत जोत्या त्याच्यावर काल्पनिक चुरमुरे उडवतो. पण सद्या मात्र एकदम चिडतो. शेळीचा धडपडणारा पाय धरून त्याचे मनगट हिसकवल्यासारखे होत आहे. 'जा की टिगशांनो, जा, गोप्याचा गाडा तरी घेऊन या की!' तो ओरडतो.

सारी पोरे गप्प होतात. पळत जाऊन दिलीप वर उघडी लाकडाची पेटी असलेला हातगाडा घेऊन येतो. वासूलासुद्धा उत्साह वाटतो, आणि उडत उडत तो घरातील गुलालाचा डबा घेऊन येतो. त्यानंतर मात्र खेळाला खरा रंग चढतो. अर्धाअधिक डबा सद्या घसकन् शेळीच्या अंगावर ओततो, व ती पिकल्यासारखी लालभडक दिसू लागते. पण त्या शृंगाराबाबत शेळीला फारसा उत्साह वाटत नाही. ती मध्येच अंग हलवते

व गुलालाचा भपकारा नाकातोंडात शिरताच 'च्यायची!' म्हणत पोरे खोकू लागतात. सद्या मूठभर गुलाल तोंडाला फासून घेतो, व थोड्याच वेळात तसले अनेक चेहेरे मधून मधून चड्ड्या वर ओढत दणादणा नाचू लागतात. वासू मात्र आपण त्यापैकीच आहो हे दाखविण्यासाठी बोटभर गुलाल हळूच गळ्याला लावून घेतो व त्या घोळक्याच्या कडेकडेने फिरतो. पण जोत्याचे मन खरे संगीतप्रिय. बेंडबाजाखेरीज आंबिलगाडा म्हणजे फडतूस. तो एक फळकूट शोधून आणतो, व परटाच्या बंद दुकानाच्या पत्र्यावर असे ठोकू लागतो, की अर्धी गल्ली हादरून उठते. एका माडीवरील खिडकी उघडते व कोणीतरी खेकसते :

'काय गावावरून ओवाळलेली कारटी आहेत! ए, जा पडा जाऊन घरी, नाही तर उलथा तरी पटापटा काकतीवेशीला!'

पण त्या पोरांना या दोन पर्यायांपैकी कोणताच पसंत पडत नाही. उलट दिलीप तर खिशातून कॅक्यॅव कॅक्यॅव करणारे एक खेळणे काढतो व तसे केले नाही तर जन्मठेपीची शिक्षा होणार अशा आवेशाने ते भिरभिरवू लागतो. सद्या गाड्याचा वासा व त्याचा आडवा दांडा बऱ्याच नाखूष असलेल्या शेळीच्या गळ्याला बांधतो. पण गाड्यावर अद्याप झाडाझुडपांचे हिरवे काहीच नाही. तो गेट चढून हळूच वकिलाच्या बागेत उतरतो व दोनचार फुलझाडे वचावचा ओरबडून कोंणी पाहाण्याच्या आत बाहेर येतो.

गाडा सजतो. शेळीची शिंगे दाबत जोत्या तिला गाडा काढण्याचा हेतू समजावून देत पुढे चलण्याचा आग्रह धरतो. तोच कोणी तरी पारावर आनंदाने ओरडते, 'अरे, आली रे बघ थेरडी ती.'

आपल्या शेळीवर ओतलेला गुलाल पाहून गंगाईची जीभ मुक्त सुरू होते. 'तिने सगळ्यांच्या आईबापांना प्लेगने मसणवटीत पाठवले. त्या पोरांची मढी महावाड्यासमोर टाकली आणि आख्ख्या गल्लीत चुलीत शिरे उगवून घेतली,' तिच्या तडाख्यात एकटा जोत्या सापडतो. त्याला ती पाठीत असा एक धपाटा घालते की तो मटकन खालीच बसतो. गंगाई शेळीला मोकळे करून घराकडे पिटाळते व स्वत: पुढे दुकानाकडे जाते. सद्या संतापतो, 'म्हातारडं मारतंय काय! चांगला इंगा दाखवतो बघ आता. चल रे भोपळ्या' दोघे धावत म्हातारीच्या कोठडीसमोर येतात. तिने लावलेल्या शेणीवर कचाकचा पाय देऊन त्या मोडून टाकतात. गवत उधळतात. सद्या ओल्या शेणी खिडकीतून आत गाडग्यावर, कपड्यावर, खाली अंथरलेल्या गोधड्यांवर फेकून देतो. भोपळ्या गणूने तर कोळशाने जाहीर लेखी घोषणाच करून सोडली, 'म्हातारी मेली.'

रात्री सद्याची झोप चाळवते. गाडीवाल्याची लाथ बसताच कळवळलेली भिंगरी त्याला आठवते-आणि जोत्याही. मग त्याला आईची आठवण येते. 'आता या घरात आपणच मोठे, या जोत्या-भिंगरीला आपल्याखेरीज कोणी नाही हे त्याला हाताला

चाकूची धार लागावी, त्याप्रमाणे एकदम जाणवते, व त्याची झोप थोडा वेळ खाडकन् उघडते..... सद्या आडोशाआडून बाहेर येतो आणि आयुष्याच्या सहीशिक्क्यानिशी सद्या मोठा होतो.'

घरात कुणाचीही माया मिळत नसणारा, घरात राहूनही एकाकी जिणे जगत असलेला, घरात सर्वांकडून हिडीसफिडीस केला जाणारा, कुत्र्यावर माया करणारा, भुकेनी सदैव वखवखलेला, वेड्या व्यंकूवर दादागिरी करणारा पण मुळात दिलदार असलेला, शेवटी स्वत:पुरती जागा शोधण्याकरिता ह्या अफाट विश्वात एकाकी घराबाहेर पडणारा मारत्या, आपल्याला 'जन्म'मध्ये भेटतो. परशा हा मारत्याचा मोठा भाऊ, तो एका कॉलेजात गडी होता म्हणून तानीबाईला त्याचे कौतुक. परशाच्या दृष्टीने मारत्या म्हणजे हरकाम्या गडी. तो मारत्याकडून फक्त कामे करून घेतो पण मागूनही कधी मारत्याला एक आणासुद्धा बसवण्णाच्या जत्रेसाठी देत नाही. उलट मारत्याचाही चहा तो हक्काने पिऊन टाकतो, मारत्याचा जरासुद्धा विचार न करता. 'बोगस दिलीपकुमार!' हे मारत्याचे त्याच्याबद्दलचे प्रामाणिक मत. मारत्याचे पोट वखवखू लागले म्हणून तो आईला अर्धी भाकरी मागतो, तर केवळ परशाचेच कौतुक करणारी आणि सर्वांत लहान म्हणून किट्ट्याकडेच लक्ष पुरविणारी तानीबाई चिडून त्याला म्हणते, 'आता माझी हाडंच घे. एक चूर तर होती, ती दिली पोराला, मघा परशाने खाल्ली. तो कामाचा माणूस, तुझ्यासारखा तो शेणढुंगण्या नाही.' चहाही नाही. भाकरीही नाही, अशी सकाळ मारत्यासाठी उगवते.

काल मास्तरांनी दहा छड्या मारून मारत्याला शाळेतून कायमचे हाकलले. मारत्याला मनापासून वाटते, येथे कुठल्या टिक्कूजीला पाहिजे होती शाळा? शाळा गेली खड्ड्यात. आता दररोज धीरेंद्राच्यामागे बिनघोर हिंडायला हरकत नाही. परीक्षेत नेहेमी पहिला येणाऱ्या, नाजुक, चाळशी लावणाऱ्या, स्वच्छ कपडे घालणाऱ्या धीरेंद्रला पाहताच मारत्याच्या पोटात अगदी ढवळून येत असे. मारत्याने एकदा धीरेंद्राच्या पिशवीत एक गुबगुबीत बेडकी ठेवली, तेव्हा पिशवीत हात घालताच भेदरून ते पोर अशा उड्या मारू लागले, की पोरे हसून हसून मेली. त्याच्या मागे जाऊन राडीत पच्चकन पाय मारणे हा तर मारत्याचा रोजचाच आवडता उद्योग होता. काल मारत्याने धीरेंद्राच्या चेहेऱ्यावर शाई फासली तेव्हा शाईने माखलेला धीरेंद्र असा इरसाल माकडासारखा दिसत होता की, वेळ असता तर मारत्याने त्याला कागदाची शेपटी लावायलाही कमी केले नसते. तेवढ्याकरताच मारत्याने आपल्या कुत्र्याचे नावसुद्धा 'धीर' ठेवले होते. धीरेंद्र शाळेला चालला की मारत्या त्याच्यावर आपले कुत्रे सोडत असे; आरडत ओरडत धीरेंद्र पोचवायला येणाऱ्या माणसाभोवती हिंडत असे, आणि मारत्याची हसून हसून मुरकुंडी वळत असे. मारत्याचा धीरेंद्रवरचा राग वस्तुत:

परिस्थितीवरचा राग आहे. त्यामुळेच त्याला शाळाही सोडावी लागते, आणि ते तर त्याच्या पथ्यावरच पडते.

व्यंकू अगदी लहान असताना जमिनीच्या भांडणामुळे व्यंकूच्या शेजारी झोपलेल्या त्याच्या काकांचा खून होतो. भेदरलेल्या व्यंकूला वेड लागते, ते कायमचेच. तेव्हापासून तो कुत्र्यासारखा ओरडू लागला. व्यंकू धोक्याचा नव्हता तरी त्याला मागच्या शेवटच्या खोलीत कोंडून ठेवले होते. तो फक्त मारत्याशी हसत बोलत बसे. इतर कोणी आले तर अंग चोरून कोपऱ्यात बसे, कुत्र्यासारखा ओरडे. 'काळे बुरखे, पिवळ्या दिवट्या, अंथरुणात सांडलेले रक्त.' पण त्याचा व्यंकूवर परिणाम झाला तो कायमचा. एक पोर जीवनातून उठले, वेडे झाले. असे का? पुन्हा ह्या प्रश्नाला उत्तर नाही ते नाहीच. समोर कलिंगडाची फोड आली, किंवा पानात तांबडी भाजी आली की तो ओरडू लागे, कुत्र्यासारखा चावायला येई. देशपांड्यांच्या ह्या व्यंकूची खोली साफ करण्याचे काम मारत्याचे होते, पण बंद खोलीत दरडावून तो व्यंकूकडूनंच सारा केर काढून घेई. मारत्यापेक्षा दुप्पट उंच असलेल्या व्यंकूवर दररोज एकदा तरी दरडावणे मारत्याला फार पसंत होते. व्यंकूच्या वेडेपणाचा फायदा उठवून तो मधल्या मधे गुपचुप व्यंकूचे खाणे आढेवेढे घेत संपवत असे. घरी होणारी उपासमार तो अशी भरून काढत असे. आजही त्याने उलटसुलट खोटे बोलून, वहिनीच्या छडीचा धाक दाखवून व्यंकूला यंव बनवले व मग आढेवेढे घेत व्यंकूवरच उपकार करीत असल्याच्या थाटात त्याचे चहापोहे संपवले. 'घाल चुलीत तुझा चहा आता! तो तानीबाईला उद्देशून पुटपुटला.' जत्रेतून काळ्या पट्ट्याचं हिरवं घड्याळ आणून देण्यासाठी मारत्या व्यंकूकडून आठ आणे काढतो. त्याच्या जत्रेची सोय झाली.

शीळ वाजवतच मारत्या बसवण्णाच्या देवळाकडे चालू लागला. जत्रा टमाम भरली होती. मारत्या गर्दीत बुडून गेला. काय घ्यावे, काय करावे या विचाराने चक्रावलेल्या मारत्याने एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फेरी मारली. गोड पिठाच्या वड्या, लाल पाण्याच्या बाटल्या, चुरमुऱ्याचे भडंग, गरगर फिरणारे हत्ती, घोडे, सिनेमा, चक्रे, भोवरे, ... मारत्याने प्रथम भडंग घ्यायचे ठरवून खिशात ऐटीत हात घातला. नाणे बांधलेले त्याचे लाल फडके कुणीतरी उडवले होते. फडके वाटेत कुठे पडले की काय हे पाहाण्यासाठी तो व्यर्थ धडपडला. देवळाच्या कट्ट्यावर बसून येणाऱ्या-जाणाऱ्याकडे तो खुळ्या कुत्र्यासारखा पाहात राहिला. एकदम बेभान होऊन मारत्याने समोरच्या हातगाडीवरचे एक मोठे निळे रिबन हिसकावून घेतले व वेड्याप्रमाणे तो पळत सुटला. 'पकडा, अरे पकडा साल्याला' म्हणत गाडीवाला त्याच्या मागे पळाला. गर्दीत धीरेंद्रने मारत्याच्या पायात पाय अडकवला आणि मारत्या कोलमडला. मारत्याच्या मुस्कटात दोन थापडा बसल्या. गाडीवाल्याने रिबन आणि मारत्याचा पट्टाही हिसकावून घेतला. मारत्याचे कुणीही काहीही ऐकून घेतले नाही. येताच रामण्णा पोलिसाने मारत्याच्या

थोबाडीत दिली. नंतर मारत्याला ओढत रामण्णा गर्दीबाहेर आला. गर्दी पांगली. मारत्याला पुढे ढकलून रामण्णा म्हणाला, 'असले धंदे करायला लागलास काय रे माकडा! आता पळ ढुंगणाला पाय लावून. इथं पुन्हा सापडलास तर खिमा करतील ते लोक.'

वेड्याप्रमाणे धावत मारत्या घरी आला आणि विहिरीच्या कट्ट्यावर पडून रडू लागला. 'मारत्या, तुझा धीर तिथं मरून पडलाय् बघ. बाबानं त्याला गोळ्या खायला दिल्या.' हिः हिः हसत किट्ट्याने बातमी पुरवली. मारत्याला त्याचा एकदम राग आला आणि त्याने किट्ट्याच्या पाठीत असा रपाटा हाणला की हसणे संपायच्या आतच त्याचे रडणे सुरू झाले.

मारत्या धावतच झाडाकडे गेला. धीर रस्त्यावर पडला होता. शेजारी अर्धवट खाल्लेला पीठाचा गोळा होता. त्याचे पाय झटक्या झटक्याने हलत होते. शेवटी पायही ताठरताच मारत्याच्या पोटात खळगा पडला. पडक्या भिंतीजवळ मारत्याने कुदळीने आधीचाच एक खळगा अधिक खणला. त्याने भित्र्या हाताने दोरी धीरच्या पायाला बांधली व फरफटेत त्याला खळग्यापर्यंत आणले. धीरला खळग्यात घालताच त्याची शेपटीच तेवढी वर राहू लागली. कंटाळून मारत्याने पायानेच ती कचकन् आत दडपली व खळगा बुजवला. मारत्या कट्ट्यावर येऊन बसला. त्याच्या ध्यानीमनी नसताना, मागून आलेल्या त्याच्या पिंजारलेल्या केसांच्या बाबाने त्याला मागूनच एक लाथ घातली. मारत्याची तंगडी धरून त्याला ओढतच अंगणात आणले आणि पुन्हा एक अशी पुसंत लाथ मारली की मारत्या फाटल्याप्रमाणे किंचाळला. 'लोक शेण घालायला लागले तोंडात. हे मढं जत्रेत जाऊन चोऱ्या करायला लागलं, आणि लोकांनी वहाणा-वहाणांनी मारलं. तो रामण्णा होता म्हणून घरी आलंय, नाहीतर अडकवलं असतं तुरुंगात,' बाबा तानीबाईला ऐकवतो. मारत्या आडवा पडलेला पाहून तानीबाई कळवळते आणि बाबाच्या दृष्टीला पडू नये म्हणून कोनाड्यातला खुर्चीचा मोडका हात हळूच उचलते. पण बाबा ते पाहतोच आणि मोडक्या हाताच्या दांडक्याने मारत्याला मारत सुटतो. मारत्याचे सारे अंग बधीर होते. हळूहळू मारत्याचा राग वाढू लागला. तो बेभानपणे उठला आणि बाबाचा एक हात घट्ट धरून तो त्याला काडकन चावला. दात दुखू लागले तेव्हाच मारत्याने त्याला सोडले. धीरचे भूत अंगात शिरल्याप्रमाणे तो कर्कशपणे म्हणाला, 'त्या धीरला विष घातलंय नव्हे? आता पुन्हा मला कधी मारशील, तर डोकं फोडीन नारळासारखं.'

स्वतःचे खाणे आटोपल्यावर बाबा म्हणतो, 'त्या चोराला आज शेण देखील देऊ नको खायला. माजलाय हरामखोर. रामण्णानं त्याला तुरुंगातच अडकवायला पाहिजे होतं. एक कटकट तरी गेली असती. नाही तर थांब, उद्या त्याला सुद्धा गोळ्या चारवतो त्याच्या कुत्र्याप्रमाणे.' 'हाय काय खायला घरी आता? मीच तांब्याभर पाणी ढोसून

आडवी होणार आहे.' हे ऐकल्यावर मारत्या पिसाळतोच. भात नाही तर भाकरी तरी? भुकेच्या वेदनेपुढे तो इतर वेदना विसरला व पडून राहिला. रात्र वाढली तशी चावऱ्या थंडीमुळे मारत्या उठला, व शेजाऱ्यांच्या गोठ्यात जाऊन पडला. गाईच्या पुढे पातेल्यात पाण्यात भिजत टाकलेले भाकरीचे तुकडे होते. थोड्या वेळाने त्याने पातेले जवळ ओढले व एक तुकडा घट्ट आहे की मऊ आहे हे पहाण्यासाठी तोंडात घालून पाहिला. 'त्याला त्यातले काही खायचे नव्हते. छट् गाईपुढचे कोण खाते कधी?..... नंतर त्याला वाटले, सारे साले झक मारले! येथे कोण बालिस्टर आलाय् पाहायला! त्याने दोन मोठे तुकडे बेधडक उचलले व ते तो मोठ्या समाधानाने चघळू लागला.' दारिद्र्य, दारिद्र्यातील जीवघेणी भूक, माणसाला माणूस म्हणूनही जगू देत नाही. मारत्या, जोत्या, कृष्णा यांची भूक ही या देशातील कोट्यवधी मुलांची भूक आहे, ही जाणीव हादरवून सोडणारी असली तरी ते एक कठोर सत्य आहे.

रात्री केव्हातरी गाडीच्या आवाजाने मारत्या उठून बसला. 'हे नको आता. उद्या सगळेजण चोर म्हणतील आणि चोरी झाली माझी. घरी खायला नाही आणि बाबा विष घालेलही. मग धीरप्रमाणे अंगावर माशा बसतील.....' मारत्या हळूच आत आला. त्याने चुलीवरच्या पातेल्यातला बचकभर भात मुठीमुठीने तोंडात भरून सावकाश गिळला. बाबाच्या सदऱ्यातली रुपयाची चिल्लर त्याने बेधडक खिशात घातली. बाबाची तंबाखूची मोठी पिशवी गाठ मारून त्याने विहिरीत फेकून दिली. एक जुने ब्लेड घेऊन त्याने परशाच्या सायकलच्या टायरवर चराचरा रेघोट्या ओढल्या. 'उद्या ही सायकल पाहिल्यावर मोगल-इ-आझम परशा कसा चड्डीत झुरळ शिरल्याप्रमाणे नाचू लागेल याची कल्पना येताच मारत्याला हसू आवरेना व तो बाहेर पडला.' महादू भटाने एकदा त्याच्या पायावर दोन छड्या मारल्या होत्या, ते आठवून मारत्या गाडीच्या चाकाचे दोन मोठे खिळे उपसून दणादणा घराच्या छपरावर फेकतो. आता म्हातारा उठणार आणि घराला जागवणार या कल्पनेने मारत्याला समाधान वाटते. जाता जाता तो व्यंकूच्या खोलीजवळ येतो. याच मॅडममुळे हे सारं झालं, नको त्याचा पैसा! या विचाराने मारत्याने हळूच आठ आण्याचे नाणे खिडकीतून आत टाकले. आणखी दहा वर्षांनी व्यंकूला खरे घड्याळ घेऊन देण्याचे मनाशी ठरवून मारत्या रस्त्यावर येतो. आता त्याला धीरची पुन्हा आठवण होते. त्याला वाटते, धीर असता, तर हॅट हॅट म्हटले असते तरी तो आपल्याबरोबर येथपर्यंत तरी आला असता. तो स्वत:शीच म्हणाला, त्या खळग्यात एखादे झाडबीड आलंय की काय हे पाहायला मी जरूर येईन, दहा वर्षांनी.'

'आता संपले. सारी आतडी तुटली. सारे कर्ज फिटले.' एकदम नाळ तुटल्याप्रमाणे मारत्या एक नवी भूक घेऊन रेल्वे लाइनीकडे धावत सुटला.

बापाने लाथ मारून घराबाहेर काढलेले, सगळ्या गावावरून ओवाळून टाकलेले,

लक्ष्मीला सोडलेल्या रेड्याप्रमाणे उगाचच खोड्या करत गावभर भटकणारे आडदांड पोर- नाऱ्या- 'राधी'मध्ये आहे. पिसाळलेल्या राधीला त्रास देणारी कारटी नाऱ्याच्याच टोळीतली होती आणि नाऱ्या तर त्यांच्या अग्रभागी होता. राधीचे कुत्रे, 'काळे' मारण्यातही नाऱ्याचाच पुढाकार होता आणि राधीच्या काठीचा प्रसाद मिळतो तोही त्यालाच. 'आमच्या शेजारी रामभाऊ दड्डीकर राहात. त्यांची बायको सावित्रीबाई मोठी जाडजूड, अजस्त्र बाई होती आणि तिचा दंड माझ्या मांडीएवढा होता. गल्लीच्या टोकाला काळे यांचा दवाखाना होता. त्यांची बायको तर रस्त्याने चालली की कपड्यांचे मोठे कपाटच फिरायला चालले आहे असे आम्हाला वाटे. तर या नाऱ्याने कुठले तरी डांबर आणून, सावित्रीबाई व काळीणबाई यांची निकाली कुस्ती होणार अशी जाहिरात महादेवाच्या देवळाच्या भिंतीवर लिहून ठेवली होती.' नाऱ्याचा इरसालपणा इथे झगझगीत स्पष्ट होतो. फुलांच्या पुड्यात दोन मोठ्या बेडक्या घालून गंगव्वाच्या घरात खिडकीतून फेकणारा नाऱ्याच! गंगव्वा आणि तिच्या मुलीच्या किंकाळ्या अर्धा तासभर गल्लीत निनादत होत्या. 'भास्कराचार्य ज्योतिष्याच्या घरावर तेथील 'येथे रमल सांगितले जाईल' ही पाटी काढून गणू शिंप्याची 'सदरे-चोळ्या शिवणार' ही पाटी लावणारा नाऱ्याच!' चिक्कू माणूस म्हणून गावभर प्रसिद्ध असलेल्या अण्णाबुवाच्या घरी सार्वजनिक हळदीकुंकू आहे असे सगळीकडे आमंत्रण देऊन बायकांची झुंबड पाठविणारी पोरे नाऱ्याच्याच टोळीमधली होती. 'राधी'मधले हे व्रात्य, इरसाल, तामसी कारटे नाऱ्या कायम लक्षात राहते, ते त्याच्या वेगळेपणामुळे.

'रात्र झाली गोकुळी'मधला कृष्णा हा कोट्यवधी अर्धपोटी भारतीय बालकांचा खऱ्या अर्थाने प्रतिनिधी शोभावा असा आहे. त्याच्या जीवघेण्या भुकेमुळे तो आपल्या मनात कायमचे घर करून राहतो. 'मग आम्हाला भूक लागतेय. चहासुद्धा देत नाहीत घरी वेळेवर-' ही त्याची कायम तक्रार. शाळेतून आल्यावर चहासुद्धा तयार नाही हे पाहून तो चिडतो आणि सरळ परसात जाऊन उभा राहतो. समोरच्या घरातील मुले परसात पोहे खात असतात. घराकडे भीत भीत पाहात कृष्णा सरळ एकापुढे हात पसरतो. तो मुलगा आपला रिकामा हात कृष्णाच्या हातावर फटदिशी मारतो. ही भूक! मग तिच्यापुढे लाजबीज सब झूट! गरिबाला कसली आली आहे लाज? 'कृष्ण्या, भिकारड्या, तुला काय लाजबीज आहे की नाही? घे तुझा चहा. अगदी दुष्काळात जन्मलंय कारटं!' वारणाबाईच्या संतापाचे कृष्णाला काही सोयरसुतक नव्हते. नुसताच कोमट काळसर चहा पाहून तो चिडून विचारतो, 'ते कालचे चुरमुरे संपले?' कृष्णाची सारी ताकद कुठून आणि कसे खाणे मिळेल या विचारात, प्रयत्नातच खर्ची पडत असे. आईने काही काम सांगायच्या आतच कृष्णा खेळायला सटकतो. भटाच्या दुकानात मागल्या बाजूने गेले की भट चोरीचा माल–दुधीभोपळे, दोडकी यांना दोनचार आणे

देई. घरी गोळ्या-बिस्किटे मिळण्याची मारामार. कृष्णा लोकांच्या परसांतील दुधीभोपळे, दोडकी यांची चोरी करू लागला आणि शाळा बुडवून चिंचेखाली बसून कुरकुरीत बिस्किटे समाधानाने खाऊ लागला. शेजारच्या वकिलाच्या गड्याने– मारुतीने– कृष्णाला मुद्देमालासकट पकडले व तणतणतच तो कृष्णाला घेऊन आला. कृष्णाने चोरी केली यावर वारणाबाईचा विश्वास बसेना, पण ते सत्य होते. भरपूर तंबी देऊन मारुती गेल्यावर कुणी विश्वास ठेवणार नाही हे माहीत असूनही, कृष्णा आवेशाने आपली खोटी बाजू मांडत राहिला. वारणाबाईने तर हबकाच खाल्ला आणि दाजी हताश झाला. रात्री जेवताना दुर्गी उठताच वखवखलेल्या कृष्णाने पटकन् तिची भाकरी उचलून एकाच सुरळीने तोंडात कोंबली. पण तेवढ्याने त्याची भूक भागली नाही ती नाहीच. रात्री झोपल्यावरही तो चुळबुळत राहतो. हळूच चोरासारखा जाऊन तो चुरमुऱ्यांचा रिकामा डबा पाहून घेतो. हताश होतो. भुकेनी बिचाऱ्याला झोप येईना. तो सारखी कुस बदलतो. शेजारच्या घरातून आलेल्या आवाजाने वारणाबाई मनोमन शरमते. कृष्णा मात्र जाम खुष होतो. 'भाजी एका चपातीत गुंडाळून ठेव व सकाळी खीर चपाती देऊन टाक शेजारी.' कृष्णा मात्र एकदम खुलला. दडपून ठेवलेली भूक एकदम जागी झाली आणि ती रांगेत मांडून ठेवलेल्या चपात्या व खिरीची भांडी यावर खुशाल चरू लागली. 'हे सारे सकाळी देण्याऐवजी आत्ताच का देत नाहीत? मी स्वत: जाऊन आणतो हवे तर!' कृष्णा अर्धवट उठलाही पण शेजारचे घर हळूहळू गोठल्याप्रमाणे शांत झालेले पाहून तो निराशेने चादर तोंडावर ओढून घेतो. चादरीच्या फाटक्या जागेतून नाक बाहेर ठेवून कृष्णा उजाडण्याची वाट पाहू लागला. 'ती खीर शेवयांची होती. तिचा रंग केशरी होता व मधून मधून बेदाणे येत. आणि बाईला वाटले त्याप्रमाणे ती कपभर नव्हती, चांगली पातेलेभर होती, मोठे पातेलेभर! मग ती शकीने घेतली नाही, दुर्गीने नको म्हटले आणि आईचा तर उपवास होता. केशरी दाट खीर.....' केव्हा तरी मध्येच झोप चाळवून कृष्णा उठून बसतो आणि विचारतो, 'उजाडलं आई?' त्याचा हा साधा प्रश्न तीक्ष्ण सुरीप्रमाणे हृदय कापत जातो. खिळा ठोकल्याप्रमाणे कृष्णा डोक्यात फिट्ट बसतो. त्याला विसरतो म्हटले तरी विसरणे शक्य नाही, असा हा कृष्णा!

लहान मुलांना नव्या कपड्यांचे, वस्तूंचे, खेळण्यांचे किती अनिवार आकर्षण असते, याची कल्पना बरेचदा मोठ्यांना पुरेशा प्रमाणात येत नाही आणि मग कधीतरी नको ते होऊन बसते. वडील लहानपणीच मोटार अपघातात गेल्यामुळे त्यांच्या मायेला पारखी झालेली वासंती आईला कधीच त्रास देत नसे, सहसा काही मागत नसे. कधी नव्हे तो फुलाफुलांच्या परकराचा ती हट्ट करते. तिच्या वाढदिवसाला तो शिवण्याचे आई मान्य करते. शनिवारी परकर मिळणार असतो पण आई आणायला विसरते. संध्याकाळी नक्की आणण्याचे कबूल करते. पण वेड्या वासंतीला तो पाहण्याची, तो

आत्ताच आणण्याची तीव्र इच्छा होते. आईला शाळेचे पेपर्स तपासायचे असतात, म्हणून ती वासंतीच्या हट्टाकडे दुर्लक्ष करते आणि वासंतीला कायमची अंतरते..... वासंतीची तीव्र इच्छा तिला स्वस्थ बसू देत नाही. शेजारच्या मुलांबरोबर ती स्वत:च परकर पाहण्यासाठी दुकानाकडे जाते. दुकान दिसताच बेभानपणे पुढे पळते आणि मोटरखाली येते. (वासंती).

वर्षभर शाळेत जाऊनही ग म या दोन अक्षरांपलीकडे जिची मजल गेली नव्हती अशी गंगूली, नारू लोहाराची साऱ्या गावाला पुरून उरलेली उंडगी दांडगी म्हैस अलगद घरी वळवून आणत असे. दिवसच्या दिवस गंगूली काही खात नसे, पण रात्री अगर सकाळी खायला बसली की एखाद्या वड्डराचे जेवण जेऊन जाई. 'बटणे नसलेला झगा सावरत, झिंज्या मागे फेकत ती भटकायला बाहेर पडली, की संध्याकाळपर्यंत बघायला नको. तुरीच्या शेंगा, काकड्या, भुईमूग, झुडुपावर वाढलेली कोवळी रानतोंडली सारे तिला चरायला चालत असे.' 'आई, माझी भावली हुडकून दे, कुठाय ती?' शेवटपर्यंत गंगूलीचा भावलीचा ध्यास कायम होता. यमनी जोगतीणीने तिची भावली चोरली व तिला मूठ मारली, त्यामुळेच सकाळपासून खणखणीत असलेली गंगूली ओरडतच चटईवर आडवी झाली. पाहता पाहता तिचे पोट फुगले व सर्व उपाय व्यर्थ ठरून करकरीत संध्याकाळी गंगूली मसणवटीत गेली. (फुंका). तर 'सण्डे, मुरगी के अण्डे.....' असले खुळचट गाणे गाणारा बाबल्या, वडाजवळ बस थांबली की अंग मुरडून मुरडून गाणी म्हणून दाखवत असे. जेवण, चहा दिला तर काहीही काम करायची त्याची तयारी असे. तशीच अडचण असली तर म्हैस, पारडू बोडून द्यायलाही त्याची तयारी असे. पण यमनी जोगतीणीला मात्र तो टरकून होता. म्हणूनच यमनीने संगावर टाकलेल्या 'फुंक्या'ची माहिती दिल्यावर तो कळवळून संग्याला म्हणतो, 'संगा, मी सांगितलं म्हणून सांगू नको यमनीला. नाहीतर माझ्यावरसुद्धा फुंका टाकील ती सटवी! आणि मग मी खुळ्या कुत्र्यासारखा मरून जाईन–' (फुंका).

लहानपणी मेघ:श्यामने आंब्याच्या झाडाच्या खालच्या फांद्यावर फळ्या ठोकून आपले छोटेसे घर तयार केले होते आणि जरा बिनसले की तो तासन् तास तिथे जाऊन आखडून बसे. लहानपणचा हा रुसवा कोणाला अपरिचित आहे? असे रुसणे ही तर लहानपणची मिरासदारी! 'आमची आजी चांगली आहे. ती मला खजूर देते.' असे एका शेजाऱ्याला अभिमानाने सांगणारा चिमुरडा संजीव, आजीच्या घरी राहिला होता फक्त पंधरा दिवस, पण तेवढ्यात त्याने घर डोक्यावर घेतले. सगळ्या कपाटातील डबे कडाकडा काढून काही खायला मिळते का याची त्याने शोधाशोध केली होती. घरातल्या जुन्या खेळण्यांपैकी अर्ध्या खेळण्यांचा चक्काचूर केला होता. खाली गादी अंथरून

जिन्याच्या कठड्यावरून घसरत येऊन तो खिदळत धबधबा पडला होता. आणि त्याने सोप्यावरील स्वच्छ पांढऱ्या भिंती अडीच तीन फुटांपर्यंत विलक्षण चित्रांनी भरून टाकल्या होत्या. जायच्या दिवशी सकाळीच त्याने आपण होऊन माईच्या गळ्यात हात टाकले नि तिला आपल्या घरी चलण्याचा आग्रह धरला. परंतु दारात टांगा आला, तेव्हा सारे काही पुसून टाकल्याप्रमाणे आजी-आजोबा, खजूर, खेळणी तो पार विसरून गेला आणि धावत जाऊन उतावीळपणे टांग्यात बसून मागे एकदाही न पाहता निघून गेला. हेही अगदी स्वाभाविक. नवीन गोष्ट हाती आली की जुनी त्वरित विसरणे हेच बालपण. आजीने कितीही लळा लावला तरी मूल धावणार आईकडेच! (पुनरपि).

आंधळ्या आजोबांच्या मनोव्यापारांतून त्यांच्या लाडक्या नातीचे, राणीचे एक अवखळ, अल्लड, नाचऱ्या मुलीचे गोड चित्र डोळ्यापुढे साकारते ते 'राणी' या कथेत. सकाळच्या वेळी स्वयंपाकघरात राणीचा नुसता धुमाकूळ चालत असे. राणीच्या आईचे राणीवर ओरडणे चालू असे. 'राणी! ठेव ती स्पिरिटची बाटली बाजूला!' 'राणी! सांडलंस दूध? आता चहा कुठला कपाळाचा!' 'मग एखाद्या वेळी राणी मांजरासारखे ओरडते किंवा ताट घेऊन त्यावर पळी वाजवत साऱ्या घराचे कान बधिर करते.' 'राणी, आता गप्प बसली नाहीस तर प्रसाद मिळेल हं चांगला. रागाने नाना ओरडतो. मग राणी 'अजीऽ होऽऽ' असे सिनेमातल्याप्रमाणे ओरडते, व सारे जण खो खो हसतात.' आजोबांचे, भाऊचे सारे अंधारे जग, त्यांचे दुःख मांडीवर बसलेल्या राणीमध्ये नाहीसे होत असे. गळ्यात हात टाकून तिने गोष्ट सांगण्याचा अवखळ, बोबडा आग्रह केला की बरेचदा थोडा वेळ त्यांना हताश वाटे. तिच्या चेहेऱ्यावरून हात फिरवून ती आहे तरी कशी हे पाहण्याचा भाऊ प्रयत्न करीत. भाऊ आठवडाभर बेशुद्धावस्थेत असतानाच, एकाएकी तीन दिवसांपूर्वी राणी गेली हे रमाकाकूकडून कळल्यावर त्या शब्दांच्या विषारी अर्थाने भाऊ चिरडल्याप्रमाणे तळमळतात. 'राणीचा प्रत्येक शब्द दुरून येणाऱ्या घंटेच्या नादाप्रमाणे ऐकू येऊ लागला. जाताना राणी भेटली नाही भेटली नाही- असा ध्वनी घड्याळाच्या टिकटिकीबरोबर ऐकू येऊ लागला. राणीचे शब्द, राणीचे बेबंद केस, तिच्या गालाचा उष्ण मृदू स्पर्श, तिच्या ओठांचा दुधाचा वास या साऱ्यांचे एक वस्त्र बनले आणि त्या रजईच्या जोडीने हिरव्यापिवळ्या वेड्या वेगाने त्यांच्याभोवती फिरू लागले.' आजोबांचे हे नातीवरील प्रेम मनाला भावते. असे प्रेम हाच या मानवी जीवनातील अर्थपूर्ण आकडा. भावी काळात, महानगरी जीवनात, राजाराणीच्या संसारात आजोबा-आजीला हे प्रेम लाभणार आहे का, हा प्रश्न मन व्याकूळ करतो. ईश्वरेच्छा बलीयसी!

'स्लीला' मधली लीला आपल्या मनात कायम पिंगा घालत राहाते. अशी पोरटी

आडदांडपणे आपल्या आयुष्यात आली तर सारा जन्म आपणही आनंदाने धापा टाकण्यात घालवू असे कुणालाही वाटावे इतकी लोभसवाणी लीला तिच्या नाचऱ्या पावलांनी 'स्लीला' कथेत नाचत आहे, बागडत आहे, खोड्या करत आहे, गिरक्या घेत आहे. तिच्यावर फार वेळ रागावू शकणारा माणूस त्या गल्लीत नव्हता. डॉक्टरांचा नळ ती नेहमीच झुर्रकन सुरू करते. डॉक्टर रागावतात पण आता तो नळ तिला सुरू करण्यासाठीच आहे अशी असहाय भूमिका डॉक्टरांनाही घ्यावी लागते. गेटला कुलूप लावता आले असते, पण देशपांडेनी आपले लोखंडी गेट तिला त्यावर उभे राहून करकचत पुढे-मागे करण्यासाठी मुक्त ठेवले होते. अशी गोड लीला कधीतरी अवचित समोरचे छोटे फाटक धाडदिशी वाजताच निळ्या वेगाने भाऊमामांवर येऊन आदळते. त्यांच्या एकाकी, वांझोट्या, रुक्ष जीवनात पंधरा मिनिटांकरिता का होईना उजाळा निर्माण करते. ते हसत म्हणतात, 'कारटे, तू एक दिवस या भाऊमामाचा अगदी चिखल करून टाकणार. उनाड म्हैस कुठली!' लीलावर थोडे दडपण येते फक्त भाऊमामीचे; पण ती आत जाताच ती घोषणा करून टाकते, 'मी इथं संध्याकाळपर्यंत राहणार आहे.' एकदम लहर येऊन दोन्ही हातांची पहिली बोटे एकमेकांवर टिपरीसारखी आपटत ती नाचू लागते व गाणे सुरू करते. 'गवळणी घरीं कृष्ण गेला....' मध्येच गिरकी घेऊन ती सुरेख हसते. 'भाऊ, किनई तुमचं नाक रताळ्यासारखं आहे.' जणू कौतुकाने त्यांच्याकडे पाहात लीला म्हणाली. भाऊ हताश झाले. या पोरीच्या धडधडीत, सरळ स्वभावामुळे तिला आईकडून अनेकदा चांगला मार खावा लागला होता. पाटलांच्या आकूताईला तिचा चेहेरा शेळीसारखा आहे असे तिने सांगितले होते. सुधाने नायलॉन नेसले असता, आज तू पंचा का नेसलीस असा तिचा प्रश्न होता. आणि लहान डोक्याच्या लठ्ठ भाऊमामीला 'घागर'म्हणत तिने एकदा तिच्याकडून धुमका खाल्ला होता.

एकदम आठवण होऊन निळ्या झग्याच्या गच्च भरलेल्या खिशातून एक काड्याची पेटी ती काढते व उघडून भाऊरावांपुढे धरते. पेटीत कापसाच्या बोळ्यावर दोन लालभडक गुंजा व कुंकू टाकलेले एक गणेशपाखरू होते आणि ते गणपती आला की सोन्याचे होणार म्हणून निरागस लीला वाट पाहत असते. लहानपणातील हा वेडेपणा! पाखरू सोन्याचे न होताच का आणि कसे मेले हे लीलाच्या आकलनापलीकडचे होते. पण ती आपल्याच नादात दंग होती. तिने घाईघाईने काड्याच्या पेटीतला कापसाचा बोळा काढून खाली पाहिले व ती हसली. 'हा बघा भाऊ, याचे नाव राजू' अभिमानाने लीला सांगते. पेटीत हिरव्या झगझगीत काचेच्या तुकड्यासारख्या पाठीचा एक किडा वळवळत होता.

भाऊरावांच्या मांडीवर डोके ठेवून लीला म्हणते, 'दमलो बाई आम्ही. दादा-ताई केव्हा येणार कुणास्ठाऊक!' 'दमली नसेल तर काय! एक चमचा साखरेसाठी तिने मराठेच्या घरी सिनेमांतील गाणी हावभावासकट म्हटली असतील, सरदेसाईंच्या घरची

घंटा वाजवून ती पाचदा पळाली असेल, घरी सायकलमधली हवा सोडली असेल, मग त्यातच देवळातील वेडीला खडा मारायचा, अनोळखी घरात खिडकीतून आत डोकावायचे, आणि जोशीच्या घरात सोप्याला बांधलेल्या वीतभर उंच कुत्र्याला वो वो करून उगाच चिडवायचे हे सारे आलेच.'

मग लाडिकपणाने लीला गोष्टीचा आग्रह धरते, आणि वीस पंचवीस वेळा सुरू झालेली गोष्ट पुन्हा एकदा सुरू होते. काही वेळाने लीलाचे लक्ष गोष्टीवरून उडते व ती उभ्या उभ्याच भाऊमामांच्या मांडीवर डोकं ठेवून झोपते. भाऊरावांनी तिला उचलताच तिची झापड उडते व एक जांभई देत दिलखुलासपणे ती सांगून टाकते, 'भाऊ, आता आम्हाला भूक लागलेय.' कधी नव्हे ती भाऊमामी तिला खायला देण्याकरिता माजघरात एका स्टुलावर बसवते. पण स्वस्थ बसेल तर लीला कसली? टेबलक्लॉथवरील मोराला हात लावून त्याचा पिसारा डोळ्यांनी दिसतो तितकाच मऊ आहे याची तिने खात्री करून घेतली आणि शेल्फावरील स्टेनलेसच्या तांब्याकडे आली. ती येताच निमुळत्या तोंडाची लीला तांब्यातून तिला भेटायला आली. लीलाने आ करतांना स्टेनलेस-लीलाने एवढा उंच लांब आ केला की, लीला एकदम खळखळून हसली. तिने तिला वेडावून दाखवायला सुरुवात केली आणि दर आकृतीबरोबर तिचे हसणे मुक्त-उनाड होऊन माजघर भरून गेले.' भाऊमामा भाऊमामींच्या मनात कोणता सैतान डोकावून गेला याची त्या बिचाऱ्या निष्पाप, अव्याज मनाच्या, भोळ्याभाबड्या लीलाला काडीचीही कल्पना नव्हती. ती तिच्या नादात असताना पाण्याचा तांब्या धाडदिशी खाली पडतो आणि भाऊमामीच्या मनातील राग, नैराश्य, शरम एकदम जागी होऊन ती कर्कशपणे ओरडते, 'जा येथून, आणि पुन्हा येशील तर बघ.'

तिचा अवतार पाहून लीला निसटते, न बोलता तोंडात एक बोट अडकवून ती रस्त्याकडे पाहात राहाते. 'आता कोपऱ्यावर कुणी तरी दिसले, व ती आनंदाने बोंडाप्रमाणे झाली. तिने टाळी वाजवली व ती ओरडली, 'आले दादा ताई-' आणि ती खंड्याच्या निळ्या पंखाप्रमाणे निसटली.' अशी ही लीला मनात कायम घर करून पिंगा घालत राहाते.

स्वच्छ, झगझगीत जरीच्या काठाप्रमाणे हसणारी, आईच्या मागे थोरल्या बहिणीने आपल्यावर टाकलेल्या मायेच्या पदराची पूर्ण जाणीव असणारी, बहिणीच्या वाट्याला रांगोळीच्या आकृतीप्रमाणे पूर्ण सौख्य यावे असे मनोमन चिंतणारी प्रेमळ प्रभा 'भेट'मध्ये दिसते. हिंदीची परीक्षा उद्यावर आली म्हणून राष्ट्रभाषेचे हवे तसे हाल करणारी ही प्रभा! 'दिदी, तुम इतकी उगाच क्यों चिल्लाती हो?' असा प्रश्न विचारणारी प्रभा लाडिकपणे आपल्या मोठ्या बहिणीचे गुपित जाणून घेते आणि मग खोडकरपणे हसते. 'अस्सं काय ताईसाहेब! मग आज संध्याकाळी तंबोरा गवसणीमधून बाहेर पडणार!..... सर, मी पूरिया म्हणू का केदार? मला स्वत:ला सर, पूरिया फार

आवडतो.....' प्रभाचा हा वाह्यातपणा लताला आवडतो पण वरकरणी ती करड्या आवाजात म्हणते, 'कारटे, थांब तुला फुंकणीने बडवलं पाहिजे.' आपली फुलासारखी ताई आपल्याला फुंकणीने मारणार या कल्पनेनेच प्रभाला हुळहुळल्यासारखे होते व खोट्या गांभीर्याने ती विचारते, 'फुंकणीने?' चार वाजता घरी ये म्हणून लताने सांगताच ती खो खो हसत विचारते, 'अग पण माझं काय काम आहे इथं?' पण ती चार वाजता येणार हे नक्की. लताचा उल्लेख कुणी 'केवड्याचं पान' वा 'पाल' असा केला की कावरीबावरी होणारी, कळवळणारी, रडू लागणारी प्रभा या कॉम्प्युटरयुगात सहजासहजी आढळणे दुर्मिळ!

बापू काळुस्करच्या अपराधाची खरी शिक्षा होते ती त्याच्या अशक्त पोरीला-शैलूला! पोरी तिचा झगा फाडतात, तिच्या गालावर ओरबाडतात, शेवटी तिला आईबरोबर मामाच्या घरी उपऱ्यासारखे राहावे लागते. बापूही नंतर तिथेच येतो, आणखी एक उपरा. तिला कुणीही कधीही खेळात घेत नसे, पण बटने तुटलेला झगा सावरत ती दुरुन दुरुनच त्यांचा खेळ पाहात असे. चुकून चेंडू तिच्याकडे आला आणि तिने तो उचलून त्यांच्याकडे फेकला तरी तिला हिडीसफिडीस करणे टळत नसे. खेळायचे वय असूनही, समवयस्क मुलींनी बहिष्कृत केलेली शैलू तशीच कुढत मोठी होत जाणार. बिचारी दूर उभी राहूनच टाळ्या वाजवत आपला दुबळा आनंद व्यक्त करीत असे. बापूचे बापाचे हृदय कळवळते, तिला जवळ घेऊन तो तिच्या फ्रॉकला बटण लावून देतो आणि येताना चॉकलेट आणीन असे सांगतो.

'आणखी एक बाहुली?' शैलू हट्ट करते. कितीही दरिद्री कुटुंबातली मुलगी असली तरी तिला बाहुली ही हवी असतेच. किंमत मग कितीही असो. सुदैवाने प्रत्येकाला परवडणारी त्या त्या किंमतीची बाहुली कुठेना कुठे तरी मिळतेच. दुकानदारही तुमचा अंदाज घेऊनच माल दाखवितो, हे एका परिनं बरेच म्हणायचे. (गिधाडे).

'सोडवण' ही एक झपाटून टाकणारी कथा! मुलीच्या अपघाती मृत्यूने खचलेले, जीवनातून उठलेले, आणि शेवटी तिच्या ध्यासातच तिचा भास होऊन संपून जाणारे डॉ. फाटक ही जी. एं.ची एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा होय! संपूर्ण कथेत वृंदाचा अपघाती मृत्यू आपली छाया टाकून आहे. कर्तृत्ववान असूनही डॉ. फाटक अपयशी का ठरावेत? पाणी हा त्यांचा जिवाभावाचा मित्र असूनही त्यांच्या मुलीला, वृंदाला पाण्यानेच का गिळावे? वृंदाच्या अपघाती मृत्यूने अगदी त्यांचे घरच विस्कटावे, ते जीवनातूनच उठावेत? ह्या कुठल्याही प्रश्नाला उत्तर फक्त एकच, नियती! वृंदा तरी कशी, तर डॉ. फाटकांनी पोटाला हात लावताच हुळहुळून हसणारी, सायकलवरून सतत हुंदडणारी, भिंगरीसारखी नाचणारी वृंदा! तीनदा गुडघे खरचटून स्वत:च वृंदाने सायकल शिकून घेतली आणि आता तिला पोहणे हवे होते. आईबरोबर जायचे म्हणून ती वैजनाथच्या ट्रिपला गेली नाही आणि बाबांबरोबर पोहायला जायच्या आनंदाने ती

आईबरोबर गेली नाही. वृंदाने पोहण्याचा पोषाख घातला. डॉ. फाटकांनी प्रेमाने तिच्या पोटाला हात लावताच ती हुळहुळून अंग मुरडत हसली. फाटकांनी भेंडीची मोळी स्वत: तपासून पाहिली, अंगाला बांधायची दोरी हिसका देऊन बघितली. चित्कारतच वृंदा पाण्यात आडवी झाली. तरंगत्या तटाप्रमाणे फाटक तिच्याभोवती तासभर फिरत होते. एका आठवड्यात वृंदा चांगली पोहायला शिकणार हे फाटकांनी ओळखले. स्वत:च्या मुलीचा त्यांना अभिमान वाटला. वृंदाच्या आग्रहाला कौतुकाने दुबळे झालेले डॉ. फाटक नकार देऊ शकत नाहीत. फक्त दहा मिनिटे डुंबायची ते वृंदाला परवानगी देतात आणि महापुरात कृष्णा पोहणाऱ्या महादूला तिला दहा मिनिटांनी उचलायलाच सांगतात. महादूही दोन पायऱ्या उतरून येतो. दहा मिनिटांकरिता डॉ. फाटक नरोत्तमच्या बंगल्यात जातात. त्यांनी ग्लास संपवला नसेल तेवढ्यात विहिरीकडून एक माणूस धावत येतो. महादू आणि दुसरा माणूस विहिरीत बुड्या मारत होते. वृंदाच्या अंगाला बांधलेली दोरी तुटली होती. भेंडाच्या मोळीखालून निसटलेली वृंदा विहिरीने गिळली होती. 'काळवंडत गेलेले पाणी, त्याची अमानुष थरथर, वेळ जसजसा जाऊ लागला तसे कणाकणाने मरत हताशपणे पाण्यात घातलेल्या फेऱ्या.' संध्याकाळी पाचला वृंदाचे प्रेत मिळाले. वृंदा आपल्याला चटका लावून जाते. नियतीची ही अगम्य लीला मनाच्या ठिकऱ्या करते. मन अस्वस्थ होते आणि 'सोडवण' ह्या कथेपासून आपली 'सोडवण' कधीच होत नाही, हेच त्या कथेचे आणि तिच्या निर्मात्याचे असाधारण सामर्थ्य! मराठी कथासाहित्यातील जी. एं.चे ध्रुवपद जाणवते ते त्यांच्या अशा असाधारण, अविस्मरणीय कथांतून!

जी. ए. स्वत: प्राध्यापक होते. त्यामुळे शालेय, महाविद्यालयीन जीवन, त्यातील सर्वसाधारण बुद्धीचा विद्यार्थीवर्ग त्यांना अपरिचित नव्हता. सुमार बुद्धीच्या बालजगताचे जी. एं.नी अत्यंत उपरोधिक चित्रण 'माणूस नावाचा बेटा' आणि 'सांगाडा'मध्ये केले आहे. 'समोर कळकट, किंवा जादा आगाऊ चेहेऱ्याची पोरे.....' 'मी सर, मी सर- काही पोरें चित्कारीत पुढे येऊन कान खाजवीत, घामट अंगाचे भपकारे टाकीत नकाशाजवळ येऊन उभी राहात. पहिल्या बाकावरील कंटाळलेल्या चेहेऱ्याच्या मुली वेण्या पुढे आणीत, रिबने कुरवाळीत.' जी. एं.च्या दत्तूला समोरच्या पोरांचा संताप येतो आणि आपला हात दुखेपर्यंत त्या प्रत्येकाच्या हातावर ओलसर वेताने छड्या माराव्यात असे त्याला मनापासून वाटते. 'सारी एकजात इब्लीस डँबीस कार्टी! ते कोपऱ्यातील गोबरेल्या चेहेऱ्याचे दिवटे कारटे-दिवेकर! कुठलीही मिरवणूक, फंड, संप असो. आगाऊपणा करीत उगाच धडपडत असे. ज्याचे शुद्धलेखनही त्याला बापजन्मी जमणार नाही, अशा घोषणा बोंबलत हिंडत असे. ही कारटी पुढे मोठी होणार, आपल्याचसारखी पोरे जगावर सोडणार, मग त्यांना दरडोई एक मत मिळणार, आणि त्या आधारावर हा जनताजनार्दन 'आम्हाला समजेल असं वाङ्मय द्या हो! आम्हाला

कळेल असं संगीत द्या हो!' असे ओरडत हिंडणार, हरामखोर लेकाचे.' (माणूस नावाचा बेटा). जी. ए. असे दिसतात, ते त्यांच्या कथांतूनच. एरवी त्यांचे मौन सुप्रसिद्धच आहे. जी. एं.ची स्वत:ची मते, त्यांची आवडनिवड, काही गोष्टीबाबतची त्यांची मनस्वी चीड, कथेबाबतची, शब्दांबाबतची त्यांची दृष्टी, तत्कालीन हिंदी सिनेमांची, बिनाका गीतमालेची, सिलोन रेडिओच्या नळाची त्यांनी क्वचितप्रसंगी केलेली चेष्टा, 'बोगस दिलिपकुमार!' 'मोगल-इ-आझम' परशा, मोलकरणीचे अगदी नर्गिस असल्याप्रमाणे दिमाखात चालणे, (जन्म). नामूचे खिशात एक हात घालून राजकपूरसारखे उभे राहणे, जोत्याचे 'नरगिझ कोणत्या सिनेमात कोट घालते?' हा प्रश्न विचारणे (मुखवटा). 'या अलाला दिलही गया,' असले कसले तरी हुच्च गाणे सुरू झाले. ही त्या काळी अत्यंत लोकप्रिय झालेल्या 'उजाला' चित्रपटातील गाण्याची जी. एं.नी केलेली संभावना, (रात्र झाली गोकुळी). त्या काळी लोकप्रिय झालेल्या 'साधना-कट'ची त्यांनी केलेली चेष्टा (पुरुष). कपाळावर केसांचे उनाड तुरे, झुलपे उडविणाऱ्या मुलांबद्दल त्यांना येणारी चीड (कसाब, सांगाडा). अंग उघडे टाकणाऱ्या वाह्यात फॅशन्सबद्दल त्यांना येणारा संताप (हिरवी मखमल, गोरा हात, तक्षक). ह्या त्यांच्या कथांतून दिसून येतो. जी. ए. असे दिसतात, ते त्यांच्या कथांतून!

'खरे म्हणजे साऱ्या वर्गात शिकवण्याजोग्या याच तीन व्यक्ती. बाकी सारे काढेचिराइत... फक्त देशाचे आधारस्तंभ. कोणत्याही सत्याग्रहाचे फुकटे वैरण. एकदम भारताचे वैभव, व शिल्पकार. गाव, प्रांत वगैरे चिल्लर गोष्टी त्यांच्या खिजगणतीत नाहीत. त्यांचा सारा हिशेब देशाच्या मापावर! मोठी ऐपतदार कार्टी. फक्त आज मात्र ती काखा खाजवतात. बिनाका गीतमाला निष्ठेने ऐकतात आणि परीक्षेत दादाभाई नौरोजी ही महात्मा गांधींची पत्नी म्हणून लिहितात इतकेच.' (माणूस नावाचा बेटा). बाकी सारे तेच, फक्त आज बिनाका गीतमालाची जागा टी. व्ही.ने आणि व्हिडिओने घेतली आहे. तीन तीन, चार चार सिनेमे लागोपाठ पाहणाऱ्या भारताच्या आधारस्तंभांची धन्य होय. छायागीत, चित्रहार आणि मालिका यांनी वेडावलेली कारटी जागोजागी दिसतील. अमेरिकन संस्कृतीचे राक्षसी हातपाय समाजात खोलवर पसरू लागले आहेत. गर्दसारखे भयानक जहर शाळकरी मुलांमुलींपर्यंत पोहोचल्याचे वाचून मन हादरते आहे. स्वातंत्र्याची चाळीशी साजरी होत आहे. व्हीपी सिंग नामक वादळ उठलेय. आणि कॉम्प्युटर युगातील भारतात 'याचि देही याचि डोळा' काय काय पहायला मिळणार या कल्पनेनी मन व्याकूळ होतंय.

'सांगाडा'मध्ये नाडगौडा मास्तरांना शाळेतील मुलांकडे पाहून प्रामाणिकपणे वाटते, 'त्या पोरांना कशाबद्दलच आसक्ती नव्हती. कशालाच धार नव्हती. समोर दिसणाऱ्या कोणत्याही दगडावर त्यांचे आयुष्य तंगडी वर करत असे.' आज देशाचे वैभव, शिल्पकार, आधारस्तंभ असणाऱ्यांची स्थिती भन्नाट वेगाने बदलत आहे. मुलांचा

चौकसपणा वाढला खरे आहे; पण त्या मुलांचे प्रमाण किती? आणि नको तो चौकसपणा, नको ते ज्ञान, नको तो वाह्यातपणा आणि नको ती व्यसने वाढत चाललीत. ते वेगवान चक्र अखेर आपल्याला कुठे नेणार आहे? धडकी भरेल असे मार्क्स मुलांना मिळताहेत, पण त्यातूनच कृत्रिम, जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली, त्याचे काय? आणि या सर्वांतली खरी गुणवत्ता किती?

जी. एं.च्या कथेतील बालविश्व साधारणतः १९४५ ते १९७० या कालखंडातील आहे. हे बालविश्व मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि दरिद्री कुटुंबातील आहे. छोट्या खेड्यातील, गल्लीतील, चाळीतील, झोपड्यांतील मुले, जनसामान्यांची मुले या बालविश्वात प्रामुख्याने आढळतात. क्वचित बंगल्यातली मुलेही आढळतात. पण प्रामुख्याने हे बालविश्व मध्यमवर्गीय आणि बहुजन समाजातील आहे.

गोविंदाचार्याला मुले फार आवडतात, पण तो कोणालाच आवडत नसे. 'ए बिंदुमाधव, शाळा सुटली काय?' मोठ्या उत्सुकतेनी त्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी ते तेथेच गटारात फतकन मुतायला बसे. मुलांनी जवळ येण्याकरता तो बदाम, खारीक देऊ करी. पण त्याने 'बाळ' म्हणत पाठीवर हात फिरवताच गावठी शाळेतली ती मुले फिस्कारून पळून जात. त्याची खारीक कुमटलेली किंवा बदाम कडू निघाला की ती पोरे 'आहा रे लंगडूबाई' म्हणत त्याला वेडावत. (अवशेष). तर नाना मास्तर गल्लीतल्या कुठल्यातरी पोराला जबरदस्तीने पकडून आणत. शेंगदाणे देत आणि संतांचा उपदेश असलेला 'सुबोध'चा अंक मोठ्या प्रेमळ आग्रहाने त्याला देऊ करत. पण ते चलाख पोर शेंगदाणे संपवून फटकळपणे म्हणे, 'ह्यः, त्यात काय वाचायचं? मला नको' (अखेरचा दिवस). सिनेमाची गाडी दुकानापुढे थांबली, मागे पोरांचा घोळका लडबडत होताच. त्यातल्या एका निबर, कडू कारल्यासारख्या तोंडाच्या पोराने काशीचे लक्ष नाही असे समजून फक्कन दाण्यांवर हात मारला. पण काशीने तो नेमका पकडून पिरगाळला. सगळे दाणे पडले. 'का रे लडदू, हाडंच सैल करीन की!' चिडून काशी म्हणते. गाडीवाला सांगतो, 'मोठं इब्लीस कार्ट आहे ते. काल गाडीजवळ फटाकड्या लावल्या बोकडानं.' तेवढ्यात त्या पोराने एका काठीवर सैलपणे हलणारा, मुंग्या लागलेला सरडा उचलून रागाने दुकानाच्या फळीवर टाकला. 'हाडं सैल करणार ना? मग कर त्या सरड्याची.' पळता पळता ते पोर ओरडले. (शलॉट). 'तिच्या तासाच्या आधी मुले कित्येकदां अचकट विचकट लिहीत. एकाने तर म्हणे 'आंबराईतील भेट' नावाची कविता केली होती.' (शिक्षा). कधी नव्हे ती काशी सिनेमाला जाते, पण तिच्या बाजूलाच कुणी तरी हसते. काशी एवढ्याच उंचीच्या पण वयाने अगदी लहान असलेल्या त्या दोन मुली काशीच्या ओबडधोबड सरड्याच्या पायांसारख्या दिसणाऱ्या पायांकडे बोट दाखवून खिदळत होत्या. काशीने चमकून पाहताच त्या माना वळवतात, पण काशीला व्हायची ती वेदना होतेच व ती सिनेमा न पाहताच निमुटपणे घराच्या तुरुंगाकडे

परतते.(शलॉट). चिंचेच्या झाडाजवळ दामू येतो. तिथली पाच सात पोरे चिंचा तोडून दे म्हणून त्याच्या मागे लागतात. तो 'नाही नाही' म्हणतो, ते 'दे दे' म्हणतात. थोडा वेळ त्यांना नवाच खेळ मिळतो. 'मग सुताराचा निंगा पुढे झाला. नेहेमी डोके तासलेले हे पोर म्हणजे मोठे पंचकल्याणी कारटे होते. त्या भागात कुठेही कुंपण मोडले, फुले चोरीला गेली, नळाची तोटी नाहीशी झाली, किंवा तावदानावर दगड आला, तर प्रत्येक जण अत्यंत सहजपणे अगदी पहिल्या धारेची कडक शिवी प्रथम या निंगाला देत असे. निंगाने एका काठीवरून एक मेलेला हिरवट पांढरा हातभर लांब साप लोंबकळत आणला आणि म्हणाला, 'चिंचेवर चढतोस की टाकू साप अंगावर?' सापाला घाबरणारा दामू मटकन खालीच बसतो आणि काकुळतीने म्हणतो, 'निंगा, साप टाकू नको रे. मी चढतो झाडावर!' दामू झाडावर चढतो. 'थोड्याच वेळात खाली चिंचांचा सडा पडला. खाली वाकून पोरे चिंचा गोळा करू लागली व त्यांची इतकी धडपड झाली, की काहींच्या कमरेवर चड्डी ठरेना.' संधी साधून दामू खाली उडी मारतो व पळत सुटतो. (कवठे). 'धुड्म धुड्म बूम बूम!' असा सारखा देवळातील नगाऱ्यावर आवाज करून सतत देऊळ हादरवून सोडणारी, देवळात दुपारी झोपलेल्या भैरूची झोपमोड करणारी वात्रट कारटी आपल्याला 'अंजन'मध्ये पाहावयास मिळतात. भिमूकाकाबरोबर आलेले मळक्या मेणबत्तीच्या खुंटासारखे पोरही नगाऱ्याजवळ येताच त्याच्या हालचालीत कावेबाजपणा येतो आणि ते दोन्ही हातांच्या मुठीने नगारा दणादणा बडविते. मोठ्या माणसांना होणाऱ्या उपद्रवाचा विचार न करता, प्रसंगी त्यांच्या होणाऱ्या झोपमोडीत आनंदच शोधणाऱ्या वात्रट मुलांनी नगाऱ्याचा आवाज करणे काय, पत्रा बडवणे काय आणि पिंपाणी कर्कशपणे फुंकणे काय एकूण एकच. आणि अशी वात्रट कार्टी गल्लीबोळातून, चाळीतून, झोपडपट्टीतून मुबलक असतातच. दुकानदार नरसुभट बेदाणे आणण्याकरिता आत गेला की बचकभर शेंगदाणे किंवा खारवलेली आमसुले खिशात कोंबणारी साळसूद पोरे आपल्याला 'कांकणे'मध्ये दिसतात.

अशी ही 'आहा रे लंगडू बाई' म्हणून चिडवणारी, 'ह्याः, त्यात काय वाचायचं? मला नको.' म्हणून फटकळपणे सांगणारी, स्वतःच्या शिक्षिकेबद्दल अचकट विचकट लिहिणारी, चिडून दुकानाच्या फळीवर मेलेला सरडा टाकणारी, दुसऱ्याच्या व्यंगावर बोट दाखवून खिदळणारी, मेलेला साप काठीवर घेऊन तो अंगावर टाकण्याची धमकी देणारी, चिंचा गोळा करताना कमरेवरच्या घसरणाऱ्या चड्डीची शुद्ध नसलेली, कुठल्याही मिरवणुकीत, फंड गोळा करण्यात, संपात आगाऊपणा करीत उगाच धडपडणारी, कशाबद्दल आसक्ती नसणारी, दुकानदाराच्या मालावर हात साफ करणारी, सतत नगारा बडवून देऊळ हादरविणारी–इरसाल, इब्लीस, पंचकल्याणी कार्टी! कुठल्याही गल्लीबोळातून, चाळीतून आढळणारे हे भारताचे वैभव, शिल्पकार, आधारस्तंभ, जी. एं.च्या बालविश्वात अत्यंत प्रत्ययकारीपणे आपली ओळख पटवितात. हे बालविश्व

अस्सल आहे, यात कुठलीही तडजोड नाही. ' मुले म्हणजे देवाघरची फुले' वगैरे वगैरे विसरायला लावून वास्तव बालविश्वाचे जिवंत 'दर्शन' जी. ए. घडवितात ते मनाला पटून जाते. डोळ्याला झापडे लावून, संस्कारांच्या आणि नीतिमत्तेच्या गोडगोड गोष्टींचेच रवंथ करणाऱ्यांनी कितीही नाके मुरडलीत, तरी जीवनातील हे कठोर वास्तव किती काळ नजरेआड करणार?

आता अस्सल बालपणाचा हा नमुना-मोहन! दत्तू घरी येऊन पोहोचतो न पोहोचतो तोच मोहनचा हात धरून त्याला ओढत आणीत सुधा नेहेमीच्याच तक्रारींचा खास अंक सादर करते. 'मोहनने शेजारच्या शिंपिणीला चिंध्यांची बाहुली म्हटले होते, व ती बोंबलत आली होती. नव्या शर्टावर त्याने तळहाताएवढा शाईचा डाग पाडला होता व टारझन म्हणून कापड्यांच्या दोरीला लोंबकळताच दोरी तुटून ढीगभर कपडे अस्ताव्यस्त पडले होते व ....' (माणूस नावाचा बेटा). 'टारझन'चा सिनेमा पाहून आल्यावर गल्लीतल्या पोरांना हाताशी धरून 'टारझन-टारझन' खेळणे, झाडावरून पडणे, झोपाळा तुटणे, कपड्यांच्या दोऱ्या तुटणे, मोठ्यांची बोलणी खाणे अगदी स्वाभाविक, मनाला एकदम पटते, अरे हे तर आपलेच बालपण! 'शिवाजी' हा सिनेमा पाहून आल्यावर गल्लीतल्या पोरांच्या दोन टोळ्या बनवून स्वतः शिवाजी होऊन, कामट्यांच्या तलवारींनी देहभान विसरून लढणे, दुखापत करून घेणे, 'टारझन' साठी 'जेन' चा शोध घेणे, इत्यादी इत्यादी.....

आणि आता मुला-मुलींची गर्दी! पेरूच्या झाडावर प्राथमिक शाळेतील एखादी मुलगी धैर्याने वर चढते, कच्चे पेरू कचाकच चावून अर्धवट फेकून देते, मोठ्या उत्साहाने तेथूनच खच्चून ओरडते, 'काशे!' काशीच्या दुकानात मध्येच केव्हा तरी पोरे येत, चौघात मिळून दोन पैशाची एक काडी घेत व लाल जिभा बाहेर लोंबकळत ठेवून ऐटीत निघून जात. सुतिकागृहात वेळोवेळी येणाऱ्या धमणी गाडीत एकतरी पोर हटकून असेच आणि ते काशीचे खात्रीचे गिऱ्हाईक. साखरेची काडी हातात घेऊन ते रस्त्यात भटके व ती संपली की कावऱ्याबावऱ्या नजरेनी पायऱ्यांवर बसून राही. काशीच्या रोजच्या परिचयातल्या, अगदी एवढ्याशा, केवड्याच्या कणसाएवढ्या, चार मुलीत मिळून दोन पैशांचे दाणे, दोन पैशांची साखरेची काडी घेणाऱ्या मुली. या त्यांच्या दररोजच्या व्यापारातून काशीला एक पैसा फायदा नव्हता, पण इतर गिऱ्हाइके सोडून देखील काशीने त्यांचा सौदा आधी केला असता; कारण त्यांच्याशी घासाघिस करण्यात तर खरी गंमत. दाणे घेतल्यावर त्या काळजीपूर्वक मोजून बघतात. 'अग टाक की आणखी दोन दाणे!' त्या साऱ्या गिल्ला करतात. 'दोन पैशाला काय पोतंभर दाणे देऊ की काय?' 'वा ग बाई! दोन पैशाला अवघे चोवीस दाणे काय?' हात नाचवत दाणे घेणारी मुलगी म्हणते. कानातले लाल डूल हलवत एक मुलगी बाजू मांडते, 'परवा दिवशी एकोणतीस दाणे होते की.' मग किंचित हसून काशी त्यांना प्रत्येकीला मूठमूठभर

चुरमुरे देते. पण तेवढ्यावरही हा प्रेमळ व्यापार थांबत नाही. 'वा! बरीच आहेस की! आम्ही लहान म्हणून फसवत होतीस नव्हे काय?' असे विजयाने म्हणतच त्या जातात. (शलॉट)

"नागप्पा नागप्पा" ओरडत दानय्या गल्लीत शिरला की, त्याच्यामागे पोरांची झिम्मड उडे. दानय्या पोरांना मधूनमधून मधाचे जुने पोळे अगर सापाची कात देत असे. 'पोरी तर हातात नव्या गुंजा अगर गजगे पडले की लाह्याप्रमाणे फटाफट उडत.' दानय्याचे साप म्हटले की पोरे हादरून जात; पण खुषही होत आणि आज काय नवीन बाहेर पडणार हे पाहण्यासाठी श्वास आवरून छाती आवळून त्याच्याभोवती उभी राहात. त्याचा साप पाहताच मागे सरकताना पोरे एकमेकांवर कोलमडतात, एखादा धीट पोरगा नेम धरून कागदाचा बोळा सापाच्या शेपटीवर फेकतो, त्याचा पाणसाप दिसेनासा होताच पोरे भीतीने गबागबा पांगतात, पुन्हा गर्दी करतात.

'मानेवरून कोटाखाली शिरून पुढे पोटावर येणाऱ्या नागाकडे पोरे बाटल्यांच्या टोपणासारखे डोळे करून पाहत उभी राहत. मग त्या रात्री एखादे दुसरे पोरगे झोपेत किंचाळत उठे, आणि पुढच्या रविवारी दानय्याची घुंगूर असलेली काठी वाजली, त्याचा खरखरीत आवाज ऐकू आला, की बहुधा तेच पोर सर्वांत पुढे असे.'

पण तीच पोरे दानय्याने त्याच्याजवळ साप नव्हता म्हणून पूजेच्या दिवशी चिकणमातीचा साप आणताच फसल्यासारखी होतात, चिडतात, रागाने अनावर होतात. एकाने त्याचे भांडे लवंडून दिले, दुसऱ्याने पायानेच फडके हिसकले, कुणीतरी त्याची बुट्टीच उचलून दूर फेकली तेव्हा मातीच्या सापाचे तुकडे-तुकडे झाले. दानय्याची बाजू कुणीच ऐकून घेत नाही. पोरांना चेव येऊन ती दगड-काठ्या शोधू लागली. सितारामच्या सल्ल्यावरून दानय्या लगबगीने उठून चालू लागतो. तो पुजाऱ्याच्या घरापर्यंत पोचताच त्याच्यावर पहिला दगड येऊन आदळतो. झुडपात करट्यांचा वेल आढळताच पोरांचा घोळका जास्तच चेकाळतो. आणि त्या कडूजार फळांचा दानय्यावर वेगाने मारा सुरू होतो. कसाबसा दानय्या निसटतो.

'चंद्रावळ'मधील 'चंद्रावळ' आणि पदमजीच्या सब्जी नराची शर्यत पाहणारे धोंड्या आणि त्याचे लटांबर आणि आडव्या गल्लीतील पोरांचा गोतावळा, त्यांचा आरडाओरडा त्या झुंजीची रंगत अधिकच वाढवितात, तो प्रसंग डोळ्यापुढे हुबेहूब साकारण्यात या मुलांच्या गोमकाल्याचाही महत्त्वपूर्ण सहभाग आहे. पदमजीच्या शेजारी राहणारा धोंड्या पदमजीच्या सांगण्यावरून त्याचा सब्जी नर घेऊन येतो. सोबत त्याच्या गल्लीतल्या पोरांचे एक नवीन लटांबर लोंबत घेऊनच. पदमजीने सब्जी नराच्या पंखाला पुन्हा दोरा गुंडाळायला सुरवात करताच उत्सुकतेने रसरशीत भरलेल्या पोरांचे चेहेरे

उतरणे, जोड अखेर होणार हे दिसताच त्यांचे खूष होणे, त्यांची वयाला न शोभणारी उत्कट स्तब्धता, जीव ओतून चंद्रावळ आणि सब्जी नराची आकाशातील शर्यत पाहाणे, धोंड्याने पदमजीचा निरोप त्याच्या घरी पोचविण्याचे टाळणे, पदमजी पुन्हा खेकसताच धोंड्याचे वेडावाकडा चेहेरा करून उठणे, धोंड्या आणि त्याच्या गोतावळ्याचे पदमजीला दिसणार नाही अशा बेताने आडव्या भिंतीआड दडून तिथेच रेंगाळणे, उन्हाची धग कमी होताच धोंड्या व त्याच्या मित्राचे रस्त्यातच येऊन उभे राहाणे, धोंड्या व त्याच्या गोतावळीचा चेहेरा साफ पडणे तर आडव्या गल्लीतील पोरांनी आरडाओरडा सुरू करणे, चंद्रावळीने शर्यत जिंकताच सण्ण्या तर मोहरमच्या वाघाप्रमाणे एका पायावर दणादणा नाचू लागलाच पण दोन मुलांनी गणेश चतुर्थीच्या शिळ्या फटाकड्या लावणे, उतू चाललेला मुलांचा गोंधळ आणि शेवटी वर आकाशात अशुभाचे दर्शन होताच थोबाडीत मारल्याप्रमाणे पोरांचे गप्प होणे, कुजबुजत नाहीसे होणे, हे सर्व त्या उत्कट, अजोड कथेत दडलेले जिवंत, रसरशीत बालविश्व आहे.

आणि आता 'वीज'मधील मुलांची गर्दी. बळवंतमास्तरांचे वाचनवेड पलीकडल्या गल्लीपर्यंत सगळ्या पोरांनादेखील माहीत झाले होते. म्हणून तीदेखील कधीतरी एखादे साप्ताहिक वा फाटके पुस्तक बळवंत मास्तरांच्या पुढ्यात टाकून हक्काने गोष्ट सांगण्याबद्दल त्याच्या मागे लागत. 'केस विस्कटलेली, भोळसर दिसणाऱ्या चेहेऱ्यांची ही पोरे आत्ता गप्प बसली आहेत, पण नंतर तीच वात्रटपणे खिदळू लागणार' हे बळवंत मास्तर जाणून होता. बळवंत मास्तराचे आविर्भावासकट गोष्ट सांगणे अफलातून आणि ती ऐकता ऐकताच आवाज न करताच रुंद तोंडांनी मास्तराला हसणारी पोरेही इरसालच. गोष्ट ऐकत असतानाच सर्कसच्या मिरवणुकीचा बँड ऐकू येताच पोरांचे लक्ष गोष्टीवरून उडते आणि पायात वारे सुटल्याप्रमाणे ती पळत सुटतात. पायरीवर गंगी गाय बसली, की तिच्या एका बाजूने अंगावर चढून दुसऱ्या बाजूने लोळत पडणे हा पोरांचा आवडता उद्योग होता आणि तसे करताना गंगीचे मऊ मखमली कातडे थरथरले की हुळहुळल्यासारखी होऊन ती पोरे मुक्त खिंकाळत. कठडा नसलेल्या माळ्याच्या विहिरीपाशी पुष्कळदा पोरे जमिनीवर पालथी पडून आत डोकावत. हा उपद्व्याप घरी कळून ज्याचे ढुंगण चांगले सडकले गेले नाही असे एकही पोर त्या भागात नव्हते.

करेव्वाने स्वत:ला विरंगुळा व्हावा म्हणून आपल्या चुलत बहिणीचे घरी आणलेले पोर संग्या होता सात-आठ वर्षांचाच; पण मांडी मुडपून खायला बसला की, बूड अगदी न हलवता दोन भाकऱ्या रिचवत असे. काळ्या कुळकुळीत, फताड्या नाकाच्या त्या संग्याला बाजूला नेऊन बेदम चोपावे असे तिरक्याला मनापासून वाटे; कारण ते पोर आल्यापासून त्याला पुरून उरला तर तिरक्याला चहा, त्याला नको असेल तर तिरक्याच्या ताटलीत भात असे होऊ लागले होते. रात्रीच्या रात्री त्याला त्याच्या घरी पोहोचवून ये असे करेव्वाने सांगताच तिरक्याच्या मनात चीड निर्माण झाली. त्याला

वाटले, हे पोर इथे राहिले तेव्हाही त्याची कटकट होती आणि आता जातानाही ते काही सुखासुखी जात नव्हते. त्याला रस्त्यातूनच त्याच्या घराच्या वाटेला लावायचे ठरवून तिरक्या संग्याला घेऊन तरातरा निघतो. त्याला वाटते, जाईल की मग कारटे एकटेच पुढे. (वंश). 'बोट सोडून खाल्लेला प्रत्येक घास भुताला जातो' म्हणून दटावणी देताच 'भूत दाखव' म्हणून हट्ट करणारा रामकृष्ण म्हणजे प्रश्न विचारून भंडावून सोडणारा बालकांचा प्रतिनिधीच! (प्रदक्षिणा). लक्ष्मीच्या सवतीचा मुलगा श्रीपाद याच्या मनात आपल्या सावत्र आईबद्दल असलेला पराकोटीचा राग, तिरस्कार त्याच्या वागण्या-बोलण्यातून आपल्याला 'लक्ष्मी'मध्ये दिसतो. तिने बिचारीने त्याला समोर बसवून समजावून सांगण्याचा, त्याच्यावर मायेचे वस्त्र पसरण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पण त्याचा मुरडशेंगेसारखा राग कायम राहिला. ती बोलली तरच तो तेवढ्यापुरते बोलत असे. सावत्र भावंडं कृष्णी, नरसू शेजारी असल्याखेरीज त्याला जेवण जात नसे. त्यांच्यासाठी तो येताना कधीतरी जांभळे, केळे, नखाएवढी बिस्किटे आणून मोठ्या प्रेमाने त्यांना देत असे. दादांची वाटणी ते येताच तो त्यांच्या हातावर ठेवी; पण तिचा वाट्रा मात्र तो दुसऱ्या सोप्यात कुठेतरी ठेवत असे. आपल्या आईच्या साऱ्या वस्तू त्याने अत्यंत व्यवस्थितपणे कपाटात ठेवून त्याला झगझगीत कुलूप ठोकले होते. सावत्र भावंडांवर आणि वडिलांवर माया करणारा हा श्रीपाद शेवटी सावत्र आईला घराबाहेर काढतो. तर तिची स्वत:ची मुले नरसू-कृष्णी, तीही तिला दुरावली होती. सहलीला जाण्यासाठी एकदा नरसूने एक आणा मागण्याचा हट्ट केला, तेव्हा हताशपणे तिने त्याला थप्पड दिली. तेव्हापासून त्याने तिच्याकडे काही मागणे सोडून दिले. कृष्णीला एकदा गजगे हवे होते. ही माऊली घेऊन देऊ शकली नाही. काही दिवस कृष्णी खड्यांशी खेळली व मग तिने खेळणेच सोडून दिले. लक्ष्मीला वाटते, आपली मुले समजूतदार झाली नाहीत, ती वठून गेलीत.

आणि आता विनाकारण एकाएकी संपून जाणाऱ्या लंगड्या वकिलाचे एकुलते एक पोर- गोविंदा! केवळ इस्टेटीकरिता लंगड्या वकिलाने आपल्या मुलाला दत्तक दिला. 'त्या अशक्त, मळकट, वातीसारख्या पोरांना पूर्वी घालायला कपडे मिळत नसत, पण आता त्यांच्या डोक्यावर जरीची टोपी आली, गळ्यात सोन्याची जाड साखळी पडली, व शाळेला जात असता सोबत काठी घेतलेला गडी दिसू लागला. पण एक दिवस सकाळी परीक्षा होती म्हणून गड्याला न घेताच पोरगे शाळेकडे धावले आणि वाटेत हणमंताच्या देवळातच त्याच्या भाऊबंदापैकी कोणीतरी त्याला गळ्यात भोसकून आडवे केले. पुस्तक, पाटी बाजूला पडलेले. प्रेत धर्मशाळेत तीन तास बेवारशाप्रमाणे पडून होते.' तेव्हापासून लंगडा वकील गल्लीबोळातून हिंडू लागला. सोन्याच्या साखळीसाठी गोविंदाला आडवे केलेले असते दादूभटाने आणि लंगड्या वकिलाची खात्री असते की गोविंदाला संपविले शामरावने! सोन्याची साखळी अशा रीतीने गोविंदासाठी फारच

महाग पडते, त्याच्या मृत्यूचे कारण ठरते. अल मख्तूब, मख्तूब! जे लिहिले आहे, ते लिहिले आहे. त्यातून गोविंदा कसा सुटणार? (अंजन)

'एकदा नानू उंदीर मारीत होता. मारण्यासाठी त्याने काठी उगारली, तोच अकस्मात् नारायण पुढे आला आणि गुडघ्यांवर हात ठेवून ऐटीत मान बगळ्यासारखी ताणून तो उंदराकडे कुतूहलाने पाहू लागला!..... त्याच्या डोक्यावरील टपोरे टेंगूळ चार दिवस स्पष्ट दिसत होते. पण त्यापेक्षाही 'गड आला पण सिंह गेला' या चालीवर 'टेंगूळ आले, पण उंदीर गेला' असे साऱ्यांनी त्याला चिडवल्यामुळे पंधरा दिवस तो कुणाशी बोलत नव्हता! .....' हाच नारायण जैन वस्तीमागील बागेतून फुले चोरून आणताना तीर्थंकराची काळ्या पाषाणाची प्रचंड मूर्ती आपल्यामागे येऊ नये म्हणून मागे न पाहाताच एक फूल हळूच तिच्याकडे फेकायचा. आईच्या लक्षात येणार नाही अशा बेताने लोणी पळवण्यासाठी नारायणाशी झटाझट करणारी विजू 'आईच्या खोली'त कुणाचा हात धरल्याखेरीज पाऊल टाकत नसे. जर का त्या अंधाऱ्या खोलीत पाय कशाला ठेचाळला किंवा खुंटीवरील पिशवी हाताला लागली की 'आई' म्हणून किंचाळत विजू बाहेर पडत असे. त्याच विजूने एकदा आईच्या नकळत देव्हाऱ्यातील चांदीचा नाग शाळेतील मुलींना दाखविण्यासाठी दप्तरातून नेला होता. (निरोप)

हसली की डाळिंब फुटत असल्याप्रमाणे चेहेरा असणारी, कैऱ्यासाठी मीठ, मिरचीपूड मागताना अंगाशी झोंबून आपणाला स्वत:च्या वयाची करून सोडणारी जयू नाचऱ्या पावलांनी साऱ्या घरात अलगद फिरत असे. वास्तविक तिची आई पार्वती आणि तिची काकू सीताक्का यांच्यातून विस्तव जात नसे, पण आईची नजर चुकवून जयू मात्र सीताक्काच्या घरात मनसोक्त हुंदडत असे. तिला भाऊ नसल्यामुळे सीताक्काच्या प्रल्हादकडे तिचे सतत काम निघत असे. एकदा तर अर्धा तास खटपट करून प्रल्हादने तिच्या पट्ट्या सुटलेल्या वहाणांना खिळे मारून दिले होते. नाचऱ्या पावलांनी अखंड चौकशी करीत ती सीताक्काला दमवून सोडीत असे. ही खोली कुणाची, ती कुणाची असे विचारीत ती घरभर नाचत असे. सीताक्काकडून सारे ऐकत जणू बंद खोलीच्या फटीतून आतील काही दिसते का हे पाहण्याचा प्रयत्न करीत असे. हातात अबोलीची सुबक माळ पडेपर्यंत चुरुचुरू बोलत नाचऱ्या पावलांनी सीताक्काच्या भोवतीभोवती करीत असे. मात्र एकदा का हातावर पडली की तिची पाऊले बाहेर पडलीच. जयू म्हणजे एक वेडा धुमकेतू आहे असे प्रल्हाद कौतुकाने म्हणत असे. 'शेवटचे हिरवे पान'मधली ही जयू मनात रेंगाळत राहाते. याच कथेत बापलेकीमधील अकृत्रिम, उत्कट, स्वाभाविक माया फकिरा सुतार आणि त्याच्या मुलीच्या रूपाने आढळते. सीताक्का फकिरा सुताराला भेटायला येते त्यावेळी तो गुडघे मुडपून कट्ट्यावर बसला होता व नुसत्या झग्यातली, मोकळ्या केसांची त्याची मुलगी त्याच्या गळ्याभोवती दोरी टाकून तोंडाने 'च्यॅक च्यॅक' करीत होती. सीताक्काला फकिरा सांगतो, 'उड्या

मारायला म्हणून दोरी आणून दिली, तर मलाच गळ्याशी बांधून गाडीचा बैल करून टाकलं!' 'त्याने प्रेमळपणे मुलीच्या झिंज्यामधून हात फिरवला व तो तिला कोवळ्या आवाजात म्हणाला, 'तुम्ही चला आत बाईसाब, मी आलोच एवढ्यात. शहाणी बाई आमची!' मुलीला इतक्या आत्मीयतेने, आदराने वागवणारी पण खेडवळ, गावंढळ समजली जाणारी माणसे वैपुल्याने आढळतात. तर प्रोफेसर सुब्रावांकडून त्यांची मुलगी मोहिनी आणि तिची मैत्रिण सरोज हट्टाने वेणी घालून घेत. मग त्यांनी कशाबशा बांधलेल्या झिंज्या डोक्यावर नाचवत त्या साऱ्या कॉलनीतील आवारातून फुले चोरत हिंडत. खरे तर सरोजचा बंगला प्रशस्त असून दोन माळी तेथे काम करत. 'पण कुत्र्याचा डोळा चुकवून हेगडेच्या बंगल्यातून हजार मोगऱ्यांची गावरान फुले चोरून आणण्यात तिला धन्य वाटे.' ही सरोज शाळेत मुलांशी मारामारी करण्यातसुद्धा कचरत नसे. (माकडाचे काय, माणसाचे काय?). फकिरा सुतार काय आणि प्रोफेसर सुब्राव काय दोघांचीही आपल्या मुलीवर माया एकाच जातीची आहे. दोघांनाही जीवनातील मायेचा अर्थ गवसला आहे.

शाळेतून धावतच राघू घरी येतो, दप्तर फेकतो आणि घाईघाईने सदरा बदलतो. मुरलीधराच्या देवळात होणाऱ्या मुलांच्या नाटकाला त्याला जायचे असल्यामुळे त्याला खायलाही नको असते इतकी त्याची धांदल उडते. त्याची आई रमा उत्साहाने त्याला तिनेच शिवलेली हिरवी चड्डी घालायला देऊ करते, पण ती राघूला अजिबात नको असते. त्याच्या कपाळावर स्पष्ट आठी उमटते. एकदा त्याने ती वापरली होती. त्यावेळी 'हिरवा राघू, हिरवा राघू' म्हणून सर्वांनी त्याला बेजार केले होते. रमाने मोठ्या हौसेने स्वत: शिवलेल्या त्या हिरवट चड्डीला तो फटकळपणे नकार देतो. 'शी: कसला रंग आहे तिचा! ती नको, आहे तीच राहू दे मला.' वेड्या रमेला त्याच्याबरोबर देवळात जायचे असते, त्यालाही तो नकार देतो. 'नको, नको. मग मुले हसतात. अजून आईला बरोबर घेऊन येतो म्हणून बाबल्या म्हणतात.' हसून त्याचे केस गमतीने विसकटत रमा आईच्या प्रेमाने म्हणते, 'होय रे होय, तू अजून बाबल्याच आहेस मला.' निदान तिला त्याला देवळापर्यंत पोहोचवण्याची इच्छा असते पण तिचा हात झटकून तो पळून जातो. मुलांना पंख फुटू लागले, त्यांचे स्वत:चे बालविश्व निर्माण झाले की मग त्यांना अगदी प्रत्येक ठिकाणी आईची सोबत नको असते हेच खरे. (बाधा)

मधूने मोरपीस मागताच जेवण सोडून सारा बाजार धुंडाळून ताबडतोब मोरपीस आणून देणारे दादा आणि भरदुपारी मोरपीसाचा हट्ट करणारा मधू आपल्याला 'घर' या कथेत आढळतात. तेच दादा रंगपंचमीला बाहेर खुर्चीत स्वच्छ सदरा घालून बसत, शेजारी तोंड पुसायला टॉवेल घेऊन तातोबा उभा असे. तीच ती पोरे निरनिराळ्या घोळक्यांनी येऊन त्यांच्यावर बदाबदा रंग ओतत. दादा त्यांना मूठ मूठ भरून चिल्लर चहापाण्यासाठी देत. शेजारी तातोबाची गुरगुर चालू असे, पण दादांच्या मुठी तशाच

भरून वाहात. दादा आयुष्यभरच भरल्या सुपासारख्या मनाने वावरलेत. आणि अचानक भागीदारांनी हातोहात फसविल्यामुळे दादांचे सारे सारे फुंकल्याप्रमाणे नाहीसे झाले. दादांनी आत्महत्या केली तीही त्यांच्या स्वभावाला धरून. आठनऊशे फूट खाली पडणाऱ्या विक्राळ धबधब्याच्या कडेवरून त्यांनी खाली उडी घेऊन आपला मृत्यू निश्चित केला. 'मधूने नंतर हजार कामे केली. सायकली पुसल्या, मुलांना शाळेत पोचवले, छापखान्यात रात्री काम केले, मोटर स्टँडवर तिकिटे विकली. पावले झिजवीत शेजारच्या खेड्यातून लोणी गोळा करून घरोघरी विकले. छापखान्यात एकदा एक रुपया चोरल्याचा आळ आला. दुसऱ्या एका ठिकाणी 'क्षुल्लक नोकराने खाली बसू नये' असे त्याला ऐकवले गेले. आणखी एके ठिकाणी आंबून गेलेला भात तेथल्या तेथे त्याने खावा असा आग्रह धरण्यात आला, आणि त्याने नाही म्हणताच 'मस्तवाल पोर' म्हणून त्याला घराबाहेर ढकलण्यात आले.'

'नासक्या, पाणचट दुधासारख्या चेहेऱ्याला रुंद शिंपल्याप्रमाणे कान ताठ चिकटलेले, प्रमाणापेक्षा जास्त लांब, सैल हातापायांचे हे गैदी पोर तेथे काम करणाऱ्या प्रत्येकाच्या ओळखीचे होते.' हे वर्णन आहे 'गुंतवळ' मधल्या पांड्याचे. पांड्याच्या बापाचे दुकान कोणी तरी आकसाने जाळले. तेव्हा हलाखीची परिस्थिती सुधरेपर्यंत चारपाच महिने बापाने पांड्याला सदूभाऊपाशी ठेवले होते. गावाबाहेर पडण्याची पांड्याची पहिलीच वेळ असल्याने त्याचे डोळे सारखे गळत होते आणि मारुतीच्या कट्ट्यावर तर त्याने अंगच टाकले. बापाने लोण्यासारखा मऊ हात त्याच्या पाठीवरून फिरवत कशीबशी त्याची समजूत घातली. 'अरे, तुला दोन-तीन महिन्यात आणतोच की परत! तुला काय टाकून देतो? चार-पाच तारखेला पैसे पाठवतो, मग ये की कारट्या परत!.....' रात्री पांड्याला गावाकडच्या आठवणी येत आणि त्या आठवणींनी तो व्याकुळ होऊन नव्या महिन्याची वाट पाहू लागे. नवा महिना सुरू झाला की त्याच्या भाबड्या मनाचा पाय जमिनीवर ठरत नसे. असे पाच महिने गेले. पत्र म्हणताच थरथरत्या हाताने पांड्या पत्र घेतो. पण पूर्वी फक्त एकदाच आलेल्या कार्डासारखे कार्ड पाहाताच पांड्या हबकतोच. 'आजी फार आजारी होती. मी गाव सोडून मुंबईला जात आहे. तीन चार महिन्यात येऊन घेऊन जातो.' जोशी पत्र वाचून दाखवतो आणि पांड्या कोपऱ्यात अंग टाकून मुसमुसू लागतो. त्या बावळट मठ्ठ चेहेऱ्याच्या पांड्याचा खरोखरच लळा होता कोकणीला. पांड्याची मानगूट धरून त्याला आपल्याकडे वळवून ती खेकसते, 'काय रे घुबडा! काय कुणी उलथलं होय तुझं? मी जिवंत आहे की रे अजून रांजणाएवढी! तुला गिळायला तरी काही कमी पडत नाही ना? मग तोंड का झिरपतंय पोतेऱ्यासारखं?' पांड्याचे रडणे जास्तच वाढते, तेव्हा 'थू तुझ्या' म्हणत कोकणी त्याच्या बाजूलाच फतकल घालून बसते. कोकणीला पांड्याविषयी वाटणाऱ्या प्रेमात काही तरी मनमोकळे, ओबडधोबड, भळभळीत होते. ती त्याला प्रेमळपणे सढळ

हाताने भरपूर खाऊ घाली. पण दिवसभराच्या कामाने मरगळलेला पांड्या पेंगत पेंगतच भात चिवडू लागे आणि मग मात्र कोकणीच्या तोंडाचा पट्टा सुरू होई. 'खा की म्हारा! असं काय तोंड झालंय! काय तुझा बापबीप उलथलाय की काय!' 'काय गोमटं दिसतंय बघा रूप आजारी भटासारखं! प्लेगचं कोंबडंसुद्धा जास्त खातंय!' पांड्याला नवा सदरा शिवला त्या दिवशी सदूभाऊने नगारा वाजवायचाच तेवढा बाकी ठेवला. त्या दिवशी त्याने पांड्याला चारपाच मैलातील साऱ्या झोपड्यांतून फिरवून आणले. येणाऱ्या-जाणाऱ्याला पांड्याचा नवा सदरा दाखवून स्वत:च्या आतड्याची, कनवाळूपणाची ग्वाही दिली आणि रात्री पांड्याने चहा पिताना थोडासा चहा सांडताच सदूभाऊने त्याच्या पाठीत असा रपाटा हाणला की दोन दिवस पाठीवर पाची बोटे मोजून घ्यावीत. पांड्याचे दु:ख अंत:करणात खोलवर जाणवल्यावाचून राहात नाही.

'भोवरे' ही कथा म्हणजे मायेची जीवघेणी गुंतवळच! बहिणीची भावावरील, भावाची बहिणीवरील, वडिलांची मुलीवरील आणि मामाची भाच्यावरील माया. या कथेत आजकाल दुर्मिळ बनत चाललेल्या मायेचे महावस्त्र आपल्यापुढे उलगडत जाते. या कथेतील 'नमूताई' म्हणजे त्यागाचा गौरीशंकर. जी.एं.ची एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा!

अंगावर झुरळ टाकले म्हणून किंचाळत 'माकडगोप्या, तुझी हाडं सैल करते थांब' म्हणत हातात लाकूड घेऊन मागे लागलेली नमूताई. एकदा आपण दुपारी झोपलो असताना तिने दोन भेंड्या सुतळीत अडकवून ती माळ आपल्या गळ्यांत घातली व शेंडीला एक लहानसे वाळलेले हिरवे केळे बांधले. मग आपण जागे झाल्यावर डोळे किंचित बारीक करीत, पूर्ण उतू गेल्याप्रमाणे अनिर्बंध हसणारी, दत्तू-मालतीबरोबरच नाचत, टाळी वाजवीत गाणे म्हणणारी नमूताई..... 'माकडगोपाळ, शेंडीबाळं, गळ्यात भेंडी, डोक्यात केळ.....' हे नमूताईचे अल्लड, उधाण आलेले बालपण!

वडिलांना हळूहळू दुरावत जाणारी मंगल आणि तिच्या वडिलांचे, गोपाळचे तिच्यासाठी असहायपणे तीळतीळ तुटणे इथेच आपल्याला दिसते आणि गोपाळमंगलमध्ये निर्माण होत जाणाऱ्या दुराव्याबद्दल आपल्याला हळहळ वाटू लागते. मंगल पूर्वीप्रमाणे गोपाळकडे धावत येत नसली तरी ती समोरच कुठेतरी वावरत असे. कधी लहरीत असली की आईबद्दल एखादी तक्रार सांगे, किंवा एखादी गोष्ट आणून देणार की नाही असे निर्वाणीने विचारत असे. मंगलने मागितलेल्या वस्तूबद्दल दिवस ढकलणे आणि मग कधीतरी स्वस्तातली वस्तू आणून देऊन वेळ भागविणे हा प्रकार तर नित्याचाच झाला होता. तिला सुमतीप्रमाणे कातडी पिशवी हवी होती, पण ती महाग म्हणून गोपाळने फुलाफुलांची सुरेख कापडी पिशवी मंगलला आणून दिली. ती पोर रागावून दिवसभर जेवली नाही आणि नंतर हट्टाने आपली जुनी, फाटकीच पिशवी वापरीत राहिली.

मंगलला लाल बूट हवे होते. गोपाळने पुन्हा साध्या वहाणाच आणून दिल्या. मंगलचा राग वाढतच गेला. तिच्या मनात कुठेतरी एक एक गाठ पडत गेली. कार्यक्रमात भाग घेण्याकरिता मंगलला निळा कमरपट्टा असलेला नवा पांढरा झगा हवा होता आणि तो नसेल तर शाळेतही येऊ नकोस असं बजावलं होतं. बिचारी शाळेत कार्यक्रम असूनही घरीच राहिली. डोणीच्या दगडावर एवढेसे तोंड करून बसली. गोपाळला पाहाताच तिने फुरंगटून त्याच्याकडे पाठ फिरविली. मग गोपाळने तिला कुरवाळले आणि उचलून घेतले. मग मात्र निमूटपणे ती आली पण कार्यक्रमाचा उल्लेख ऐकताच तिच्या डोळ्यातून गंगा-यमुना सुरू झाल्या. सगळे कळल्यावर गोपाळ वरमतो, आकसतो. वास्तविक बरेच दिवस स्वत:साठी ठेवलेले रेशमी कापड त्याने झग्यासाठी मंगलला देऊन टाकले होते. तेव्हा तो विषय संपला अशी त्याची समजूत होती. मंगलने 'पेन हवे' म्हणताच खिशातील पेन तिला कायमचे देऊन टाकणारा गोपाळ! त्याने तिला छत्री आणून दिली, 'ट्रिपला जाते' म्हणताच उसने पाच रुपये आणून ताबडतोब तिची व्यवस्था केली. आणि एका महिन्यात हे सारे घडले. गोपाळ तरी काय करणार? मंगलचे दुरावत जाणेही स्वाभाविकच होते. गोपाळ मंगलची समजूत घालण्याकरिता नवी आश्वासने देऊ लागतो. मंगल मध्येच तोडून म्हणते, 'माहीत आहे सगळं 'आणतो आणतो' म्हणता, आणि मला काही आणीतच नाही. सारं काही आणता ते माधवसाठी, आणि ते सगळं पडून राहतं!' नमूताई आणि माधवची जबाबदारी जर गोपाळने झटकून टाकली असती, तर शांतू-मंगलच्या सर्व हौसमजा व्यवस्थित भागल्या असत्या; हे शांतूचे वारंवार सुचविणे बरोबरच होते, पण गोपाळचे आतडे त्याला तसे करू देत नव्हते आणि बोटांतून वाळू सतत सरसर झरत जावी त्याप्रमाणे मंगलचे बालपण संपत होते. शेवटी आईबरोबर आजोळी जाताना एक शब्दही वडिलांशी न बोलता त्यांचे पेन ती त्यांच्या कोटाच्या खिशाला अडकवून जाते. रात्री ते गोपाळच्या लक्षात येते व त्याला प्रश्न पडतो, 'हा झिडकार आहे की कोवळी माया आहे?'

बिचारा माधव! शाळेतच त्याला ताप भरतो. नमूताईला निरोप मिळताच ती त्याला खांद्यावर टाकून घेऊन येते. दीड दोन महिने अंथरुणाला खिळल्यावर त्याचा ताप जातो, पण तापातच त्याच्या पायांवरून वारे गेले व जीभही वाकडी झाली. त्याला कोणाचा आधार घेतल्याशिवाय बसणेही मुष्कील झाले. तेव्हापासून बिचारा अंथरुणालाच सपाट चिकटला. पुष्कळदा गोपाळमामा जवळ गेला की तो त्याला मिठी मारून काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत असे, पण गोपाळला त्याचा एक शब्ददेखील कधी समजला नाही. काय सांगायचे, मागायचे होते माधवला? वेड्या नमूताईची मात्र सारी आशा पांगळ्या माधवमध्ये अडकून पडली होती. माधवकरता काही नवीन वस्तू आणली की तो थोडा हसायचा, आसक्तीने त्या वस्तूवरून हात फिरवायचा आणि मग झटकन कुशीवर वळून डोळे झाकून पडायचा. पुढे पुढे तर माधव डोळे न उघडताच

नुसती मान हलवायचा. ही जाणीव फारच जहरी. माधवला सगळे कळून चुकले होते का? इतक्या लहान वयात?

सखाराम पाटील आणि विठी जोगतीण यांच्या गुप्त संबंधातून जन्माला आलेली अनौरस मुलगी 'अमाशी' गावकऱ्यांच्या सामुदायिक शिकारीला बळी पडते. 'बळी' जाते आणि विनाकारण बळी जाणाऱ्या अमाशीबद्दल आपल्या मनात कुठेतरी हळहळ निर्माण होते. बेडकीला बेलफळाचा डिंक लावून रंगीत कागद लावून सजवणारी अमाशी, बेडकीचा पाय सुतळीने बुट्टीला बांधून ठेवणारी अमाशी, बेडकीची सुटण्याची व्यर्थ धडपड पाहून खिदळणारी अमाशी, घुंगूर बांधलेला पाय जमिनीवर आपटून गळ्यातील कवड्यांच्या माळेतील एक कवडी आनंदाने चोखणारी अमाशी!

अमावश्येला जन्माला आलेल्या विठी जोगतीणीच्या या कारटीला महारमांग सुद्धा एक शिवी हासडूनच अमाशी म्हणत, म्हणून तिचे नावच पडले 'अमाशी'! ती वीतभर असल्यापासून सखारामने तिला वाढवले, पण ती वाड्याच्या वळचणीलाच असे. पाटलिणीने डागण्यासाठी लालभडक पळी दाखविल्यापासून वाड्यात तिने पाऊल टाकले नव्हते. ती गावात दिसली की रामोश्यांची घाणेरडी मुले तिला दगड मारत, सत्त्या कुंभार पच्चकन तिच्या अंगावर थुंकायचा, कुलंगी कुत्री तिच्या मागे लागत, कारण गावकऱ्यांच्या दृष्टीने ती अपशकुनी ठरली होती; म्हणून तीही कुणी बरोबर असल्याखेरीज गावात जात नसे. अमाशी मात्र सगळ्यांकडे पाहून हसे, एकाच पायात चाळ बांधून नाचून नाचून इतरांना हसवे.

कुंभाराच्या चंद्रीच्या अंगात देवी संचारली आणि हलग्यांच्या आवाजात गावकरी पाटलाकडे आले. अमाशी पटकन बुट्टी उचलून पाटलाकडे आधारासाठी धावली. देवळाच्या अंगणात छाती बडवत चंद्री घुमत होती. चंद्री बळी मागते. 'मला माणूस पाहिजे, रगत पाहिजे, नाहीतर सत्त्यानाश करीन. गाव खाऊन टाकीन आसक.' प्रथम गावकरी सबुरीने घेतात, नंतर चेकाळतात. 'जे मेल्याने कोणाचाही डोळा ओलावणार नाही, असले कुठले मांणूस चांदगावात आहे' तेच सखाराम पाटलाला कळेना. चिडून तो विचारतो, 'काय सर्व्यांचीच तोंड गेली काय लडदूंनो, बोला की! का मीच जाऊ आनी मान कापून घेऊ हणमंतभावीत?' सर्व गावकऱ्यांच्या वतीनं गुडगुडगंगाई अमाशीचीं मागणी करते. सखाराम पाटील उभा पेटतो, बेभान होतो. त्याची सर्व ताकद पणाला लावून तो अमाशीचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतो. शेवटी अमाशीच्या जीवावर उठलेली पाटलीणही गावकऱ्यांना सामील होते आणि पाठीत दणकन् लाथ बसल्याप्रमाणे सखाराम खाली बसतो. पाटलिणीने टाकलेला डाव सफल होतो. तिने खूण करताच गंगाई, सत्त्या कुंभार अमाशीवर तुटून पडतात. हलग्यांच्या आवाजात अमाशीला घेऊन झिंगलेले गावकरी अर्धवट अंधारातच भुताप्रमाणे गडाकडे सरकू लागतात.

अमाशी मांजराप्रमाणे ओरडत असते. काय चालले आहे हेच बिचारीच्या

आकलनापलीकडचे असते. त्या तशाही अवस्थेत तिच्या हाताला चिकटलेल्या, बोटांनी न धरताही हाताला घट्ट चिकटून राहाणाऱ्या बेलफळाची तिला गंमत वाटते. थोड्या थोड्या वेळाने ती तो चमत्कार पाहाते.

गंगाई मूठभर कुंकू अमाशीच्या झिंज्यावर उधळते. तिच्या नाका-डोळ्यांवरून कुंकू फासते. सत्त्या दरादरा ओढत तिला विहिरीच्या कमानीतल्या कोनाड्यात ढकलतो, ती चित्कारत असतानाच सारा जमाव अनेकमुखी शिकारी बनतो. पाटलिणीने भिरकावलेला पहिला दगड तिच्या गुडघ्याला लागतो. वेदनेने ओरडतच अमाशी एका पायावर नाचू लागते. मुले खिस्सदिशी हसतात. मग दगडांचा पाऊसच सुरू होतो आणि अमाशी धाडकन तोंडावर पडते. थोड्या वेळाने तिची हालचाल थांबते..... गावकरी गड उतरत असतानाच उघड्याबोडक्या, अनवाणी पावलांनी येणाऱ्या सखारामाची आणि त्यांची गाठ दरवाज्यात पडते. झपाटल्याप्रमाणे सखाराम अमाशीकडे धाव घेतो. दगड बाजूला करून अमाशीला उचलून त्याने तिचा चेहेरा आपल्याकडे वळवला. 'फुकट आलं जन्माला लांडरू, फुकट मरून गेलं' सखाराम पुटपुटतो. सखारामच्या जीवनातील घुंगूर-आवाजाची वेदना बधिर होऊन संपून जाते. हीही नियतीचीच अतर्क्य लीला!

वेडसर, क्रूर राक्षसी प्रवृत्तीची गुणी 'राक्षस'मध्ये दिसते आणि एक सत्य जाणवून जाते. जी.एं.चा लहान मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोण अत्यंत वास्तववादी आहे. सैतानी प्रवृत्ती आपल्या मनातच दडलेल्या असतात. त्यावर नियंत्रण ठेवण्याचा आपला सतत प्रयत्न चालला असतो. ह्या विकृती जशा मोठ्या माणसात असतात तशाच त्या छोट्या मुलांमुलींमध्येही आढळतात. सर्व प्रकारच्या मुलांमुलींचा प्रत्यक्ष सहवास लाभला तर अनुभवाने लक्षात येते; लहान मुले आणि मोठी माणसे यांतील आदिम प्रवृत्ती, स्खलनशीलता सारखीच असते. विल्यम जेराल्ड गोल्डिंग यांच्या 'लॉर्ड ऑफ दी फ्लाईज'चा अनुवाद जी.एं.नीच का केला हेही गूढ सहज उकलून जाते. या नोबेल पारितोषिक विजेत्या ब्रिटिश कादंबरीकाराने अनुभवलेले बालविश्व आणि जी. एं.नी अनुभवलेले बालविश्व एकच आहे, वास्तववादी आहे. सद्या, मारत्या, सुताराचा निंगा, नाऱ्या, नामू, करेव्वा आणि गुणी! जी. एं.नी रेखाटलेल्या बालविश्वातील विकृत मनोवृत्तीचे पण वास्तववादी प्रकृतीचे हे प्रतिनिधी!

काळ्या मांजरावरून मोटार गेल्यामुळे ते फुटून मेले हे दहाजणांनी तरी पाहिले असेल; पण गुणी त्या मांजराला आपणच मारले, त्याचे पाय तोडले, असे सांगत काड्याच्या पेटीत ठेवलेला त्याचा डोळा दाखवित हिंडत होती. अशी ही अभंड बोलणारी कार्टी! एकदा गुणीने केसुरकिड्यात मोठा काटा टोचला व ती त्याचे आनंदाने निरीक्षण करू लागली. बिचारा किडा मागचे पुढचे भाग हलवू लागला आणि ते पाहून गुणीला हसू फुटले. तिने त्या काट्यावर आणखी तीन चार किडे टोचले. थोड्याच वेळात ते सर्व एकाच लयबद्ध पद्धतीने हलू लागले आणि गुणी चौथऱ्यावर लोळत खिदळत

राहिली. कुठून तरी एक झुरळ आणून गुणी लाल मुंग्यांपुढे टाकते. मुंग्या झोंबताच झुरळ आपले काटेरी पाय झडझडत होते. चुकून ते सरळ झाले तर गुणी त्याला पुन्हा पालथे करीत होती. झुरळाला होणाऱ्या वेदनेत आनंद शोधणारी ही गुणी! काही वेळाने झुरळाचा फक्त एक तुकडा आणि दोन काटेरी पाय शिल्लक राहिले. चार पाच मुंग्या तो उरलेला भाग नेटाने ओढीत होत्या. तेव्हा रागावलेल्या गुणीने तो तुकडा व मुंग्या पायाने चिरडून टाकल्या. गोरीत तिला एक गोगलगाय दिसते. गुणी एका काटकीने तिला स्पर्श करते, तर स्वाभाविकच ती शिंगे आत घेऊन शिंपल्यात नाहीशी होते. गुणी तो शिंपला ढकलत दुसऱ्या गोगलगाईपाशी आणते व त्यांच्या भांडणाची वाट पाहते. गुणी बराच वेळ त्यांना डिवचून पाहाते, पण भांडण होत नाही. गुणी चिडते आणि दगडाने ते दोन्ही शिंपले ठेचून त्यांचा अगदी लगदा करते. गोरीतील थडग्यांमधून तासन् तास मुक्तपणे हिंडणारी ही गुणी! त्या स्मशानाचा कोपरा न् कोपरा तिला ठाऊक होता आणि ती जागा निदान दिवसा तरी तिला घरासारखी वाटत असे. तिथेच तिला तो बुटावर छडी आपटणारा क्रूर, विकृत माणूस दिसतो, हाही तिचा मनोव्यापारच. तो तिला दगडाखालचा साप दाखवतो. त्याला एकाच छडीत मारून दाखवतो व छडीवरून मेलेला साप उचलून तो भिरकावून देतो. नंतर गुणीच्या अंगावर वस्सकन आलेल्या कुत्र्याच्या नाकावर तो जोरात छडी हाणतो. ते कुत्रे आडवेच होते व अंग झटकू लागते. नंतर कुत्र्याच्या जबड्याखालच्या भागात सुरीचे पाते खुपसून तो थोडे वळवतो व सर्रकन ते काढून घेतो. रक्ताचा पट्टा बाहेर येतो. नंतर तो गुणीच्या हातात सुरी देऊन ती चालविण्याचे जणू प्रशिक्षणच तिला देतो. गुणीमध्ये नवा आत्मविश्वास जागृत होतो. तिला ती सुरी हवी असते, अगदी मनातून हवी असते. योग्य वेळी तुला ती मिळेलच असे सांगून तो माणूस गुणीचा निरोप घेतो.

सकाळीच शंकरूने– तिच्या आजोबानेच– तिला घट्ट पकडून डागले होते. अगदी कात्रीचे पाते काळवंडल्यावरच त्याने तिला सोडले होते. पण मोकळी होताच गुणीने काडकन त्याचे बोट चावले. शंकरू उडालाच. गुणीच्या हाडक्या चेहेऱ्यावर प्रहार करून तो खेकसला, 'आणि हे बघ, आजपासून उलथ कुठं तरी! मी आल्यावर जर तू दिसलीस इथं तर कातडी सोलून काढीन.' गुणी घरी आली तेव्हा शंकरू उघडाबंब खाटेवर घोरत होता. गुणी हलक्या पावलांनी घरात वावरते, भाकरी ओच्यात घेते, जाजम व चादर दारात नेऊन ठेवते. शंकरूचा गळ्याखाली थरथरणारा भाग, त्याचे मोकळे पोट पाहून तिच्या हातावरील आग जागी होते. ती कपाटावरील कात्री तिच्या हातात येते. कात्रीत तिला सुरीचा भास होतो आणि शांतपणे स्थिर हाताने गुणी शंकरूच्या गळ्याखालच्या थरथरणाऱ्या भागात कात्री खुपसते. पोटात तीन चार ठिकाणी कात्री खुपसून ती वर्तुळे वळवते. कात्री खाटेवरच टाकून थोड्या वेळाने ती शांतपणे देवळाच्या कट्ट्यावर झोपी जाते.

रस्त्यात येसूबाईला गुणी अगदी सहजपणे तिने शंकरूचा खून कसा केला ते सांगते. फरक इतकाच की गुणी कात्रीऐवजी सोन्याचा चौकोन असलेल्या सुरीची गोष्ट करीत होती. येसूबाईने तिला गप्प राहाण्याबद्दल बजावले. येसूबाईही तिला हिडीसफिडीसच करत असे. येसूबाईच्या सांगण्याकडे गुणीचे लक्षच नव्हते; कारण येसूबाईच्या अगदी मागे तो माणूस येसूबाईवर सावली टाकत उभा होता. स्थिर नजरेने पाहाताच गुणी येसूबाईच्या घरात शिरते. म्हणजे शंकरूनंतर गुणीला नेहेमी हिडीसफिडीस करणाऱ्या येसूबाईचा नंबर असतो. आणि सोन्याचा चौकोन असणारी, लाल खडे बसवलेली सुरी हाती येईपर्यंत वाट पाहाण्याची तयारी गुणीची असते. योग्यवेळी गुणीचा तो माणूस तिच्या हातात सुरी पडेल अशी व्यवस्था करणार असतो. अशी वेडी, विकृत, क्रूर गुणी!

'वंश' मधील करेव्वाही लहानपणी अशीच क्रूरपणे वागे. वीरभद्राच्या तळ्याकाठी ओबडधोबड बेडक्यांवर काठीचा नेमका फटकारा मारून त्यांना संपविण्यात करेव्वाला अजब आनंद मिळे. कारण फुटताना होणारा त्यांचा फिसक असा आवाज ऐकला की तिच्या अंगातून आनंदाची लहर थरथरे. एकदा केवळ गंमत म्हणून करेव्वाने पाटलाच्या गवतगंजीस आग लावल्यामुळे दोन बैल तडफडून जळाले होते. अशी ही गुणी करेव्वा!

आणि आता जी.एं.च्या बालविश्वात शेवटी अपरिहार्यपणे त्यांचा लोभसवाणा 'मी'! जी.एं.चे बालपण प्रामुख्याने प्रकट होते 'तुती', 'कैरी' आणि 'राधी' ह्या कथांतून! ह्या तीनही कथांचा निवेदक आहे एक लहान मुलगा, 'मी'! 'तुती' आणि 'कैरी' ह्या कथा तशा स्वतंत्र कथा आहेत. पण त्या जर लागोपाठ वाचल्यात तर लगेच जाणवते एकाच कुटुंबाची ही कथा आहे. 'तुती'चा पुढचा भाग म्हणजे 'कैरी'.

माळ्यावर पतंग उडविणारा, आतून आई ओरडली, 'कारट्या, उतर तेथून खाली, नाहीतर आणशील सारं घर डोक्यावर!' की माळ्यावरच अंग चोरून गप्प उभा राहणारा. पतंग नसेल त्यावेळी माळ्यावर जमलेल्या कबूतरांकडे पाहात वेळ घालविणारा असा हा चिमुरडा 'मी' आहे. शेवग्याच्या झाडावरचे डिंकाचे पांढरे तांबडे गोळे गोळा करून त्याच्या लहान गोळ्या शाळेतील मुलांच्या पाठीला चिकटविणारा. पेन्सिल, मोराचे पीस यांच्याबरोबर गोळ्यांची देवाणघेवाण करणारा असा हा 'मी'. 'तुती थोडी कच्चीच असावी. म्हणजे अगदी कच्ची नव्हे तर थोडी पिकलेली, अगदी पिकलेली नव्हे, तर थोडी कच्ची म्हणजे गोडही लागते आणि आंबटही लागते. जीभ रवरवते, आणि गोडही लागते. मग तुती बराच वेळ ध्यानात राहाते.' हे सांगणारा 'मी'. आईने वड्यांचा डबा आज नेऊन ठेवायला सांगितल्यावर गुपचुप त्यातील दोन वड्या खाणारा साळसूद 'मी'. सुम्मीच्या लग्नासाठी गेल्यावर सारा वेळ विहिरीचे चक्र फिरविणारा, चिखलात पाय घसरून पडणारा, कपडे मळविणारा आणि दुसरे चांगले कपडेच नसल्यामुळे वरातीत मळक्या कपड्यांनीच जाणारा. निघताना आठवणीने

शेवटचे चक्र फिरवून घेणारा हा बालसुलभ प्रवृत्तींचा 'मी!'

'सुम्मी माझी लहान आई होती' हे तो सांगतो तेव्हा कंठ दाटून येतो. सुम्मी आणि 'मी' चे भावविश्व जी.एं.नी अत्यंत गहिरे, कोमल, लोभसवाणे रेखाटले आहे. ज्यांच्या वाट्याला ही माया येते, ते खरोखर भाग्यवान म्हटले पाहिजेत. आईने धपाटा दिल्यावर रुसून बसलेल्या 'मी'चा सगळा पारा सुम्मीचा हात पाठीवरून फिरताच उतरत असे आणि ती हसली की मग संपलेच. त्याला एकदम वाटू लागे, 'मारले तर मारले आईने. अंग काही फाटले नाही. निदान गुळाचा खडा तरी मिळाला की नाही खायला! परसातील तुतीच्या झाडावरील तुती पिकू लागल्यावर पाच सहा दिवसातच 'मी' व सुम्मी सारे झाड स्वच्छ रिकामे करून ठेवत. 'आईला सांगितलंस तर मग तुझ्या मानेवर तीन झुरळं टाकते' म्हणून सुम्मी कथानायकाला गप्प करीत असे. बाहेरच्या खोलीतील 'ब्रह्मा'ला 'मी' घाबरतो म्हणून हसणारी सुम्मी त्या खोलीत काही कामानिमित्त जावयाचे असले की, 'तुला चिंच देते हं, तुला गुळाचा खडा देते हं' अशी लाडीगोडी लावून कथानायकाला आत न्यायची व नंतर अनेकदा काही न देता उलट भित्री भागूबाई म्हणत हात नाचवत त्यालाच चिडवायची. सुम्मीच्या लग्नावरून दादा आणि नानांचे भांडण होते. अंगावरच्या धोतरानिशी दादा घरातून निघून जातो. त्या दिवशी कुणीच जेवत नाही पण छोट्या कथानायकाला मात्र भूक लागायची ती लागतेच. तो हळूच सुम्मीला विचारतो, 'सुम्मी, आज जेवण नाही, होय? मला तर फार भूक लागली आहे.' आईने त्याला एकट्यालाच वाढले. तो जेवला, पण आईने दुपारची उरलेली बटाट्याची भाजी वाढली नाही, आणि भाताला ताक वाढायचे ती विसरली, ही रुखरुख त्याला लागली. किती स्वाभाविक आहे हे त्याचे वाटणे. सुम्मीच्या अंगावर तो हळूच चादर घालतो, तेव्हा आवाज न करता त्याचा हात गच्च धरून ती रडून घेते. लग्नात नव्या लुगड्यातील सुम्मी कथानायकाला फार फार आवडते. तो सांगतो, 'तिच्या अंगाला नव्या कपड्यांचा वास होता, तिच्या नव्या बांगड्यांचा आवाज फार सुरेख होत होता आणि ती सगळीच नव्या समईप्रमाणे चमकत होती.' सुम्मीच्या अपघाती मृत्यूची बातमी कळल्यावर सुम्मीच्या आठवणी कथानायकाच्या मनात दाटून येतात. 'मला फार भूक लागली होती, पण एकदम वाटले, जेवण नको, काही नको कोपऱ्यात जाऊन एकीकडे बसावे व रडावे. सुम्मी माझी लहान आई होती. 'कासव दाखवताना विहीर काय गिळतेय की काय तुला', असे ती म्हणाली होती!'

दादा घर सोडून गेला. सुम्मी विहिरीत पडून मेली. नानांनी अंथरुण धरले. साऱ्या घराचा भार आईवर पडला. तिने सुम्मीचा कथानायकाला वापरायला दिलेला रग काढून घेतला. दादाची गादी गुंडाळून ठेवली व एका चादरीला आपले लुगडे शिवून ती रजई तिने कथानायकाला दिली. कथानायक म्हणतो, 'ती देखील छान होती. शिवाय तिच्यात मला आईजवळ झोपल्यासारखे वाटे. कारण तिला आईचा वास होता.' आई त्याला

लवकर उठवायची. आंघोळ झाल्यावर बारा नमस्कार घालून घ्यायची. मोजताना चुकणेदेखील शक्य नव्हते. कारण सगळे नमस्कार घालून होईपर्यंत आई समोर पोलिसासारखी उभी असे. जांभेकरांकडे कथानायक पोळी मागतो ही गोष्ट त्या माऊलीला लागते. स्वत: सामान विकत आणून ती खायला खूप काही करते. झोपलेल्या कथानायकाला ती उठवते. तोंड धुवून यायला सांगते. ती 'कारट्या' म्हणाली नाही म्हणून तो घाबरतो. 'जांभेकरांनी पोळ्या दिल्या?' काड्कन् त्याच्या मुस्कटात देऊन ती माऊली बजावते, 'कारट्या, आजपासून लक्षात ठेव, तू भिकारड्याचा मुलगा नाहीस. असं लोकांच्या घरी खायला मागशील तर जीभ डागून देईन. माझे हातपाय उरावर आले नाहीत अजून. असलं भिकारड्यासारखं जगायला शिकू नको. खा, गीळ ती पोळी, ती आपलीच आहे.' पहिलीचा निकाल लागल्यावर आई कथानायकाला घट्ट जवळ घेते. ती किती बदलून गेली आहे हे तेव्हा त्याला जवळून जाणवते. ती पुढे म्हणते, 'कारट्या, तू बी.ए. हो अगर होऊ नकोस, पण आतून-बाहेरून मात्र अगदी दगड हो! अगदी घट्ट, डोंगरी दगड हो बघ!' 'कैरी'त याच कथानायकाचे पुढचे बालपण पाहावयास मिळते. 'आई'चाही मृत्यू होतो आणि श्रीपूमामा मग त्याला तानीमावशीकडे आणून पोचवतो. दिवाळीत येऊन भेटण्याचे आश्वासन देऊन त्याच दिवशी अनवाणी पावलांनी माघारी जातो. कथानायकाने केव्हातरी मागे त्याला भोवरा मागितला असतो हे लक्षात ठेवून तो प्रेमळ, गरीब मामा आठवणीने एक नवा करकरीत रंगीत भोवरा व जाळी बॅगेत तळाशी ठेवायला विसरलेला नसतो. श्रीपूमामा गेल्यावर कथानायक बॅग उघडतो. बॅग श्रीपूमामानेच भरली होती. तळाशी भोवरा पाहिल्यावर कथानायकाला जसा आनंद होतो, तसाच जी. एं.च्या वाचकांनाही होतो. कारण ह्या अर्थशून्य मानवी जीवनात एवढाच एक जगण्यालायक अर्थ आहे - मायेचा आणि तोही दुर्मिळ!

शाळेत कथानायकाचा स्वच्छ सदरा पोतेऱ्यासारखे मळकट कपडे घालणाऱ्या निंगूला पाहवत नाही, म्हणून दौतीचे ओले बूच तो कथानायकाच्या पाठीवर दाबतो. ढबू पैशाएवढा डाग सदऱ्यावर उमटून शाई अंगाला लागली. कथानायक चिडतो व निंगूची दौत त्याच्या अंगावर रिकामी करतो. दांडग्या मोहज्जनच्या अंगावर कथानायकाला बळवंत ढकलतो. मोहज्जनचे पाऊल तुडवले जाते. संतापून तो काडकन मुस्कटात देतो. चूक नसताना मार का खायचा, म्हणून चिडलेल्या कथानायकाने डोके खाली घालून धावत जाऊन मोहज्जनच्या पोटात असे आदळले की तो खाली पडून धापा टाकू लागलो. 'अरे तू पोरगा आहेस की बोकड आहेस? ... पण तू पोरगा मात्र पक्का आहेस बघ. चल आपण दोस्त झालो. तुला कुणी पुन्हा ढकललं तर सांग, त्याची पन्नीच करतो. पकड त्या डुकऱ्या बळवंताला.' पण कथानायक तिथे थांबला नाही. दप्तर घेऊन तो जो पळत सुटला, तो अंगणात येऊनच थांबला. सदऱ्यावरचा शाईचा डाग

धुतल्यावरही न गेल्यामुळे, नवीन शिवायला पैसे नसल्यामुळे तानीमावशी रात्री जागून मिणमिण प्रकाशात त्या डाग पडलेल्या जागी एक रंगीत फुलपाखरू शिवून देते. शाळेत मुले पाठीवरचे ते फुलपाखरू पकडण्याचा प्रयत्न करतात, पण ते चित्रातले आहे हे कळताच खुळ्यासारखी बघत राहतात. तसले फुलपाखरू आणून दे म्हणून कथानायकाच्या मागे लागतात. त्यानंतर मोहज्जनने सदऱ्यावर पुढच्या बाजूस झाडाचे मोठे चित्र असलेला तुकडा लावला. चिंतामणीने एक फूल बिल्ल्याप्रमाणे खिशावर शिवून घेतले. 'पण खरी कमाल बळवंतने केली. त्याला फूल, झाड असले काहीच मिळाले नाही. पण त्याच्या गंजीफ्राकवर वाघाचे चित्र होते. तेव्हा तो एक दिवस नुसता गंजीफ्राकच घालून शाळेत आला. तेव्हा देशपांडे मास्तर छडी घेऊन त्याच्यामागे लागले. त्यावेळी बळवंत वाघ इकडे तिकडे पळू लागलेला पाहताच आम्ही हसून हसून बेजार झालो.' (जी. एं.च्या नर्म विनोदाचा हा नमुना.) वर्गातील मुलांना हसविण्यासाठी कथानायक वाचतो, 'पान सात धडा तिसरा. झासीची राणी लक्षुंबाई फार शानी आणि सूर होती, प प परंतु' मुले अपेक्षेप्रमाणे हसली, पण जाधव मास्तरांनी शांतपणे कथानायकाला थांबवून घेतले, आतड्याने बोलले, '....आणि मी तोतरा आहे, हे काय मी मुद्दाम देवाजवळून मागून आलो होय? आणि हे बघ मी फार शहाणा आहे असं मी म्हणत नाही, इथल्या इथं माझ्यापेक्षा शहाणी खंडीभर माणसं आहेत. मला येतं तेवढं शीक. तेवढं झालं की दुसऱ्या जास्त शहाण्या माणसाकडे जा. अरे, तू माझ्यापेक्षा जास्त शहाणा झालास, तर मला काय वाईट वाटेल होय?' कथानायकाला रडू आवरले नाही. जाधव मास्तरांच्या हातात छडी नव्हती. त्यांनी रागाने शिव्या दिल्या नव्हत्या. पण त्याच्या डोळ्यात पाणी आवरेना. जी. एं.चे शालेय जीवन कसे गेले असावे, याची कल्पना 'कैरी'त आपल्याला येते.

मग त्याला परत श्रीपूमामाकडे पाठवायचा निर्णय तानीमावशी घेते. घसाघसा तेल लावून अंग हाडे सैल होईपर्यंत त्याला न्हाऊ घालते. तिने घाईघाईने भात शिजवला. त्यावर मुद्दाम मेतकूट टाकले व लहान लहान घास भरवून त्याला जेवू घातले. स्टँडवर ती त्याला चिकटून बसली. मग एकदम जोराने तिने त्याला कुरवाळले. तिने त्याला मोटारीत ढकलले. तिकीट काढून दिले. दोन आण्याचे एक नाणे त्याच्या खिशात टाकून पुन्हा एकदा त्याच्या तोंडावरून तिने हात फिरवला. मग मात्र ती सैल अंगाने जळत्या वाळूत तशीच उभी राहून ओलसर डोळ्यांनी त्याच्याकडे पाहात राहिली. मोटार सुरू झाली तेव्हा ती खाली बसली आणि रडू लागली. जी. एं.ची 'काजळ माया'ची अर्पणपत्रिका इथे आठवते.

'सोनुमावशीस

तू आम्हाला आणखी एक आई होतीस.'

भरल्या वांग्याची भाजी आवडते म्हणून वारंवार वांगी आणणारे नाना आणि

घरात इतर भाजी असली तरी नानांसाठी वांग्याचीच भाजी करणारी आई. कृष्णीसाठी आठवणीने पाच पेंढ्या गवत आणणारे नाना. आणि त्यांच्या आजाराचे कसे कुणास ठाऊक समजणारी कृष्णी गाय. डोळ्यांतून पाणी पाझरवत मूकपणे नानांच्या आधी संपून गेलेली कृष्णी गाय. रागवला म्हणजे नानांसारखा दिसणारा दादा, तर आई हसली की सुम्मीसारखी दिसे. दादा-सुम्मीची प्रेमळ भांडणं. दादाचे सुम्मीसाठी तीळतीळ तुटणे, कथानायकासाठी तर सुम्मी म्हणजे त्याला लहान आईच असणे. सुम्मीचे इरसाल सासर आणि विहिरीत पडून तिचा झालेला अपघाती मृत्यू; नव्हे सासरच्यांनी पाडलेला तिचा खून. नानांचे आजारपण. चुकून त्यांचे 'सुम्मा' म्हणून हाक मारणे. सदैव 'कारट्या' या शब्दाने संबोधूनच आईचे कथानायकाशी बोलणे, व ती 'कारट्या' म्हणाली नाही तर घाबरणारा कथानायक. रातोरात अपुऱ्या कापडातून सदरा शिवून देणारा, तो भल्या पहाटे आणून देणारा प्रेमळ श्रीपूमामा. काडकन मुस्कटात मारून तू भिकारड्याचा मुलगा नाहीस, ही जाणीव करून देणारी; 'कारट्या, तू बी.ए. हो अगर होऊ नकोस, पण आतून बाहेरून मात्र अगदी दगड हो! अगदी घट्ट डोंगरी दगड हो बघ!' सांगणारी आई. घरात कुणीच जवेले नाही तरी लागलेली भूक आवरता न येणारा छोटा कथानायक आपल्याला 'तुती'त दिसतो.

तर 'कैरी'त प्रामुख्याने तानीमावशीच्या प्रेमाच्या वर्षावापर्यंत कथानायक चिंब भिजून निघतो. 'तू आम्हाला आणखी एक आई होतीस' या विधानाला पूर्ण उतरणारी तानीमावशी आणि तिच्यावर तितकेच अकृत्रिम प्रेम करणारा तिचा छोटा भाचा आपल्या मनात कायमचे घर करतो. कथा वाचून झाल्यावर हसणाऱ्या, रडणाऱ्या, खिदळणाऱ्या, भांडणाऱ्या, देशपांडे मास्तरांना फैलावर घेणाऱ्या, पोकळ आवाजात 'आता मात्र माझ्या आयुष्याची निरीच सुटली' म्हणणाऱ्या, ओलसर डोळ्यांनी मोटारीत बसलेल्या भाच्याकडे पाहाणाऱ्या, मोटार सुरू होताच भर उन्हात खालच्या वाळूवरच डोके गुडघ्यात घालून रडणाऱ्या तानीमावशीची अनेक रूपे मनात फेर धरतात. आठवणीने भाच्याच्या बॅगेत त्याने पूर्वी कधीतरी मागितलेला नवा करकरीत रंगीत भोवरा जाळीसकट गुपचुप ठेवणारा प्रेमळ श्रीपूमामा, 'तू घाबरू नकोस. मी आहे की! तू आणि मी मिळून अजूनही त्या भडव्या नशिबाला टांग मारू.' म्हणून भाच्याला धीर देणारा श्रीपूमामा वाचकांना हलवून जातो. शाळेतील मुलांच्या खोड्यांत त्यांना पुरून उरणारा छोटा कथानायक 'कैरी'त सर्व बालसुलभ प्रवृत्तींनी जी. एं.नी रंगविला आहे. कुठल्याही गंभीर प्रसंगात सुद्धा लहान मुलाला न धरवणारी भूक ही लागतेच, आणि पोटात पडल्यावरच ती शांत होते. 'तुती' आणि 'कैरी' दोन्ही कथांत छोटा कथानायक अशा भुकेनी बेजार आहे, आणि न लाजता तो ती भूक व्यक्त करून भागवून घेतो. त्याचे लहानपण जी. एं.नी असे जपले आहे. जी. एं.चा सर्वात आवडता रंग निळा. त्यामुळे कथानायकाच्या आवडत्या चड्डीचा रंगही निळा. (तुती). जी. एं.ना आवडणारे

मोरपीस, मोर, भोवरा ह्या गोष्टी छोट्या कथानायकालाही आवडतात. जी. एं.च्या अर्पणपत्रिकेतून येणारे जिवाभावाच्या व्यक्तींचे उल्लेख आणि 'तुती', 'कैरी' आणि 'राधी'तून दृग्गोचर होणाऱ्या त्या व्यक्ती. बरे त्या तीनही कथांच्या केंद्रस्थानी आहे छोटा कथानायक मी. त्यामुळेच जी. एं.चे बालपणच इथे आपल्यासमोर उलगडते असे वाटल्यास ते वावगे ठरू नये.

आता 'राधी' या कथेकडे वळू. 'एकसमयावच्छेदेकरून' हा शब्द छोट्या कथानायकाच्या आठवणीत खिळा ठोकल्याप्रमाणे बसवला तो गणेशवाडी भटानेच. पण त्या दिवसापासून बाहेरच्या पायरीवर बसून वाचायला त्याला उत्साहच वाटेना. छोटा कथानायक आईबद्दल म्हणतो, 'या आईविषयी मला नेहेमी एक आश्चर्य वाटे. बशीत शिरा घालून देताना तो बशीबाहेर सांडेपर्यंत ती अगदी रुंद हातांनी सढळ भरी. तेल लावून आंघोळ घालताना तिचा हात मऊ आटवलासारखा फिरे. पण काही वेळा मात्र तिची बोटे अशी कशी दगडाची होत हेच मला समजत नसे. मागे एकदा मी काळे डॉक्टरांच्या घरी सत्यनारायणाचा प्रसाद द्यायला गेलो होतो. तेथे बाहेरच्या टेबलावर काचेचा चौकोन होता. त्यात असलेली लहानलहान फुले मला फार आवडली, म्हणून मी तो चौकोन उचलून आणला. मला चोरी करायची नव्हती, आणि कागदावर ठेवायला काही हवे होते असेही नाही. उलट, दुसऱ्या दिवशी मी तो परत देऊन टाकणार होतो. पण तो माझ्या हातात पाहून आईने मला असे बडवले की त्यापुढे पत्कीमास्तर म्हणजे अगदी कापूस बोळा!'

जादूटोणा करणारी, मुलांना बिब्बा घालणारी, वाईट नजरेची बाई, राधी राहाते कशी हे पाहाण्याची बालसुलभ जिज्ञासा कथानायकाला होती, पण त्याबरोबरच तिच्याकडे गेलो होतो हे आईला कळले तर हाडांची पूड होईल हेही तो जाणून होता. पण एक दिवस तो शाळेतून येत असताना राधी त्याला बोलावते व तोही धावतच तिच्या घरात शिरून दाराआड उभा राहतो. ही पहिली भेट. 'अरे, माणसाच्या डोळ्यांनी कधी दूध नासतंय्? गाई हरवतात?' राधीचे मनमोकळे वागणे, बोलणे ऐकून कथानायकाला एकदम मोकळे मोकळे वाटते व तो एका खोक्यावर बसतो. मग राधी त्याला मिठाचा खडा मध्ये घालून दोन आमसोलं खायला देते. तेव्हापासून त्याच्या घरी आमसोलाचा खप वाढला. कपडे धुताना आईला खिशात आमसोले व मिठाची पुडी मिळते. 'त्या दिवशी ती फार कामात असतानाही तिने त्यातल्या त्यात वेळ काढून मला दोन तडाखे देण्याचे काम तत्परतेने आटोपून घेतले.'

राधीला स्वत:चे मूल नव्हते. तिची सारी माया त्याच्यावर वर्षावत होती. ती त्याला गाणी म्हणून दाखवी. तिचा आवाज गोड नव्हता, पण कथानायकाला तिचे गाणे ऐकताना 'अंथरुणात पडल्या पडल्या आईच्या जात्याची घरघर ऐकावी, तसे वाटे.' गाणी म्हणताना, फुगे करताना राधी त्याच्या अगदी जवळ बसून असे. कथानायक

म्हणतो, 'एखाद्या पेटलेल्या चुलीजवळ बसले की स्वैंयपाकघराचा कसा उबदार घरगुती वास येतो, तसा तिला एक वास होता आणि तो मला फार आवडे. आईच्या अंगालाही उब होती. पण तिला नेहेमी स्वच्छ धुतलेला साबणाचा वास येत असे, व ती मला तर नेहेमी आमच्या झगझगीत धारदार सुरीसारखी वाटे.' बाहेर जाताना आईबरोबर राहायला त्याला अभिमान वाटे, मात्र बालसुलभ सुखदु:खाच्या गोष्टी बोलायला त्याला राधी लागे. सुटीत मामाच्या गावी जाऊन कथानायक परततो त्यावेळी राधी खूप आजारी पडलेली असते. आबा सांगतात, 'तू जाऊ नकोस तिकडे. ती तुला ओळखणार नाही.' शेजारच्या बाळूकडून त्याला सर्व हकीकत कळते. 'कालपासून राधी वेड्यासारखे नाचत कुत्र्याप्रमाणे ओरडू लागली होती आणि लोकांनी तिच्या खोलीला बाहेरून कुलूप घातले होते.' रॉकेल आणायला तो राधीच्या घराजवळून जातो, आणि खिडकीतील राधीचा चेहेरा पाहून घाबरतोच. 'राधी! राधी! मी आलो परत सुटीहून!' तो ओरडतो. 'परत आल्यावर तू मला ओळखणार नाहीस' असे तिने मला म्हटले होते. पण आता खुद्द तिलाच माझी ओळख लागेना. कट्ट्यावरचे लोक त्याला हसतात, चिडवतात तेव्हा तो धावतच घरी जातो. संध्याकाळी राधीच्या खोलीसमोर माणसांच्या गर्दीत कथानायक सारखा नवस करीत उभा राहिला. राधीचे ओरडणे ऐकले की अंगाच्या चिंध्या होत आहेत असे त्याला वाटे. तो घरी परतला त्यावेळी आईने त्याच्या पाठीवरून आटवलासारखा मऊ हात फिरवला व काही न बोलता ती आत गेली. रात्री आबा येऊन सांगतात, 'राधी मेली रे, सुटली बिचारी. आता त्या यातना काही बघवत नव्हत्या.' 'मला माझे अंग निर्जीव झाल्यासारखे वाटत होते. मला सारखे काही ना काही आठवू लागले व डोळ्यातील पाणी थांबेना. राधीच्या खांद्यावर चढून मी रायआवळे काढले. तिच्याकडून किती वेळा तरी गायवाघाचे गाणे ऐकले. काळवंडलेल्या पातेल्यातील गुळाचा चहा... फाटून गेलेले लुगडे... 'तुझ्या आईचं तुझ्यावर फार प्रेम आहे, नाही?... तुझी आई देवी आहे... माझी ओळख विसरू नको हं!... मारलं? कुणी मारलं?...' आईने त्याचा हुंदका ऐकला. ती त्याच्या जवळ सरकली व तिने आपला हात त्याच्या अंगावर टाकला. अशा ह्या तीन कथा 'तुती', 'कैरी' आणि 'राधी' जी. एं.च्या बालपणाचे 'दर्शन' आपल्याला घडवितात.

जी. एं.नी घडविलेल्या बालविश्वाचे 'दर्शन' घडल्यावर जाणवते ते एकच, हे बालविश्व अस्सल आहे. वास्तववादी आहे. भोंगळ, दांभिक आदर्शवादाला, संस्कारांच्या, नीतिमत्तेच्या पोकळ गोड गोष्टींना इथे थारा नाही. 'मुले म्हणजे देवाघरची फुले' हा खोटा समज इथे नाही. इथे जे आहे ते कठोर वास्तव आहे. अत्यंत निर्ममतेने, कुठलीही तडजोड न करता जी. एं.नी एक समर्थ बालविश्व निर्माण केले आहे. ते एकसाची, एकसुरी नसून त्यात कमालीची विविधता आहे, संपन्नता आहे. हे बालविश्व निर्माण करताना जी. एं.नी घेतलेली प्रचंड मेहनत जाणवल्यावाचून राहात नाही. त्यामुळेच

या बालविश्वात 'तोचतोचपणा' आढळत नाही. नाचणाऱ्या मोराच्या थरथरणाऱ्या मोरपिसाऱ्याप्रमाणे जी. एं.चे बालविश्व निश्चित एक आगळा वेगळा आनंद देते.

☆☆☆

'साहित्य सूची'
मे १९८८



जी. एं.च्या 'कथे'तील दाम्पत्यजीवन

जी. एं.च्या कथांच्या पहिल्या वाचनात वरवर पाहता जी. ए. स्त्री-द्वेष्टे भासतात. जी. ए. खरोखरच केवळ स्त्री-द्वेष्टे होते काय? स्त्री-विषयीच्या पूर्वग्रह-दूषित दृष्टिकोणातूनच त्यांच्या सर्व स्त्री-व्यक्तिरेखा साकारल्यात का? जी. एं.च्या कथांचे सखोल वाचन केल्यानंतर जी. ए.वर 'स्त्री-द्वेष्टेपणा'चा ठेवला जाणारा आरोप त्यांच्यावर एकतर्फी अन्याय करणारा वाटतो. एक मात्र खरे की जी. एं.च्या अनेक कथांतून 'स्त्री'विषयक येणारे त्यांचे भाष्य, वा निवेदन टोकाचे, औपरोधिक असते. त्यातून त्यांच्या 'स्त्री'कडे पाहाणाऱ्या विशिष्ट दृष्टिकोणाची सतत जाणीव राहाते.

सर्वसामान्यपणे 'स्त्री'चे वर्णन करताना जी. ए. 'घोडी' ही उपमा वापरताना दिसतात.

शेणाची बुट्टी डोक्यावर घेऊनसुद्धा ठुमकत चालणाऱ्या, दर पावलाबरोबर पायातील साखळ्या खळक वाजविणाऱ्या, अकरा-बारा वर्षांच्या गवळ्याच्या गुलशीचे वर्णन करताना निवेदन येते, 'पुन्हा ती बुट्टी उचलून चुंबळावर ठेवते व मागे न पाहता वरातीतल्या घोडीसारखी चालू लागते.' (मुखवटा)

मागून अतिशय आकर्षक बांधा असलेल्या, हायहिल्समधून पेरूच्या फाकीसारख्या टाचा दाखविणाऱ्या, घोड्याच्या शेपटीसारखे केस बांधलेल्या स्त्रीला समोरून पाहण्याची तीव्र इच्छा दामूला झाली. दामूलाच काय कुणालाही ही इच्छा स्वाभाविकपणेच होणार; पण तिला पाहताच दामूचा चेहेरा साफ पडला. जी. ए. वर्णन करतात, 'त्या बाईचे सारे दात पुढे होते व चेहेरा चक्क घोड्यासारखा होता. भयंकर 'नाइटमेअर'च म्हणायचं

की! पण ही बया दिवसादेखील घोडीप्रमाणे वाटते बुवा!' (हिरवी मखमल, गोरा हात)

'स्त्री काय, एक नसेल तर चुटकीसरशी दुसरी मिळेल, आणि दोन स्त्रियांत दोन घोड्यांपेक्षा जास्त फरक नसतो. सोन्याच्या नाण्यांचे पैजण वाजू लागले, की ते स्वीकारायला जिची पावलं नाचू लागत नाहीत, अशी स्त्री अद्याप जन्मायची आहे!' म्हाताऱ्याचा आवाज एकदम कुत्सित झाला. (प्रवासी)

'रक्तमुखी'या कथेती स्त्री म्हणते, 'स्त्री ही सुंदर अथवा कुरूप नसतेच..... पुरुष तिला तसे मानतो इतकेच आणि हा त्याचा निर्णय सर्वस्वी त्याच्या मूर्खपणावर अवलंबून असतो.'

तर 'यात्रिक' कथेच्या शेवटी न्हावी एक विदारक सत्य वेशीवर टांगतो. 'कालची सोन्याची पुतळी आजदेखील त्याच खणखणीत नगद आवाजात बोलत राहते, पण कालची सौंदर्याची पुतळी आज गाडीच्या चाकाखाली सापडलेल्या डबड्यासारखी होते, आहेस कुठे? अरे, मूठभर गुलाबी पावडर आणि खोटे तीळ व भुवया रंगवायला थोडे काजळ एवढे साहित्य असले की कुत्र्याला पाणी पिण्यासाठी ठेवलेल्या मडक्यालादेखील महाराणीच्या चेहेऱ्याप्रमाणे सजवता येते. कसले सौंदर्य नि काय!.... सगळीच मांजरे अंधारात काळीच असतात....'

'इस्किलार' या कथेत गारुड्याच्या तोंडी येणारी कोटी तमाम संस्कृतिरक्षकांना झीट आणणारी आहे.... भोवती जमलेल्या सगळ्या लोकांना, अगदी पोरांनादेखील गारुडी एक कोडं घालतो.

'जगात सगळ्यात मोठा आकडा कोणता?'

'शंभर!' झाडणीसारख्या डोक्याचे एक पोर मोठ्याने ओरडले. कोणीतरी म्हटले, 'एक हजार, दहा हजार.....'

'नाही. तुम्ही सगळे चुकलात.' मान हलवत गारुडी म्हणाला. 'जगात सर्वात मोठा आकडा स्त्रीच्या दोन पायांचा! त्यात अडकून पडलेला पुरुष कधीच बाहेर पडत नाही!'

'आकडा' ह्या शब्दावरची ही कोटी, प्राचीन काळापासून चालत आलेले एक त्रिकालाबाधित सत्य स्पष्ट करून जाते. स्त्री-सामर्थ्याचा हा प्रत्यय आपल्याला प्राचीन महाकाव्यांपासून, प्राचीन इतिहासापासून आजतागायत सर्वत्र येतो. युद्धाला, कलहाला स्त्रीच कारणीभूत ठरली याचीही ठायीठायी उदाहरणे मिळतील. महाभारत-द्रौपदी, रामायण-सीता, ट्रोजनवॉर-हेलन, अल्लाउद्दिन-पद्मिनी ही अगदी चटकन् स्मरणारी उदाहरणे आहेत. पण स्त्रीत अडकून पडल्यामुळे तिच्या सौंदर्यामुळे, प्रेमामुळे, शारीरिक आकर्षणामुळे देहभान विसरून, कर्तव्यच्युत झालेलेही किती तरी आढळतात. उदा. बाजबहाद्दर-रुपमती, जहाँगीर-नूरजहान. पत्नीला भेटायला आतुर झालेला तुलसीदास रात्रीच्या अंधारात दोरी समजून सापाला धरून सज्जा चढून गेला हे उदाहरणही प्रसिद्ध

आहे. इंद्रपद प्राप्त करून घेण्यासाठी घोर तपश्चर्या करणाऱ्या ऋषींच्या तपश्चर्येचा भंग करण्याची कामगिरी इंद्र अप्सरांवर सोपवित असे आणि या कामात अप्सरा नेहेमी यशस्वी होत हे आपल्याला ज्ञात आहे. विश्वामित्र-मेनकेचे उदाहरण याबाबतीत प्रसिद्ध आहे.

चितेवर पिठाचे सात-आठ गोळे भाजत असलेला नग्न बैरागी भुकेने हैराण झालेल्या प्रवाशाला सांगतो, 'वास्तविक हे गोळे तू खायला हरकत नाही. ही चिता माझ्या पत्नीचीच आहे. आयुष्यभर तिनं आपल्या शरीरानं अनेकांना अनिर्बंध सौख्य दिलं; मेल्यावरही शरीरानं हे सुख द्यायला ती हरकत घेणार नाही.'

वरील सर्व उदाहरणांतून 'स्त्री'कडे पहाण्याची जी एक टोकाची औपरोधिक वृत्ती प्रकट होते, त्यावरून जी. ए.वर 'स्त्री-द्वेष्टेपणा'चा आरोप ठेवणे हे धाडसाचेच ठरेल. फार तर त्या कथेतील संबंधित व्यक्तींवर आपल्याला 'स्त्री-द्वेष्टेपणा'चा आरोप ठेवता येईल. पण इथेही थोडी गफलतच होईल. स्त्रीचा तसाच वाईट अनुभव गाठीला असल्यामुळे जर त्या व्यक्ती स्त्री-द्वेष्ट्या बनल्या असतील, तर आपण त्यांना त्याबद्दल दोषी कसे ठरवणार? जी. एं.नी स्त्रीचे वर्णन करताना 'घोडी' ही उपमा वारंवार वापरली म्हणूनही केवळ ते स्त्री-द्वेष्टे ठरत नाहीत. काही स्त्रिया घोड्यांसारख्या दिसतात; वाटतात हा 'पुरुष' या नजरेचा दोष कसा म्हणता येईल? एकजात सर्वच... अगदी सरसकट सर्व स्त्रिया आणि अर्थातच सर्व पुरुष आदर्श, उदात्त, महान, सौंदर्याचे पुतळे कसे असतील? खरे तर बरेचदा मानवाच्या चेहेऱ्यावर कमालीचे साम्य आढळते. जगात सगळीकडे, जिकडे तिकडे अगदी मांगल्य आणि मांगल्यच भरून आहे, असे बुळबुळीत भंपक समाधान काय कामाचे? न्हावी, रक्तमुखीतील स्त्री एक व्यावहारिक सत्य स्पष्ट करून जातात, तर 'प्रवासी'तल्या म्हाताऱ्याची सून मूळातच बदफैली होती, म्हणून तो तिला बळी जाऊ द्या असे सुचवितो. आणि 'दोन स्त्रियांत दोन घोड्यांपेक्षा जास्त फरक नसतो' असे सांगतो. त्याच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच की स्त्री ही दुर्मिळ, अप्राप्य अशी गोष्ट नाही. नग्न बैराग्याच्या पत्नीने आयुष्यभर त्याला जो रोख अनुभव दिला, त्यामुळेच त्याच्या बोलण्यातून कडवट विखार व्यक्त होतो.

तेव्हा जी. एं.च्या कथांतून व्यक्त होणारा हा विखार म्हणजे जीवनातील एका अपरिहार्य अंगाची त्यांना आलेली अनुभूती होय व तिचा अत्यंत रांगडा, रोखठोक आविष्कार त्यांनी केला इतकेच. स्त्रीची अनेक रूपे आपल्या आयुष्यात आपल्याला बघावयास मिळतात. त्यातील हेही एक रूप आहे. जी. एं.चा आविष्कार अत्यंत दाहक असल्यामुळे ते 'स्त्री-द्वेष्टे' वाटतात, पण तसे ते नव्हते.

जी. एं.च्या अनेक कथांतून स्त्रीचे केवळ हे एकच चित्र अवतरत नाही. बहुविध प्रकारच्या, समाजाच्या निरनिराळ्या थरातल्या, स्त्री-व्यक्तिरेखा जी. एं.नी साकारल्या आहेत. निरनिराळ्या नात्यांनी या स्त्री-व्यक्तिरेखा कथांतून येतात. ती विविधता लक्षात

घेतल्याबरोबर जाणवते की जी. एं.नी स्त्रीचे केवळ एकांगी दृष्टिकोणातून चित्रण केलेले नाही.

जी. एं.च्या अनेक कथांतून येणारी 'आई' ही व्यक्तिरेखा म्हणजे एका अर्थाने जी. एं.नी लिहिलेले महाकाव्य होय. 'आई' ची व्यक्तिरेखा साकारताना जी. ए. निःसंशय आईमय होतात. साने गुरुजींच्या 'श्यामच्या आई'ची आठवण जर जी. एं.च्या कथांतून येणारी 'आई' ही व्यक्तिरेखा देतेच, पण ती खऱ्या अर्थाने 'श्यामच्या आई'च्या पुढे निघून जाते. साने गुरुजींनी निर्मिलेली 'श्यामची आई' आचार्य अत्र्यांच्या शब्दात 'मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र ' असेल, पण एका विशिष्ट वयानंतर, 'किशोरवया'नंतर 'श्यामची आई' हाती धरवत नाही. जी. एं.नी निर्मिलेली 'आई' ही व्यक्तिरेखा वास्तव आहे, जिवंत हाडामासाची आहे. आपल्या अवतीभोवती सहजपणे आढळणारी सामान्य स्त्री आहे. त्यामुळे जी. एं.च्या कथांतून येणारी 'आई' ही व्यक्तिरेखा आपल्याला कायम आनंद देते. तिला 'श्यामच्या आई'प्रमाणे मिळमिळीत संवादांचा, गोडगोड आदर्शाचा, तत्त्वज्ञानाचा वा कृत्रिमतेचा स्पर्श नाही.

रागावणारी, मुलांना वळण लावणारी, खस्ता खाणारी, मुलांची काळजी करणारी, मुलीच्या सुखासाठी तीळतीळ तुटणारी, घरासाठी चंदनासारखी झिजत झिजत जाणारी, वात्सल्याची मूर्तिमंत प्रतिमा असलेली, कारुण्यमय त्यागमूर्ती, दुःखे झेलणारी, शिक्षा करणारी, प्रेमळ, संसाराचा सारा भार आपल्या दुबळ्या खांद्यांवर झेलणारी, सोशिक, समजूतदार, प्रसंगी जगदंबा भासणारी, अशा विविध रूपांतून जी. एं.च्या कथांतून 'आई'ची व्यक्तिरेखा अवतरलेली आहे.

'आई'प्रमाणेच जी. एं.च्या 'कथे'तून येणारी बहिणीची, विशेषतः मोठ्या बहिणीची-अक्काची- व्यक्तिरेखा त्यागाची, मायेची, करुणेची मूर्ती असते. बहिणीची व्यक्तिरेखा निर्मिताना जी. एं.ची शैली एक आगळेच रूप धारण करते. खास कमावलेले, मऊ, भावव्याकुळ, नाजुक! 'मुखवटा' या कथेतील त्यांच्या सद्याप्रमाणे बहिणीची माया तर अनेक कथांतून पाझरते आहे, शांताक्का (प्रदक्षिणा), नमूताई (भोवरे), सुम्मी (तुती), रुक्मिणी (पराभव), कमळी (कैरी), ताई (पुनरपि), मिस डिसोझा (वस्त्र), लता (भेट), सावित्री (पाळणा), विजू (निरोप), कमल (सांगाडा), शांतू (हिरवी मखमल, गोरा हात).

जी. एं.च्या ९७ कथांमध्ये 'तानीमावशी' ही मावशीची फक्त एकच व्यक्तिरेखा 'कैरी' या कथेमधे आली आहे. पण ती उत्कट, सविस्तर आणि परिणामकारक उतरली आहे. 'माय मरो, पण मावशी जगो' या वाक्प्रचारास पूर्ण उतरणाऱ्या तानीमावशीच्या रूपाने दुसऱ्या आईच्याच प्रेमाचा वर्षाव छोट्या कथानायकावर होतो. 'कैरी' या कथेत तानीमावशी आणि तिचा भाचा यांच्यातील निखळ मायेचा प्रत्यय आपल्याला ठायी-ठायी येतो. किंबहुना त्या दोघांतील माया हाच ह्या कथेचा केंद्रबिंदू आहे. 'कैरी' वाचताना, जी. एं.च्या 'काजळमाये'ला दिलेल्या अर्पणपत्रिकेची वारंवार आठवण होते.

ती अर्पणपत्रिका अशी–

'सोनुमावशीस,

तू आम्हाला आणखी एक आई होतीस.'

जी. एं.च्या अर्पणपत्रिका अत्यंत बोलक्या आहेत. स्वत:बद्दल जी. एं.नी आत्मचरित्रपर लेखन केले नाही हे सर्वविदित आहे. पण त्यांच्या ह्या अर्पणपत्रिका मात्र त्यांच्याबद्दल बरेच काही सुचवून जातात.

याचाच अर्थ असा की जी. एं.नी रेखाटलेल्या स्त्री-व्यक्तिरेखा एकसुरी, एका साच्याच्या नसून त्या विविध प्रकारच्या असून, विविध थरांतील आहेत. खरे तर जी. एं.च्या कथांतून स्त्री-पुरुष व्यक्तिरेखांचे एक संपन्न विश्व आपल्यापुढे साकार होते. आणि म्हणूनच जी. ए.वर 'स्त्री-द्वेष्टेपणा'चा आरोप आपल्याला करता येत नाही.

जी. एं.च्या कथांतून चवचाल, बदफैली, स्त्रियांची एक पलटणच्या पलटण आपल्यापुढे उभी राहते. साहजिकच या स्त्रिया त्यांच्या दाम्पत्य-जीवनातील सारा आनंद, सारा गोडवा पार रसातळाला नेतात; किंबहुना त्यांना त्याची यत्किंचितही पर्वा नसते. अत्यंत बेदरकार वृत्तीने त्या आपली पशुतुल्य वासना पूर्ण करून घेतात. जशा बदफैली स्त्रिया जी. एं.च्या कथात आढळतात, तसेच वासनाधुंद पुरुषही जी. एं.च्या कथांतून दाटीवाटीने उभे आहेत.

अंकलीकर वकिलाची बायको मोहना नृत्याच्या क्लासच्या नावाखाली, चाळीशीच्या शूद्रासारख्या दिसणाऱ्या अग्निहोत्री मास्तराकडून आपली वासना भागविते. मोहना हजारात देखणी होती. तिचा चेहेरा लालसर गुलाबकळीप्रमाणे होता आणि ती पुष्कळांकडे पाहून हसत असे. ती रस्त्यावरून चालत असली, की तिच्याकडे निर्लज्ज आसक्तीने न पाहणारा पुरुष क्वचितच. तिचे नृत्य हे नावालाच होते. ती आली की अग्निहोत्री लगेच दाराला कडी लावत.'काशीने एकदा पेटीवर उभे राहून हळूच फटीतून आत पाहिले होते. लांब गादीच्या खुर्चीवर अस्ताव्यस्त कपड्यांची मोहना पडली होती आणि काळवंडलेले अग्निहोत्री अतृप्त भुताप्रमाणे तिच्या उत्सुक शरीरावरून वासनेची बोटे फिरवत होते. काशी एकदम शरमली होती, पण तिचे शरीर तापल्यासारखे झाले होते.' (शलॉट). वास्तविक मोहना सौंदर्यवती होती, वकिलाची बायको होती, घरी सुबत्ता होती, तिला काहीही कमी नव्हते, आणि तरीही ती अग्निहोत्री मास्तरच्या गळ्यात पडली. अग्निहोत्री तिला सहजप्राप्य होता, त्याला हवे तसे नाचविणे तिला शक्य होते, म्हणून ती तिच्या मर्जीने त्या मास्तरला खेळवत होती, नाचवत होती, आणि तो नाचत होता. स्वत:च्या वासनेच्या पूर्तीसाठी मोहना स्वत:च्याच वैवाहिक जीवनाला चूड लावते. अंकलीकर वकिलाला हे माहीत असते की नाही तोच जाणे.

घरात स्वयंपाकीण म्हणून कामाला लागलेली विधवा गोदूबाई स्वत:च्या भरगच्च शरीराच्या भांडवलावर माधवरावला ताब्यात घेते. माईचा संसार उद्ध्वस्त करते आणि

एकाच छपराखाली माईच्या डोळ्यांदेखत तिच्या नवऱ्याबरोबर स्वत:चा संसार थाटते. माधवराव-गोदूबाई यांच्या अनैतिक संबंधातून मालतीचा जन्म होतो. तीही आता तरुण झाली होती. माईचे जगणे अर्थशून्य होते. कथेच्या शेवटी वादळामुळे घराचे छप्पर खाली येते आणि एक लहान तुळई अंगावर पडून माधवराव व गोदूबाई दोघेही संपतात. 'माधवराव अंग मुडपून झोपले होते व त्यांच्या शेजारी अस्ताव्यस्त कपड्यात गोदूबाईंनी अंग पसरले होते आणि त्यांनी स्वामित्वाच्या विश्वासाने एक हात त्यांच्यावर टाकला होता.' (स्वप्न). इथे सहजप्राप्य झालेल्या गोदूबाईच्या भरगच्च शरीराच्या अनावर आकर्षणाने माधवराव माईचा विश्वासघात करून नवा डाव मांडतो, आणि निर्लज्ज कोडगेपणाने माईच्या डोळ्यांदेखत स्वत:ची वासना भागवितो. माईचा काडीचाही दोष नसताना तिचा संसार उद्ध्वस्त होतो. जिवंतपणीच तिला कुणालाही न सांगता येणाऱ्या मरणयातना भोगत, मरणाची वाट पाहात निरर्थक जगावे लागते.

'कसाब' या कथेत तर चवचाल, बदफैली, बाजारू स्त्रियांची एक छोटी टोळीच पाहावयास मिळते. सोनू आंगलीची आई, त्याची बहीण, पत्नी येसूबाई आणि मुली, कमळी व पारू यांच्या बदफैली वागण्यामुळे सोनू आंगली त्याच्या बालपणापासून आतापर्यंत एका कोसळत्या छपराखालीच वावरतो आहे. आपण घाणीतच जन्मलो, घाणीतच वाढलो आणि घाणीतच वावरत आहोत, ह्या दाहक जाणीवेने पेटलेला सोनू त्याचा सगळा संताप त्याच्या शेळीवर काढतो. हातातील फळकुटाने तो तिला बदड बदड बडवितो. अर्धांगाने एक पाय गेलेल्या सोनूच्या बापाच्या संमतीनेच सोनूच्या आईचे धंदे चालत. बादशाही मटण खानावळीचा मालक नानू कदम वेळी अवेळी घरी येई. बाप सोनूला घेऊन बाहेर पडे. तासा दोन तासांनी घरी परतल्यावर तो नानूने आणलेला मटण रस्सा समाधानाने खात बसे. बाप वारल्यावर मुलांना टाकून आई नानू कदमाबरोबर मुंबई बघायला गेली ती कायमचीच. स्वत:चे जिव्हालौलव्य पुरविण्यासाठी पुरुषाने गाठलेली हीन पातळी आणि नवऱ्याने नादानपणे मूक संमती देताच बायकोने राजरोस घरातच सुरू केलेला व्यभिचार यांचे भेदक दर्शन इथे घडते. तर जवळजवळ कर्तृत्वशून्य असलेली सोनूची बायको येसूबाई, मुलींना खुशाल नको त्या मार्गाने जाऊ देते. कमळीला तर ती चक्क बाजारबसवी होऊ देते आणि स्वत: घरात सापाप्रमाणे शिरलेल्या केशवरावाच्या स्वाधीन होते. सोनूला ती ठणकावून सांगते, 'होय, कमळी जाते मारवाड्याकडे, काय म्हणणं आहे तुमचं? मी देखील केव्हाच लाज कोळून प्याले आहे, झालं समाधान? तसं केलं नसतं तर दारोदार परटं घेऊन भीक मागण्याची पाळी आली असती सगळ्यांवर! तुमचा पगार बघावा तर अगदी साहेबी! सहा महिन्यातून तुम्ही मोप शिप्तरभर दोन रुपये आणणार, मग आम्ही काय पोटाला बिब्बा घालायचा होय? म्हणे तीस वर्षे अब्रूने काढली! काढली असाल की, त्यात काय एवढं? दोन वेळा गिळायची ठीक व्यवस्था असली की अब्रू बासनातनं बाहेर येते कशाला शिंदळकी

करायला?'

जी. एं.नी रंगविलेल्या बदफैली स्त्रियांच्या पलटणीचे नेतृत्व निर्विवादपणे ह्या येसूबाईकडे जाते. व्यभिचाराचीही ती कारणमीमांसा देते. त्याचेही ती एक तत्त्वज्ञान बनविते, म्हणजे फारच झाले.

किराणा दुकानदाराशी लग्न लावून दिलेली जानकी अंगावरील गोधड्यासारख्या लुगड्यात घरी परतली, ती घरीच बसली. आता ती पुढच्या सोप्यावर बिनदिक्कत पातळ नेसते; रस्त्यावरून येणाऱ्याजाणाऱ्याने पाहायचे ते अगदी खुशाल पाहून घ्यावे! 'जानकी दारातच उभी असल्याने इकडून तिच्या अंगाच्या भरदार, पुष्ट रेषा दिसत होत्या तशाच त्या समोरूनही दिसत असणार. पानपट्टीच्या दुकानातील लोक एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून फाजील हसत होते, पण त्याची कल्पना नसल्याप्रमाणे जानकी मात्र आपल्याच नादात पातळ खेचत ओढत चापचूप बसवत होती.' ती नेसत असलेले पातळ इतके झिरझिरत होते की तिच्या पोटावरचा कसला काळसर डाग त्यातून स्पष्ट दिसत होता. पंधरा दिवसांपूर्वी अचानक घरी आलेला भैरू लोटलेला दरवाजा ढकलून आत आला. 'दरवाजा उघडताच जानकी लगबगीने खिडकीकडे गेली व तेथल्या खुंटीवरचे कपडे व्यवस्थित करू लागली.... बाबूराव खाली चटईवर बसला होता. तो निलाजरेपणाने वीस दात हसला'..... भैरू निमूटपणे घराबाहेर पडला. चार वर्षांपासून बापलेकीत बोलणे नव्हते. कथेच्या अखेरीला मल्हारी भैरूला सांगतो, '..... तुझी पोरगी आता कामातून गेली खरी. मला सगळं माहीत आहे. बाबूराव येतो हे तुला माहीत आहेच. पण आकडेवाला वैद्य येतो, बाजापेटीवाला येतो, हे तुला माहीत नाही. ती एकदा जत्रेला म्हणून गेली होती, आहे ध्यानात? कुठली जत्रा नि काय! गावातच राहत होती तीन-चार दिवस एका खानावळवाल्यावजळ! जत्रेत काय इरकली लुगडी वाटतात होय माणसांना?' मल्हारीने भैरूच्या पोटात बोट टोचून विचारले. 'पण या सगळ्या राडीला जबाबदार कोण? मी विचारतो जबाबदार कोण? तर तिचा ऐदी बेरड नवरा. तो बसून खायला सोकावला होता. त्यानंच तिला या मार्गाला लावलं. मग पोरीला चटक लावली. भैऱ्या, तू तिच्या पोटाकडे कधी बघितलंस? तिथं तिच्या नवऱ्याने बैलाचा नाल तापवून तिला डाग दिला आहे. कारण तसलं घाण काम करायला तिने पहिल्यांदा साफ नाही म्हणून सांगितलं होतं.' (अंजन). इथे जानकीच्या अधोगतीला तिचा ऐदी नवरा कारणीभूत ठरला. पतीने पत्नीच्या कुंकवाला कोरीवपणा द्यायचा की त्यानेच तिला वाममार्गाला लावून, धंद्याला बसवून 'त्या' पैशावर घाणीत वळवळणाऱ्या किड्याप्रमाणे जगायचे? मुळात जानकीचा काहीही दोष नसताना, केवळ दैवयोगाने षंढ नवऱ्याशी लग्नगाठ पडल्यामुळे, तिचा संसार उद्ध्वस्त झाला. वर मान न करणाऱ्या पोरीची, एक निर्लज्ज बेशरम बाई झाली, ती तिच्या नपुंसक, नादान नवऱ्यामुळे!

थोराड अंगाची सावित्री दुसरेपणावर नानांच्या घरात आली. सात-आठ

महिन्यांच्या सहवासात नानांना तिच्याविषयी काहीसुद्धा समजले नाही. नानांना तर तिने अंगाला कधी हातसुद्धा लावू दिला नाही. आणि एक दिवस ती सरळ नानांना टाकून बहिणीचा अपुरा राहिलेला संसार करण्यासाठी निघून गेली. नाना तिथे जाऊन हात हलवत परत आले. तिने त्यांना लाखोली वाहिली, कडाकडा तोंड केले आणि येत नाही म्हणून साफ सांगितले. नाना निवृत्त झाले; त्यांचे फंडाचे सतराशे रुपये घरी आले, आणि एक दिवस अचानक सावित्री येते ती सोबत आपल्या एका जाराला, भगवंतला बरोबर घेऊन. ती नांदायला आलेली नसते, तर फंडाचे पैसे पळवायला आलेली असते. सरळ मनाचे नाना, मागचे सगळे विसरून तिला पत्करायला निघाले. सावित्रीने ढोंग बेमालूपणे वठवले, पण टपोरलेले पोट ती कसे लपवणार? सावित्री आत पातळ बदलत होती.

'पाठमोरी पुष्ट सावित्री तिच्या दंडात चोळी अगदी रुतून गेली आहे! तिच्या उफाड्याच्या शरीरात ताणून भरलेल्या उष्ण रक्त-मांसाच्या कल्पनेने ते झिंगल्यासारखे झाले. ती आता आत कपडे बदलत होती. ते आवेगाने उठले, हिसक्यासरशी डेस्कवरचा दिवा त्यांनी उचलला व आत येऊन दिवा किंचित उंचावत हावऱ्या, उपाशी नजरेने त्यांनी सावित्रीच्या अंगावर डोळे फिरवले. तिचे पातळ बदलले होते, पण अद्याप तिचे नेसणे पूर्ण झाले नव्हते.

चेहेऱ्यावर काडकन प्रहार झाल्याप्रमाणे त्यांचा तोल गेला व आंधळेपणाने त्यांनी भिंतीचा आधार घेतला. साऱ्या शरीरभर पसरलेली आग ओसरली व त्यांचे डोळे कवड्यांसारखे मळकट झाले. ते पुढे झाले. त्यांनी सावित्रीचा हात करकचून धरला आणि नैराश्याने डोळ्यात बोटे खुपसून घेतल्याप्रमाणे त्यांनी पूर्णपणे तिच्याकडे पाहून घेतले. आता संशय नव्हता.'

एक भयानक शंका नानांच्या मनात एखाद्या सापासारखी सळसळत उतरते. गौतम तरी खरोखरच आपला मुलगा होता का-का तोही..... पहिल्या पत्नीचाही त्यांना संशय येऊन जातो आणि या धक्क्याने त्यांचे आयुष्यच उन्मळून पडते. सावित्रीची प्रतारणा, तिचे बदफैलीपण नानांचे उरलेसुरले भावनिक विश्व करपवून टाकते. नानांची जीवनेच्छाच साफ नष्ट होते. 'उफाड्याचे निर्लज्ज घट्ट मास, दुसऱ्या कुणाचे तरी बीज घेऊन आपल्या घरात एका सोप्यावरून दुसऱ्या सोप्यावर हिंडत आहे! नानांचे पोट कुणीतरी आतून उलटवल्याप्रमाणे त्यांना शिसारी आली.'

स्वत:बरोबर आणलेले विष दुधात ढवळून तो कप सावित्री नानांना आणून देते, आणि ते दूध लवकर घेण्याचा आग्रह धरते. नानांनी लवकर दूध घ्यावे म्हणून ती त्यांच्यावर खेकसते. नानांना आता जगण्यातच रस उरला नव्हता, म्हणून सावित्री आत जाताच, त्यांनी स्वत:जवळ असलेल्या विषाची मळकट पांढरीपूड दूधात ओतली, आणि यांत्रिकपणे ते दूध ढवळू लागले. शेवटी एकदाचे नानांनी दूध घेतले. नानांचा अखेरचा प्रवास सुरू झाला आणि इकडे सावित्रीनेही सगळी आवराआवर करावयास सुरवात

केली. 'तिथे तिने पेटी उघडली व नोटांचे पुडके हातात घेतले. त्यांच्यावरून हावरेपणाने हात फिरवताच परपुरुषाच्या आलिंगनाप्रमाणे तिचे अंग वासनेने तापले व ती खिळल्यासारखी झाली. कोणत्याही परपुरुषांच्या नव्हे, तर रेशमी शर्ट घालणाऱ्या बाळा सरदेसाईच्या! तिच्या डोळ्यात आता ईर्ष्या चमकली. ' तो आता आपल्याकडे ढुंकूनही पाहात नाही, पण या नोटा नाचवल्या की, तो काय त्याचा मेलेला बाप येईल नाचत! पोटाचे ओझे काय टाकणे फारसे अवघड नाही. झुळझुळीत पातळे, कधी मिळाले नाही असे खाणे-पिणे! आयुष्याच्या निर्णयाविरुद्ध टिच्चून घ्यायच्या सुखाचा आनंद, नोटांच्या स्पर्शाने तिच्यावर पसरला. मग देवळात वाट बघत बसलेला गोधड्यासारखा भगवंत गेला मसणात. त्याचे काम आता संपले!' (अखेरचा दिवस)

वासंती पोतदारची कीर्ती जगजाहीर होती, तरीही त्या केळकराने तिच्याशी प्रेमविवाह केला होता. मात्र अद्यापही तिच्या स्वैर वागण्यावर त्याचे कसलेही बंधन नव्हते. सुधाला भेटायचे निमित्त करून, नायलॉनचे पातळ नेसून पाच महिन्यांपूर्वीच ती दत्तूच्या घरी आली होती. वास्तविक पंधरा दिवसांसाठी सुधा माहेरी गेली आहे, हे दत्तूने तिला एकदा बाजारात व एकदा सिनेमा थिएटरात केळकर समोर असताना सांगितले होते. दत्तू एकटाच घरी आहे हे निश्चित माहीत असल्यामुळेच वासंती दत्तूकडे आली व निर्विघ्नपणे दत्तूकडून तिला हवे ते सुख घेऊन गेली. 'कसले तरी धुंद अत्तर; आताशा ती ब्रा देखील रेशमीच वापरत असे की काय कुणास ठाऊक. ती जायला निघाली त्या वेळी तिच्या चेहेऱ्यावर विजयाचे कुत्सित स्मित होते, मांजर जिभल्या चाटते तसे! ते पाहून दत्तू शरमला.' वासंतीच्या वागण्याचा अंदाज असूनही केळकरचे तिच्यापुढे काही चालत नव्हते. वासंतीच्या स्वैर वागण्याला कुठलाही धरबंध नव्हता. केळकरच्या ती मुळीच ऐकण्यात नव्हती, आणि तरीही केळकर मात्र वासंतीच्या तालावर तिला हवे तसे वागत होता. केळकरवर वासंतीचे पूर्ण नियंत्रण होते. वासंतीच्या व्यक्तिमत्त्वापुढे केळकर हे अगदीच सुमार बुजगावणे होते. मुळातच सगळे माहीत असूनही, समजून उमजून त्याने वासंतीबरोबर प्रेमविवाह केला होता. केळकरची कुवत ओळखूनच वासंतीने त्याच्याशी लग्न केले होते, त्यामुळेच तिचे अनिर्बंध आयुष्य पूर्वीप्रमाणेच चालू होते. समाजात असे जोडपे आपल्याला कुठेना कुठे पाहावयास मिळते. वासंती घरी आली आणि भोग घेऊन गेली, याबद्दल दत्तू जो कांगावा करतो, तो तद्दन खोटा होता. दत्तूचे शरमणे हे त्याच्या भंपकपणाचे निदर्शक होते. दत्तूचे लग्न जरी सुधाशी झाले होते, तरी त्याच्या मनात कायम रेखा होती. जवळजवळ ठरलेले लग्न मोडून रेखा एका इंजिनिअरशी लग्न करून निघून गेली. दत्तूच्या मनात मात्र तिच्या स्मृती कायमच्या घर करून राहिल्यात. त्यामुळेच दत्तू कधीही पूर्णपणे सुधाचा होऊ शकला नव्हता. संधी मिळताच त्याने वासंतीला जवळ घेतले. झालेल्या संभोगाबद्दल तो एकट्या वासंतीला दोष देतो, म्हणूनच त्याचे हे वागणे आपल्याला भंपकपणाचे

वाटते. सुधाशी लग्न होण्यापूर्वी समोरच्या चाळीत राहाणाऱ्या इंदिरेकडे तो एक दिवस दुपारची वेळ साधून गेला होता. 'तिच्या शुभ्र पुष्ट छातीवर त्याच्या शर्टाची बटने रुतली. तिच्या गळ्यात कुठल्यातरी संतबाबाचे चित्र असलेले लॉकेट होते. त्याचा तर पूर्ण आकार उमटला. दोन जळत्या वासनांच्यामध्ये अनासक्त संताची समाधी! तिचा गळा फार सुरेख आहे. गोल, लिलीसारखा आहे. हाताचा स्पर्श होताच क्रूरपणे कुसकरावा असे वाटण्याइतका आकर्षक आहे. त्याखाली तीळ आहे, थोडा जांभळसरच. त्या वेळी तिचा नवरा कट् कट् करीत असेल. की तोही....' स्वत:चे अनैतिक वर्तन पूर्णपणे जाणून असलेल्या दत्तूला सरळ मनाच्या सुधाचाही संशय येतो, पण उघड उघड तिला तसे स्पष्ट विचारायची हिंमत त्याला होत नाही. शेजारचा माधवराव आपल्या अपरोक्ष वेळी अवेळी घरी येतो आणि सुधाशी तास न् तास काहीबाही बोलत बसतो, या जाणिवेने दत्तू कावराबावरा होतो, बेचैन होतो. सुधा आपल्याला फसवीत आहे असे दत्तूला खात्रीपूर्वक वाटले असते, तरी त्याला एका परीने बरे वाटले असते. पण तिच्या स्वच्छ हसण्यामुळे, खोडकर बोलण्यामुळे, तिच्या मनमोकळ्या चेहेऱ्यामुळे, तिच्यावर अविश्वास दाखविणे दत्तूला जमत नव्हते. ही एक नवीन वेदना त्याच्या मनात कायम ठसठसत होती, आणि या त्याच्या उद्वेगाला त्याचा तोच जबाबदार होता. (माणूस नावाचा बेटा)

पोस्टातली नोकरी गमावून घरी बसलेल्या बाबाजीला त्याची बायको लक्षुमी दारच्या कुत्र्याएवढीही किंमत देत नव्हती. लक्षुमी चार घरची धुणीभांडी करून घर चालवत होती, आणि म्हणूनच तिने बाबाजीला सरळ एकेरी संबोधनाने हाक मारायला केव्हाच सुरवात केली होती. बाबाजी-लक्षुमी यांच्यातील संबंध जवळ-जवळ संपुष्टातच आले होते. लक्षुमीबाबत वाटणाऱ्या भावना तिच्यापुढे व्यक्त करण्याची छाती बाबाजीला नव्हती. वासनेने धुंद झालेला बाबाजी शेवटी वकिलाच्या घरी कांम करणाऱ्या तेरा-चौदा वर्षाच्या राधाला फुले देण्याच्या निमित्ताने बोलण्यात गुंतवतो. वास्तविक बाबाजीची मुलगी तुळशी ही राधापेक्षा मोठी होती, परंतु वासनेने पेटलेल्या बाबाजीला वासनापूर्तीशिवाय दुसरे काही समजेनासेच झाले होते.

'बाबाजी वेडा झाला. त्याने झपकन खिशात हात घातला, रुपयाचे नाणे घट्ट मुठीत घेतले व राधेचा हात धरून त्यावर ठेवले. तो बावळटपणे, धापा टाकत हसला. त्याचा हात आंधळ्या नागाच्या फण्याप्रमाणे तिच्या छातीवर चाचपडू लागला आणि त्याने एकदम पाची बोटे कुस्करली.'

राधा किंचाळली, चवताळली आणि तोंडाचा अखंड पट्टा सोडून तिने बाबाजीला वहाणेने बडवायला सुरवात केली. राधाचे किंचाळणे ऐकून जनी, गोजराईची मुले; गोजराई तिथे गोळा झालेत. शरमेने बाबाजीला मान वर करवेना. राधेच्या तोंडाचा पट्टा चालालाच होता. जनी तर अंग घुसळून घुसळून हसू लागली. जनीचा कलकलाट

ऐकून बाहेर आलेल्या लक्षुमीला पाहून राधाला आणखीच चेव आला.

'हलकट! माझ्या बापाचं वय याचं, दाढी पिकली आता पिठासारखी, आणि मला रुपया देतोय, निलाजरा रेडा कुठला!'

'जा, पड जा आता घरी कुत्र्यासारखं!' लक्षुमी बाबाजीवर खेकसली. बाबाजी निमूटपणे गेला. लक्षुमीने काडकन् राधेच्या मुस्काटात दिली. हात नाचवत ती म्हणाली, 'माहीत आहे जा ग सटवी! हत्तीच्या पावलाएवढी अब्रुवाली मला माहीत आहे जा- धरला असेल हात! अशी काय तू मोठी तालेवार लागून गेली आहेस!'

सारा जोम ओसरून राधा रडू लागली व धावतच ती वकिलांच्या घरात गेली.

वळकटीत तोंड खुपसून बाबाजी हुंदके देत होता, थरथरत होता. बाबाजीने अगदीच पुचाटपणे आयुष्य काढले, त्याने कधी आपल्या कुंकवाला सुरीसारखा कोरीवपणा दिला नाही ही कठोर जाणीव होऊन लक्षुमीला बाबाजीचा संताप आला, आणि त्याच्या त्या विसविशीत दुबळ्या शरीरात एक लाथ झाडावी असंसुद्धा तिला वाटून गेले. लक्षुमीला पाहताच स्वत:च्या तोंडात फाडफाड मारून घेत बाबाजी म्हणाला, 'शप्पथ, कशी माती खाल्ली देव जाणे, आता मात्र कधी नाही. बाच्या शप्पथ, पुन्हा कधी नाही....' बाबाजीच्या या शब्दांनी जणू तिच्याच कंबरेत लाथ बसल्यासारखे झाले. तिच्या मनात खोल कुठे तरी शरमेच्या सापाची पिल्ले वीत असल्याप्रमाणे तिचे सारे शरीर विकल झाले होते. दोन महिन्यांपूर्वीच आपल्याला एकदम चढलेले विष तिला आठवले, खिजवू लागले. डॉक्टरांच्या माजघरात ती धुणे वाळत घालीत होती. तिने हात उंच केले, तो तिचा पदर ढळला. ती तशीच समोरील भव्य, सोनेरी चौकटीच्या आरशात आपल्याकडे आसुसलेल्या, अतृप्त नजरेने पाहात राहिली. त्याच वेळी डॉक्टर मागच्या बाजूने परसात चालले होते. त्या क्षणी तिचे सारे शरीर बेभान झाले. डॉक्टरांनी मागून येऊन हळूच आपल्या कमरेभोवती हात विळखावा असे तिला वाटले, व त्या धुंद अनिर्बंध क्षणी ती डॉक्टरांकडे पाहून उत्तेजक हसली होती. आणि डॉक्टर त्याप्रमाणे आलेही होते. त्या पंधरा रुपयांत तुळशीचे सँडल्स झाले होते. बेवकूफ बाबाजीला शेण खाणेसुद्धा जमले नाही याचाच लक्षुमीला जास्त संताप आला. स्वत:च दोन महिन्यांपूवी निर्माण झालेली वासना तिने बेभानपणे डॉक्टरांकडून भागविली होती, पण तो क्षण निघून गेल्यानंतर तिला मेल्याहून मेल्यासारखं झाले होते. त्यामुळेच तिला बाबाजीचा तिरस्कार वाटत नव्हता, तर कसलाही कणा नसलेल्या बाबाजीची तिला घृणा वाटत होती. (नाग)

आसुसलेल्या चेहेऱ्याच्या मळकट चिंधीसारख्या दिसणाऱ्या नवऱ्याला रत्नाने साफ गुंडाळून ठेवले होते. तो घरी येताच टोच मारल्याप्रमाणे चुंबन देणे, तत्परतेने चहा- खायला देणे, लाडिकपणे त्याच्या किडकिडत शरीराशी झोंबणे, त्याच्याकडे पाहून मखमली मादक हसणे, या सर्व अस्त्रांचा वापर करून रत्नाने त्याचे पार पाळीव कुत्रे

बनविले होते. बेताचे कर्तृत्व आणि बेताचीच बुद्धी असलेला तो कारकून खोट्या आनंदात निर्बुद्ध बैलाप्रमाणे जगत होता. किंबहुना बैलाइतकीही बुद्धी त्याला नसावी हेच खरे. समोरच्या खानावळीतील खोलीत राहणारा औषधविक्रेता, रामस्वामी आणि मराठे यांच्याशी रत्नाचे शरीरसंबंध होते. नवरा घरी नसला की वेळी अवेळी रत्ना त्या खोलीत जाऊन स्वत:च्या आणि तिच्या त्या प्रियकरांच्या वासना आळीपाळीने भागवीत असे. ह्या अनैतिक संभोगाच्या बदल्यात आपल्या प्रियकरांकडून, रत्ना तिला हव्या त्या वस्तू उकळीत असे. चिपाडासारख्या नवऱ्याकडून न शमणारी भूक ती अशा रीतीने भागवीत असे. त्याचबरोबर त्याच्या तुटपुंज्या पगारात तिच्या न पुरविल्या जाणाऱ्या इच्छाही ती आपल्या प्रियपात्रांकडून पूर्ण करून घेत असे. केवळ किरकोळ वस्तूंच्या, कधी साडीच्या मोबदल्यात रत्ना त्या तीन पुरुषांना सहजप्राप्य होती. 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्य:!' हेच खरे. रात्री तिचा नवरा सिनेमाला गेला. एकटाच. वेडपट कुठला. 'खरी आर्य स्त्री कशी असते ती पाहा!' हा सिनेमा पाहावयास तो गेला असे उपरोधपूर्ण निवेदन जी. ए. कंसात देतात. ह्या कंसात जी. एं.नी मद्रासी फॉर्म्युल्याची झकास टर उडविली आहे. नवरा सिनेमाला गेल्यावर तटाटलेला उर्मट ब्लाऊझ आणि झिरझिरीत रेशमी पातळ नेसून ती औषध विक्रेत्याकडे आली. 'तिच्या चिमुडलेल्या ओठांच्या ठिणगीने अंग पेटल्यासारखं झाले. तिचे धुंद डोळे अर्धवट मिटले व तिच्या ज्योतीसारख्या लवलवीत शरीराचे वस्त्र माझ्याभोवती लवचिक लपेटले.' (वहाणा). रत्नाचे हे बेबंद स्वैर वर्तन पाहिल्यावर जी. एं.चे बैराग्याच्या मुखातून येणारे जीवनचिंतन मनाला पटून जाते. '..... सापाचं मुख, घाण मांजराचा पृष्ठभाग, विहिरीचा तळ, ज्वालामुखीचं शिखर, खेचराची मागची बाजू, हत्तीची पुढची बाजू आणि स्त्रीचा मध्यभाग याबाबत आयुष्यात अतिसावध राहा!' (प्रवासी)

'पारधी' या कथेतील दादासाहेब हा विकृत मनोवृत्तीचाच पुरुष म्हणावा लागेल. स्वत:च्या मनोविकृतीचेही त्याने एक स्वत:चे तत्त्वज्ञान बनविले होते, आणि स्वत:ला पारधी समजून इतरांना जाळ्यात पकडून त्यांचा खेळ दुरून पाहण्यातच त्याला आसुरी आनंद होत असे. बाथरुममध्ये 'प्लेअर्स' सिगरेटची केस उघडून इतर वकिलांना सिगरेटी वाटताना, 'मला तुम्ही बनवलंत असं तुम्हाला वाटतं; पण मी तुम्हाला खेळवतो आहे. एका सिगरेटच्या किंमतीत एक माकड नाचायला मिळतं ही गंमत माझी आहे!' ही त्यांची भावना होती. भरदार शरीराची मिजासखोर माई दुसरेपणावर निमूटपणे खालच्या मानेने त्यांच्या घरात आली, ते त्यांनी अचूक लावलेल्या जाळ्यात अडकूनच. माईशीच लग्न करण्याची दादासाहेबांची ईर्ष्या लग्न होताच संपली. त्यांनी आपल्या दैनंदिन कार्यक्रमात लग्नानंतर काडीचाही बदल केला नाही. चापून चोपून पातळ नेसून आपले पूर्ण तारुण्य कपड्यांतून दृग्गोचर करणाऱ्या माईच्या पुष्ट, आग्रही देहाला स्पर्श

करण्याची तीव्र इच्छा होऊन किती वर्षे झालीत, हे दादासाहेबांनाच आठवत नव्हते. वास्तविक माईच्या सॅटीनच्या ब्लाऊजवरील झगझगीत वळशांवरून नजर फिरताना, कोणाच्याही बाबतीत ती लालसेने रक्तरेषेप्रमाणे झाली असती. पण दादासाहेबांचे सगळे वागणेच तिरपागडे होते. नाइलाजाने दादासाहेबांच्या घरात आलेल्या माईच्या बेताल वागण्यास कारणीभूत झाले असावे. 'खाऊन सोकावलेले, वांझोटे जिरॅनियमचे झाड!' असे जे दादासाहेबांच्या दृष्टीने माईला रूप प्राप्त झाले, त्यालाही अप्रत्यक्षरित्या तेच जबाबदार होते. साऱ्या जगाकडे केवळ 'पारध्या'च्याच नजरेने बघणाऱ्या दादासाहेबांनी माईलाही 'सावज' म्हणूनच बघितले आणि इथेच त्यांनी मूलभूत चूक केली.

साहजिकच दादासाहेबांच्या आयुष्याच्या वळचणीला दिवस काढणाऱ्या पाप्याच्या पितरासारख्या डॉक्टरला माईने जवळ केले.

टचटचीत हिरवट शिरा असलेले अशक्त हात, पेरवासारखा लालसर, भकास चेहेरा, विरळ केस, पूर्वायुष्यातील एका चिंधीप्रमाणे गळ्यात अडकवलेला स्टेथास्कोप, असा अवतार असलेल्या त्या गुंजतोळा शरीराच्या डॉक्टरात माईने काय पाहिले कुणास ठाऊक! स्वत:ची आणि डॉक्टराची 'ती' भूक माईने राजरोस घरातच भागवायला सुरवात केली. दादासाहेबांच्या गैरहजेरीत डॉक्टर तासन्‌तास माईशी बोलत माडीवर बसतात हे घरात सुधीरला, रामाला, स्वैपाकिणीला अगदी सगळ्यांना माहीत होते. माईचा हा बदफैलीपणा दादासाहेब पूर्ण जाणून होते; वरकरणी मात्र आपल्याला काहीच माहीत नाही, काहीही समजत नाही, असा मुखवटा धारण करून स्वत:च्याच घरात ते वावरत होते. हीच त्यांची विकृती होती. 'ईर्ष्येने त्यांनी माईंना घरात आणले, त्याच वेळी त्यांचा उन्माद संपला, शिकारच संपली आणि तीदेखील येथे आली ती जाळ्यात सापडलेल्या श्वापदाप्रमाणे! पण तिला आपल्या एके काळच्या श्रीमंतीचा कधीच विसर पडला नाही. चहात चमचा ठेवून दादासाहेब कधीतरी चहा पिऊ लागले की ती थट्टेच्या स्वरात म्हणे, 'अजून माधुकरीच्या आयुष्याचा रंग तुमच्यावरून गेला नाही!' प्रथम प्रथम दादासाहेबांना या थट्टेतील धार जाणवे, तिच्यातील विषामुळे दिवस बिघडे. पण नंतर त्यांना समजले, - 'बस्स, ही फक्त सुटण्याची धडपड आहे, पाय झाडणे आहे, असहाय चावरेपणा आहे. तिला वाटते, आपण यांना फसवत आहोत, पण आपण फसवले जात आहोत याची आपल्याला पूर्ण जाणीव आहे. ती जाळ्यात आहे व जाळ्याची दोरी आपल्या हातात आहे.' दादासाहेबांना राग आला तो डॉक्टरांचा, कारण त्यांच्या कोणत्याच पिंजऱ्यात ते सापडत नव्हते... काळा चष्मा घालून आपल्यासमोर ऐटीने वावरणाऱ्या, आपले फूल, सिगरेट आणि पत्नीही हक्काने घेणाऱ्या डॉक्टरांच्या वागण्यात आपण दादासाहेबाला फसवत आहोत असा छुपेपणा, धूर्तपणा दिसत नाही, याचाच दादासाहेबांना राग येतो. डॉक्टरांच्या ताठरपणामुळे त्यांना गोंधळल्यासारखे होते. डॉक्टरांच्या हातात आपल्यापेक्षाही एक जास्तीचा पदर आहे का? साप सळसळत

उतरावा त्याप्रमाणे मनात आलेल्या संशयाने त्यांचे जीवनच हादरते. आपल्याला सारे माहीत आहे, ही गोष्ट डॉक्टरांनाही माहीत असेल का? डॉक्टरांना माहीत, म्हणजे माईलाही माहीत असणार. मनात आलेला हा संशय त्या पारध्याला स्वत:च्याच नजरेतून उतरवितो. कापुरुष ठरवितो. पारधी म्हणून वावरत असताना आपलीच पारध झाली या जाणिवेने दादासाहेब उन्मळून पडतात. एका पुरुषाचा दुसऱ्या एका पुरुषानेच केलेला विश्वासघात दादासाहेबांना सहन होत नाही. 'माई काय स्त्रीच आहे. डॉक्टर नाही तर वैद्य, नाही तर प्राध्यापक, अगदीच नाही तर भूगोलाचा मास्तर! वेली काय, वनिता काय, टेकण्यासाठी उकिरड्यावर, भिंतीवर चढतील. पण अरे, डॉक्टर हा पुरुषच. त्यातही कुणी अनोळखी, वाटेवरचा वाटसरू नव्हे. आपल्या घरी अनेकदा अन्नाचा तुकडा मोडलेला! त्याने तरी अशा प्रसंगी आपल्याला आधार द्यायचा, आपुलकीने आपल्या मदतीला धावायचे. या क्षणी दादासाहेबांना यल्लूभीमा समजला.' जेवणानंतर माई डॉक्टरांना खूण करतात व मोठ्या चतुराईने त्यांना माडीवर घेऊन जातात. अवघी दहा मिनिटे डॉक्टर वर होते, पण तेवढ्या अवधीत दादासाहेब दोन जन्मठेपा भोगून बसले. आणि दहा मिनिटात काय होत नाही?

'चंद्रावळ' या कथेतील गौरी 'गाभाऱ्यात पणती लावावी त्याप्रमाणे टोपपदराचे झगझगीत नवे लुगडे नेसून' सण्ण्याच्या आयुष्यात आली. तिच्या काळ्या, बांधेसूद, घोटीव शरीरामुळे सण्ण्याच्या दृष्टीला काही दिवस गर्व चढल्यासारखं झाले. आणि एक दिवस अचानक गौरीने त्याच्याच भावाचे, गंजुडा बाबूचे घर गाठले. अवघे सहासात महिनेच सण्ण्याचे वैवाहिक जीवन टिकले. या काळात तिला गोंजारण्याचा आटोकाट प्रयत्न सण्ण्याने केला, पण त्या सटवीच्या मनाची पिसेच उलटी होती, त्याला सण्ण्या काय करणार? त्या गंजुड्या बाबूत तिने काय पाहिले तिचे तिला माहीत! एक दिवस आपले बोचके उचलून ती सरळ बाबूच्या खोलीत जाऊन राहिली. संतापाने तोंडात फेसाळलेला सण्ण्या वाश्याचा तुकडा घेऊनच धावत गेला आणि खाली मान घालून परतला. गंजुडा बाबू शांतपणे म्हणाला, 'सण्ण्या, का रे फुकट गुरगुर? का शेपूट आपटतोस? मी तुझ्या या म्हशीला बोलवायला आलो होतो व्हय? जा की घेऊन तिला, ती येणार असेल तर.' खोलीत गाठोड्याला रेलून मिजाशीत पसरलेल्या गौरीने कडाकडा बोटं मोडत, तिरस्काराने शब्द थुंकले, 'याच्याकडे? खड्ड्यात घाल या जोखमाराला!' पुरुषाचा यापेक्षा जास्त अपमान कोणत्याही स्त्रीला करता येणार नाही. कंबरेत लाथ बसलेल्या, लूत भरलेल्या कुत्र्यासारखा सण्ण्या बाहेर आला. गंजुडा बाबू सण्ण्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला समजावण्याचा प्रयत्न करतो, 'सण्ण्या, ऐक माझं! व्हय मी गंजुडा, पण माझ्या डोक्यात डोळे आहेत घट्ट. या साऱ्या दीडदमडीच्या खोट्या चवल्या. हीच बया उद्या मला सोडून जाईल एखादा न्हाव्याबरोबर! नागिणीवर विश्वास टाकावा, पण यांच्यावर? अंहं थू:! सगळ्याच बेशरम निर्लज्ज, चवचाल.' सण्ण्याने

त्याचा हात झिडकारून टाकला व निमूटपणे तो त्याच्या कबुतरखान्याजवळ येऊन गोठून बसला. सण्ण्याच्या आयुष्याचे गौरीने पार पोतेरे करून टाकले. ती त्याला दररोज दिसत असे आणि मग त्याच्या भाबड्या रानवट मनाला तोंड खुपसायला कुठे जागा उरत नसे.

लंगडा गोविंदाचार्य त्याच्यासारख्याच एका काळ्या, कुरूप, ठेंगण्या, खेडवळ; अगदी आकारहीन बाईबरोबर लग्न करतो. हळूहळू तिच्या कपाळावरचे मोठे कोरडें कुंकू गेले, टिकली आली आणि नंतर ती दारात उभी राहून उगाचच खिदळू लागली. त्याच्या भजनाने तिचे डोके उठे; म्हणून दर मंगळवार-शुक्रवारी तो तिला चार आणे देऊ लागला व ती गल्लीच्या टोकावरील सिनेमाला जाऊन बसू लागली. निसर्गनियमाप्रमाणे गोविंदाचार्याला काळा, वातीसारखा अशक्त मुलगा झाला. 'कुत्र्याच्या वाळल्या लेंडीप्रमाणे' दिसणाऱ्या त्या मुलाचा त्याला सुपाएवढा अभिमान वाटे पण कुणीही त्याचे नाव विचारले नाही, की त्याला कधी हात लावला नाही. त्याच्या बायकोचे सिनेमाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत गेले. आता तिने कुठलीशी मैत्रिण गाठली. मैत्रिणीची भेट म्हणून हळूहळू नवीन करकरीत पातळ, नव्या चपला, माळा घरी आल्या. आता तिला सिनेमाहून परतायला उशीर होऊ लागला. तरी गोविंदाचार्याच्या मद्दड डोक्यात काही प्रकाश पडला नाही. अखेर एक दिवस गोविंदाचार्यापासून मिळालेले ते वातीसारखे पोर त्याच्याकडे फेकून आपले सारे सामान घेऊन ती पळून गेली. कुणीतरी मुद्दाम खवचटपणे बातमी दिली, की परवाच्या दिवशी ती दादू गवळ्याबरोबर स्टेशनवर हिंडत होती. नंतर एक दिवस त्या पोरानेही त्याच्या खांद्यावरच प्राण सोडला. काही फाजील लोक मुद्दामच त्याच्या बायकोची चौकशी करीत. थंडपणे तो सांगे, 'ती होय? ती पळून गेली. अहो, करायचे काय? बाकीची माणसं घर करतात, लग्न करतात, त्यांना मुलंबाळं होऊन सुख मिळतं, म्हणून मीही लग्न केलं. पण आमचं साधलं नाही! मी देवापुढे नारळ फोडला, पण ती निघाला कुजका. कोण काय करणार सांगा!' गोविंदाचार्याची जीवनाकडून अगदीच माफक इच्छा होती, पण तीही पूर्ण न होता, त्याच्याच वाट्याला ती उठवळ बाई 'बायको' म्हणून यावी, एवढे शेणखाऊ नशीब त्याच्याच वाट्याला का आले? (अवशेष)

'पुरुष' या कथेतील विश्वनाथ-ताराचा संसार वास्तविक सुखाचा व्हायला काहीही हरकत नव्हती. विश्वनाथच्या मालकीचे एक घर आणि तीन दुकाने असल्यामुळेच त्याचे लग्न झाले. 'आणि उफाड्याने वाढलेले, उत्सुक शरीर घेऊन तारा त्याच्या आयुष्यात आली.' तिला रानवट रंगाचे भडक कपडे आवडत. चहा घेताना इतरांना मळमळावे अशा रीतीने ती तो भुरकत असे. पाच वर्षांच्या आयुष्यात शंकरपाळे विणीचा सैलसर लालभडक स्वेटर, तीन वर्षांचा मुलगा रमेश आणि साऱ्या घराला येणारा तिच्या पक्व फळासारख्या शरीराचा उष्ण धुंद वास, याखेरीज तिने आपल्याला काहीही दिले नाही, अशी विश्वनाथची प्रामाणिक समजूत होती. नाही म्हणायला त्याच्या

लेखनाबाबत एकच जाणीव तिने दाखविली होती; तो लिहीत असताना त्याला त्रास होऊ नये म्हणून ती जिन्याचे दार लावून घेत असे. बरेचदा तर ती बाहेरून कडीही लावत असे. यातले इंगित तिचे तिलाच फक्त माहीत होते. आपल्या लेखनातले ढिम्म काही तिला कळत नसले, तरी ती आपण लिहीत असताना आपल्याला उपद्रव होऊ नये, म्हणून किती खबरदारी घेते, याचेच विश्वनाथला अप्रूप होते. भाबडा, निर्बुद्ध, बैलोबा. नाव विश्वनाथ असले तरी बायकोसुद्धा पूर्णपणे त्याची नव्हती. तिथेही त्याला भागीदार होता. त्याचाच गुरू-प्रा. निकम. निकमच्याच ओळखीने त्यांचे लग्न झाले होते. ताराला निकम पूर्वीपासूनच ओळखत होते आणि विश्वनाथची कुवतही ते जाणून होते. विश्वनाथच्या बहिणीला, कुमीला निकमपासून दिवस गेले होते आणि तरी तिला झटकून ते मोकळे झाले होते. ताराच्या बाबतीत तर झटकण्याचाही प्रश्न नव्हता. विश्वनाथच्या कुंकवाच्या ढालीआड दोघांचे चोरटे संबंध यथास्थित चालू होते. आणि हद्द म्हणजे विश्वनाथला त्याची पुसटशीसुद्धा कल्पना नव्हती. 'तारा परतली त्या वेळी तिने जिन्याच्या दाराला हलकेच कडी लावली. ती आत टेबलाकडे वळताच निकमनी तिचा हात घट्ट धरला व तिला जवळ झटकले. हे तिला अपेक्षित, परिचित होते तरी तिने मान वर खुणावून हात सोडावून घेण्याचा प्रयत्न केला. पण नंतर तो दुबळा झाला व लाटेवरून पांढरी किनार यावी त्याप्रमाणे ती पूर्णपणे त्याच्याकडे आली. थोडा वेळ तिचा चेहेरा धुंद होऊन शांत झाला व ती विसकटलेले केस सावरीत पुन्हा खुर्चीवर जाऊन बसली.' खाली हा अध्याय सुरू असताना वर माडीवर विश्वनाथ स्वत:च्या लेखनकामाठीत दंग होता. निकम ताराला खेळवत होते आणि तारा निकमला. दर सहा महिन्यांनी ताराचा वाढदिवस येत असे आणि ती निकमकडून भेट उपटत असे. आजही तिने वाढदिवसाचे निमित्त करून चाळीस रुपये मागितले. निकमने विश्वनाथकडून पैसे उसने घेऊन ताराला दिले. दिले तेही रसिकतेने. 'निकम किंचित बाजूला वळले. त्यांनी खिशातून नोटा काढल्या व त्यांची घडी करून त्यांनी त्या ताराच्या गळ्याजवळ ब्लाऊजमध्ये ढकलल्या.... त्यांच्या बोटांनी परतताना एक रसिक स्पर्शही वेचून घेतला.' समोर विश्वनाथ पोस्टमनकडून पार्सल घेत होता. तारा कांगावा करते, पण तोही खोटाच होता हे निकम जाणून होते. बावळट नवऱ्याशी प्रतारणा करताना ताराला जराही संकोचल्यासारखे होत नव्हते, इतकी ती निर्ढावली होती. स्वत:च्या शरीरावर ती बेहद्द खूष होती व त्याचे निकमकडून हवे तसे कोड पुरविताना तिच्या बेहोश, धुंद मनाला जराही लाज वाटत नव्हती. 'तिने लाडिकपणे त्यांचा हात दाबला व तिचा चेहेरा आनंदाने खुलला. ग्लॅडिओलाच्या कळीसारखे तिचे अंग, त्याचा तिला फार अभिमान वाटला. आपल्याला शरीर आहे हे तरी कधी विश्वनाथला समजले की नाही कुणास ठाऊक! आंघळ्या फुंकरीने पाकळी उमलावी तसा रमेश जन्मला इतकेच.'

सुमार बुद्धीच्या, बेताची कुवत असलेल्या, बावळट, निरुपद्रवी, सरळ मनाच्या

विश्वनाथशी प्रतारणा करून तारा काय मिळविते? संसारात तिला असे काय कमी होते, की त्यामुळे तिने निकमला भिडावे?

अंगी पुरेसे व्यावसायिक कौशल्य असूनही मानसिकदृष्ट्या खचलेल्या, हताश झालेल्या जीवनात स्वत:चा काहीही दोष नसताना अपयशी ठरलेल्या डॉक्टर दादा फाटकांची चटका लावणारी, दादा फाटकांच्या मनोव्यापारांचा तरल वेध घेणारी, एखाद्या मुलायम वस्त्राप्रमाणे विणलेली एक समर्थ कथा म्हणजे जी. एं.ची 'सोडवण'.

मोठ्या उमेदीने डॉ. फाटकांनी दोन दवाखाने उघडले. त्याच वेळी शालूदेखील त्यांच्या आयुष्यात हसली. फाटकांच्या जुन्या मित्राचे, रामदास दिवगीचे आणि शालूचे लग्न ठरले होते. एकदा सहज रामदासने शालूची आणि डॉ. फाटकांची ओळख करून दिली. त्या दिवशी आयुष्यात पहिल्यांदाच डॉक्टरांना आपल्या गबाळ्या सुती कपड्यांचे, पायातील जुनाट बुटांचे वैषम्य वाटले. शालूने आत्मविश्वासाने बोलणाऱ्या डॉ. फाटकांत काय पाहिले कुणास ठाऊक, पण तासभर ती आपुलकीने त्यांचे बोलणे, भावी मनोदय ऐकत राहिली. त्या धूर्त मुलीला रामदास दिवगीपेक्षा डॉ. फाटक अधिक स्मार्ट, ब्राइट प्रॉस्पेक्टस असलेले भासले, व तिने सरळ रामदासशी ठरलेले लग्न उधळून डॉ. फाटकांच्या पत्नीपदाचा ताबा घेतला. इथेही फाटक फसलेच. शालूचा उथळ स्वभाव, सर्व आडाखे मांडून-जोखून लग्नाचा 'व्यवहार' बघण्याची तिची वृत्ती, रामदासला बाजूला सारण्यातील तिचा बेदरकारपणा, त्यांनी लक्षातच घेतला नाही. डॉक्टर फाटकांचे दवाखाने रिकामे राहू लागले, आणि शालू अकारण चिडू लागली. थोडे मनाविरुद्ध झाले की ती चिडून उपहासाने बोलत असे. तिच्यापुढे उभे असताना डॉ. फाटकांना नेहेमीच आपले अपयश फार जाणवे, सदैव कमीपणा वाटे. तिच्या साऱ्या मैत्रिणींच्या मोटारी होत्या व त्यांच्या नवऱ्यांचे दवाखाने भरलेले असत, हे ती डॉ. फॉटकांना वेळीअवेळी जाणवून देई. डॉक्टर फाटकांबरोबर एकत्र फिरायला जाणे तर तिने कधीच सोडून दिले. शालू जवळपास नसली, ती कुठे गेली की मनावरचे दडपण गेल्याप्रमाणे फाटकांना मोकळे वाटत असे. जीवनात पत्नीची साथ असण्याऐवजी तिचा दु:स्वासच फाटकांच्या नशिबी आला. जशी अकल्पितपणे शालू फाटकांच्या जीवनात आली, तितक्याच थंडपणाने एक दिवस चिठ्ठीसुद्धा लिहून न ठेवता ती त्यांच्या जीवनातून निघून गेली. स्वत:ची अधिक उत्तम सोय बघण्यासाठी. वास्तविक आघात झाला तो दोघांवरही, पण सर्व खापर फाटकांवर फोडून ती पुण्याला बहिणीकडे निघून गेली व शेवटी नरोत्तमाची रखेली म्हणून राजरोसपणे त्याच्याजवळ राहिली. डॉ. फाटक व शालू यांना एकत्र ठेवणारा एकमेव दुवा, त्यांची एकुलती एक मुलगी वृंदा विहिरीने गिळताच त्यांचे कणाहीन वैवाहिक जीवन भुईसपाट झाले.

डॉ. दादा फाटकांच्या अपयशी जीवनातील एकमेव विरंगुळा होता त्यांची मुलगी वृंदा. वृंदावरच त्यांची सारी माया, सारी आशा केंद्रित झाली होती. सकाळीच शालू

आणि वृंदा कुठेतरी जायला निघाल्या. कुणाच्या तरी घरी त्या सारा दिवस राहणार होत्या. फाटकांना हे कळताच अगदी सहज बोलता बोलता त्यांनी वृंदाला ती जर त्यांच्याजवळ घरी राहिली, तर तिला घेऊन पोहायला जाऊ असे सुचविले. शालू चिडलीच, पण अखेर वृंदाला फाटकांजवळ ठेवून गेली आणि फाटकांना मोकळे मोकळे वाटले. भवितव्यतेच्या अंधारात काय वाढून ठेवले आहे याची बिचाऱ्या फाटकांना कोठून कल्पना येणार?

वृंदाच्या अंगाला बांधलेली दोरी तुटली व निसटलेली वृंदा विहिरीने गिळली. फाटक पिंजारलेल्या केसांनी बेभानपणे विहिरीत बुड्या मारू लागले. तेथे हातांना काही लागते का हे चाचपडून पाहू लागले. काळवंडत गेलेले पाणी, त्याची अमानुष थरथर. वेळ जसजसा जाऊ लागला तसे कणाकणाने मरत, हताशपणे पाण्यात घातलेल्या फेऱ्या, प्रसंगातील रौद्रभीषणता आणि फाटकांची विकल मनस्थिती, त्यांची असहायता जी. एं.नी मोजक्या शब्दांतून प्रत्ययकारीरित्या चित्रित केली आहे.

सारखे केस ओढत फाटक रात्रभर खुर्चीत बसून होते. त्यांचे आयुष्यच त्या एका काळ्या क्षणाने जणू मारून टाकले आणि हे ओळखलेले फाटक म्हणूनच भ्रमिष्टाप्रमाणे बसून होते. पंधरा दिवसांतच शालू फाटकांना सोडून गेली आणि शालूच्या नजरेला नजर देण्याची ताकद नसलेल्या दुबळ्या फाटकांची फसलेल्या संसारातून कायमची सुटका झाली. 'आपण वृंदाला हाताला धरून विहिरीकडे नेले, फक्त उचलून मात्र तिला आत फेकले नाही इतकेच. पाणी हा आपला इतका जिवाभावाचा मित्र आणि नेमक्या त्यानेच एक क्षण साधून असा विश्वासघातकी प्रहार केला' असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. ह्या आघाताने फाटक खचले.

रक्ताक्षी मंदिरात गुप्तपणे अभयराजशी गांधर्वविवाह करणारी दासीकन्या ध्रुवशीला धर्मगुरुलाही भोग देते, आणि काळ्याकभिन्न डोंबालाही भिडते. तर पंडितराज विष्णुशर्म्याची पत्नी एका क्षुद्र सेवकाच्या संगतीत रममाण होते(विदूषक).

घरी सर्व प्रकारचे सुख मिळत असतानाही, परपुरुषाला जवळ करणाऱ्या, उच्च मध्यमवर्गीय स्त्रिया मोहना आणि माईच्या रूपाने आढळतात; तर साध्या साध्या वस्तूंच्या क्वचित साडीच्या मोबदल्यात प्रियकराला हवे तसे शरीरसुख देणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रिया, रत्ना आणि ताराच्या रूपाने दिसतात. स्वत:ची अनावर वासना बिनदिक्कतपणे परपुरुषाकडून भागवून घेणाऱ्या बेशरम स्त्रिया इंदिरा आणि वासंतीच्या रूपाने आढळतात. घरात स्वयंपाकीण म्हणून शिरलेली गोदूबाई, स्वत:च्या भरगच्च शरीराच्या जोरावर माधवरावासकट घरच ताब्यात घेते आणि माईच्या डोळ्यादेखत सरळ स्वत:चा नवा संसार थाटते. ऐदी बेरड नवऱ्याने जबरदस्तीने धंद्याला बसविलेल्या जानकीचे मूळ शालीन रूप नष्ट होऊन तिच्यात एक निर्लज्ज, चवचाल बाई निर्माण होते. थोराड अंगाची सावित्री; गोविंदाचार्याची काळी, कुरूप, ठेंगणी, आकारहीन

बायको आणि गौरी ह्या तर मुळातच बेशरम स्त्रिया. त्या सरळ नवऱ्याला टाकून दुसरा घरोबा करतात. सावित्रीने तर किती पुरुषांना जवळ केले होते, याचा हिशोब तिचा तिलाच माहीत. नवऱ्याला दूधातून विष देऊन त्याचा खून करायलाही ती कचरत नाही. नादान नवऱ्याला पोतेऱ्याएवढीही किंमत न देणारी लक्ष्मी, वासनेने पेटताच सरळ डॉक्टरच्या गळ्यात पडते; मोबदल्यात डॉक्टर तिच्याकडे पंधरा रुपये फेकतो. वृंदाच्या अपघाती मृत्यूचे कारण मिळताच शालू डॉ. फाटकांना सोडून सरळ पुण्याला जाऊन नरोत्तमची रखेली बनते. या सगळ्या बदफैली, बेशरम, चवचाल बायकांच्या लेखी विवाहसंस्था, मांगल्य, पावित्र्य, साधासरळ सुखी संसार यांना शून्य किंमत होती. या सर्वांची राज्ञी शोभते येसूबाई. ती तर नवऱ्याला, सोनू आंगलीला ठणकावून सांगते, 'होय, कमळी जाते मारवाड्याकडे, काय म्हणणं आहे तुमचं? मी देखील केव्हाच लाज कोळून प्याले आहे, झाले समाधान?.... दोन वेळ गिळायची ठीक व्यवस्था असली की अब्रू बासनातनं बाहेर येते कशाला शिंदळकी करायला?'

या सर्व चवचाल स्त्रियांच्या स्वैर वर्तनामुळे, किडलेल्या, पोखरलेल्या, फसलेल्या वैवाहिक जीवनाचे भेदक दर्शन आपल्याला घडते. या स्त्रिया भिन्न भिन्न सामाजिक थराचे प्रतिनिधित्व करतात. झोपडपट्टी, चाळ, बंगला, कनिष्ठ मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, सुशिक्षित, अशिक्षित, शहरी संस्कृतीत वाढलेल्या, गावरान, अशी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक पातळीवरची भिन्नता या व्यक्तिरेखांमध्ये आढळते. भिन्न भिन्न थरांतील या स्त्रियांच्या चित्रणातून, संसार खुंटीवरच टांगून, वासनापूर्तीत बरबटलेल्या स्त्रियांचे विराट दर्शन जी. एं.नी आपल्याला घडविले आहे. या सर्व स्त्रियांच्या जोडीला अपरिहार्यपणे दुसरा एक किंवा अनेक पुरुष असतातच. जोडीला पुरुष किती घ्यायचे हे त्या स्त्रीवर अवलंबून असते. तिची वासना जेवढी तीव्र, पुरुषांचे प्रमाण तेवढे जास्त.

हे वासनाकांड पहिल्यानंतर जी. एं.च्या कथांमध्ये स्त्रीचे फक्त बदफैली रूपच तेवढे दिसते, असा गोड गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. ज़ी. एं.च्या कथांमध्ये फक्त किडलेल्या, पोखरलेल्या, फसलेल्या वैवाहिक जीवनाचेच तेवढे भेदक दर्शन घडते असेही नाही.

पतीशी एकनिष्ठ असलेल्या प्रेमळ पत्नीचीही विविध रूपे आपल्याला 'रात्र झाली गोकुळी', 'व्यथा', 'काकणे', 'पुनरपि', 'भोवरे', 'अंजन', 'वंश', 'शिक्षा', 'तुती', 'राणी', 'राधी', 'माधारा', 'शलॉट', 'ठिपका' या कथांतून दिसतात.

'रात्र झाली गोकुळी' ह्या कथेतील वारणाई-दाजीच्या फाटक्या संसारातील अठराविश्वे दारिद्र्य आपल्या हृदयाला घरे पाडून जाते. दारिद्र्याचे इतक भेदक चित्रण क्वचितच कुणा अन्य मराठी कथाकाराने केले असेल. अत्यंत निर्ममतेने बारीकसारीक तपशीलांनी जी. एं.नी दाजी-वारणाईच्या दरिद्री संसाराचे वास्तव चित्र उभे केले आहे.

अशा जीवघेण्या दारिद्र्यातही या जोडप्यातील परस्पर सामंजस्य, एकमेकांसाठी तीळतीळ तुटणारा त्यांचा जीव, दुसऱ्याचे दुःख हलके करण्याचा त्यांचा चाललेला दुबळा प्रयत्न, त्यातून दिसणारी त्यांची नितळ माया, प्रस्तुत कथेत आपल्याला सतत जाणवत राहाते. दाजीला चहा घेण्याचा आग्रह वारणाई करते, तो अगदी साधा प्रसंग; पण त्यातून दाजीसाठी तुटणारे वारणाईचे आतडे आपल्याला जाणवल्यावाचून राहात नाही.

त्रस्त, दमलेल्या चेहेऱ्याचा दाजी नेहेमीपेक्षा लवकर घरी परततो. वारणाईच्या शेजारी बसत चुलीतील जळत्या साली‌वर तो विडी पेटवतो. 'काम फार होतं आज?' सुस्कारा सोडत दाजी उत्तरतो, 'चालायचंच'. साधा संवाद, पण त्यातून पत्नीचा पतीबद्दलचा जिव्हाळा दिसून येतो. दाजी विचारतो, 'आज चहा आहे काय थोडा? म्युनिसिपालटीच्या दवाखान्यातून मी दोन गोळ्या आणल्या आहेत. त्या म्हणे चहाबरोबर घ्यायच्या आहेत.' वारणाई चटकन चहाचा कप भरते, पण तो शकीचा चहा म्हणताच दाजी हात मागे घेतो व नंतर थोड्या वेळाने करून दिलास तरी चालेल असे सांगतो. वारणाई चहाचा आग्रह करते, 'नको. आताच घेऊन टाका त्या गोळ्या. नाहीतर सारं अंगावरच काढायची संवय आहे तुम्हाला.' निमूटपणे दाजी चहाबरोबर गोळी घेतो. अंगावरच दुखणं काढण्याची दाजीची संवय वारणाई जाणून होती. दाजीच्या दरिद्री संसाराबद्दल तिचा कधीही, कुठलाही त्रागा नव्हता. होती ती हळहळ -दाजीकरता काही करता येत नसल्याबद्दल. निदान मोफत दवाखान्यातून त्याने आणलेल्या गोळीबरोबर घ्यायला त्याला वेळेवर चहा मिळावा म्हणून ती धडपडते. ज्याअर्थी दाजीने गोळ्या आणल्या, त्याअर्थी त्याची प्रकृती खासच ढासळली आहे, हे ती जाणते. तिच्या दुबळ्या हातात त्याला चहा देण्यापलीकडे अधिक काही करण्याची शक्ती नव्हती, त्यामुळे तेवढे करून ती गप्प बसते.

एकीकडे वाढलेल्या वयाच्या दुर्गी, शकीची काळजी तिला पोखरत होती, तर दुसरीकडे अगदी दुष्काळात जन्माला आल्याप्रमाणे वाटणाऱ्या कृष्णाची न भागणारी भूक तिचा दमछाक करीत होती. पण त्या माऊलीचा कशाबद्दलच त्रागा म्हणून नव्हता. सगळीकडून कोसळलेल्या त्या दरिद्री छपराखाली एका सोप्यातील संसाराची सारी जबाबदारी आपल्या दुबळ्या खांद्यावर तिने कशीबशी पेलली होती. दाजीप्रमाणेच तीही सगळं दुखणं अंगावरच सहन करीत होती. दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्यांना दुखण्याचे फाजील कौतुक परवडण्यासारखे नसते. अंगावरच सगळं दुखणं सहन करीत, झिजत झिजत संपून जाण्यापलीकडे त्यांच्या हाती काहीही नसते. दारिद्र्याचा 'रोख अनुभव' गाठीशी असल्याखेरीज याची पुरती कल्पना येणेही कठीण. या जीवघेण्या दारिद्र्याचा तेजाबी प्रत्यय प्रस्तुत कथेतून सतत येत रहातो.

आता वारणाईला पाणी ओढणे होत नसे. तिच्या दुबळ्या शरीरात तेवढा नेटच

उरला नव्हता. भिंगरी फिरल्याप्रमाणे खोकल्याची उबळ जर मध्येच आली तर तिचे हात दुबळे होत आणि मग घागरीबरोबर आपणही विहिरीत जातो की काय अशी भीती तिला वाटे. पण तिच्या मागचे कुठलेही काम कधी चुकले नाही, की त्याबद्दल तिने कधी ब्र शब्द तोंडावाटे काढला नाही. स्वत:च्या दुखण्याची जाणीव तिने दाजीलाही कधी दिली नाही. दुर्गी हल्ली अबोल झाली होती, तर शकीचे उर्मट वागणे दिवसेंदिवस वाढतच चालले होते; पण दोन्ही मुलींना होता होईल तो सांभाळून घेण्याचा वारणाईचा प्रयत्न असे. शकीचे नि:संग वागणे तिला अगदी सहन होत नसे, पण काय करणार बापडी? बरेचदा शकीकडे पाठ करून ती बसे व येणारा राग आतल्या आत दाबी. संध्याकाळी स्वयंपाकाला काय; हा तर दररोजचाच प्रश्न तिच्यापुढे असे. तो सोडवता सोडवता तिचा जीव अगदी मेटाकुटीला येई. दाजीचीही प्रकृती खालावली होती. अलीकडे खाली वाकताच त्याच्या डाव्या बाजूला छातीत मोठी तापलेली सुई सावकाश खोल रुतवल्याप्रमाणे बारीक पण असह्य कळ येत असे, हे त्याने वारणाईपासून लपवून ठेवले होते. वारणाईच्या दु:खात आणखी एका नव्या काळजीची भर घालण्याचे दाजीने हेतूत: टाळले होते. वारणाई खोकून खोकून हैराण झाली की दाजीला वाटे, हा खोकला तिचा जावा, आपल्याला यावा. सध्यापेक्षा आपल्या कळात, वेदनात त्यामुळे आणखी काय भर पडणार? पण निदान ती तर या जीवघेण्या यातनांतून सुटावी. आपण जर अचानक संपून गेलो, तर आपल्या मागे वारणाईचे काय होईल? हौसेने वाढविलेल्या दुर्गीचे काय होईल? ह्या विचाराने दाजी त्रस्त होतो. वारणाई हबकून जाऊ नये म्हणून तो तिला आपल्या ढासळलेल्या प्रकृतीची कल्पनाही देऊ शकत नव्हता. 'फाटक्या पण रुंद पानांच्या मोठ्या काल्याच्या केळीसारख्या' वारणाईने सारे घर पाठीवर सांभाळले आहे, याची पूर्ण जाणीव दाजीला होती; आणि म्हणूनच तिचे दु:ख थोडे तरी कमी होण्यासाठी तिचा खोकला आपल्याला यावा, असे त्याला मनापासून वाटते.

'भाजी एक चपातीत गुंडाळून ठेव, व सकाळी खीर चपाती देऊन टाक शेजारी.' असे शेजारच्या घरातील पुरुषाचे वाक्य ऐकून झोपलेली वारणाई जागी होते व मनोमन शरमते. दाजीच्या नकळत शेजारच्या घरातील राहिलेले शिळपाके अन्न येत असे व मुलांतच वाटले जात असे. वारणाईने कानोसा घेतला, दाजी कट्ट्यावर शांत झोपला होता, हे पाहून बिचारीला त्यातल्या त्यात समाधान वाटले. संसारातील लक्तरं शक्यतोवर दाजीला दिसू नयेत, याकरिता होता होईल तो वारणाई धडपडत असे. हजार जागी ठिगळं जोडलेल्या विटक्या वस्त्रासारखा संसार, पण वारणाई निमूटपणे, विनातक्रार, ती करीत होती. सतत कुरकुरणाऱ्या, गचके खाणाऱ्या, मध्येच चिखलात रुतून बसणाऱ्या गाड्यात बसलेले दाजी-वारणाई हे सहप्रवासी त्यांच्या कोसळत्या संसारातही त्यातल्या त्यात परस्परांना किमानपक्षी दु:ख होऊ नये म्हणून जी धडपड करतात, त्यामुळे गहिवरून आल्याखेरीज राहात नाही.

जी. एं.च्या कथेला सामाजिक आशय नसतो, हा आरोप म्हणजे शुद्ध कांगावा होय. 'सामाजिकते'चे ढोल न बडविताही जी. एं.च्या कथेतून समाजाचेच बारीक सारीक तपशीलांसकट विराट दर्शन सातत्याने घडत आले आहे. वस्तुत: जी. एं.ची अभिव्यक्ती प्रखाद्या कॅमेऱ्याप्रमाणे असते. समाजाच्या ज्या थरावर त्यांच्या कथेचा कॅमेरा रोखलेला असतो, त्याचे चित्रण करताना फ्रेममध्ये येणाऱ्या सर्व बारीकसारीक तपशीलांचे सविस्तर वर्णन ते देतात. त्यांच्या कथांचा कॅनव्हासच मोठा असतो, त्यामुळे मुळातच त्या चांगल्या ऐसपैस पन्हयाच्या असतात.

घराची अजिबात काळजी नसलेल्या, मुलीच्या पैशावर जगणाऱ्या, नीट धडपणे भिक्षुकीचा व्यवसायही न करणाऱ्या व्यवहारशून्य भास्करभटाचा संसार टोकाच्या चिवटपणाने करणारी राधाबाई आपल्याला 'व्यथा' ह्या कथेत दिसते. भास्करभटाचे उत्पन्न जवळजवळ शून्य होते. क्वचित येणारी निमंत्रणे वेळेवर पार पाडून घरात दोन पैसे आणणे भास्करभटाला जमत नसे. घरावर लावलेला 'भविष्य, रमल सांगितले जाईल' हा बोर्ड तर केव्हाच काळवंडून गेला होता. कालिंदीचे लग्न झाले, तर पुढे आपले काय? या भीतीने खुद्द भास्करभटानेच तीन-चार वर्षांपूर्वी गुपचुप जाऊन 'कालिंदीला मुलगा पसंत नाही' असा निरोप दिला होता. मुलाला कालिंदी पसंत होती, म्हणून पुढच्या बोलण्यासाठी राधाबाईने दोन दिवस वासरासारखी वाट पाहिली. पुढे त्या मुलाच्या लग्नात त्याच्या आईने कुत्सितपणे सांगितलेल्या हकीकतीतून तिला भास्करभटाचे 'सारे कर्तृत्व' कळून आले. दोन दिवस तिने अन्नाच्या कणालाही स्पर्श केला नाही व भास्करभटाला बोलून बोलून तिचा घसा बसला.

'तिच्या पैशावर जगायला काय धाड झालीय आम्हाला?' ती वैतागाने म्हणाली होती, 'तुम्ही नको पण माझे हातपाय धड आहेत तोपर्यंत राबेन मी. नाहीतर मग दोघेही उडी टाकू विहिरीत एकदाची!'

त्या प्रसंगाची आठवण झाली, की भास्करभटालाही शरमेने आपला चेहेरा कुठे लपवावा हे समजत नसे. भास्करभटाचे मन कायम झाडांत गुंतलेले होते. टिचभर परसात तो खुरप्याने खसाखसा जमीन उकरी व उदंड उत्साहाने झाडे लावी. 'एक तरी झाड उत्साहाने पाने उघडत हिरव्या आनंदाने वर वर यावे, तेथे पोसावे व फुलांच्या खाली तृप्त दिसावे, ही त्यांची इच्छा कधीच पूर्ण झाली नाही. तासभर काम करून तवाभर खडे वेचून काढावे, दिवसामागोमाग दिवस तांब्याने पाणी घालावे. मग एक दिवस वाळून अगर कुजून गेलेले झाड काढून टाकावे, हीच नेहेमी फलश्रुती होत असे! त्यामुळे फुलझाडे आपल्या नशिबी नाहीत म्हणून त्याने ती लावायची बंद केले होते. पण मिरचीचे झाड- ती मात्र एक ईर्ष्या होती. ते त्यांच्या आयुष्यातील एक स्वप्न होते. पंधरावीस वेळा त्याने बिया टाकल्या. अनेकदा झाडे आलीही. पण नंतर ती वेडीवाकडी व्हायची. एखादेदुसरे फूल आले, की पिवळसर पडायची. या वीतभर जमिनीत खाली एखादा

विषारी साप बसून फूत्कार टाकतो की काय असे त्याला नेहेमी वाटे!' राधाबाई चिडून विचारायची, 'नेहमी जळळं त्या मातीत काय करता? आता तुम्ही मोठ्ठं हत्तीच्या पायाएवढे शेत करणार आहात दोन मिरची झाडावर!' परसात माती उकरत असता राधाबाई आली की तो शरमत असे, आकसत असे. तिला झाडाविषयी कशी आपुलकी वाटत नाही, हे त्याला समजत नसे. त्याच्या ह्या प्रयोगांकडे राधाबाई कायम सुरकुतलेल्या नाकानेच पाहायची. तिचे सारे आयुष्यच कालिंदीच्या काळजीने गहाण पडले होते आणि भास्करभटाला तर कालिंदीची, राधाबाईची, घराची शुद्ध नव्हती. बाहुलीच्या गळ्यातील काळा मणी हरवला या बातमीपासून शाळेजवळ एक लंगडी शेळी दिसली इथपर्यंत साऱ्या बातम्या सांगणारी राधाबाईची कालिंदी हरवली होती. त्या हरवलेल्या कालिंदीला शोधण्याकरिता, तिला पुन्हा पूर्ववत हसरं करण्याकरिता, राधाबाईचे व्याकुळ मन बरेचदा दिवास्वप्न पाही. 'अखेर कालिंदी आपल्या घरी गेली. ताशे-सनई, मंडळींची गर्दी, जेवणावळी यात राधाबाई आनंदाने गुरफटून गेली. शेवटी, आता परक्याची झालेली कालिंदी आपल्याला अगदी चिकटून उभी आहे. आपल्या श्वासामासाची पण आता दुसऱ्याची..... त्या क्षणाच्या छायेनेदेखील तिचे मन हिरमुसकल्यासारखे झाले. कालिंदीला दाग नकोत, दागिने नकोत, फक्त ती घरची आहे असे वागवले तरी पुरे. ती एक॰ हळदीच्या पावलांनी आपल्या रस्त्याला लागली की आपण सुटलो. मग आपल्या आयुष्याला कितीही ठिगळे लागू देत, दंड पडू देत.....'

कालिंदी दिसायला अगदीच साधी, ठेंगणी, निबर होती, तर चेहेऱ्यावर असलेल्या बारीक लवमुळे ती रानवट वाटे. तिचे लग्न जमत नव्हते. बिचारी कायम शरमलेल्या चेहेऱ्याने खाली मान घालूनच वावरत असे. आज यळूरकरांकडून निरोप यावयाचा होता, पण भास्करभटाने तेवढेही काम स्वतः न करता वासू परांजपेवर सोपविले. यळूरकरांची मंडळी घरी येणार म्हणून सर्व जुळवाजुळव करण्यासाठी राधाबाई दिवसभर धडपडत होती, आणि इथे भास्करभट शांतपणे जमीन उकरत बसला होता. हताशपणे कपाळावर हात मारून पाणावलेल्या डोळ्यांनी तिने विचारले, 'येतो म्हणाली ना ती मंडळी?' 'त्यांनी सांगितलं मुलगी पसंत नाही!' जणू हा विषय आता संपला ह्या कल्पनेने भास्करभट पुन्हा जमिनीकडे वळला, कालिंदीच्या बाबतीत असे काही घडले की, मर्मी लाथ बसल्याप्रमाणे राधाबाई तळमळत असे. प्रेम शिंपून वाढविलेली कालिंदी कुणालाच कशी नको आहे हे तिला समजेनासे झाले. उद्या जर पट्दिशी आपल्याला काही झाले तर कालिंदीचे काय होईल ह्या विचाराने रात्री ती तळमळत असे. व मग कालिंदीला ऐकू जाऊ नये म्हणून, ओठ दाबून भोवतालचा अंधार ओलाचिंब करीत ती मूकपणे रडू लागे. एका आईची ही 'व्यथा' आपल्याला खोलवर हलवून सोडते.

उतू चाललेल्या दुधाप्रमाणे देहभान विसरून परस्परांवर आतुरतेने उत्कट प्रेमाचा वर्षाव करणारे जोडपे कमल आणि तिच्या नवऱ्याच्या रूपाने 'शलॉम' या कथेत दिसते.

ठरलेल्या वेळी घाईघाईने घरी येणारा नवरा, तो येणार हे निश्चित माहीत असूनही दारात उभी राहून त्याची वाट पाहाणारी कमल, ऐटीत सायकलवरून उतरून त्याचे धडधडा जिना चढणे, तो आत येताच कमलचे लगबगीने दार लावणे, त्याने आवेगाने तिला मिठीत घेणे, कुस्करणे, कमलचे खिदळणे, गुदमरणे, आणि सारखे हसणे, आला तितक्याच घाईघाईने त्याचे बाहेर निघून जाणे, केस सावरीत कमलचे देहभान विसरून त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात राहाणे, तो गेल्यावरही भांडे हिंदकळत असल्याप्रमाणे कमलचे हसत राहाणे, या सर्वांतून आपल्याला त्या दाम्पत्याचे सुखी वैवाहिक जीवन प्रतीत होते.

आडव्या खडकाप्रमाणे वाढलेला राचय्या आणि केवड्याच्या कणसाप्रमाणे भासणारी भवरी हे परस्परांना सर्वस्वी अनुरूप असलेले, एकमेकांशी समरस झालेले जोडपे होते. घळईतील आयुष्य संपले तेव्हा नाइलाजाने वस्ती सोडून जाणारा राचय्या हाच शेवटचा पुरुष होता. रामण्णाने एकटे दुकटे वनवासी राहण्यापेक्षा आपल्याबरोबर चलावे म्हणून राचय्याने दहाव्यांदा दातांच्या कण्या केल्या.

रामण्णाची त्या मातीतून पाऊल उचलण्याची बिलकूल तयार नव्हती, म्हणून शेवटी राचय्या-भवरींनी बोचकी बांधली. रामण्णाकरता दोन दिवसांचे अन्न उकडून ठेवले, मरीआईला नारळ दिला आणि भवरीच्या गावी जाऊन नशीब पाहण्यासाठी ती दोघे वस्तीबाहेर पडली. ती दोघे दृष्टीआड होताच रामण्णा आतल्या खोलीत आला आणि हतबुद्ध झाला. चुलीजवळ भवरीने काढलेले चुन्याचे स्वस्तिक, हळदीकुंकवाची बोटे लावलेला नारळ, शेजारी ॲल्युमिनिअमच्या थाळीत रचून ठेवलेल्या भाकऱ्या, यावरून भिरभिरत आलेली रामण्णाची नजर, त्याच्या शेजारीच घडी करून ठेवलेल्या मोगली एरंडाच्या चिकासारख्या पांढऱ्या शुभ्र कांबळ्यावर पडताच तो सुन्न झाला. भवरीच्या बापाने तिला लग्नात दिलेले ते कांबळे तिने रामण्णाकरता मागे ठेवले होते. पोटच्या पोरीप्रमाणे आतडे गुंतवून जाणाऱ्या भवरीबद्दल त्याचा कंठ दाटून आला. पायावर डोके ठेवून पदराने डोळे पुसतच राचय्याच्या मागोमाग बाहेर पडलेल्या भवरीची मूर्ती त्याच्या डोळ्यांपुढून हलेना. बाहेरच्या खोलीत राचय्याने स्वत:चे गरम जाकीट आणि मुद्दाम हौसेने करवून घेतलेल्या, एकदाही न वापरलेल्या, कुरकुरू आवाज करणाऱ्या, वीतभर उंच टाचांच्या लाल बेगडाच्या झगमग पट्ट्या असलेल्या नव्या करकरीत वहाणा सहज दिसणार नाही अशा तऱ्हेने मुद्दामच एका बाजूस ठेवल्या होत्या. मुलाच्या आणि सूनेच्या आपल्यावरील प्रेमाने रामण्णा एकदम हळवा झाला. (ठिपका).

दादा घर सोडून गेला, सुम्मी विहिरीत पडून मेली, नानांनी अंथरूण धरले, साऱ्या घराचा भार आईवर पडला. तिने सुम्मीचा कथानायकाला वापरायला दिलेला रग काढून घेतला, दादाची गादी गुंडाळून ठेवली व एका चादरीला आपले लुगडे शिवून ती रजई तिने कथानायकाला दिली. कथानायक म्हणतो, 'ती देखील छान होती. शिवाय तिच्यात

मला आईजवळच झोपल्यासारखे वाटे; कारण तिला आईचा वास होता. ' आई त्याला लवकर उठवायची, अंघोळ झाल्यावर बारा नमस्कार घालून होइपर्यंत आई समोर पोलिसासारखी उभी असे. जांभेकरांकडे कथानायक पोळी मागतो ही गोष्ट त्या माऊलीला लागते. स्वत: सामान विकत आणून ती खायला खूप काही करते. झोपलेल्या कथानायकाला ती उठवते. तोंड धुवून यायला सांगते. ती 'कारट्या' म्हणाली नाही म्हणून तो घाबरतो. जांभेकरांच्या घरातल्यासारख्या पोळ्या बघून टाळी वाजवून विचारतो, 'जाभेकरांनी पोळ्या दिल्या?' काडकन् त्याच्या मुस्काटात देऊन ती माऊली बजावते, 'कारट्या, आजपासून लक्षात ठेव, तू भिकारड्याचा मुलगा नाहीस. असं लोकांच्या घरी खायला मागशील तर जीभ डागून देईन. माझे हातपाय उरावर आले नाहीत अजून. असलं भिकारड्यासारखं जगायला शिकू नको. खा, गीळ ती पोळी, ती आपलीच आहे.'

पहिलीचा निकाल लागल्यावर आई कथानायकाला घट्ट जवळ घेते, ती किती बदलून गेली आहे हे तेव्हा त्याला जवळून जाणवते. ती पुढे म्हणते, 'कारट्या, तू बी. ए. हो अगर होऊ नकोस, पण आतून बाहेरून मात्र अगदी दगड हो! अगदी घट्ट डोंगरी दगड हो!'

भरल्या वांग्याची भाजी आवडते म्हणून वारंवार वांगी आणणारे नाना आणि घरात इतर भाजी असली तरी नानांसाठी वांग्याचीच भाजी करणारी आई, कृष्णीसाठी आठवणीने पाच पेंढ्या गवत आणणारे नाना, आणि त्यांच्या आजाराचे कसे कुणास ठाऊक समजणारी कृष्णी गाय, डोळ्यांतून पाणी पाझरवत मूकपणे नानांच्या आधी संपून गेलेली कृष्णी गाय, रागावला म्हणजे नानांसारखा दिसणारा दादा, तर आई हसली की सुम्मीसारखी दिसे, दादा-सुम्मीची प्रेमळ भांडणे, दादाचे सुम्मीसाठी तीळतीळ तुटणे, कथानायकासाठी तर सुम्मी म्हणजे त्याची लहान आईच असणे, सुम्मीचे इरसाल सासर आणि विहिरीत पडून तिचा झालेला अपघाती मृत्यू-नव्हे सासरच्यांनी पाडलेला तिचा खून, नानांचे आजारपण, चुकून त्यांचे 'सुम्मा' म्हणून हाक मारणे, सदैव 'कारट्या' या शब्दाने संबोधूनच आईचे कथानायकाशी बोलणे, व ती 'कारट्या' म्हणाली नाहीतर घाबरणारा कथानायक, रातोरात अपुऱ्या कापडातून भाच्यासाठी सदरा शिवून देणारा, तो भल्या पहाटे आणून देणारा प्रेमळ श्रीपूमामा, घरात कुणीच जेवले नाही तरी लागलेली भूक आवरता न येणारा छोटा कथानायक– एका सुखी, आनंदी, प्रेमळ कुटुंबाचे वास्तव चित्र आपल्याला 'तुती' या कथेत दिसते.

छोट्या कथानायकाला दोन-चार अंडी तळून द्या, असे डॉ. काळेंनी सांगताच आबा भेदरलेत. एक तर आई घरात अंडी कशी काय आणू देणार हा प्रश्नच होता, आणि खरे म्हणजे अंडी मिळतात कुठे, तेच आबांना माहीत नव्हते. शेवटी अंडी आणून दिली गणेशवाडीभटाने, आणि तीही पूजेच्या ताम्हणातून. आईला आवडत नाही म्हणून

मग आबांनीच एक दिवसाआड एक अशी ती अंडी, परसात दूर लाकडे ठेवायच्या खोलीत कथानायकाला तळून दिलीत.

एकदा आबांनी थट्टेत आईला 'म्हातारी' म्हटले, तर दोन दिवस ती त्यांच्याशी भांडत होती. शेवटी आबांनी हात जोडून म्हटले होते, 'चुकलो बाई, जगदंबे! जगदंबा कधी म्हातारी होत नाही.' भांडण आणखी दोन दिवस लांबले.

राधीच्या बरोबर कथानायक करंदीकरांच्या घरी जातो. राधीच्या खांद्यावर पाय देऊन झाडावरचे आवळे तोडतो, आणि दप्तर भरून घेतो. तोपर्यंत अंधार पडायला आला होता. घरी येताच आई त्याची खरपूस हजेरी घेते; आणि पिशवीतील सर्व आवळे बाहेर फेकून देते. त्याला अद्दल घडवायला ती देवदारी फळकूट उचलते. कधी नाही ते त्या दिवशी बाबादेखील त्याच्यावर चिडतात आणि फळकूट घेऊन ते त्याला ढकलत अद्दल घडविण्यासाठी माडीवर नेतात. कथानायक अगदी रडकुंडीला येतो. पण माडीवर येताच आबा डोळे मिचकावून हसतात. दोनचारदा शास्त्रासाठी फळी त्याच्या अंगाला लावतात. 'आबा, हे काय?'

'काय म्हणजे? फळीनं मारीन असं मी म्हणालो होतो ना? मी तुला आता फळीनं मारतो आहे. किती जोरात मारीन असं कुठं मी सांगितलं होतं?' त्या दिवसापासून आबा त्याचे दोस्त झाले. ते राधीविषयी विचारत व तो न विचारलेल्या पुष्कळ गोष्टी त्यांना सांगत असे.

कितीतरी दिवसांनी राधी घरावरून जाते, पण तिचे कपडे पाहून त्याला तिची लाज वाटते. शेवटी आईच एक जुनेरे त्याच्याजवळ देऊन राधीला नेऊन द्यायला सांगते. 'जा, घाल जा तिच्या मढ्यावर ते! एकेकाची देणी असतात जन्मात. ती फेडल्याखेरीज गत्यंतरच नसतं कुणाला.' आबा त्याला थांबवून ते जुनेरे वर्तमानपत्रात गुंडाळून देतात व हळूच त्याच्या खिशात दोन रुपयांच्या नोटा सरकवून, त्या खुणेनेच राधीला द्यायला सांगतात.

'राधी' या कथेतील आबा आणि आई हे सर्वार्थाने परस्परांना अनुरूप असे जोडपे होते. त्यांच्यातील प्रेमळ भांडणाची लज्जतही न्यारीच. 'राधी' या कथेत आबा आणि आई यांच्या सुखी, समाधानी, वैवाहिक जीवनाचा प्रत्यय आपल्याला पदोपदी येतो.

भाऊंच्या पत्नीला शिवणकामाची अतिशय आवड होती. बरेच दिवस मिणमिणत्या दिव्याच्या धुरकट प्रकाशात ती सारखी काहीतरी शिवत असलेली भाऊंना दिसे. पण चुकून भाऊ जागे झाले, की ती भराभर सर्व गाठोड्या कोंबून उगाचच एखादे जुनेरे हाताळू लागे. भाऊंना थांगपत्ता लागू न देता तिचे काहीतरी 'गुपित' काम चालू होते. ज्या संधीची ती वाट पाहत होती, ती एक दिवस आली. बाहेर हाडे चिंबणारी थंडी पसरली होती. खिडकीपाशी बसलेल्या भाऊंनी कुडकुडतच पत्नीला पांघरायला काहीतरी मागितले. ती स्वच्छ हसली, आणि हळुवार हातांनी तिने ती रजई त्यांच्या

अंगावर पांघरली. त्यावर प्रकाश पडताच निरनिराळे रेशमी तुकडे झगमगून इतके सुंदर दिसू लागले की भाऊ आश्चर्याने क्षणभर थक्क झाले. 'समोर समाधानाने उमललेल्या डोळ्यांनी ती उभी होती. केळीसारखी नितळ, सडपातळ, साधी. त्या क्षणी आपल्या जीवितातील केवढ्या सुखाला ती जबाबदार आहे याची त्यांना उत्कट जाणीव झाली.' अंगावर रजई घालून समोर उभे असलेले भाबडे चित्र भाऊंच्या स्मृतीवर कायमचे कोरले गेले. जी. एं.च्या 'कथे'तून आढळणारे हे असे मोरपिसासारखे हळुवार क्षण आपल्या अंतर्यामी कुठेतरी खोलवर सुखवून जातात. क्षणभंगूर, अर्थशून्य जीवनातील हा मायेचा अर्थपूर्ण क्षण आपल्याला मानवी जीवनातील निखळ आनंदाची तरल जाणीव देतो. (राणी).

तानीमावशीच्या संसाराला 'तुळसा'ची कीड लागली होती. भाऊराव व तानीमावशीची तुळसावरून बोलाचाली होते. रागाने ताणलेली तानीमावशी विझल्यासारखी होते आणि स्वत:शीच पोकळ आवाजात बोलते, 'मला वाटलं होतं, मी जाते म्हणताच तरी ते वठणीवर येतील, पण त्यांनी मलाच जा म्हणून सांगितलं की! आता मात्र माझ्या आयुष्याची निरीच सुटली.' रात्री तानीमावशी व भाऊराव यांचे जोरात भांडण होते. आरडाओरड्याने कथानायक उठतो. भाऊरावाने तानीमावशीला भिंतीकडे ढकलले व तिच्या गळ्यातील बोरमाळ हिसकावून घेतली. कथानायक तिरीमिरीने उठतो व भाऊरावाच्या हाताला काडकन चावतो. भाऊराव पायानेच त्याला भिंतीवर आदळतो. वेंधळ्यासारखी उभी असलेली तानीमावशी धुणे वाळत घालण्याची काठी हातात घेऊन शांतपणे म्हणते, 'ठीक आहे, शेवटी हे असंच व्हायचं होतं तर ! पण त्या पोराला जर पुन्हा हात लावशील, तर आईची शपथ घेऊन सांगते, की मी तुझ्या अंगाचा शेणकाला करून टाकीन.'

. तानीमावशी भाच्याला म्हणते, '....मी कधी देवाकडे फारसं मागितलं नाही. पण जे अगदी थोडं मागितलं, ते देखील त्यानं दिलं नाही, म्हणून मला त्याचा पुष्कळदा राग येतो. मला काय घोडागाड्या, वाडा, अंगावर पासरीभर सोनं पाहिजे होतं? पोटापुरतं खायला असावं. एखाददुसरं पोर असावं स्वत:चं, आपला म्हणता येईल असा संसार असावा, एवढ्यावरच ते झाड समाधानाने जगतं, वाढतं. मला एकदा हे सगळं मिळालं देखील होतं; पण इथं आले, आणि जी कीड लागली ती अगदी मुळासकट!" तानीमावशीची ही वेदना आपल्याला व्याकुळ करते. जीवनाकडून तानीमावशीची अत्यंत माफक अपेक्षा होती, पण तीही पूर्ण न होता, तानीमावशीचा सुखी संसार उद्ध्वस्त झाला. याला सर्वस्वी जबाबदार तिचा चंगीभंगी नवरा भाऊराव होता. तानीमावशीच्या डोळ्यांदेखत तो उघडउघड मोलकरणीबरोबर रंग उधळत होता. घरी भांडी घासायला येणाऱ्या तुळसाने तिच्या कुंकवात भागीदारी केली होती. भाऊराव तुळसाच्या पार नादी लागला होता. भांडणाच्या ओघात तो तानीमावशीला सरळ सांगतो की, 'तानीमावशी

आणि तुळसा यांच्यात निवडच करायची झाली तर तो तुळसाची निवड करेल.' त्याच्या ह्या कृतघ्न शब्दांनी तानीमावशीच्या आयुष्यातील उरला सुरलाही अर्थ नाहीसा होतो. स्वत:च्याच घरात ती उपरी ठरते. रात्री तो तिला तुळसासाठी माळ मागतो. दोघांचाही आरडाओरडा चालू होतो. भाऊराव तरातरा दवाखान्यात जाऊन परत येतो व तानीमावशीपुढे विषाची पुडी टाकतो.

'मरतो मरतो म्हणणारे असले मी पुष्कळ बघितले आहेत,' ते म्हणाले, 'तुला मरायचं आहे ना, घे हे औषध. चार माणसांना पुरून उरेल बघ. असल्या धमक्यांना मी कंटाळून गेलो. आणि आता बऱ्या बोलाने ती माळ दे.' भाऊरावाने तानीमावशीला भिंतीकडे ढकलले आणि तिच्या गळ्यात हात घालून माळ हिसकावून घेतली. हिसकाहिसकीत मंगळसूत्रही तुटले व काळे मणी इतस्तत: विखुरले. नंतर भाच्याला श्रीपूमामाकडे परत पाठवून तानीमावशी भाऊरावानेच आणून दिलेले विष घेऊन झोपते, ती उठतच नाही. एक साधीसरळ प्रेमळ पत्नी, नवऱ्याच्या पाजीपणामुळे जीवनातून उठते, संपून जाते. (कैरी).

काशीचे आयुष्य म्हणजे बापाने तिच्यासाठी निर्माण केलेला दुसरा तुरुंगच. काशीला बापाची आठवण आहे ती म्हणजे तिच्यामागून येणाऱ्या बापाच्या चिडचिड्या कर्कश आवाजाची. अर्धा तास अंगावरून सरडे चढत-उतरत असल्याप्रमाणे त्याचे शब्द तिच्या अंगावर पडणार याचीच. सतत आठ वर्षे अंथरुणाला खिळून चार दिवसांपूर्वीच तिचा बाप कायमचा बाहेर पडला आणि तिचा दुस्वास संपला. जन्मदात्या- विषयीच्या काळ्या विषारी द्वेषाने पेटलेली काशी आपल्याला दिसते. पण त्या बरोबरच निवेदनाच्या ओघात त्याचे कारणही आपल्याला कळते आणि मग उरते ती काशीबद्दल सहानुभूती. बापाच्या गळ्यावर दोन्ही हात ठेवून तो अगदी चिरडून टाकावा असे काशीला वाटते. हे काशीचे मन प्रथमदर्शनी सुखवस्तू पांढरपेशा समाजातील माणसाला विकृत वाटावे असेच आहे. पण काशीचे हे मन तिच्या अनुभूतींशी अत्यंत प्रामाणिक आहे, असेच म्हणावे लागेल. त्या अतृप्त, हाडकुळ्या माणसाने तिच्या आईचे आणि तिचे आयुष्य सापाप्रमाणे पिऊन स्वत:चा देह पोसला होता. बापाने काशीला जे दिले त्यातून अपरिहार्यपणे निर्माण झाला तो काशीचा बापाबद्दलचा विखार. काशीची ही प्रतिक्रिया अत्यंत नैसर्गिक वाटावी अशीच आहे.

काशीला आईची आठवण एकच. ती पाच-सहा वर्षांची असताना बापाने आईला लाकडाने बडवले, लाल सळईने तिच्या दंडावर तीन वळ ओढले आणि घराबाहेर काढले. आई नंतर मामाकडे गेली. काशीला मात्र जतन करायला एक शब्द देखील तिने ठेवला नाही. 'काय केले होते आईने, की काय केले नव्हते?' काशीला त्याचा कधीच उलगडा झाला नव्हता.

आईवडिलांच्या मायेविना उकिरड्यावरील रोपट्याप्रमाणे वाढलेली ही पोर,

तिच्या सुखदु:खाचे सोयरसुतक कोणालाच नव्हते. मुलीवर होणाऱ्या आईच्या वात्सल्याच्या वर्षावाची एकही सर काशीच्या वाट्याला कधी आली नाही. जन्म देण्यापलीकडे तिच्या आईने तिच्यासाठी काहीही केले नाही. वात्सल्याची ही भूक तशीच दबलेली रहाते. (शलॉट).

दागदागिने, स्वत:चे घर आणि लौकिकार्थाने व्यवस्थित चालू असलेला संसार असूनही त्यात गाविंदराव-सावित्रीबाई हे दाम्पत्य सुखी नव्हते. बरेच दिवस पोटी अपत्य नसलेली सावित्री, नवऱ्याने आग्रहाने घरी ठेवून घेतलेल्या त्याच्या बालमित्राशी, श्रीपादशी केव्हा शरीरसंबंध जुळविते तिचे तिला माहीत. श्रीपादला वेडाचा झटका आला होता, आणि हवापालट म्हणून गोविंदरावानेच त्याला आग्रहाने चार-सहा महिने ठेऊन घेतले होते. वासनेने चाळवली गेलेली, मतीभ्रष्ट झालेली सावित्रीबाई, नवऱ्याशी प्रतारणा करून स्वत:ची वखवखलेली भूक भागविते. दिवस जातात. मुलगा होतो- बापू. बापूला लहानपणीच वेड लागते आणि त्याला वारंवार हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागते. बापूला पाहिलं की गोविंदरावांना अपरिहार्यपणे श्रीपादची आठवण येई. घराण्यात कुणीही वेड नसताना बापूलाच तेवढं वेड का लागावं- त्याचे कारण गोविंदरावांनी जाणलं होते, पण उघडपणे आपली ही 'जखम' ते कुणाला दाखवूही शकत नव्हते. सावित्रीचे जग निराळे, तिचे दु:ख निराळे, तिच्या बाबतीत आपण अखेर उपरेच ही गोविंदरावांना सतत बोचणारी वेदना होती. बापू, सावित्री, फणेरीपेटीतील दागिने आणि रक्त आटवून बांधलेले घर, यातील कशाशीच आपला आतड्याचा संबंध नाही, हे गोविंदराव जाणून होते. तरीही त्या भल्या माणसाने तशाही स्थितीत बापूला वा सावित्रीला काहीही कमी पडू दिले नव्हते. निर्लज्ज सावित्रीच्या मस्तकावर त्याच्या घराचे छत्र कायम होते. पोटी अपत्य नाही म्हणून, छिनालपणा करण्याची वस्तूत: सावित्रीला काय गरज होती! (जखम).

'प्रदक्षिणा' ही कथा शांताक्कांच्या निष्फळ, निष्प्रेम, एकाकी जीवनाची मन विदीर्ण करणारी एक अतिशय दु:खद कथा आहे. शांताक्कांच्या शोकांतिकेला सर्वस्वी जबाबदार असलेला त्यांचा पती, दादासाहेब हा आपल्या समाजातील पुढारी, देशभक्त, थोर समाजसेवक!

शांताक्कांच्या शाळेत स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून गेलेले असताना कपिलेश्वराच्या तीर्थाजवळ आंबराईत, रक्ताच्या आवेगाने शांताक्कांवर त्यांनी टाकलेला राकट, आसुसलेला हात.... तो जवळजवळ बलात्कारच होता. नंतर काळ्या मण्यांनी त्याला आधारासाठी बोहले दिले इतकेच. आपल्या असहाय अवस्थेत दादासाहेबांनी दिलेला चोख, खणखणीत शब्द पाळला ही शांताक्कांची तीस वर्षांची समजूत कशी खोटी, भ्रामक होती ते राजाभाऊंकडून तिला समजते. जंगलखात्यातला उग्र दिनूमामा बंदूक घेऊन छाताडावर उभा राहिला म्हणून ते लग्न पार पडले.

चोरट्यासारखे झालेले रामकृष्णाचे बारसे. शांताक्का रामकृष्णाला चिरक्या अनैसर्गिक आवाजात सांगतात, 'त्यानंतर माझ्या आयुष्याला पुरुषाचा स्पर्श झाला नाही. गेल्या तीस वर्षांत तुझ्या वडिलांनी मला हात लावला नाही. लग्नाआधी मी पत्नी झाले, आणि लग्नानंतर कुंवार राहिले. असलं अभद्र आयुष्य मी तीस वर्षं जगवत आले आहे.' दादासाहेबांनी स्वत:ची भूक मात्र व्यवस्थित भागविली. तिथे तडजोड नव्हती. शांताक्कांच्याच लहान बहिणीबरोबर, जान्हवीबरोबर पुण्याला त्यांनी राजरोस घर केले.... यात चोरटेपणा होता तो जान्हवीला. जान्हवीच्या बॅगेत दादासाहेबांच्या खाजगी कपाटातील छोटी कातडी पिशवी बघून शांताक्का सर्पाचे वेटोळे पाहात असल्याप्रमाणे थरकतात. त्यातील दादासाहेबांच्या पत्रांतून त्यांनी केलेली स्वत:ची प्रतारणा शांताक्कांना कळून चुकते. पाठीला पाठ लावून आलेल्या जान्हवीने आपला असा विश्वासघात करावा याचा जबर धक्का त्यांना बसतो. तर उलट शांताक्कांनीच आपला विश्वासघात केला, आपले सुख, आपले आयुष्य चोरटे केले असा दावा जान्हवी करते.

एकमेकांबरोबर निमूटपणे राहाणारे, पण वस्तुत: एकमेकांना पूर्णपणे विटलेले जोडपे भाऊराव-भाऊमामी होते. मध्यम वयाच्या या दांपत्याला मूल नव्हते. होण्याची शक्यता नव्हती आणि हेच त्यांच्या दु:खाचे मुख्य कारण होते. व्यवस्थित, जेथल्या तेथे, चित्राप्रमाणे निर्जीव भासणारे घर भाऊमामांना खायला येई. वीस वर्षे भाऊमामांच्या त्याच त्या हालचाली, घाणेरड्या पाण्याच्या ठिबकणाऱ्या थेंबाप्रमाणे त्यांच्यावर पडत होत्या. संतापून त्याबद्दल हजारदा सांगून झाले असेल, पण भाऊमामीत काडीचाही बदल झालेला नव्हता. चहाची चव त्याच्या गरमपणात असते हे भाऊमामाला कधीच कसे समजले नाही, याचे भाऊमामीला आश्चर्य वाटे. वयाची सत्तेचाळीस वर्षे पूर्ण केलेल्या भाऊमामाची सुस्त बेडकीसारखी दिसणारी दुसरी हनुवटी पाहून भाऊमामीला शिसारी येई. खायला प्यायला काही कमी नाही, पण एकमेकांच्या सान्निध्यात आयुष्यावरील करवंटी काही फुटली नाही, चिमुकली पावले काही दुडूदुडू धावली नाहीत, याचे तिला वैषम्य वाटे. नेमक्या आपणा दोघांनाच निष्फळ एकत्र आणण्याचा हा वांझोटा व्यापार कुणी केला असेल, याचे भाऊरावांना आश्चर्य वाटे. भाऊमामीचे ओबडधोबड अंग, तिचे हमखास दाराच्या चौकटीला धडकणे पाहून भाऊमामांना कायम संताप येत असे, पण नेहेमी ते दात घट्ट दाबून आलेला राग गिळत व सारे काही सहन करीत. (स्त्रीला).

रमाला बाधा होताच तिचा आता आपल्याला काही उपयोग नाही हे पाहून चक्र दुसरे लग्न जुळविण्याचा प्रयत्न सुरू करणारा गोपाळराव आपल्याला 'बाधा' या कथेत दिसतो. घराकरता राबराब राबणाऱ्या रमाला तो क्षणात झटकून टाकतो. रमाला माहेरी पोहोचविण्याचे आई आणि गोपाळराव ठरवून टाकतात. वास्तविक 'रमा दिसायला केवड्यासारखी, वागायला इरकली लुगड्यासारखी कुलवंत. पाचसहा वर्षे संसार कसा देवीच्या आरतीसारखा झाला.' पण दोन-चार महिन्यांपासून रमाला कशाने झपाटले

कुणास ठाऊक. ती पाणी तर पाणीच भरीत राही. सर्व भांडी– अगदी लहान वाट्या, तामली, वापरात नसलेला तांब्यासुद्धा पाण्याने भरी. पिंपळाला प्रदक्षिणा घालायला लागली, तर महिन्याच्या प्रदक्षिणा एकाच दिवशी घाली. तिने एकदा भिकारणीला पातेल्यासकट भात दिला. आईचे सारे उपाय रमेपुढे थकले. बरेचदा आई तिला ताडताड बोलत. तिच्या लहानपणीच वारलेल्या आईचाही उद्धार करीत. रमा अशावेळी सुन्न होई. रात्रीच्या भांड्यांचा ढिगारा घासणे, अंथरुणे घालणे, कपड्यांच्या घड्या घालणे अशी एकामागून एक कामे ती निमूट करीत राही. रात्री बिचारी अंथरुणात गुपचुप रडत राही. कधी कधी आईला रमाला पाहून भडभडून येई. तिच्या सोन्यासारख्या संसाराला कुणी चेटुक केले हेच त्यांना समजेना. खोदूनखोदून त्या रमाला पुष्कळदा 'काय होतंय' म्हणून विचारीत व मग हताशपणे 'कारटीला कसली बाधा झालेय कुणास ठाऊक!' असे म्हणून गप्प बसत. आपल्याला माहेरी पोहचवून देण्याबद्दल चाललेले आईचे व गोपाळरावाचे संभाषण रमाने ऐकले, पण तिला ते खरेच वाटेना. गोपाळरावाने तर कुणाला नकळत दोन दिवसांपूर्वीच देशपांड्यांची मुलगी पाहिली होती, आणि तिच्याशी लग्न करण्याच्या विचाराने त्यांच्या मनाचा पूर्ण ताबा घेतला होता. पण ओलसर डोळ्यांच्या, दिनवाण्या चेहेऱ्याच्या रमाला कसे झिडकारायचे हे त्याला समजेना. अखेर त्या गुंत्यातून रमानेच त्याची सुटका केली. तलावावर पाणी भरायला गेलेली रमा एकेक पायरी उतरत पाण्यात खोलखोल उतरत गेली. पाणी क्रमाक्रमाने तिच्या गुडघ्यापर्यंत आले, आणि पाण्याचा स्पर्श एकदम आग्रही झाला. स्वत:च एक लाट असल्याप्रमाणे रमा तरंगू लागली, आणि मग तो सुटकेचा सोन्याचा क्षण आला.(बाधा).

स्वत:च्या कर्तृत्वाच्या कैफात बायकोला अगदी कस्पटाप्रमाणे वागवणारा अण्णाराव आणि त्यांच्या हडेलहप्पी वागण्यापुढे निमूट मान तुकवणारी काकू 'तक्षक' ह्या कथेत आपल्याला दिसतात. संसार हा दोघांनी मिळून करावयाचा असतो हे अण्णारावच्या गावीच नव्हते. त्यांची इच्छा म्हणजे वज्रलेप. स्वत:च्या मुलांच्या बाबतीतही तो बाप नसून ताप बनला होता. घरचा तो रक्षक न ठरता तक्षक बनला होता. स्वत: कर्तृत्ववान असूनही मुलांच्या आयुष्यांना योग्य वळण देणे त्याला जमले नव्हते. एकुलत्या एका मुलीच्या, प्रेमाच्या, प्रेमविवाहाच्या प्रस्तावाला त्यांनी त्यांच्या नेहेमीच्या पद्धतीने उधळून लावले. अत्यंत शालीन असलेली प्रेमा दहा वर्षात पाहता पाहता पार बदलून गेली. एक दिवस ती बापाला ठणकावून सांगते, 'दादा, आता माझं आयुष्य माझं आहे.... मागे एकदा मी त्याबद्दल तुम्हाला विचारलं आणि तुम्ही मला चिरडून टाकलंत. आता मी मोकळी आहे. मी आता तुमच्यावर अवलंबून नाही. मी येत्या एक तारखेपासून नोकरी धरली आहे. आणि मी नंतर स्वतंत्र राहाणार आहे.'.... 'माझ्या जवळ तसं खूप आहे, आणि मला त्याचा अभिमान आहे. आता मी, तुम्ही

साऱ्या आयुष्यभर जे केलं तेच करणार आहे. जास्तीत जास्त किंमतीला मी त्याचा सौदा करणार आहे.' बोलल्याप्रमाणे प्रेमा घरातून निघून गेली. मोठ्या मुलाला, सदानंदला तर त्यांनीच अपमानीत करून देशोधडीला लावले. बिचारा एका तालुक्याच्या गावी निघून गेला. तिसऱ्या मुलाची चित्रकलेची आवड त्यांनी हिंस्रपणे चिरडून टाकली, आणि त्याला कापूसखरेदी दुकानात दूर राणीकोटला पाठवून दिले. चार महिन्यांनी ठार वेडा झालेल्या जयरामला कुणी तरी घरी आणून पोहोचविले. नंतर तो अण्णारावांच्या घरात, अण्णारावांच्या डोळ्यादेखत झिजत झिजत मेला. नवऱ्याने केलेली आपल्या तीनही मुलांची ही परवड काकूंनी उघड्या डोळ्यांनी निमूट सहन केली. स्वत:च्या मस्तीत चूर असलेल्या त्या दैत्यापुढे काकूंचे काहीही चालत नसे. सदानंद निर्वासित झाला, प्रेमाने अब्रूचे दुकान लावले, आणि जयराम मरून गेला, ही अण्णारावांची कमाई! कुत्र्याला हड हड करावे तसे काकूवर सदैव डाफरत असे. 'जा चालती हो डोळ्यांपुढून! तो रावजी, नरश्या, तू देखील– सगळेच पिंडावरचे कावळे आहात. हरामखोर! काळी करा तोंडं इथून. कसल्या लोकांशी गाठ पडली जन्मभर!' अशी त्याची मुक्ताफळे झेलण्यात त्या माऊलीचा जन्म गेला. सदानंदला दुकानासाठी दागिने दिले म्हणून काकूंवर ओरडले, 'तू आपले दागिने दिलेस, द्यायला हरकत नाही. पण जर तू तुझ्या बापाच्या घरून गुंजभर सोनं आणलं असतंस तर ते शोभून दिसलं असतं! स्वाभिमान दाखवावा, पण स्वत:च्या हिंमतीवर. आजपासून तू अंगावर गुंजभर सोनं घालू नकोस.' दुसऱ्या दिवसापासून गळ्यात दोऱ्याचे मंगळसूत्र घालून त्या भरल्या घरात काकू कर्दळीसारखी हिंडू लागली.

घरातील दारिद्र्यामुळे तीच तीच पातळे पुन्हा आलटून पालटून नेसणारी, प्रसंगी काकूंनी दिलेले स्वत:च्या सवतीचे, कृष्णाचे आवडते हिरव्या रेशमी काकणांच्या रंगाचे पातळ नेसणारी, ते नेसताना मनोमनी संकोचणारी कावेरी दारिद्र्यातही आनंदी होती. केस किंचित ओढून बांधणारी, ओले कुंकू लावणारी, कानातील मळक्या, हिणकस सोन्याच्या कुड्याव्यतिरिक्त अंगावर मंगलधातू नसलेली, आणि शहरी वातावरणाचा स्पर्श अद्यापही न झालेली कावेरी म्हणजे चालते बोलते 'पावित्र्य' होते. कसलाही हट्ट नसलेली, आहे त्यात समाधानी राहून सौख्याची फुले फुलविणारी, दरिद्री संसारातही तरारून पूर्ण फुललेली, बाळकूच्या बारीकसारीक खोडींना सांभाळणारी, जपणारी, काळजी घेणारी कावेरी, बाळकूला परसदारी वृन्दावनात फुललेल्या 'तुळशी'सारखी भासते.

अशा कावेरीवर बलात्काराचा प्रसंग का यावा? ही कुठली नियती? नियतीच्या या अगम्य, अतर्क्य तरी वास्तव लीलेमुळे वाचक अंतर्मुख होतो, व्याकुळ होतो. त्याच्या नकळत त्याची सहानुभूती कावेरीला प्राप्त होते. त्या सज्जन पण दुबळ्या जिवांच्या साध्यासरळ आयुष्यात दु:खाचे गरळ ओकून त्यांना अधिक दुबळे, अधिक केविलवाणे,

आणि कायम दु:खी करण्यात काय अर्थ आहे, असेच जणू कावेरीला वाटले. मेस्त्रीसारख्या मस्तवाल माणसाशी तोंड देण्यास, त्याला धडा शिकविण्यास आपल्या घरचे लोक-नरसूभट, बाळकू असमर्थ आहेत हे ओळखून असलेली कावेरी, स्वत:चा क्षोभ दडपून त्यांना अंधारातच ठेवण्याचा निर्णय घेते. घरच्या माणसांचे दुबळेपण कावेरी ओळखून होती, पण त्याबद्दल स्वत:च्या मनातसुद्धा ती त्यांना दोष देत नव्हती. सामान्य माणसे मूलत: दुबळीच असतात; म्हणूनच मेस्त्रीसारखे पोळ माजतात हे कटू सत्य ती जाणून होती.

दिवसभर एवढी अघोरी यातना भोगल्यावर सायंकाळी तिचा स्वत:चा निर्णय झाला आणि त्या यमयातनांपासून ती मुक्त झाली. स्वत: जे भोगले आणि आता जे संपविण्याचा तिच्यापुरता तिने निर्णय घेतला, त्यापासून बाळकूला दूर अंधारात ठेवून, कावेरीने कुठल्याही प्रकारे बाळकूशी प्रतारणा केली नव्हती. उलट आपल्या साध्याभोळ्या निष्पाप, दुबळ्या नवऱ्याला घडले ते सांगून जहरी, जळती वेदना देण्याचे तिने टाळले. या वेदनेचा भार आपल्या दुबळ्या नवऱ्याला पेलवणार नाही, तो कोलमडून पडेल, आयुष्यभर जळत राहील हे ओळखण्याची कुवत कावेरीत होती. म्हणूनच स्वत:चे दु:ख तिने एकटीनेच भोगले, संपवले.

कावेरीने तिला काय झालंय ते सांगण्याचे टाळले हे ओळखून बाळकू म्हणाला, 'आता सांगू नको, पण उद्या परवा केव्हातरी सांग. तीदेखील तुझ्या इतकीच अबोल होती.' आणि बाळकूच्या या वाक्यांनी 'कावेरीच्या मनात शेगडी उधळल्यासारखे झाले.'

'ती-देखील तुझ्या इतकीच अबोल होती.' बाळकूच्या या वाक्याने फणा उभारलेल्या नागाप्रमाणे कावेरीचे स्त्रीमन उसळले. तिच्या मनात 'शेगडी उधळल्यासारखे' झाले. त्या तशाही अवस्थेत आपल्या सवतीच्या, बाळकूच्या पहिल्या पत्नीच्या, कृष्णेच्या उल्लेखाने तिच्या मनाला डागण्या बसल्या व तिच्या मनातील कृष्णेबद्दलचा सूक्ष्म मत्सर जागा झाला. आपल्या संसारातील कृष्णेची ही भागीदारी तिला असह्य होई, पण ती बोलत नसे. निमूट दु:ख गिळी. मरूनही बाळकूच्या, घरच्यांच्या आठवणीतून अस्तित्व दाखविणाऱ्या कृष्णेचे जणू सावटच कावेरीच्या वैवाहिक जीवनावर पडले होते. कृष्णेच्या प्रत्येक उल्लेखाने कावेरीला सुई टोचल्याप्रमाणे सूक्ष्म वेदना होत असे. कावेरीच्या मनाची 'शेगडी' अशी उधळत असे. उधळलेले निखारे डाग देत, विखरत, स्थिरावत, हळूहळू विझत. पण त्या मधल्या काळात कावेरीच्या मनाच्या खापऱ्या खापऱ्या होत. कावेरी बाळकूच्या मनात स्थिरावली पण कृष्णेसह. कृष्णेला संपूर्णपणे विसरणे बाळकूला जमले नव्हते आणि हेच कावेरीचे दु:ख होते. जिचा द्वेष करणे अशक्य आणि जिची सतत भागीदारीही असह्य अशा मृत सवतीच्या, कृष्णेच्या सतत छायेखाली वावरण्याची शिक्षा कावेरीच्या नशिबी आली होती. वर या दु:खाचा निचरा होत नसल्यामुळे धुमसत धुमसत ते हळूहळू विझत असे. तोंड दाबून ह्या असह्य दु:खाचा मुका मार कावेरीला सहन

करावा लागत असे.

'हिरव्या रेशमी काकणांच्या रंगाचे, जुने पण अंग अद्याप जावळासारखे मऊ असलेले' कृष्णेचे पातळ कशाला टाका या विचाराने काकूंनी कावेरीला दिले. कृष्णेचे पातळ कावेरीला नको होते पण चेहेऱ्यावर नाराजी न दाखवता तिने ते स्वीकारले. त्या पातळाच्या रूपाने जणू कृष्णाच तिला लपेटली आणि त्यामुळेच कावेरी आतल्या आत पार संकोचली. सवतीच्या उष्ट्या ताटात जेवत असल्याची दाहक जाणीव घरच्यांना होऊ न देण्यात कावेरी यशस्वी झाली होती. हेही तिचे दु:ख ती एकटीच पेलीत होती, स्वत: जळून इतरांना आनंद देत-चंदनी उदबत्तीप्रमाणे.

वास्तविक कावेरीला रेशमीकाडी काकणे फार आवडायची. बाळकूने एक दिवस मोठ्या हौसेनी कावेरीसाठी काकणे आणली. स्वत:च्या पूर्वानुभवावर आधारित, कृष्णेला आवडत तसली - आमसोली काकणे. मुद्दाम विचारल्यावरच कावेरीची आवड त्याला कळली आणि तो अगदी हिरमुसला. कावेरीलाही स्वतंत्र स्त्री-मन होते हेच त्याच्या गावी नव्हते. कृष्णेच्या पूर्वानुभावरच तो कावेरीबरोबर संसार करीत होता. कृष्णेच्या आवडीनिवड कावेरीबाबत गृहीत धरीत होता. अगदी सहज कावेरीचे कृष्णेशी असलेले साम्य व्यक्त करीत होता. यामुळे नकळत कावेरी दुखावली जाते ही जाणीव तर त्याच्या आकलनापलीकडची होती. बाळकू रातपाळीला गेला. काकू देव्हाऱ्यासमोर आडव्या झाल्या. बाहेर नरसूभट झोपला. केवळ काकूंचे मन राखण्यासाठी गोळी घेऊन कावेरी अंथरुणात पडली. कावेरी हलकेच उठून बसली. पायातली कृष्णेची जोडवी काढून तिने हलकेच फणेरीपेटीत ठेवून दिली. काकणांचा अजिबात आवाज न होऊ देता ती बाहेर आली. जिना उतरून कावेरी शेवटच्या प्रवासाला निघाली. (काकणे).

'पराभव' या कथेतील 'आई' ही व्यक्तिरेखा म्हणजे निमूटपणे सगळे भोग भोगणारी एक दुर्दैवी स्त्री! नवरा असून विधवेप्रमाणे जिणे जगणारी, मुले असून एकाकी, अशी ही केविलवाणी स्त्री चंदनाप्रमाणे हळूहळू झिजत जाते. तेवढे झिजणे तिच्या हाती आहे, बाकी तिच्या हाती काही नाही.

रुक्मिणीवर, तिच्या मुलीवर तिची अपार माया. आईची मुलीवर जशी असायली हवी, तितकीच माया ती रुक्मिणीवर करते. दुधावरच्या सायीप्रमाणे ती रुक्मिणीला जपते, वाढवते. रुक्मिणी तरी कशी? तर हजारात देखणी. पायात सोन्याचे तोडे मिरवावेत अशा योग्यतेची! तिचे एकदा व्यवस्थित लग्न झाले की आईची एक जबाबदारी संपणार होती. पण नेमके नको ते होतें. गोपाळकृष्णाच्या उत्सवात रुक्मिणी सदानंदच्या जवळ येते, त्याच्याबरोबर काजूंच्या झाडांतून फिरते. तिचे सदानंदवर प्रेम बसते, आणि तिला सदानंदशी लग्नही करावेसे वाटते. वास्तविक सदानंद हा चांगला शिकला-सवरलेला. म्हैसूरच्या एका कॉलेजातील प्राध्यापक, रुक्मिणीला अगदी अनुरूप. गोष्ट अगदी साधी सरळ. पण मानवी जीवन इतके साधे, सरळ कुठे असते? आईला

कठोर व्हावे लागते. रुक्मिणीला सदानंदपासून तोडावे लागते. सदानंदला वाटेला लावावे लागते.

माधवला आईचे हे वागणे क्रूरपणाचे वाटते व तो आईला विचारतोही, 'त्यानं जर रुक्मिणीशी लग्न केलं असतं, तर काय बिघडलं असतं?'

आई माधवला काय सांगणार? रुक्मिणीची कशी समजूत घालणार? आपल्या संसाराचे धिंडवडे कुठली स्त्री आपल्या मुलांना सांगणार? शरमेनं काळवंडलेली आई कपाळावर हात मारून म्हणते, 'हे बघ, मी मरून जर रुक्मिणी सुखी होणार असेल ना, तर चल, तू दाखवशील त्या विहिरीत मी या पावली उडी घेते. मला काही मन, आतडं, काही नाही? तिला स्वत:चं सुखी आयुष्य मिळालं, तर मी त्याच्या आड येईन? थोरले काका जर कधी भेटले, तर विचार. माझ्या तोंडानं माझी लाज काढून घेऊ नको.'

सदानंदची आई ही तिची सवत होती. माधवच्या वडिलांचा- नारायणरावांचा- सदानंदच्या आईशी अनेक वर्षे संबंध होता आणि ती बाई अगदी वाईट चालीची म्हणून प्रसिद्ध होती. आता अशा घरात ती कशी रुक्मिणीला ढकलणार? बरे अवघड जागी असलेले हे दुखणे ती कुठल्या तोंडाने माधवला अगर रुक्मिणीला समजावून सांगणार? म्हणजे हा सगळा तोंड दाबून बुक्क्यांचा मार तिचा तिलाच सहन करावा लागणार होता. आणि त्या सहनशील माऊलीने तो निमूटपणे पचविला.

रुक्मिणीच्या पहिल्यावहिल्या प्रेमभावनेला निष्ठुरपणे चिरडताना तिच्या मातृहृदयाला काय कमी यातना भोगायला लागल्या असतील? मुलीचे सुख तेच वास्तविक तिचेही सुख होते. पण नेमक्या वडिलांच्या रखेलीच्या मुलाशीच मुलीने प्रेमसंबंध जोडावा या कर्माला ती काय करणार? रुक्मिणीसाठी तिचा जीव तीळतीळ तुटत होता. पण रुक्मिणीची ती समजूत घालू शकली नाही आणि हेच तिचे दु:ख होते. तिच्या विफल जीवनाचे ते जीवघेणे फलित होते.

दादा घरातून गेले ते आईला त्रासून, हे रुक्मिणीचे प्रामाणिक मत होते व ते ती माधवलाही पटवून देण्याचा प्रयत्न करी. दादा आईला त्रासून घरातून गेले नाहीत, तर ते त्यांच्या कर्माने गेले, हे माधवला उशिरा का होईना, पण कळले होते. बिचारी आई, तिच्या कपाळावरचे कुंकू आणि गळ्यातील मंगळसूत्र दोन्हीही तितकीच अर्थहीन, औपचारिक होती. आईचे सारे आयुष्यच केवळ नावापुरते झाले होते. नारायणरावांनी बँकेत तेरा हजार रुपयांचा घोटाळा केला व आपले ते कृत्य लपविण्यासाठी ते घरातून गेले. मग घराची अब्रू वाचविण्यासाठी थोरल्या काकांनीच स्वत:चे पैसे घातले. आईने निमूटपणे आपले सर्व दागिने, किडूक-मिडूक त्यांच्या हवाली केले, म्हणून सारे निभावले. दादा मात्र तेव्हापासून घरातून बाहेर पडले ते कायमचेच. आईच्या कुंकवाला दादांनी कधी मजबूत आधार तर दिला नाहीच; उलट त्यांच्या कृत्यावर आईलाच पांघरूण घालावे लागले. वर आईला त्रासूनच दादा घरातून गेले, हे ऐकून घ्यावे लागले.

दादांच्या संसारात आई ही पूर्ण फसली होती. दादांनी तिला दोन मुले देण्यापलीकडे काहीही सुख दिले नव्हते. दादांना कोणती व्यसने नव्हती? बँकेतल्या तेरा हजारांपैकी बराचसा पैसा तर सदानंदच्या आईनेच गडप केला होता. आईचे सौभाग्य हे असं कसर लागलेले होतं.

मुलगी तर तिला दुरावलीच, पण मुलालाही तिच्यापासून तोडले. 'तू तिच्याकडेच राहायला पाहिजेस ना? मग अगदी तिच्याकडेच राहात जा, माझ्याकडे येऊ नको, माझ्याशी बोलू नको, मग तरी झालं? मला नवरा नको, मुलगा नको आणि मुलगीही नको. राहीन मी एखाद्या महारोग्यासारखी. नशिबात भोग आहेत, तोपर्यंत राहाते आणि मग जाते निघून.' आईची ही वेदना हृदय चिरत गेल्यावाचून राहत नाही. ह्या वेदनेनेच 'आई' आपल्या अंत:करणात घर करून राहते.

थोरल्या काकांनी आपल्या भावाचे, नारायणरावांचे लग्न आईशी ठरवले व मोठ्या मानाने तिला घरात आणले. पण नारायणरावांच्या व्यसनांनी तिचे आयुष्यच काळवंडून गेले. शेवटी नारायणराव परागंदा झाले आणि नवरा असूनही विधवेप्रमाणे एकाकी जगणे तिच्या वाट्याला आले. पण तरी तिने चुकूनही मोठ्या दीराला एका कटू शब्दाने दुखविले नाही. यातून दिसतो तो तिच्या मनाचा मोठेपणा; तिच्यावर झालेले तिचे माहेरचे संस्कार, जे आजकाल दुर्मिळ झाले आहेत. नवऱ्याच्या दिवाळखोरीवर पांघरूण घालण्यासाठी ती निमूटपणे थोरल्या दीराच्या स्वाधीन तिचे स्त्रीधन करते. बायकोचा खरा दागिना, जो तिचा नवरा, तोच जर दिवटा निघाला, तर सोन्याचे मंगळसूत्र त्याच्या नावाने बांधून तरी उपयोग काय? त्याची अब्रू तीच आपली अब्रू मानणारी ती स्वाभिमानी आर्य स्त्री, स्त्रीधन देते ते गेलेली अब्रू अधिक चव्हाट्यावर येऊ नये यासाठीच. पण तरीही स्त्रीसुलभ स्वभावाप्रमाणे तिला ज्या यातना झाल्या असतील, त्या तिलाच माहीत! थोरल्या दीराच्या दहापंधरा माणसांच्या रगाड्यात तिचे ओझं कुणालाच वाटलं नसतं, पण थोरल्या दीराची तशी तयारी असूनही ती मानी स्त्री स्वत:च्या घराचा उंबरठा ओलांडत नाही.

जीवनाच्या अनाकलनीय लढाईत खरी पराभूत झाली बिचारी आई! सामान्य स्त्रीच्या वाट्याला येते ते पतिसुखही तिला पारखे झालेले. नवरा जवळ होता, तोपर्यंत त्याच्या व्यसनात तो धुंदफुंद होता आणि नंतर तर काय तो परागंदाच झाला. तिचा संसार केवळ नावापुरताच झाला. तिच्या कपाळावरचे कुंकू आणि गळ्यातील मंगळसूत्र दोन्हीही अर्थशून्य, औपचारिकच होती. यापेक्षा आणखी पराभव तो कोणता? नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा आणि कुंकवातील सदानंदच्या आईची भागीदारी तिने कशी सहन केली, तीच जाणे! आतड्याने वाढवलेली स्वत:च्याच रक्तामांसाची मुलगी जेव्हा तिला दुरावली, तेव्हा तिचा दुसरा पराभव झाला. आयुष्यात मिळाले तरी काय तिला? दोन मुलांना जन्म देऊन त्यांना वाढविण्यापलीकडे तिला काहीच आयुष्यात मिळाले नाही.

स्वत:च्या मुलाच्या लग्नात उपऱ्यासारखे, चोरासारखे वावरणे तिच्या नशिबी आले, तेव्हा ती पुन्हा तिसऱ्यांदा पराभूत झाली.

उभे आयुष्य एखाद्या विरलेल्या वस्त्राप्रमाणे पराभूत अवस्थेत जगणारी, पण मुलांच्या भल्यासाठी तळमळणारी ही वत्सल 'आई' रसिकांच्या अंत:कोषात घर करून राहणार नाही काय?

नवऱ्याच्या ऐन भरभराटीच्या काळात, उमेदीच्या काळात तर सुखाने वैभवात लोळत कुणीही संसार करील, पण दिवस पालटल्यानंतर पडत्या काळातही, दारिद्र्यातही तितक्याच नेकीने साथ देणारी आई 'शिक्षा' ह्या कथेत जी. एं. नी चित्रित केली आहे. निव्वळ कपडे धुण्यासाठी परटाला दोन काळीभोर नदीकाठ राने देऊन टाकणाऱ्या देसाई घराण्यातील मुलगी असूनही, लग्नानंतर माहेरची श्रीमंती पूर्णपणे विसरून वैभवात आणि पडत्या काळातही दादांना पूर्ण साथ देणारी आई, निमूटपणे गेल्या चारपाच वर्षांपासून घरातील सारे कामे स्वत:च करू लागली होती. जेव्हा पहिली घागर तिने ओढली तेव्हा बापडी एकटीच तासभर हातावर फुंकर घालीत बसली होती. दादांच्या पावलावर पाऊल टाकून विनातक्रार आयुष्य जगणाऱ्या आईनेच दादांच्या सुखी आयुष्याला अर्थ दिला होता. तिच्यामुळेच त्यांचे वैवाहिक जीवन सुखी बनले होते. तर 'पुनरपि' या कथेत माई आणि दादांच्या सुखी संसाराचा पट आपल्यापुढे उलगडत जातो. दादांच्या अखेरच्या आजारात अविश्रांत मेहनत घेऊन, त्यांची होता होईल ती सेवा करणाऱ्या माईची प्रेमळ, कष्टाळू मूर्ती या कथेतून आपल्यापुढे उभी राहाते. त्या दोघांच्या फळलेल्या, फुललेल्या, समाधानी संसाराचे चित्र आपल्यापुढे साकार होते. एकाकी म्हातारपणातही परस्परांना सांभाळून घेणारे, परस्परांवर पूर्वीइतकीच उत्कट माया करणारे, परस्परांची काळजी घेणारे असे दादा-माईचे सर्वार्थाने सुखी दाम्पत्यजीवन आपल्याला सतत जाणवत राहते. दादांचा मृत्यू होतो. आणि माईलाही स्वत:च्या मृत्यूची चाहूल लागते, तिथे ही कथा संपते.

लग्न होऊन दहा वर्षे झाली होती, पण करेव्वाची कूस फळली नव्हती. बरोबरीच्या स्त्रियांची घरे गोकुळाप्रमाणे भरलेली, पण करेव्वाच्या बाबतीत नवससायास सर्व फुकट गेलेले. सुरुवाती सुरुवातीला तिची चेष्टा करणाऱ्या, तिला उपाय सुचविणाऱ्या बरोबरीच्या स्त्रियांनी हळूहळू तिला टाळायला सुरुवात केली. असलीच त्यांच्या घोळक्यात तरी करेव्वा भुताप्रमाणे एकटी पडू लागली. दहा वर्षात करेव्वाचे आयुष्यच पालटून गेले. तिला कुणी जाताना हाळी देईना, की तिच्या अंगणात कुणाचे पाऊल ठरेना. सार्वजनिक जेवणाचे आमंत्रण उभ्या गावाला असले, तरी करेव्वाला बोलवावयाचे राहून जाऊ लागले. कोडग्याप्रमाणे ती तेथे गेलीच, तरी तिच्या येण्याची, खाण्याची वा मध्येच निघून जाण्याची कुणीच दखल घेत नसे. बरोबरीने ज्यांची लग्ने झालेली आणि ज्यांची घरे मुलांनी भरलेली त्यांचा तो मोठाच पराक्रम! बरड जमिनीप्रमाणे राहणे

हा करेव्वाचा महान गुन्हा! मानवाच्या जगाचा हा उफराटा न्याय! त्याला करेव्वा अश्रू ढाळण्यापलीकडे काय करू शकत होती? एखाद्या विद्रूप महारोग्याप्रमाणे करेव्वा सगळीकडे टाळली जाऊ लागली. तिला तोंडावर कुणी 'नको' म्हटले नसले, तरी तिने येऊ नये, अशीच सर्वांची इच्छा असे. आपल्या अलिप्त कोरड्या वागण्याने तसे करेव्वाला जाणवून द्यायला कुणीही मागे राहात नसे. प्रत्येक प्रसंगाने करेव्वाची हळवी जखम दुखावली जाई आणि हताश करेव्वा एकांतात पोटभर रडण्यापलीकडे काहीही करू शकत नसे.

ती उतरणीवर दिसताच इमानीपणे धावत येणारे कुत्रे कुठे दिसले नाही, ही गोष्ट ध्यानात येताच करेव्वाला स्वत:च्या दु:खाचा विसर पडतो व मधल्या गवतातून ती घर जवळ करते. तिरक्याला, तिच्या नवऱ्याला, ती गेल्या गेल्या विचारते, 'कुत्रं कुठाय?' मुन्शीपालटीच्या लोकांनी कुत्र्याला विष घातले व त्यामुळेच ते आडवे झाले, हे कळताच करेव्वा संतापाने पेटून उठते व नवऱ्याला खडसावून विचारते. 'मग काय झोपला होता की काय?' नवऱ्याच्या निष्क्रियतेचा तिला मनस्वी उबग येतो. 'पट्टा घाल मातीत! आमच्या गळ्यात पट्टा नाही, म्हणून ती माणसं आम्हाला देखील विष घालतील की! मढी गेली त्यांची मसणात!' करेव्वाच्या ह्या कडाडण्यातून तिची नवऱ्याबद्दलची घृणा जेवढ्या तीव्रतेने प्रकट होते, तितकेच जाणवते ते तिचे कुत्र्याबद्दलचे वात्सल्य! पोटी लेकरू नसल्यामुळे तळमळणाऱ्या करेव्वाचे त्या कुत्र्यावर असले विलक्षण प्रेम होते. तिरक्याला त्याची काय कल्पना असणार कपाळ?

दहाबारा वर्षांपूर्वी तिरक्या कुस्ती खेळत असे, पण आता मात्र त्याच्या शरीराचे पुरते सोंग झाले होते. त्याचे सुटलेले अंग, डेऱ्याप्रमाणे दिसणारे पोट पाहून करेव्वाला त्याच्याबद्दल किळस निर्माण होई. त्याच्याचमुळे आपले सारे आयुष्य भरड होऊन गेले, हे तिला राहून राहून जाणवे व मग त्याला पाहताच तिला एकदम चीड येत असे. तिला सारखे वाटे, 'कशासाठी आपण याच्याशी लग्न केले? आणि ते देखील दुसरेपणावर?' नवऱ्याविषयी करेव्वाला वाटणारी ही चीड अगदी स्वाभाविक होती. तिच्या अतृप्त स्त्रीत्वाचा तो स्वाभाविक आविष्कार होता.

स्त्रीला पूर्णत्व प्राप्त होते ते मातृत्वाने. वांझोटेपणाचे दु:ख हे स्त्रीजीवनातील फार मोठे शल्य. वांझोटेपणामुळे स्त्रीचे संपूर्ण जीवनच झाकोळून जाते. पोटी अपत्य असण्यातील सुख वांझोट्या स्त्रीखेरीज खऱ्या अर्थाने कुणाला कळणार? पोटी मूल जन्माला येणे ही एक साधी जीवनशास्त्रीय गोष्ट. बी जमिनीत रुजून तरारून वर येण्याइतकी साधी, पण ज्या अभागी स्त्रिया या मामुली वाटणाऱ्या सुखाला पारख्या होतात, त्यांच्यासाठी तीच मामुली गोष्ट अपूर्व ठरते. कोणत्याही गोष्टीची मातब्बरी ज्याला ती लाभली नाही त्यालाच असते, हेच खरे.

स्त्रीच्या वांझोटेपणाच्या जीवघेण्या दु:खाला शब्दबद्ध करणाऱ्या तीन समर्थ कथा

जी. एं.च्या लेखणीतून उतरल्या आहेत. 'वंश', 'स्लीला' आणि 'कैरी'. करेव्वा, भाऊमामी आणि तानीमावशी तिघीही वांझोटेपणाचे दु:ख भोगतात, पण त्या दु:खाची तऱ्हा निराळी आहे. तिघींच्याही दु:खात, दु:ख भोगण्यात विविधता आहे, सूत्र एक असले, तरी त्यामुळेच जी. एं.च्या कथा एकसुरी होत नाहीत.

लग्न होऊन दहा वर्षे होऊन गेलेली पण पोटी अपत्य नाही, ह्या वांझोटेपणाच्या दु:खाने हताश झालेली करेव्वा, एका आगळ्या तिरीमिरीत अंधाऱ्या रात्री गावाबाहेरच्या राममारुतीसमोर करकरा नवस करावयास जाते; परंतु तेथूनही तिला वांझोटीच परतावे लागते, सोबत एक नवी जळती जाणीव घेऊन. (वंश).

आईवडिलांच्या दरिद्री संसारात भावंडांच्या आयुष्याची होत असलेली परवड पाहून नमूताई बिनतक्रार विधुर नारायणरावांशी लग्नाला तयार झाली. जवळजवळ दुप्पट वयाच्या नारायणरावांशी नमूताईने कोरड्या डोळ्यांनी समजून उमजून लग्न केले. आपल्या नव्या संसारात तिने आईवडिलांची, भावंडांची सर्व सोय पाहिली, त्यांना आसरा दिला, मार्गी लावले.

नारायणरावांच्या आजाराने हाय खाऊन नमूताईचे डोळे आत ओढले गेले व शरीर वणव्यात होरपळल्याप्रमाणे सुरकुतले. सारे संपून गेले, तेव्हा तेवढ्या रात्री गोपाळने चार माणसांना उठवले व सारी व्यवस्था केली. आत नमूताई अजूनही कपड्याच्या बोळ्याने नारायणरावांची थंड पावले शेकत होती, तळवे चोळीत होती. गोपाळने तिला उठवले, तेव्हा ती खुळ्यासारखी पाहतच राहिली नि प्रेत उचलताच डोळे गरगरवत ती खाली कोसळली. त्यानंतर पंधरा दिवस ती अंथरुणाला खिळून होती. त्या पंधरा दिवसात तिने मुलाची, माधवाची चौकशी केली नाही की घोटभर पाणी मागितले नाही. नारायणराव वारले हे ती मानायलाच तयार नव्हती. अत्यंत शांतपणे तिने गोपाळला समजाविले, 'तुलादेखील असा कसा भ्रम झालाय?..... आता असलं वेडंवाकडं माझ्यापुढं तरी काही बोलत जाऊ नकोस, समजलं? तुला ते वडिलांसारखे. त्यांनी मरावं असं तुला म्हणवतं तरी कसं? तुला माहीत नसलं तर मी सांगते. ती माणसं होती हॉस्पिटलची. त्यांना आता हॉस्पिटलमध्ये ठेवलं आहे. येतील ते महिना-पंधरवड्यात घरी!'

दोनचार दिवसातच ती उठली. शांतूला बाजूला सारून नेहेमीप्रमाणे तिने स्वयंपाक केला. त्यात तिने आवर्जून नारायणरावांना विशेष आवडणारी खोबऱ्याची चटणी व वांग्याची भाजी केली आणि भर उन्हात अनवाणी पावलांनी दोन मैल रस्ता तुडवत ती हॉस्पिटलमध्ये पोचली. नारायणरावांची चौकशी करीत हॉस्पिटलमध्ये हिंडणाऱ्या नमूताईला डॉ. जोगळेकरांनी पाहिले. सर्व ओळखून त्यांनी तिचा डबा घेतला. तिला बाहेर थांबवून एका वॉर्डबॉयकडून तो रिकामा करवला व तिला परत दिला. त्यानंतर दोनचार दिवस ती हॉस्पिटलमध्ये जात होती. डॉ. जोगळेकर काहीतरी सांगून

तिची समजूत घालीत होते आणि रिकामा डबा घेऊन ती परतत होती. या श्रमांनी तिच्या पायांना फोड आले. डोके तडकल्यासारखे होऊन डोकेदुखी तासन्‌तास जात नव्हती. डॉ. जोगळेकरांकडून सर्व काही समजलेला गोपाळ विस्कटलेल्या हताश चेहेऱ्याने घरी आला. नमूताईला समोर बसवून त्याने तिची पावले उचलून पाहिली व न बोलता त्याने हलकेच बोटभर व्हॅसलीन तिच्या पायांवर चोळले.

'उद्यापासून तू हॉस्पिटलकडे जायचं नाहीस. मी जात जाईन.' तो म्हणाला.

'उद्या जायचं रे कशाला?' ती स्वच्छ हसून म्हणाली, 'त्यांना म्हणे आजच नेलं आहे.... मुंबईला औषधपाण्यासाठी. आपली मालती तिथं आहेच की! तिला म्हणावं, जाऊन बघत जा कधीतरी आठवड्यातून एकदा. तू देखील दोनतीन महिन्यांनी एकदा गेलास तरी चालेल. पण त्यांना इकडे आणायचं ना, त्या वेळी मात्र मला नि माधवला घेऊन जा बरं का! खर्चाचं काम होईल थोडं. पण जाऊ याच रे! मलाही त्या वेळी अनायासं मुंबई बघितल्यासरखं होईल. नाही?' नमूताईची तिच्या नवऱ्यावरील, नारायणरावावरील ही अकृत्रिम, गहिरी माया आपल्याला गहिवरून सोडते. अशी पत्नी लाभायला खरोखरच सात जन्माचं पुण्यच पदरी असावं लागतं. पत्नीचे हे विलोभनीय, भावव्याकुळ रूप जी. एं.नी अत्यंत समरसून निर्माण केले आहे. (भोवरे).

जी.एं.ची 'घर' ही कथा वाचल्यानंतर एक कनिष्ठ मध्यमवर्गीय 'घर' डोळ्यापुढे उभे राहते आणि त्याबरोबरच डोळ्यापुढे साकारते एक सज्जन, पापभीरू, सरळमार्गी, प्रेमळ, संस्कारी वृद्धाची प्रतिमा. आजकाल दुर्मिळ होत चाललेले जुन्या पिढीतील 'प्रेम' मधूकाका आणि त्यांच्या सावलीप्रमाणे त्यांच्याबरोबर निमूटपणे वाटचाल करणाऱ्या माईच्या रूपाने नजरेत भरते; तर पित्यावर जिवापाड प्रेम करणारा, पित्यावर श्रद्धा असलेला 'राम' मधूकाकांच्या रूपाने आणि नंतर बदलत्या काळाप्रमाणे 'मतभेद' असले, तरी पित्यावर माया करणारी मुले आढळतात 'रमेश' व 'शांताराम' यांच्या रूपाने. एकूणच कुटुंबातून दुर्मिळ होत चाललेल्या प्रेमभावनेने ओथंबलेली एक कुटुंबकथा, एक 'घर', तीन पिढ्यांचा कालपट इथे झरझर उलगडत जातो आणि एक अस्सल अनुभव देऊन जातो.

भागीदारांनी धंद्यात फसविले, दादांचा वाडा, दोन मोटारी, दागिने सारे सारे गेले आणि त्याच्या पाठोपाठ गेले दादा..... आठनऊशे फूट खाली पडणाऱ्या विक्राळ धबधब्याच्या कडेवरून त्यांनी खाली उडी घेतली. मधूकाकांना शेवटच्या दुखण्यात सतत पाणी पडत असल्याचा आवाज ऐकू येतो. आणि दादा दिसतात, ते दादांशी बोलतात, त्यांना पेढाही देतात, पण दादांचे बोलणे पाण्याच्या प्रचंड आवाजात त्यांना ऐकू येत नाही, म्हणून ते माईला विचारतात.

'दादा काहीतरी म्हणाले, ते तुला तरी ऐकू आलं का?'

बिचाऱ्या माई, त्या काय उत्तर देणार? रमेशला, मोठ्या मुलाला मिठी मारून

हुंदके देत त्या त्याला सांगतात, 'त्यांचं मन भ्रमिष्टासारखं झालं आहे रे! ते आपल्या दादांशी बोलतात मधूनमधून.' मधूकाकांचे त्यांच्या दादांशी बोलणे मन सुन्न करणारे, घशात गहिवर दाटून आणणारे, त्यांच्या पितृभक्तीची तीव्रतेने जाणीव करून देणारे ठरते.

मधूकाकांचे दुसरे दैवत त्यांची आई. दादांचा वाडा ताडीचा लिलाव घेणाऱ्या राचय्याने घेतला आणि कपडे, भांडे रस्त्यावर येऊ लागली. तरी दादा झोपाळ्यावर भ्रमिष्टासारखे बसून होते. मग आईनेच जाऊन चार खोल्यांचे घर ठरवले. दादांचे कोसळणारे 'घर' सावरले. एकदा आई आठवल्याप्रमाणे दचकून म्हणाली, 'त्यांच्याबरोबर गावाला गेले असते, तर बरं झालं असतं. आपल्याच घरात संपून जावं, अशी माझी देखील इच्छा होती. पण ते काही घडणार नाही झालं.' तेव्हा व्याकुळ होऊन मधूने आईला वचन दिले, 'हे बघ आई, मी तुला शपथ देऊन सांगतो, आयुष्यभर नुसत्या लंगोटीवर राहावं लागलं, तरी हरकत नाही. मी माझं घर बांधीन.'

आणि मग 'डोळे म्हणजे खिडक्या व्हाव्यात, हातपाय खांब व्हावेत' इतक्या ईर्ष्येने मधूकाका त्या घराच्या मागे हात धुवून लागले. आईला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी मर्यादित कर्तृत्वाच्या मधूकाकांनी पहिल्यापासून पोट मारून पै-पै साठवली आणि स्वत:चे व घरच्यांचे आयुष्य रुक्ष, वैराण बनविले. कंपनीतल्या कामांबरोबरच त्यांनी रात्रीचे काम स्वीकारले. पण त्यांच्या कष्टांमुळे काडीचेही सुख घरच्यांच्या वाट्याला येत नव्हते. त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य प्रवाह वाहात होता त्यांच्या घराच्या दिशेने. साध्या वहाणांविना रमेशला शाळेत चारपाच वर्षे काढावी लागली. त्यांचे कपडे त्याला लहान झाले की शांतारामला मिळत. साध्या ट्रीपला जायला कधी मुलांना त्यांनी हात उचलून चार आणे दिले नाहीत की कधी त्यांना नवी कोरी वही मिळाली नाही. माईच्या अंगाला कधी गुंजभर सोनं लागलं नाही की कधी तलम कापड लागलं नाही. मधूकाकांची गोधडी-धोतरं तर गावात प्रसिद्धच होती. लोक चेष्टेने म्हणत, 'गोगलगाईवर चकमक हाणली तरी एखाद्या वेळी ठिणगी पडेल, पण मधूकाकांच्या हातून पै निसटायची नाही!' लोकांनी केलेली चेष्टा कानावर आली, तरी मधूकाका त्याकडे दुर्लक्ष करीत. लंकेच्या पार्वतीप्रमाणे वावरणाऱ्या माईंना बघून हळव्या मधूकाकांना काय यातना होत असतील तेच जाणे! मुलांचे हिरमुसलेले चेहेरे सतत पाहताना त्यांच्या पितृहृदयाचे पाणीपाणी होत असेल, पण कठोरपणे स्वत:चे व कुटुंबियांचेही मन मारून, प्रशस्त घर बांधणाऱ्या मधूकाकांची जिद्द मात्र इथे झळाळून उठते.

मालती आधीच दुरावली. रमेश त्याच्या प्रेमासाठी दुरावला आणि शांताराम नोकरीसाठी बडोद्याला जाणार. मग मधूकाकांजवळ त्यांच्या पत्नीखेरीज कोण राहणार? कळवळून मधूकाका शांतारामला विचारतात-

'इथंच एखादी मिळाली नसती नोकरी? इथं आपलं घर आहे. तुम्ही पोरंच अशी

दूर गेलात, तर मग घर बांधलं ते कुणासाठी?'

आता अक्षयतृतीयेला घराचा मुहूर्त करायचा म्हणजे आपल्याला केवळ माईची तेवढी सोबत आहे ह्याची विदारक जाणीव मधूकाकांना तीव्रतेने होते. नातूकडे जाण्यासाठी जेव्हा त्यातल्या त्यात नवे, सुती लुगडे नेसून अनवाणी पावलांनी माई समोरून जातात, तेव्हा मधूकाका मनाशीच ठरवतात, 'आता मात्र कधीतरी तिला नवीन वहाणा घेऊन देऊ. कधीतरी जर तृतीयेनंतर पुरेसे पैसे उरलेच तर मंगळसूत्राला-देखील सोन्याची तार घालू.' आपल्याबरोबर वणावणा चालत आलेल्या माईबद्दल मधूकाकांना गहिवरून येते. आपल्यामागे तिचे कसे होईल, ह्या विचाराने ते बेचैन होतात. शेवटी तो विचारच त्यांना नकोसा वाटतो. माई जांभळ्या रेशमी पातळात फार चांगल्या दिसल्या असत्या, पण ते विकत घेण्याइतके पैसे कधी उरलेच नाहीत याचे राहून राहून मधूकाकांना वाईट वाटते. आपल्यामुळे माईला फार भोगावे लागले. याची पूर्ण जाणीव मधूकाकांना होती आणि म्हणूनच घराचा मुहूर्त झाल्यावर आता माईकडेच लक्ष पुरवायचे, असे ते मनाशी ठरवून टाकतात. यातून त्यांचे पत्नीप्रेमच व्यक्त होते. त्यांच्या प्रेमाची ग्वाही माईच देतात. माई रमेशला म्हणतात, 'त्यांच्यासारखं आतडं असलेला माणूस मिळायला कुंडलीत पन्नास ग्रह असावे लागतात! त्यांनी काय काय भोगलं, पाहिलं याची इतरांना काय कल्पना असणार?'

आपले घर नको असलेल्या झुरळाप्रमाणे फुंकले जाईल, याची जाणीव व त्यामुळे निर्माण झालेली वेदना भोगणे मधूकाकांच्या दुबळ्या शरीरातील सहनशक्तीपलीकडचे काम होते. त्यांना साथ होती फक्त त्यांच्या पत्नीची-माईची. तर त्याही आताच म्हणू लागल्या होत्या की, 'दुखऱ्या गुडघ्यामुळे वरखाली करायला आपल्याला जमणार नाही.' म्हणजे भिंती उभ्या राहिल्या, पण त्यांना घर करणारी माणसे मात्र पांगत जाणार, हेच खरे.

सोप्यावरून माजघरात येताच मधूकाकांना गणपतीच्या कोनाड्यात गणपती दिसू लागतो. झोपाळ्यावर थेट आईप्रमाणे माई भासू लागल्या. झोपाळ्याच्या पितळी दांड्यावर मधूकाका मोठ्या प्रेमाने हात फिरवतात व खिशातील हातरुमालाने त्याची एक दांडी उगाचच पुसतात. ठेवणीतल्या ऐवजावरून हळुवारपणे हात फिरविणाऱ्या स्त्रीप्रमाणे मधूकाकांचे हे सारे मनोव्यापार हळुवार आहेत. मधूकाकांचे मन घरात किती अडकले होते, त्याचेच हे द्योतक.

हॉस्पिटलमध्ये त्यांच्या खोलीत त्यांना सतत पाणी पडत असल्याचा आवाज ऐकू येतो. तो कसला आवाज म्हणून ते माईंना व नंतर डॉ. देशपांड्यांना विचारतात. माई घाबरतात आणि डॉ. देशपांडे सर्व उमजून कशीबशी वेळ मारून नेतात. मधूकाकांना आता त्यांचे दादा दिसत होते. ते दादांशी बोलत होते आणि म्हणूनच त्यांना तो धबधब्याचा आवाज ऐकू येत होता. भ्रम लागलेल्या मधूकाकांना कोण व कसे समजून

घेणार? मधूकाकांना आता अखेरचे वेध लागले होते.

भजी तळण्याखेरीज अक्कल नसलेला सदुभाऊ त्याच्या मायेसकट या रुक्ष व्यवहारी जगात उपरा ठरला. ज्या गिऱ्हाइकांवर त्याने मायेचा वर्षाव केला, त्याच गिऱ्हाइकांनी शानभागचे दिमाखदार हॉटेल उभे राहाताच सदूभाऊची माया विसरून त्याच्याकडे संपूर्ण पाठ फिरविली. एक दिवस सगळा गल्ला, बारा आणे जमताच सदूभाऊला आपण कुठल्या कुठे सांदीकोपऱ्यात फेकले गेलो, हे मुळातून जाणवले आणि त्या रात्री न जेवताच तो अंथरुणावर पडला. भाऊची चमचमीत उसळ आणि खमंग खुसखुशीत मसाला भजी गावकऱ्यांनी झिडकारली. भाऊचे हॉटेल इतिहासजमा झाले. हा धक्का सदूभाऊच्या सहनशक्तीपलीकडील होता. शंभर शानभागांना बघून घेण्याची त्याची ईर्ष्या, त्याच्या गिऱ्हाइकांनीच पोकळ ठरविली. सदूभाऊच्या आयुष्याचा कणाच मोडला.

आणि अशा वेळी एक दिवस परीक्षेत नापास झालेला अनंत घरी परतला. आता आपले शिक्षण संपले हे त्याने ओळखले. हॉटेलात फोनो पुन्हा वाजायला लागला. हॉटेलचा ताबा आता अनंतने घेतला. धंदा हातात घेतल्यावर आठ दिवसातच अनंतने सदूभाऊला मुळातून दुखावले. 'आपण आता सगळंच नवं केलं पाहिजे. ही टेबलं, खुर्च्या, हे सारं तुम्हाला ठीक होतं. आता ते सगळं घाला कचऱ्यात. मी जीव तोडून सांगत होतो की आता हळूहळू सारं बदललं पाहिजे. आता गळ्याशी आलं तेव्हा समजलं. दाढीला आग लागली की पाणी शोधत बसायचं.' चुलीपुढे बसलेल्या सीताबाईच्या हातातील पाटल्या सदूभाऊने फाकवून काढल्या, ट्रँकेतला एक पितळी डबा काढला व ते सारे अनंतापुढे टाकून तो म्हणाला, 'माझ्याजवळ एवढं आहे ते घे. नाहीतरी तुलाच द्यायचं होतं ते कधीतरी. घे आणि त्याची वाटेल तशी विल्हेवाट लाव. मी आता संपून गेलो.' अजूनही अनंत त्याची बाजू मांडत होता; पण सदूभाऊ भिंतीकडे मान वळवून चटईवर पडला होता, आणि सीताबाई काही न बोलता निमूट जाळाकडे पाहात होती. आपल्याकडे असलेले सर्व किडूकमिडूक, अगदी सीताबईच्या पाटल्यासुद्धा मुलाच्या स्वाधीन करून सदूभाऊ मुलाच्या मार्गातून बाजूला झाला.

पहिल्याप्रथम अनंतने जवळच एक लहानसे स्वतंत्र घर घेतले आणि आपले डबे, भांडीकुंडी, अंथरुण घेऊन सीताबाई तेथे गेली. भाऊच्या हॉटेलला नंतर फरशी आली, संगमरवरी टेबले आणि शेवटी लक्ष्मीविलास इतकाच मोठा 'सरस्वती विलास' हा बोर्ड झळकला. अनंतने हॉटेलवरील सदूभाऊचा ठसा पुरता पुसून टाकला. पहिल्या दिवशी फुकट्यांची तीच भाऊगर्दी झाली, आणि त्या गर्दीत झिंगल्याप्रमाणे हिंडणाऱ्या भीमूने चौदा कपबशा फोडल्या. सारा दिवस सदूभाऊ घरात बसून होता. त्याने किंवा सीताबाईने नव्या हॉटेलकडे खिडकीतूनसुद्धा पाहिले नाही.

मसाला भजी बनविण्याचे आपले एकुलते एक कौशल्य पणाला लावून मुलाला

मदत करण्यासाठी सदूभाऊ जी धडपड करतो, ती त्याची बेहोश धडपड आपल्याला गहिवरून सोडते.

ध्यानीमनी नसताना सदूभाऊला स्पेशलरुममध्ये आलेला पहाताच अनंतचा चेहेरा साफ पडला. शरमेने मान खाली घालून तो बावळटासारखा ओशाळवाणा उभा राहिला. लगबगीने दुसरा घाणा घालण्यासाठी सदूभाऊ स्पेशलरुममधून बाहेर आला. आता त्याचे मन हलके हलके झाले होते. पूर्वीचा आत्मविश्वास पुन्हा जागा झाला होता. अनंतसाठी आपण काही करू शकलो हे समाधान मोरपिसाप्रमाणे थरथरत होते. चेहेऱ्यावरून तरी साहेब शहाणा दिसत होता. त्याला अस्सल आणि नक्कल यातला फरक खात्रीने लक्षात येईल. एकदा का आपल्या मसाला भज्यांची चव त्याच्या जिभेवर रेंगाळली की अनंतला कॅन्टीन मिळालेच म्हणून समजा. आणखी एक घाणा घालून तो तयार होईपर्यंत दोन ग्लास वचकन् हौदात बुडवून ते निथळतच हातात धरून तो पुन्हा स्पेशलरूमकडे धावला. साहेब आत काय बोलतोय ते ऐकण्यासाठी तो बाहेरच रेंगाळला आणि त्या भोळ्या जीवावर एकाएकी वीज कोसळली.

'हे पहा रागावू नका.' साहेब अनंतला सांगत होता. 'नव्या कॅन्टीनमध्ये असला ऐदी नोकर चालायचा नाही. भजी आणलेलं हे भांडं पाहिलंत? त्याला अजून भिजवलेलं मळकं पीठ चिकटलंय् ठिकठिकाणी.'

'शी: आणि हात तर राडेनं बरबटले होते.मला तर पाहूनच मळमळू लागलं.' बाई म्हणाल्या. अनंतला काय बोलावे हे समजेना. इतका तो शरमेने आंबून गेला होता. प्रयत्न करत तो म्हणाला, 'माफ करा साहेब, नव्या हॉटेलात हा यायचा नाही. तिथली व्यवस्था सगळी स्वतंत्र राहील. हा फार जुना नोकर आहे. थोडा अर्धवटही आहे. म्हणून पुष्कळदा सांभाळून घ्यावं लागतं.'

सदूभाऊला काही कळेनासेच झाले. त्याचे सारे शरीर झाडाच्या खरखरीत बुंध्याप्रमाणे बधीर झाले. डोक्यात सारे रक्त जमा होऊ लागल्याप्रमाणे त्याला भासले. हातातील ग्लास आता गळून खाली पडतात की काय असे त्याला वाटले. साऱ्या शरीरातून शक्तीच ओसरल्यासारखे झाले. असा तो किती वेळ उभा होता कुणास ठाऊक. शानभागने चिरडले, गिऱ्हाइकांनी नाकारले आणि आता अनंतने झिडकारले. जीवनातून सर्वार्थाने पराभूत झालेले सदूभाऊ एखाद्या जिवंत भुताप्रमाणे सुन्नपणे माघारी वळला.

घरात येताच मात्र त्यांचा सारा संताप उफाळून येतो आणि त्या बेभान अवस्थेत तो लोणच्याच्या, मेतकुटाच्या बाटल्या एकामागोमाग एक दणादणा जमिनीवर आदळून फोडतो. त्याचा हा त्रागा त्याच्या अगतिक केविलवाण्या अवस्थेतून निर्माण झाला होता. 'कसाब'मधला सोनू आंगली जसा स्वत:चा सगळा राग शेळीवर काढतो, तिला बदड बदड बडवतो, तसा सदूभाऊ बाटल्या फोडतो. शेवटी शरीराची लाही लाही करणाऱ्या संतापाला कुठेतरी वाट मोकळी करून द्यावी लागतेच. सदूभाऊने तेच केले. तरी त्याचे

ठणकणारे डोके शांत होईना म्हणून ते गच्च दाबून त्या पसाऱ्यातच तो खाली बसला. आवाज ऐकून बाहेर आलेल्या सीताबाईने निमूटपणे त्याला हाताला धरून उठवले. एखाद्या लहान मुलाप्रमाणे सदूभाऊ तिच्या मागोमाग गेला आणि चटईवर निमूट पडून राहिला.

जीवनात सगळीकडून पराभूत झालेल्या सदूभाऊला बायको मात्र स्टॅण्डर्ड मिटं सोन्यासारखी लाभली होती. याबाबतीत सदूभाऊच्या भाग्याला खरोखरच तोड नव्हती.

अगस्ती ऋषींच्या जीवनात त्याची पत्नी लोपामुद्रा जशी लुप्त झाली होती, तिने जशी स्वत:ची अलग मुद्राच शिल्लक ठेवली नव्हती, ती जशी अगस्ती ऋषींशी पूर्ण एकरूप झाली होती, तशी सीताबाई सदूभाऊच्या जीवनात पूर्णपणे समरस झाली होती; तिला सदूभाऊ व्यतिरिक्त वेगळे अस्तित्वच उरले नव्हते. तीस वर्षांपूर्वी सदूभाऊ काकाच्या घरी राहात होता. एकदा घरी लाकडे फोडायची राहून गेली, म्हणून रागाच्या भरात काकाने सदूभाऊला लाथ मारली. त्यावेळी संतापाने थरथर कापत तिने काकाला दम दिला, 'पुन्हा पाय उचलला तर जळत्या लाकडाने पाय भाजून काढीन.' तिने तडक बोचके बांधले आणि भररात्री ती सदूभाऊबरोबर घराबाहेर पडली. उरलेली रात्र त्यांनी मारुतीच्या कट्ट्यावर काढली व नंतर तीन मैल काट्याकुट्यातून अनवाणी चालत हमरस्ता गाठला. इथे आले. इथे जीवन फळले, फुलले आणि आता पुन्हा नवी सुरवात करणे नशिबी आले. पुन्हा तीन दगडांवर मडकी चढवणे आले.

झालेले सगळे सीताबाईला सांगून टाकावे असा एक आवेग क्षणभर सदूभाऊच्या मनात निर्माण झाला. पण सीताबाईचे मन निष्कारण चिरडले जाईल हे जाणून त्याने आवेग गिळला. 'धंद्यासाठी गुंजतोळा गेले, धंद्यासाठी घर गेले आणि आता धंद्यासाठी आपले बापपणही काढून घेतले गेले!' ओठ आवळून बराच वेळ सदूभाऊ ठसठसणाऱ्या जिव्हारी वेदनेत जळत राहिला. ठणकणारे डोके गच्च धरून कसेबसे सदूभाऊ म्हणाला, 'उद्या सकाळी पहिल्या मोटरनं आंबेगावाला जायचं' व एकदम गप्प झाला. सीताबाई क्षणभर त्याच्याकडे पाहतच राहिली. जे काय ओळखायचे होते, ते त्या माऊलीने ओळखले. त्या रात्री कुणीच जेवले नाही.

रात्री केव्हातरी अनंत आला आणि तडक स्वयंपाकघरात सीताबाईपुढे उभा राहिला.

'आई, मला वाटतं तुम्ही आता गावाकडे जावं. नाहीतरी तेथल्या घराकडे कुणीतरी पाहिलंच पाहिजे.' तो ओढलेल्या कोरड्या आवाजात म्हणाला, 'मला इथं धंदा करायचा आहे. माझं आयुष्य नासाडू नका. आत्ताच बघ दादांनी त्या भटाला मारलं. असा भट कुठं मिळायचा नाही. तो शानभाग आज त्याला पाच रुपये जास्त देऊन घ्यायला तयार आहे. असं जर होऊ लागलं तर माणसं टिकतील तरी कशी? आणि तो घाणेरडा अवतार घेऊन साहेबापुढे आले. वयाला इतकी वर्षे झाली, एवढं समजायला नको का

त्यांना? तू त्यांना सगळं समजावून सांग उद्या.'

जे सदूभाऊने सांगायचे टाळले, ते अनंतने सांगून टाकले. सीताबाईच्या तोंडून शब्द फुटला नाही. मात्र ती मुठी घट्ट आवळून ताडकन उभी राहिली. तिच्याकडे न पाहताच अनंत निघून गेला.

भल्यापहाटे उठून तिने आंघोळ केली. उंबऱ्यावर नेहेमीप्रमाणे गोपद्म काढले आणि कळशी घेऊन ती दत्तमंदिरात गेली. आज दंडवत घालून तिने मूर्तीचा निरोप घेतला. तीर्थ घेऊन ती घरी आली, त्यावेळी सदूभाऊ तयार होऊन बसला होता.

'इथलं काही नको घ्यायला. आपण आलो, त्यावेळी काय होतं आपल्याजवळ?' सदूभाऊ कठोरपणे म्हणाला.

सीताबाईने निमूटपणे पुष्कळशी गाठोडी काढून बाजूला ठेवली व बोचके बांधून ती तयार झाली. अस्पष्ट दिसू लागताच सदूभाऊ उठला व त्याने बोचके उचलले. पण सीतामाईने ते त्याच्याकडून घेतले व ती तयार झाली. सदूभाऊने आपला झारा घेतला. कडवटपणे हसून तो म्हणाला, 'आयुष्यात भजी तळण्याखेरीज मी काही शिकलो नाही. त्याच्या पलीकडे मला काही समजलंही नाही. ही तुझ्या नवऱ्याची अक्कल!' पण सीताबाईकडे पाहाताच त्यांचा कडवटपणा नाहीसा झाला.

तीस वर्षं सावलीप्रमाणे सोबत करणारी सीताबाई सदूभाऊच्या जीवनात पूर्णपणे विलीन झाली होती. सदूभाऊ व्यतिरिक्त तिला वेगळे अस्तित्वच उरले नव्हते. 'शिवशक्ती'प्रमाणे सदूभाऊ-सीताबाई हे परस्परांत एकरूप झालेले दाम्पत्य म्हणजे जी.एं.च्या कथासृष्टीतील दाम्पत्यजीवनाचा कळस होय. सुखी वैवाहिक जीवन हे शेवटी खऱ्या अर्थाने पत्नीवर प्रामुख्याने अवलंबून असते. खऱ्या अर्थाने सफल, समाधानी, सुखी दाम्पत्यजीवन आपणास शलॉट (कमल-नवरा), ठिपका (राचय्या-भवरी), तुती (नाना-आई), राणी (भाऊ-पत्नी), राधी (आबा-आई), पुनरपि (माई-दादा), भोवरे (नमूताई-नारायणराव), शिक्षा (आई-दादा), घर (आई-दादा, माई-मधूकाका) आणि माघारा (सीताबाई-सदूभाऊ) या कथांतून आढळते.

फटफटीत उजाडल्यानंतर सीताबाईला क्वचितच कुणी कधी बाहेर पाहिले असेल. हॉटेलच्या मधल्या दरवाज्यामागे एखाद्या सावलीप्रमाणे सदूभाऊचा दोन सोप्यांचा संसार सांभाळत सीताबाई सारा दिवस निमूट काम करीत असे. भल्या पहाटेला तिची आंघोळ झालेली असे. हॉटेलच्या उंबऱ्यावर एक गोपद्म काढून त्यावर हळदकुंकू वाहिले की ती दत्तमंदिरात जाई. तीर्थ घेऊन ती घरी आली की तेवढ्या दिवसापुरता तिचा बाहेरच्या जगाशी संबंध संपे. दहा वर्षांपूर्वी एकदा ती फार आजारी पडली होती. सदूभाऊनेही तिची आशा सोडली होती. त्यावेळी तिने सदूभाऊला जवळ बोलावून सांगितले, 'मी यातून उठून बसेल असं वाटत नाही. तेव्हा एक करा. मी जाताना माझ्या अंगावर पुरेपूर वस्त्र आहे की नाही बघा. आणि लाकडासाठी माझे पिशवीतील पैसे

घ्या.' त्या आजारातून ती वाचली. त्यानंतर आता इतक्या दिवसानंतर प्रथमच तिची ती पिशवी दिसताच सदूभाऊ जुन्या आठवणीने व्याकुळ झाला.

आपल्याबरोबर तिच्या आयुष्याची पुन्हा परवड नको, म्हणून तो तिला अनंतजवळ राहायला सुचवितो, पण ती मानी स्त्री सौम्य शब्दात नकार देते. जिथे सदूभाऊ जाईल तिथे निमूटपणे त्याच्या मागोमाग जाणे, त्याला साथ देणे, हा तिचा धर्म होता. शरीर थकले तरी आपला पत्नीधर्म सोडायला ती तयार नव्हती.

नवऱ्याला लाथ मारणाऱ्या चुलत सासऱ्याला दम देणारी, सदूभाऊने आंबेगावला माघारा जायचे म्हटल्यावर निमूटपणे बोचकी बांधून तयार होणारी, आयुष्य उताराला लागल्यानंतर पुनश्च हरिओम करावयास सिद्ध होणारी, नवऱ्याची इच्छा नाही हे कळताच मुलाचा शेवटचा निरोपही न घेता नवऱ्याच्या पावलावर पाऊल टाकून 'माघारा' निघणारी सीताबाई ही पत्नीत्वाचा परमोत्कर्ष साधणारी जी.एं.च्या कथासृष्टीतील अनन्यसाधारण व्यक्तिरेखा आहे. आपली नेहेमीची निर्मय तटस्थता सोडून खुद्द जी.ए. एके ठिकाणी सीताबाईला 'सीतामाई' संबोधून जातात. 'खिडकीतून अस्पष्ट दिसू लागताच सदूभाऊ उठला व त्याने बोचके उचलले. पण सीतामाईने ते त्याच्याकडून घेतले व ती तयार झाली.' संपूर्ण कथेत ह्या एका नाजुक क्षणी जी.एं.चीही तटस्थता ढळली आणि स्वत:च निर्मिलेल्या व्यक्तिरेखेच्या महानतेमुळे ते भावव्याकुळ झालेत. सामान्य व्यक्तीतील असामान्य माया जी.ए. अतिशय उत्कटत्वाने व्यक्त करतात. 'माये'चे तरल पदर उलगडून दाखवत असताना ते असे अचानक क्षणार्ध भेटून जातात. सदैव काळ्या चष्म्याआड वावरणाऱ्या जी.एं.तील कोमल अंत:करणाचा भावव्याकुळ 'माणूस' अशा एखाद्या क्षणी त्यांच्या निवेदनातून वा व्यक्तिरेखेतून आपल्याशी संवाद साधून जातो. खुद्द निर्मात्यानेच 'सीतामाई' ह्या एकाच संबोधनातून सीताबाईचा उचित गौरव केला आहे.

जी.एं.च्या कथासृष्टीत स्त्रीच्या विविध रूपांचे विराट दर्शन आपल्याला घडते. बदफैली, चवचाल स्त्रियांची पलटण इथे आपल्याला जशी आढळते, तशाच 'आई' आणि 'बहिणी'च्या विविध व्यक्तिरेखाही इथेच आपल्याला दिसतात. निखळ मायेचे अस्सल दर्शन आई, बहीण आणि मावशीच्या व्यक्तिरेखांतून जी.एं. नी सातत्याने घडविले आहे. आईची व्यक्तिरेखा साकारताना तर जी. ए. नि:संशय आईमय झाल्याचे पदोपदी जाणवत राहाते. बहिणीची व्यक्तिरेखा निर्मितांना त्यांचा भावव्याकुळ सूर जाणवल्यावाचून राहात नाही. मायेचे इतके प्रत्ययकारी चित्रण विरळाच. जी. एं.च्या कथासृष्टीतील तो एक संपन्न सौंदर्यकंद आहे.

जी.एं.नी निर्मिलेले दाम्पत्यजीवनही विविधतापूर्ण आहे. समाजाच्या विविध थरांतील जोडपी इथे आपल्याला भेटतात. दाम्पत्यजीवनाचे सारे यश स्त्रीवरच प्रामुख्याने अवलंबून असते, हे इथे प्रकर्षाने जाणवते स्त्रीच्या बदफैलीपणामुळे उद्ध्वस्त झालेल्या

दाम्पत्यजीवनाचे विविध सामाजिक थरातील कितीतरी नमुने ह्या कथासृष्टीत आढळतात. विविध कारणांमुळे अयशस्वी झालेली जोडपीही इथे आहेत. परस्परांना पाण्यात पाहाणारी, परस्परांचा टोकाचा द्वेष करणारी आणि तरीही एकाच छपराखाली कसाबसा संसार रेटणारी जोडपीही आपल्याला इथेच दिसतात. आणि जीवनाचा खरा अर्थ समजलेली, वैवाहिक जीवनाचा सूर गवसलेली, सुखी, समाधानी, जोडपीही इथेच आपल्याला पहावयास मिळतात. समाजाच्या भिन्न भिन्न थरातील विविध पातळ्यांवरील स्त्रियांची जी विविध रूपे जी. एं.नी निर्मिली आहेत, त्यांचे झगमगते दर्शन घडल्यानंतर हिंमत होईल जी. ए.वर 'स्त्रीद्वेष्टेपणा'चा आरोप करण्याची?

☆☆☆

'साहित्य सूची'
जाने. फेब्रु. १९८९



कंसातील जी. ए.

जी. एं.च्या 'कथे'चे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्यात येणारे कंस. जी. एं.च्या कथेत हे मध्येच कंस का येतात? आचार्य अत्र्यांच्या 'मराठा'तील अग्रलेखात त्यांच्या एखाद्या सभेचाच विषय त्यात असला, तर कंसांचा भरगच्च वापर केलेला असे. (हंशा), (टाळ्या), (हंशा आणि टाळ्या), (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट), (प्रचंड हंशा). असे कंस आचार्य अत्रे अग्रलेखातून वापरत. 'गेल्या दहा हजार वर्षात . . . . . ' अशी प्रचंड भाषा वापरणाऱ्या आचार्य अत्र्यांना ते शोभूनच दिसले.

इतर मराठी कादंबरीकारांनी, कथाकारांनी अगदी क्वचितच कंसाचा वापर केलेला आढळतो. कंस हा कथेचाच एक घटक बनविण्याचे निर्विवाद श्रेय जी. एं.नाच जाते. फक्त जी. ए. हेच असे एकमेव कथाकार आहेत की ज्यांच्या 'कथे'च्या स्मरणाबरोबर त्यांच्या कथांतून येणाऱ्या कंसाचे स्मरण यावे.

जी. एं.च्या कथेत हे कंस का येतात? ह्या प्रश्नाने मला गेल्या दोनतीन वर्षांपासून पछाडले होते. त्या प्रश्नाचा मी जणू ध्यासच घेतला आणि मग हळूहळू जी. एं.च्या कथासृष्टीनेच मला त्या कंसामागील जी. एं.ची भूमिका, हेतू, दृष्टी उलगडून दाखविली. एक प्रकारे ह्या कंसांमधून हळूहळू उलगडत गेलेले जी. एं. चे व्यक्तिमत्त्व, 'निळा सावळा ते पिंगळावेळ' कथांतील कंसांमधून हळूहळू उलगडत गेलेले जी. एं.चे व्यक्तिमत्त्व, त्यांचा दृष्टिकोण सर्वस्वी बरोबरच आहे, असा माझा दावा नाही. एका भक्ताने आपल्या दैवताचा घेतलेला ध्यास आहे, ही माझी स्वच्छ भूमिका लक्षात घेऊनच ह्या आस्वादक समीक्षेकडे पाहावे.

'तेथली एकच खिडकी असलेली तिसऱ्या मजल्यावरील कोंदट जागा, जिन्यावर सतत चालू असलेली पावलांची वर्दळ आणि वेळीअवेळी सिनेमातील गाणी ओरडणारी (चाळीत राहणाऱ्यांनाच भरमसाठ इतकी कशी पोरे होतात?) हजारो पोरे, हे सारे परवडले.' (पराभव/रक्तचंदन)

या एकाच वाक्यातून आपल्याला मुंबईतील चाळीचा दृक्-प्रत्यय येतो. कारण चाळीतील अनेक गोष्टी या एकाच वाक्यात ठासून आलेल्या आहेत. एखाद्या वारूळातून भसाभसा मुंग्या बाहेर पडाव्यात, तशी चाळीतून असंख्य मुले बाहेर पडताना, आरडाओरडा करताना, खेळताना आढळतात. झोपडपट्ट्यांतून आणि चाळीतून हजारो मुले आढळतात, तेव्हा आपल्या मनातही हाच प्रश्न उद्भवतो. 'चाळीत राहणाऱ्यांनाच भरमसाठ इतकी कशी पोरे होतात?'

मनोरंजनाचे तेवढे एकच साधन ज्यांना उपलब्ध आहे, तिथे भसाभसा प्रजा वाढणारच, हे आपणही जाणून असतो. भारतातील लोकसंख्येचा प्रस्फोट एकीकडे भेडसावत आहे. या अवाढव्य वाढलेल्या लोकसंख्येमुळे जीवनावश्यक गरजांची टंचाई रोजच आपल्याला त्रस्त करीत आहे. पाण्याच्या प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केले आहे; वीजेचे जाणे नेहेमीचेच झाले आहे. वीज जाते म्हणजे कुठे फिरायला का जाते? आणि नेमकी टी.व्ही.च्या लोकप्रिय कार्यक्रमाच्या आधी ती एखाद्या स्थूल बाईप्रमाणे धापा टाकत कशी काय येते बुवा? अशी ही गेलेली विद्युलता जेव्हा नेमकी छायागीताच्या, चित्रहाराच्या, हिंदी सिनेमाच्या, लोकप्रिय नेटवर्क कार्यक्रमाच्या वेळी येतै. त्यावेळी एखादे निर्बुद्ध जनावर एकदम मोठ्याने फुसांडावे त्याप्रमाणे 'हाऽऽ' असा जो जल्लोष चोहीकडून कानी येतो, तो ऐकवत नाही. हे ऽ हे सारे आपले बांधव आहेत. त्यांच्यावर कसे काय प्रेम करायचे? त्यांच्या बुद्धीची किंव वाटण्याऐवजी संताप येतो. टंचाईच्या ह्या परिस्थितीला जबाबदार आहे ती अनिर्बंधपणे वाढणारी बेसुमार प्रजा. आणि एखाद्या अहोरात्र धडधडत असलेल्या कारखान्यातून बेफाम वेगाने उद्याचे मतदार या देशावर कोसळत आहेत. भारतासारख्या विकसनशील देशाच्या मानाने प्रचंड असलेला जनन-दर आणि वैद्यकीय सोयींमुळे घटलेला मृत्यू-दर, यामुळे दर वर्षी ऑस्ट्रेलिया खंडाच्या एकूण लोकसंख्येइतकी भर भारतीय लोकसंख्येत पडते. लोकसंख्येचा प्रस्फोट होणार नाही तर काय होईल?

जी. एं.च्या ह्या कंसातील प्रश्नातून व्यक्त होणारे त्यांचे कुतूहल आपल्याला खुदकन हसविते, पण हे किंचित स्मित फार कडवट आहे. या प्रश्नामागील उपरोध आपल्याला विचारप्रवृत्त करतो, आणि त्यामुळे मनात उठणारे मानसिक संदर्भाचे तरंग निश्चितच सुखावह नसतात, ते फार दाहक असतात. आणि या पाठोपाठ मनात उद्भवणारा विचार तर त्यापेक्षाही मन:स्ताप देतो. हीऽ ही सगळी बेजबाबदार माणसे

आपली बांधव आहेत! आपण सारे एक आहोत! त्यांच्यावर प्रेम कसे काय करायचे? .....हमे मिल जुलके आगे बढना है। ज्यांना निर्बुद्ध कोडगेपणाने प्रजा वाढवीत बसण्यापलीकडे दुसरे काही जमत नाही, ज्यांना देशातील गंभीर समस्यांची जाणीव नाही, ज्यांच्यामुळे ह्या समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करीत आहेत. अशा जनता-लाटेला बरोबर घेऊन आम्हाला कॉम्प्युटर युगात प्रवेश करायचा आहे.

'मुखवटा' ह्या कथेत औदुंबराच्या पारावर असलेल्या एका छोट्याशा दत्ताच्या देवळाचे वर्णन आले आहे. ह्या देवळात मूर्ती नाही. फक्त स्वयंभू पादुका आणि त्यावर एक पितळी मुखवटा. हे देऊळ उपेक्षित आहे. कधीतरी एखाद्या आडगुरुवारी तिथे दोन-चार फुले वाहिलेली दिसतात. एरवी कुणी तिकडे फिरकत नाहीत. या देवळाच्या पूजेचे काम रघुनाथभटाकडे आहे. पण तो ते कसे तरी उरकायचे म्हणून उरकतो. जी.ए. वर्णन करतात-

'चार घरची पूजा करून कंटाळलेला रघुनाथभट (कसर लागलेली निळी शाल पांघरतो ना, तोच) कशाबशा चार अक्षता त्यावर उधळतो, आणि अगदी रात्री तो मुखवटा धाबळीच्या पिशवीत घालून घरी घेऊन जातो.' (मुखवटा/निळासांवळा)

इथे आलेल्या कंसातून जी. एं.नी प्रत्यक्ष वाचकांशी संवाद साधला आहे. हरि नारायण आपटे आणि त्यांच्या समकालीन कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातून, कथांतून लेखक वाचकांशी संवाद साधत असत. ना. सी. फडक्यांच्या गुजगोष्टीतूनही जणू लेखक वाचकालाच गुजगोष्टी सांगत आहे, असा प्रत्यय येतो. अगदी तसाच प्रत्यय इथे येतो. नेहेमीचा दुरावा, अलिप्तपणा सोडून जी. ए. जणू वाचकाच्या पाठीवर थाप मारून सांगतात, 'कसर लागलेली निळी शाल पांघरतो ना, तोच'- तोच रघुनाथभट बरे का. 'ना आणि तोच' या दोन शब्दातून इथे जी. ए. कधी नव्हे ती आपल्याशी जवळिक साधतात. जी. एं.च्या बाबतीत हा योग दुर्मिळ. वाचकांच्या दृष्टिने तर अगदी मणिकांचनयोग! या कंसाद्वारे जी. ए. अगदी आपल्या निकट, आपल्या बैठकीत आल्यासारखे वाटतात. या कंसाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे रघुनाथभटाच्य शालीचाही रंग निळाच आहे. काळा, तपकिरी, ब्राऊन, हिरवा, पोपटी, लाल, पांढरा, क्रिम यातला कुठलाही रंग शालीसाठी जी. एं.ना चालत नाही. रघुनाथभटाला कथेत काहीही काम नाही, स्थान नाही. देवळाच्या वर्णनात ओघात आलेली ही एक सामान्य व्यक्ती, पण केवळ एका वाक्यात जी. ए. त्याचे असे काही वर्णन करतात, की आपल्याला त्या भटाचा तीव्र प्रत्यय यावा. आणि अशा या वर्णनाच्या ओघात आलेल्या व्यक्तिसाठीही जी. ए. शाल निवडतात ती निळीच. जी. एं.ची ही निळ्या रंगांची आवड अशी अनेक ठिकाणी उसळी मारून वर आलेली, अभिव्यक्त झालेली त्यांच्या कथांतून आढळून येते.

'गुंतवळ' या कथेतील पांड्याचा बाप हलाखीची स्थिती आल्यामुळे नाइलाजाने

पांड्याला सदूभाऊपाशी आणून सोडतो. गावाबाहेर पडण्याची पहिलीच वेळ असल्यामुळे पांड्याचे डोळे सारखे गळत होते. गावाबाहेरच्या मारुतीच्या कट्ट्यावर तर पांड्याने अगदी अंगच टाकले. बापाचे हृदय त्यामुळे द्रवले; पण त्याचाही निरुपायच होता.

'मग त्याच्या बापाने त्याच्या पाठीवरून हात फिरवला. (उभ्या नांगरासारख्या धिप्पाड शरीराच्या बापाचे हात मात्र लोण्यासारखे होते. सारख्या बिड्या ओढून पिवळसर झालेले.) आणि पांड्याला त्याने समजावून सांगितले, अरे, तुला दोन-तीन महिन्यात आणतोच की परत! तुला काय टाकून देतो? चार-पाच तारखेला पैसे पाठवतो, मग ये की कारट्या परत! . . .' (गुंतवळ/निळासांवळा)

बापाचे पांड्याच्या पाठीवरून हात फिरवणे, आणि त्याची समजूत घालणे, यात आलेला हा कंस, बापाच्या हातातून पांड्याला जाणवणाऱ्या त्याच्या वात्सल्याचा अचूक प्रत्यय आपल्याला देतो. परिस्थितीपुढे हताश झालेल्या, पण त्यातूनही घर सावरण्याकरिता धडपडणाऱ्या, नाइलाजाने पोटच्या गोळ्याला परक्याकडे कामावारी ठेवणे क्रमप्राप्त झालेल्या, धिप्पाड शरीराच्या, वरकरणी कठोरहृदयी भासणाऱ्या बापाचे अंतःकरण अतिशय मृदू होते, याची साक्ष त्याचे लोण्यासारखे मऊ हात देतात. पण एवढ्यावरच हा कंस थांबत नाही, तर ते हात सारखे विड्या ओढून ओढून पिवळसर झाले होते, हेही तो नमूद करतो. बापाच्या बाह्य धिप्पाड व्यक्तिमत्त्वाशी सर्वस्वी विसंगत भासणाऱ्या त्याच्या मऊ हाताचा उल्लेख कंसात घालून जी. एं.नी त्या विसंगतीवर नेमके बोट ठेवले आहे. हा कंस रसभंग तर करत नाही, उलट पांड्याच्या बापाचा प्रेमळपणाच आपल्या मनावर ठसवतो. हुंदके देणाऱ्या पांड्याची कशीबशी समजूत तो प्रेमळ पिता कशी घालू शकला, याची कल्पना या कंसामुळे येते. त्याच्या संवादात येणारा 'कारट्या' हा शब्द त्याच्या प्रेमळपणावर खास जी. एं.च्या शैलीने शिक्कामोर्तब करतो. जी. एं.च्या कथांतून वडिलधाऱ्या व्यक्ती (आई, वडिल, मावशी) मुलांवर प्रेम व्यक्त करताना 'कारट्या' ह्या संबोधनाचाच वापर करताना आढळतात. त्यामुळे अस्सल प्रेमळपणाची खूण म्हणजे 'कारट्या' हे संबोधन, जी. एं.च्या कथांपुरते आपल्याला लक्षात घ्यावे लागते.

'तिला पाहताच सारी पोरे व्यवस्थित बसतात, व घाईघाईने तोंडावरील गुलाल पुसतात. गोप्या सदऱ्याचे बटण लावतो (पण ते पुन्हा लगेच निसटते) व किंचित तोंड उघडून तिच्याकडे पाहतो. मंगल सात-आठ वर्षांची असेल, पण पाहिले की जाईच्या फुलाची आठवण होते. तिचे कपडे नेहेमी शुभ्र रेशमाचे असत. आणि ती हसली (आणि ज्यावेळी ती खरोखर हसत नसे, त्या वेळी ती हसण्याच्या बेतात असे) की पाहणाऱ्याला उगाचच नाजुक हुरहुर लावणारा आनंद होतो.' (मुखवटा/निळासांवळा)

'मुखवटा' ह्या कथेत तळागाळातील मुलांचा खेळ दुरूनच का होईना पण पाहण्यासाठी समोरच्या देशपांडे चाळीतील मंगल बाहेर येते व वरच्या पायरीवर बसते.

भोपळ्या, गोप्या, सद्या, जोत्या, भिंगरी, वासू आदी ती मुले, घाणेरड्या अवतारात देहभान विसरून हुंदडत, पण स्वच्छ कपड्यातील जाईच्या फुलासारखी नाजुक मंगल बाहेर आली की ती मुले वरमत, दबून जात. ती आली की वासू खेळातून गळून निमूट पारावर बसत असे. एकदाच तिने त्यांच्या खेळात भाग घेतला, म्हणून तिची आई रागारागाने पुटपुटत तिच्या हाताला धरून तिला घेऊन गेली. तिच्या शब्दांनी ती सारी पोरे शरमली. तेव्हापासून मंगल वरच्या पायरीवर बसूनच त्यांचा खेळ पाहते.

काळोखाला प्रकाशाचे आकर्षण असावे तसे या पोरांना मंगलचे आकर्षण आहे. तिच्या लाकडी खोड्यात अडकलेल्या पडवळासारख्या पायांबद्दल दु:ख आहे. मंगलविषयी अपार सहानुभूती आहे. तिच्याबद्दल आदरही आहे. जणू त्यांच्या फाटक्या, गलिच्छ, क्षुद्र जगात मंगल एखाद्या परीप्रमाणे क्षणकाळ अवतरत असे. तिचे येणे, वरच्या पायरीवर बसून त्यांचा खेळ पाहणे त्यांना आवडत असे. तिचे 'दिसणे' त्यांना सुखावत असे. पण त्याचवेळी स्वत:च्या अजागळ अवताराची त्यांना लाज वाटत असे. तिला पाहताच पोरे, त्यातल्या त्यात व्यवस्थित बसतात. स्वत:चे कपडे ठाकठीक करण्याचा प्रयत्न करतात. 'आंबिलगाड्या'च्या खेळात तोंडाला फासलेला गुलाल पुसतात. आतापर्यंत बटणाची शुद्ध नसलेला गोप्या सदऱ्याचे बटण लावून किंचित तोंड उघडे टाकून तिच्याकडे पाहतो. संस्कारी मध्यमवर्गीय नीटनेटक्या मुलाचे अनुकरण करण्याचा हा गोप्याचा दुबळा प्रयत्न आहे. बटणाची आठवण त्याला मंगलला पाहून येते, एरवी सदऱ्याचे बटण उघडे असले तरी त्याचे बिघडत नाही. त्याच्या आईचेही बिघडत नाही. कमरेवर चड्डी नीट असली की झाले. नीटनेटक्या कपड्यांची, अवताराची शुद्ध तळागाळातील, झोपडपट्टीतील मुलांना असते कुठे? साहजिकच गोप्याने लावलेले बटण पुन्हा लगेच निसटते.

जी. एं.चा हा कंस मंगल आणि गोप्या यांच्यातील सामाजिक अंतर स्पष्ट करतो. गोप्याला नीटनेटकेपणाची सवय नाही, आवड नाही, त्यामुळे उसना ओढून ताणून आणलेला नेटकेपणा टिकणार कसा? काजातून निसटून बटण लगेच मुक्त होते. गोप्याला अर्थातच याची शुद्ध नाही. तो आपला मंगलकडे आसासून पाहत आहे. बारीकसारीक गोष्टी टिपून कथेत आवर्जून त्यांचा उल्लेख करणारा जी. ए.मधला सूक्ष्म निरीक्षक इथे आपल्याला दिसतो. जी. ए. अगदी सगळे सगळे सांगण्याचा, दर्शविण्याचा प्रयत्न करतात, तो असा. मंगल हसली की पाहणाऱ्याला उगाचच नाजुक हुरहुर लावणारा आनंद होत असे. एवढे वर्णन करून जी. ए. थांबत नाहीत. मंगलच्या हसण्याबद्दल ते लगेच कंस टाकतात. जी. एं.चा हा कंस इतका मोहक आहे की त्यामुळे सदैव हसऱ्या चेहेऱ्याने वावरणाऱ्या मंगलच्या गोड चेहेऱ्याचा दृक्प्रत्यय आपल्याला येतो. हा कंस दीर्घकाळ स्मरणत राहातो आणि दुर्दैवी मंगलबद्दल वाचकालाही हळहळ वाटू लागते. पांगळी असूनही आनंदी असलेली, सदैव हसतमुख चेहेऱ्याने वावरणारी मंगल

वाचकाला वेदना देऊन जाते. ह्या कंसामुळेच मंगलसाठी आलेली 'जाईची फुलांची' उपमा सार्थ वाटते. मंगलच्या व्यक्तिमत्त्वाचा गोड ठसा उमटविणारा हा कंस जी. एं.च्या शैलीचा मोहक नमुना आहे. हा कंसही वाचकाला हुरहुर लावतो ती वेगळीच.

'त्यानंतर सी. राजगोपालाचारी व टकल्या मानेचे गिधाड यांच्या संयोगातून निर्माण झाल्याप्रमाणे दिसणारा कट्टी मास्तर, व काळा कुळकुळीत, ज्याला पोरे शाळिग्राम म्हणत, ते सोलापुरे गुरुजी (मास्तरबिस्तर सारे बाटगे. एकदम गुरुजी. दोन रुपयाला घरी येऊन सारे विषय शिकवणारा गुरुजी!) ही सारी मंडळी इतक्या गंभीरपणे आत आली की, एखाद्याला वाटावे की ते खांद्यावरील प्रेत बाहेर ठेवून आत काही तरी न्यायला आले आहेत.' (माणूस नावाचा बेटा/हिरवे रावे)

मदलूर, कट्टी मास्तर आणि सोलापुरे गुरुजी हे तिघेही शाळेचे लाइफमेंबर. सदा गंभीर, जबाबदारीच्या ओझ्याने वाकलेली ही मंडळी. तिघांनाही जवळजवळ खाजगी जीवन नाहीच. त्या तिघांच्या शाळेतील आगमनाचे उपरोधपूर्ण वर्णन करीत असताना मध्येच कंस येतो, तो आपल्याला त्या तिघांतील सोलापुरे गुरुजीचे वेगळेपण जाणवून देण्याकरिता. हा कंस इथे आला नसता तरी तिघांच्या औपरोधिक वर्णनात कुठलीही कमतरता भासली नसती हे खरे, पण 'गुरुजी' ह्या शब्दापाशी जी. ए.च इथे थबकलेले दिसतात, आणि 'माणूस नावाचा बेटा' ह्या संपूर्ण कथेला लाभलेल्या औपरोधिक सुरातच हा कंस जणू अपरिहार्यपणे अवतरतो. प्राथमिक शाळेतील गुरुजींबद्दलचे आपले मानसिक संदर्भ जागृत करण्याचे कार्य हा कंस साधतो. त्यामुळे सोलापुरे गुरुजींचे ध्यान आपल्या नजरेसमोर तरळून जाते, आणि कंसातील उपरोध जाणवून खुदकन हसू येते.

'गुरुजी'ला 'मास्तर' म्हटले की राग येतो. त्यांच्या मते 'गुरुजी' ह्या संबोधनातच तथाकथित 'पावित्र्य' आहे ते 'मास्तरा'त नाही. मास्तर म्हणजे बाटगा. पूर्वी 'मास्तर' म्हटले म्हणून शिक्षा करणारे गुरुजीही आढळत, आता 'गुरूजी' म्हटले म्हणून मारणारे गुरुजी आढळतात. ह्या गुरुजींचेही एक वेगळेच विश्व असते. आणित्या त्यांच्या मर्यादित विश्वात ते सर्वेसर्वा असतात. प्रामुख्याने खेड्यात, तहसिलीत आणि मुंबई, पुणे, नागपूरसारखी मोठी शहरे सोडली तर कुठल्याही शहरात हे गुरुजी पाहावयास मिळतात. मोठ्या शहरातून अलीकडे मास्तरणींची संख्या वाढलीय, त्यामुळे 'गुरुजी' सापडणे हा दुर्मिळ योग. वर्तुळ जेवढे लहान तेवढा 'गुरुजी' महान ! छोट्या वर्तुळात 'गुरुजीं'चा दबदबा फार. त्याचे ज्ञान अगाध आणि त्याला येत नाही, अगर माहीत नाही असे तर एकही क्षेत्र नसते. त्याची राजकारणाची समजही गौरवास पात्र असते. लहान वर्तुळात तो अष्टपैलू समाजकार्यकर्ता असतो, आणि सरपंचाच्या खाजगी बैठकीतला भिडू असतो. पण असा हा 'गुरुजी' शिकवणीचे गाजर दिसताच मात्र वेगळाच होतो. ही कथा लिहिली त्या काळात तो दोन रुपयात सारे विषय घरी येऊन शिकवत असेल. हल्ली त्याचा भाव वधारलाय. पण शिकवणार सारे विषय. वाढत्या महागाईनुसार

गुरुजीचेही स्थळकाळानुसार दर बदलत चाललेत. तथाकथित सुसंस्कृत, साक्षरतेत अग्रभागी असलेल्या जिवघेण्या स्पर्धक शहरात 'गुरुजी' घरी येऊन सर्व विषय शिकव्रायला दरमहा २५० ते ३०० रु. वाजवून घेतात. गुरुजींचा दबदबा फार. एक दिवस गुरुजी येऊन शिकवून जाणार, दुसऱ्या दिवशी त्याची असिस्टंट फॉलोअप वर्क करून जाणार. आहे की नाही रुबाब!

'एखाद्या वस्त्रात बंदिस्त राहायला नाखूष असलेल्या धुंद गोऱ्या अंगावर चांदण्या असलेले हिरवे वस्त्र, एकदा त्या केसात इंद्रधनुष्यात नक्षत्रे उगवल्याप्रमाणे वाटणारी चमकणाऱ्या रंगीत खड्यांची माळ, लालभडक मखमलीवर भरजरी तिरप्या रेषा व तिच्या अंगाभोवती आसक्तीने वळवणाऱ्या त्यावरील प्रकाशाच्या काड्या, येथपर्यंतही धग पोचवणारा मांड्यांचा आकार (आणि येथूनच त्यांच्यावर फिरणारी उतावीळ बोटे)..... चार पाच दिवसांनी सर्कस निघून गेली.' (वीज/पिंगळावेळ)

सर्कससुंदरींचा कमनीय बांधा, त्यांची रबराप्रमाणे लवचिक शरीरे, त्यांच्या लवलवत्या हालचाली, दिव्यांच्या झगमगाटात चमकणारे त्यांचे पोषाख आणि त्या घट्ट-आवळ पोषाखातून दृग्गोचर होणारी त्यांची मादक शरीरे, प्रेक्षकांच्या हृदयाची धडधड वाढवितात. त्यांना घायाळ करतात. विशेषत: त्यातील एखादी सुंदरी तर प्रेक्षकांच्या हृदयाचा ठावच घेते. तिच्यावर त्यांच्या नजरा खिळून राहतात. तिच्या वारंवार आगमनाची उत्कंठेने प्रतिक्षा सुरू होते. तिच्या चित्ताकर्षक हालचाली, तिचे झगमगते मादक शरीर, तिचे हसणे आणि तिचे अभिवादन यांकडे पापणी लवू न देता अनिमिष नजरेने पाहाणारे असंख्य पुरुष प्रेक्षकांत असतात. तिलाही याची जाणीव असतेच. घायाळ पुरुषी नजरांचा विखार सवयीने तिला अंगवळणी असतो इतकेच. ही सर्कससुंदरी आपल्याला अप्राप्य आहे, हे सर्व जाणून असतात. तरीही त्या तीन तासाच्या अवधीत आपल्या नजरेने तिला पिणारे, कुरवाळणारे, तिला मनातल्या मनात बाहुपाशात घेणारे..... असंख्य असतात. इथून तिथून पुरुष सगळे सारखेच! त्या सर्कससुंदरीबद्दल आपल्या मनात तरळून जाणारे सर्व विचार, आपल्या पत्नीपुढे प्रामाणिकपणे व्यक्त करून दाखविणारा एक तरी हरीचा लाल आढळेल काय? शक्यच नाही. घरात सुखाने राहायचे आहे ना? मग हे भलतेच कसे काय बोलून दाखविणार? आणि बोलून उपयोग काय? फुकट पत्नीपुढे हसे मात्र होणार. नंतरची धुसफूस, त्रागा, पाणउतारा, शीत अथवा गरम युद्ध यांना तोंड कोण देणार? त्यापेक्षा आपला मनातल्या मनात चालणारा एकतर्फी खेळ निश्चितच सुखावह नाही का?

खरे सांगा, सर्कस पाहताना त्या सर्कससुंदरीच्या गच्च, घट्ट, तरीही मुलायम, लोभसवाण्या मांड्या आणि त्यातील त्रिकोणी उभार नजर खिळवून ठेवत नाही का? त्या मांड्या आणि त्यातील तो उभार मन चाळवत नाही का? ते दर्शन उत्तेजक, पेटविणारे नसते का? ते पाहूनही न पाहिल्याप्रमाणे करणे खरोखर शक्य आहे का?

विश्वामित्रसुद्धा जिथे चळलेत तिथे आपला काय पाड लागणार? मनात येणारे हे असले विचार निदान स्वत:च्या मनाशी तरी कबूल करण्यात काय कमीपणा आहे?

'वीज' या कथेतील बळवंतमास्तरांच्या मनात जाग्या झालेल्या अभिलाषेचा, वासनेचा लालभडक कोंभ ह्या कंसातून अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झालेला आहे. सदैव वाचनात हरवलेला, दिवास्वप्नात रममाण होणारा, मुलांवर प्रेम करणारा, गंगी गायीत आतडे गुंतविणारा, गोदाक्काची माया जाणून तिला आई मानणारा, सरळ स्वभावाचा भोळाभाबडा बळवंतमास्तर अखेर आपल्यासारखाच 'पुरुष' होता. त्यालाही वासना होत्याच आणि त्या आपल्या इतक्याच तीव्र होत्या, हे ह्या कंसातून जी. एं.नी स्पष्ट केले आहे.

(आणि येथूनच त्यांच्यावर फिरणारी उतावीळ बोटे)..... जी. एं.चा हा कंस कायम स्मरणात राहातो, कारण तो केवळ बळवंतमास्तरांच्या मनोव्यापाराचे स्पष्टीकरण देत नाही, तर तो आपल्याही अव्यक्त मनात चालणारे खेळ व्यक्त करतो, तो प्रातिनिधिक बनतो. प्रेक्षकांमध्ये बसलेल्या शेकडो पुरुषांच्या वासनांचे, सर्कससुंदरींकडे बघणाऱ्या त्यांच्या दृष्टींचे, सर्कससुंदरीबद्दल सर्वांनाच वाटणाऱ्या समान अभिलाषेचे दर्शन हा चिमुकला कंस घडवितो, म्हणूनच तो कायम स्मरणात राहातो. केवळ सहा शब्दांच्या ह्या वाक्यांशातून जी. एं.नी केवढा विस्तीर्ण आशय सूचित केला आहे, नाही?

'चांगले जेवण झाल्यानंतर (जेवण म्हणजे अर्थात कोंबडीचे. नाही तर बाकीचे जेवण काय, आहे आपले यज्ञकर्म!) प्लेअर्सला एक भावोत्कट गंध असतो.' (माणूस नावाचा बेटा/हिरवे रावे)

प्रस्तुत कंसातून जी. एं.नी आपल्या वाचकांशी संवाद साधला आहे. इथे जी. ए. आपल्याशी कधी नव्हे ते मोकळेपणाने बोलत आहेत असे वाटते. जी. एं.ची मांसाहाराची आवड इथे स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. एखाद्या अस्सल खवय्याप्रामणे जी. ए. मांसाहाराची जी तरफदारी करतात ती मनाला सुखावून जाते. विशेषत: जी. ए. आपल्या रोजच्या जेवणाला यज्ञकर्म म्हणून संबोधतात, ते मनाला एकदम पटते. खरोखर बरेचदा आपण रोजचे जेवण केवळ उरकायचे म्हणून उरकत असतो झाले. त्यात कुठलीही रंगत नसते. लज्जत चाखल्यानंतर प्लेअर्स हवी असे जी. ए. म्हणतात. इथे योगायोगाने जी. एं.च्या दोन्ही आवडी, मांसाहार आणि सिगरेट नमूद झाल्या आहेत. 'माणूस नावाचा बेटा' ह्या कथेत जी. एं.नी सिगारेटवर एक सुनीतच दिले आहे.

जी. ए. म्हणतात, "पण एकदा चारमिनार घेतल्यानंतर तिच्यातील कैफ दुसऱ्या कशातच येणार नाही. राग, निराशा, विषण्णता या कोणत्याही वेळी चालणारी एकच सिगारेट म्हणजे, बस्स, चारमिनार! . . . . . एखाद्या वडारणीच्या आडदांड आलिंगनाप्रमाणे, रासवट उग्र दर्पाने निदान सारे मन ब्रश मारल्याप्रमाणे होते. साऱ्या विषयावर निगरगट्टपणे वापरता येणारी चार मिनार हे सिगरेटमधील सुनीत आहे!"

जी. एं.ची कथा लक्षात घेता जी. ए. आणि विनोद ही कल्पनाच पहिल्या झटक्याला विनोदी वाटेल. जी. एं.नी निखळ विनोदी (की पोरकट, आचरट!) कथा कधी लिहिली नाही वा संपूर्ण विनोदी कथाही लिहिली नाही. पण याचा अर्थ जी. एं.ना विनोदाचे वावडे होते असाही नाही. जी. एं.ना विनोद नक्कीच आवडत असावा, त्यांना विनोद उत्तमप्रकारे कळत असावा, रुचत असावा. किंबहुना निवडक मित्रांच्या मैफलीत वा त्यांच्या पत्रांतून जी. एं.च्या विनोदांचे तुषार नक्कीच उडत असावेत, असे वाटते. जी. एं.च्या कथांतून क्वचित जो विनोद प्रकट होतो, त्याला उपहासाची, उपरोधाची तीक्ष्ण धार असते. जी. एं.चा विनोद प्रसंगी बोचरा असतो. क्वचितच तो नर्म, प्रसन्न असतो. खळखळवून हसविणारा गडगडाटी विनोद जी. एं.नी कधी निर्माण केलाच नाही. 'एखादी तरी स्मितरेषा' एवढीच मर्यादा जी. एं.च्या विनोदाला आढळते.

अशाच एका कंसातून अवतरलेला जी. एं.चा विनोद त्यांच्या नर्म, प्रसन्न विनोदाचा उत्तम नमुना आहे. जी. एं.चा जो खास वाचकवर्ग आहे, त्याच्या कायम स्मरणात राहणारा हा विनोद आणि अर्थातच हा कंस आहे.

'वुलन पँन्टमध्ये आजारी पाल हिंडत असल्याप्रमाणे दिसणारा बापट, (बिचाऱ्याला कधी कुणी त्या नावाने हाक मारली नाही.) काव्याची विशेष आवड नसणारेही त्याला 'बापट कुल्ले आपट' या संपूर्ण सयमक नावाने हाक मारीत. त्यानेही कंटाळून तक्रार करण्याचे सोडून दिले होते.(माणूस नावाचा बेटा/हिरवे रावे)

यात गंमत एकच आहे, की कधी कुणा बापट नावाच्या व्यक्तीची गाठ पडली व कुणी कुणा बापटाची ओळख करून दिली किंवा कुठे बापट हे नाव वाचनात, ऐकण्यात आले की, हटकून लख्खकन जी. एं.चा हा कंस आठवतो, मग गालावर स्मित झळकते. आपल्या हसतमुखामुळे समोरच्या बापटाला बरे वाटते तो भाग अलाहिदा. त्या बापड्याला आपल्या स्मितामागचे रहस्य माहीत नसते म्हणून ठीक, आणि तोही जी. एं.चा खास वाचक असला तर मग त्याला हा कंस माहीत असतोच. पण तो कंस आठवल्यामुळे आपण हसतमुख आहोत हे आपले रहस्य कायम असते. एकूण या कंसाने जी. एं.नी 'बापट' हे आडनाव चिरस्मरणीय करून ठेवले. जी. एं.च्या 'कथे'शी हा विनोद, आणि हा कंस निगडित आहे. जी. एं.च्या कथेवर त्यांच्या रसिक वाचकात जेव्हा प्रदीर्घ गप्पा सुरू होतात, त्यावेळी या विनोदाचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध नसलेल्या लेखकाचा विनोद कायम स्मरणात राहावा हेही त्या लेखकाचे सामर्थ्यच नव्हे का?

कथेतील अगदी सर्वसामान्य किरकोळ व्यक्तिरेखाही जी. ए. चार-दोन वाक्यांतून ठसठशीत, उठावदार अन प्रत्ययकारी बनवितात हेही त्यांच्या कथेचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. कथेतील सर्व अंगांकडे, उपांगांकडे जी. ए. सारखेच लक्ष पुरवितात. वर्णनाच्या ओघात आलेल्या जनसामान्यांचेही ते मोजके, मार्मिक,

प्रत्ययकारी वर्णन करतात. त्यामुळे त्यांच्या कथेची वीण कुठेही विसविशीत होत नाही. उलट जी. एं.नी त्यांच्या प्रत्येक कथेवर जी प्रचंड मेहनत घेतली अन् एक एक कथा-शिल्प साकार केले, त्यामुळे त्यांच्या कथेतील प्रत्येक वाक्याचा अन् त्यातील शब्दांचा गंभीरपणे विचार करावा लागतो. जनसामान्यांचे, म्हणजेच कथेतील अत्यंत किरकोळ व्यक्तिरेखांचे रेखाटन करतानाही जी. एं.नी कंसाचा वापर केला आहे, त्याकडे आपण आता वळू.

'आता साडेदहा झाले होते. तेथून रमाबाई (लठ्ठ, पदर सारखा सावरणाऱ्या, पाऊल टाकताच ते सारे घरंगळणार असे त्यांचे अंग हादरत असते.) हातात ताम्हण घेऊन शाकंबरीला बाहेर पडल्या.' (शलॉट/पारवा)

रमाबाईंचा लठ्ठपणा ह्या कंसातून उत्कटत्वाने जाणवतो. नजरेसमोर एक स्थूल, विशालदेही, मांसाच्या वळकट्या असलेली, सुखवस्तू घरातील वयस्कर स्त्री साकारते. कारण नसतानाही सतत पदर सावरण्याचा तिचा चाळाही कळून येतो आणि त्यातून स्वत:चे अस्तित्व सतत इतरांना जाणवून देण्याची, इतरेजनांच्या नजरांचा केंद्रबिंदू बनण्याची तिची प्रवृत्तीही कळून चुकते. कधीकाळी असलेल्या तिच्या सुडौल बांध्याचा, रूपाचा अन् श्रीमंतीचा तोरा तिच्या ह्या चाळ्यातून आपल्याला सूचित होतो. पुढे कथेत तिच्या रूपाचा अन् त्यामुळे पडलेल्या खुनाचा उल्लेख येतोच. प्रस्तुत कंसातील एका वाक्यामुळे वर्णनाचा कितीतरी फापटपसारा वाचला असल्याचे लक्षात येते. कंटाळवाणे, निरस वर्णन टाळून एका वाक्यात किंवा वाक्यांशातून तीच गोष्ट अधिक प्रभावीपणे जाणवून देण्यासाठी जी. एं.नी इथे कंसाचा वापर केला आहे, हे उघड आहे.

'ती समोरची अशक्त, फिकट (आणि हातावर केस किती!) आणि मांजरपाटी, चेहेऱ्याची इयररिंग्ज सतत हलवणिारी शांता दीक्षित.'

(माणूस नावाचा बेटा/हिरवे रावे)

दत्तू जोशीच्या वर्गातील शांता दीक्षित ही समोरच्या बाकावर बसणारी एक सामान्य मुलगी. कथेत तिला काहीच काम नाही. वर्गातील मुलामुलींचे वर्णन करताना आलेली एक अतिसामान्य व्यक्तिरेखा-- केवळ जमावातील एक! पण जी. एं.चे वाक्य आपल्याला शांता दीक्षितचा दृक्प्रत्यय देते. मांजरासारखे चिमुकले खापरतोंड असलेली अशक्त मुलगी आपल्या नजरेसमोर तरळते. चेहेऱ्याचे अन् शरीराचे सोंग असले तरी अशा विद्रूप, अशक्त, फिकट, मरतुकड्या मुली सतत न शोभणारे नखरे मात्र करीत असतात. त्यामुळे त्यांची किंव येण्याऐवजी संतापच येतो. माना काय वेळावतात, इयररींग्ज काय हलवतात, वेणीशी चाळा काय करतात, भुवया काय उडवतात, पाय काय हलवत असतात. अय्याऽऽ, इश्शऽऽ, होऽक्का यांची तर बरसातच करतात. खरे तर ह्या साऱ्या हलचाली अन् उद्गार सुंदर मुलींना शोभून दिसतात, पण त्याच हालचाली अन् उद्गार मरतुकड्या, खापरतोंड्या मुलींना अजिबात शोभत नाहीत. पण

त्यांना इतरांची पर्वा नसते. केवळ मुलीच्या जन्माला आल्या म्हणून त्या आपला सूड उगवत असाव्यात, असे वाटते. यात कळस म्हणजे केसाळ मुली! शांता दीक्षित अशक्त, फिकट, मांजरपाटी चेहेऱ्याची तर होतीच, शिवाय ती केसाळ होती. प्रस्तुत कंसातील उद्‌गार केसाळ व्यक्तीबद्दलचा जी. एं.चा उपहासच व्यक्त करतो.

मानव हाही एक प्राणीच आहे, हे खरे. पण केसाळ माणूस नकळतच केसाळ प्राण्याची आठवण देत असतो. काही माणसांना आपल्या छातीवरील भरगच्च केसांचा अतिशय अभिमान वाटतो आणि आयाळीप्रमाणे भासणारे आपले ते वैभव उघडेबंब राहून ते येताजाता इतरांना दाखवीत असतात. काही तरुण पुरुष त्यासाठी शर्टाची एक-दोन बटणे मुद्दामच उघडी टाकतात. पुरुषाच्या छातीवरील हे केसाळ जंगल स्त्रियांना आकर्षित करीत असेलही, नाही असे नाही. पण स्त्रियांच्या, मुलींच्या हातापायावरील केस मात्र किळसच निर्माण करतात. क्वचितच कुणा मुलीच्या वा स्त्रीच्या गालावर, ओठावर आढळणारी हिरवट लवही अगदी पाहवत नाही. हीच किळस जी. एं.च्या वरील कंसातून व्यक्त झाली आहे.

'गेल्या गॅदरींगच्या वेळी त्याने मोठ्या उत्साहाने आपल्या बायकोला शाळेत आणले. ' (ठेंगणी, भांबावलेली, नव्या पातळाचा बोंगा.) (शिक्षा/हिरवे रावे)

'शिक्षा' ह्या कथेतील तो कुणी कारकून शाळेच्या गॅदरींगच्या निमित्ताने आपल्या बायकोला शाळेत घेऊन येतो. कौतुकाचे कटाक्ष, माफक शब्दांची सौजन्यशील देवघेव, हेडमास्तरांच्या तोंडून दखलवजा एखादे तरी वाक्य आपल्या वाट्याला येईल अशी त्या नवख्या कारकुनाची कल्पना असावी. पण तो अननुभवी होता म्हणूनच बायकोला शाळेत नेण्याचा वेडेपणा त्याने केला. त्याच्या बायकोची कुणी दखलच घेतली नाही. उलट तिच्यादेखत हेडमास्तर क्षुल्लक कारणावरून त्याच्यावर डाफरले. कारकून मनात खजील झाला. अन् त्याची बायको त्या समारंभात अवघडली, संकोचली, गुदमरली.

त्याची ती बायको त्या समारंभात कशी दिसत होती? जी. एं.चा कंस त्यांचे नेटके वर्णन करतो. त्या अनोळखी वातावरणात ती भांबावून गेली. शाळेतील शिक्षिकेचा नट्टापट्टा, त्यांचा दिमाख, तोरा, भपका, त्यांची अखंड चालणारी बडबड यात ती कुठेच बसत नसल्यामुळे ती दिपली, भांबावली. त्यात ती ठेंगणीठुसकी. सफाईदार पातळ नेसण्याचा सराव नसल्यामुळे शाळेत जाण्यासाठी म्हणून मुद्दाम नेसलेल्या नव्या पातळाचा साफ बोंगा झाला होता. पण नजरेत भरावे, बरे दिसावे म्हणून तिने केलेला सर्व आटापिटा वाया गेला होता. तिचे पुरते सोंग झाले होते. शिक्षिकांच्या थट्टामस्करीला आयता एक विषय मिळाला एवढेच. जी. एं.नी ह्या कंसातून त्या कारकुनाच्या बायकोचे बाह्य वर्णन तर दिलेच, पण तिची अवघडलेली अवस्थाही अप्रत्यक्षपणे सूचीत केली आहे. शहाण्या माणसाने आपल्या नोकरीच्या ठिकाणी मुलांना अगर बायकोला नेऊ नये

आणि बायकोच्या नोकरीच्या ठिकाणी तर मुळीच जाऊ नये. झाकली मूठ सव्वालाखाची. विषाची परीक्षा पाहू नये. अगदी सेवा-निवृत्तीच्या निरोप-समारंभालासुद्धा बायकोला नेणे टाळावे. कारण त्या समारंभातही ती बिचारी परकी, उपरी ठरते. बायकोला बरोबर घेऊन मिरवायचेच असेल, तर बाहेर कमी का ठिकाणे आहेत? जिथे आपण आज काम करतोय, वर्चस्व गाजवतोय, तिथे उद्या खुद्द आपणच उपरे, आगंतुक ठरणार आहोत हे कटू सत्य ध्यानी घ्यायलाच हवे.

कथेतील क्षुल्लक व्यक्तिरेखेपासून तो महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखेपर्यंत सर्वच व्यक्तिरेखा ठळकपणे उभ्या करण्याकरिता जी. ए. धडपडताना दिसतात. निवेदनाच्या ओघात आलेल्या अगदी सामान्य व्यक्तीचे वर्णनही ते एक-दोन वाक्यातूनच अशा सामर्थ्याने करतात की, आपल्या नजरेसमोर ती व्यक्ती तरळून जावी. तत्काळ दृक्प्रत्यय देण्याचे तीव्र सामर्थ्य जी. एं.च्या शैलीला लाभलेले होते. त्यामुळे कथेतील सर्व, अगदी जमावातील, गर्दीतील व्यक्तीही आपल्याला स्वच्छ जाणवून जातात. जी. एं.च्या शब्दकळेच्या ह्या असाधारण सामर्थ्यामुळे एखाद्या चित्रपटाप्रमाणे कथा आपल्यापुढे उलगडत जाते.

पण त्याबरोबरच अगदी बारीकसारीक तपशील दिल्याशिवाय जी. एं.ना चैन पडत नसे असे दिसते. निवेदनाच्या ओघात आलेल्या सामान्य व्यक्तिरेखेच्या बाबतीतही जी. ए. शक्यतोवर सर्व तपशील पुरविण्याची धडपड करताना आढळतात. यातूनही प्रतीत होते ती त्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती!

जी. एं.चे खालील काही कंस त्या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. कथेत ते निश्चितच खटकतात, रसभंगही करतात. त्यातून विशेष काही निष्पन्न होते असंही नाही. त्यातून जाणवते ते एकच, तपशील पुरविण्यासाठी धडपडणारं जी. एं.चे मन आणि त्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती. 'परवा दिवशी एकोणतीस दाणे होते की!' हा दुसरीचा आवाज (कानात लाल डूल.) (शलॉट/पारवा)

'दुकानाच्या एका कोपऱ्यात दादूभटाने आपली सारी दौलत (पंच्यात गुंडाळलेले एक गाठोडे, अल्युमिनियमची तांब्या-थाळी, आणि दोऱ्याने पट्ट्या सावरून धरलेल्या जुन्या वहाणा) ठेवली होती.' (अंजन/काजळमाया)

'हातात औषधांची बॅग घेऊन (काय औषधे होती कुणास ठाऊक. हे औषध अमक्या रोगावर आहे एवढे कुणी तरी मला सांगितले होते. मी तेच इतरांना सांगतो. खरे खोटे कुणास ठाऊक! लोकांच्या चुळा तोंडात घेऊन त्या माझ्याच म्हणून मी दुसऱ्यांना देतो.) त्या गावात फिरती सुरू झाली.(वहाणा/हिरवे रावे)

'कारंज्यावर फेस दिसावा त्याप्रमाणे फुलांचा पांढरा रंग ठिकठिकणी शिंपडलेली आकशमोगऱ्याची झाडे सय्यद देसाईची. (त्याला अद्यापदेखील 'इ' जोडल्याखेरीज स्कूल म्हणता येत नाही.)' (घर/पिंगळावेळ)

नंतर पंखांचा फडफडाट ऐकू येतो. पिवळ्या किरमिजी रंगांची पाखरे लाल किरणाला घाबरतात. अनेक पाखरे, हिरव्या खड्यासारख्या डोळ्यांची (माझ्या आंगठीसारख्या).(वहाणा/हिरवे रावे)

'नंतर शीळ वाजवत (खरे म्हणजे त्याला शीळ वाजवता येत नसे. तिला एकदम मध्येच चीर जात असे.) त्यांचा थोरला मुलगा माधव येतो.

(राणी/निळासांवळा)

'माईनी खिडकी लावली (पण खिडकी लावावी संजानानेच!) व त्यांच्या अंगावर चादर टाकली.' (घर/पिंगळावेळ)

'घर' ह्या कथेत आलेला हा कंस मधूकाकांच्या मनातील नाजुक हळुवार भावना व्यक्त करतो. संजानाबद्दल त्यांना वाटणारे निर्व्याज प्रेम यातून आपल्याला प्रतीत होते.

आपली मुलगी शालिन, सात्विक, प्रेमळ, बाळबोध संस्काराची निघावी ही मधूकाकांची इच्छा. पण त्यांच्या अपेक्षेला त्यांच्या मुलीने, मालतीने साफ हरताळ फासला. मधूकाका-माईच्या बाळबोध संस्कारात वाढलेल्या मालतीने सप्तपदी ओलांडताच जणू कात टाकली.

ती रेसला जाऊ लागली, क्लबातही जाऊ लागली. स्वत:ची दोन मुले कुठेतरी जावेकडे, नणंदेकडे आदळून ती गावभर हिंडू लागली. नाटक- सिनेमाला जाऊ लागली. मुलांमध्ये गुंतून पडण्यापेक्षा नाटक-सिनेमा-क्लब-रेस-नवऱ्याबरोबर मुक्तपणे भटकणे तिला अधिक आवडू लागले. फावल्या वेळात मुले. मुले काय कुठे पळून जातात? मधूकाकांना वाटले, आता मालतीने केसदेखील कातरून घेतले असतील आणि क्लबात जाऊन कधीतरी का होईना, ती पीत देखील असेल! अर्थातच मधूकाकांच्या मनातून मालती साफ उतरली. आपली मुलगी अशी वाहवत गेली याची त्यांना अतिशय खंत वाटे. अशी मुलगी त्यांना नको होती. मुळीच नको होती.

त्यांची मुलीची अपेक्षा पूर्ण केली संजानाने. ना रक्ताची ना नात्याची. जर्मन मिशन हॉस्पिटलमध्ये भेटलेली एक नर्स संजाना. पण तिने मधूकाकांना फार आतड्याने वागवले. ती मालतीच्याच वयाची होती. तिला तिचे असे कुणीच नव्हते. हॉस्पिटलच्या आवारातच ती राहात असे. तासन् तास एकटीच बसून असे. मधूकाकांशी साऱ्या महिनाभरात ती चार-सहा वाक्ये बोलली असेल नसेल. पण ती चहाचा कपदेखील असा पुढे करीत असे, की त्यांनी तो घ्यावाच, असा प्रेमळ आग्रह त्यात असे. खिडकी बंद करण्याचे साधे कामसुद्धा ती इतक्या आपुलकीने करीत असे, की मधूकाकांना गहिवरून येत असे. तिच्या प्रत्येक कृतीतून आपुलकी, लाघवी आग्रह जाणवत राही. पडल्या-पडल्या मधूकाकांना वाटून जाई, खिडक्या हव्यात कशासाठी? प्रकाश आणि हवा आत येण्यासाठी? छे! खिडक्या हव्यात त्या संजानाने बंद करण्यासाठी! अनेकदा संजानाचाच विचार त्यांच्या मनात रेंगाळत राही. त्यांना मनापासून वाटे, ही कुणाची

तरी चांगली बहीण, बायको झाली असती. हिच्यामुळे कुणाच्या तरी आयुष्याला अर्थपूर्णता आली असती. आपुलकीसाठी हजारो माणसे तळमळत असताना ही अशी इकडे एका कोपऱ्यात एकाएकीच का वठून जात आहे? मालतीला दोन मुले आहेत. त्यांना कुठेतरी आदळून, वाऱ्यावर सोडून ती गावभर उंडारते. ती मुले संजानाला का लाभली नाहीत? मातीवर मीठ पडावे, अन् बी खडकावर पडून वाया जावे, जगात असे उफराटेच का घडत जाते?

मालती क्वचितच माहेरी येई, पण त्यावेळीही तिने मुलांना बरोबर आणले नव्हते. नातवंडांना खेळवण्याचं, त्यांच्याकडून सदरे ओले करून घेण्याचे सुख मधूकाकांना कधी लाभलेच नव्हते. मालतीच्या लग्नानंतर ती हळूहळू त्यांना दुरावतच गेली. साहजिकच मालतीच्या बाबतीत त्यांच्या मायेला कुठेतरी बंध पडत गेले. ते सगळे बंध संजानाला पाहिल्यावर गळून पडलेत. जणू आपली हरवलेली मालती ते संजानात शोधत होते. संजानाने त्यांना लोभ लावला अन् मधूकाकांच्या मनात एक कोमल भावबंध रुजला. पित्याच्या वात्सल्याने ते संजानाच्या प्रत्येक कृतीकडे बघू लागले. तिच्या सहवासात मुलीसाठी आसुसलेले त्यांचे अतृप्त मन शांत होऊ लागले. म्हणूनच त्यांना मनापासून वाटले, खिडकी लावावी ती संजानानेच!

'रात्री' तो सिनेमाला गेला. (खरी आर्य स्त्री कशी असते ती पहा! बेफाम नृत्ये, मोहक संगीत. सं. दिग्दर्शक-एफ् लक्ष्मण. शिवाय हॉलीवुडच्या प्रख्यात माकडाचा जांवई 'झिप्पो.') (वहाणा/हिरवे रावे)

'वहाणा' ह्या कथेत येणारा जी. एं.चा हा औपरोधिक कंस वाचकाच्या कायम लक्षात राहातो.

त्या कुणा कारकुनाची टंच बायको रत्ना. आसुसलेल्या चेहेऱ्याच्या मळकट चिंधीसारख्या नवऱ्याला तिने पार गुंडाळून ठेवले होते. पाप्याच्या पितराप्रमाणे दिसणाऱ्या त्या नवऱ्याला तो घरी येताच ती टोच मारल्याप्रमाणे चुंबन देई. लाडिकपणे त्याला बिलगून ती मादक मखमली हसे. तिच्या ह्या साऱ्या लीलांनी तो हरखून जाई. स्वत:च्या भाग्यावर तो निहायत खूष असावा. त्याच्या माघारी समोरच्या खानावळीतील आपल्या प्रियकरांकडे जाऊन ती आपल्या सर्व गरजा भागवी. नवऱ्याच्या तुटपुंज्या पगारातून न भागणाऱ्या तिच्या गरजा औषधविक्रेता, रामस्वामी आणि मराठे आळीपाळीने भागवीत. छोट्या मोठ्या वस्तूंच्या मोबदल्यात ती त्यांना हवे तसे शरीरसुख देई. जॉर्जेटच्या पातळापासून इमिटेशन मोत्यांच्या माळेपर्यंत, टूथपेस्टपर्यंत तिची मागणी असे. ती बिनबोभाट पूर्ण होई. वस्तूच्या मोबदल्यात एक टंच, रसरशीत, तरुण शरीर. तिच्या त्या प्रियकरांनाही हा सौदा पटला होता. तिलाही त्यात काही गैर वाटत नव्हते. मरतुकड्या नवऱ्याकडून जे सुख मिळत नव्हते, ते ती तिघांकडून आळीपाळीने भोगत होती. वर ह्या त्या वस्तू. नवऱ्याला तर तिने डोंबाऱ्याचे माकडच बनविले होते.

घरात नव्या वस्तू येतात कुठून? हा प्रश्न ज्या बापड्याला पडला नाही, बायकोच्या उठवळपणाचा ज्याला पत्ताच लागला नाही, रात्री तरुण बायकोला घरी एकटे ठेवून जो खुशाल एकटाच सिनेमाला जाऊन बसतो, त्याच्या वाट्याला रत्नाच येणार. का रत्नाचा बदफैलीपणा त्याला माहीत झाला होता आणि आपली शारीरिक, आर्थिक कुवत ओळखून त्याने डोळ्यांवर झापडे बांधली होती?

रत्नाच्या बेबंद वागण्यामुळेच ह्या कंसातील उपरोध आणि तिच्या नवऱ्याचा बुळेपणा तीव्रतेने जाणवतो. कंसातील सिनेमाचे वर्णन ही 'मद्रासी फॉर्म्युल्या'ची जी. एं.नी उडविलेली खिल्ली आहे. 'खरी आर्य स्त्री' हे शब्द आपल्याला रत्नाचा आणि सिनेमात सती सावित्रीचा आव आणणाऱ्या त्या नटीचा-दोघींचाही-खोटेपणा सूचित करतात.

लोकप्रिय फॉर्म्युलाचा पोकळपणा, बेगडीपणा जी. एं.नी मोजक्या शब्दातून इथे वेशीवर टांगला आहे. आपल्या सिनेमात तेव्हाही काही दम नव्हता, आजही नाही. जीवनाला सामोरे जाणारी दर्जेदार, दमदार, कथाप्रधान निर्मिती आपल्याकडे अति अल्प प्रमाणात झाली आहे. हा कंस हे फार भेदकपणे स्पष्ट करून जातो.

'पस्तीस वर्षांपूर्वी करवतकाठी रुमाल बांधून भीतभीत त्यांनी त्या तबेल्यात प्रवेश केला होता. आता तेथे दुमजली इमारत झाली होती. (अद्याप थोडं कर्ज आहेच म्हणा.) एखाद्या जुन्या दप्तराप्रमाणे इतक्या वर्षांच्या आयुष्याचे गाठोडे सायन्स हॉलमधल्या सांगाड्याच्या पायाशी ठेवून ते आता बाहेर पडणार होते.' (सांगाडा/निळासांवळा)

नाडगौडा मास्तरांचे चित्रण करीत असताना निवेदनात आलेला हा कंस आहे. (अद्याप थोडं कर्ज आहेच म्हणा.) कंसातील हा विचार नाडगौडांच्या मनातील विचार होता. शाळेशी पूर्णतया एकरूप झालेल्या नाडगौडांना शाळा सोडताना अखेरच्या दिवशीही दुमजली दगडी इमारतीनिमित्त शाळेला झालेल्या व अद्यापही पूर्णपणे न फिटलेल्या कर्जाची खंत वाटत होती. अस्सल महाराष्ट्रीयन मनोवृत्तीची आठवण हा कंस देतो.

कथा वाचताना ह्या कंसाचा अडथळा तर वाटत नाहीच, उलट त्यामुळे नाडगौडा मास्तर त्याच्या महाराष्ट्रीयन वृत्तीमुळे आपल्याला अधिक जवळचा, आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या समाजातील वाटू लागतो. कथेची, कथेतील व्यक्तिरेखेची पाळेमुळे अशा रीतीने ह्या मातीत रुजविण्यात जी. ए. सफल होतात. हा कंस वाचताना नकळतच आपल्याला ओळखीच्या गुदगुल्या होतात. व्यापारी मनोवृत्ती आपल्या रक्तातच नसल्यामुळे मरेपर्यंत कुठल्या कुठल्या कर्जाचा बाऊ करण्यातच आपली सारी हयात खर्ची पडते. इथे तर नाडगौडांना स्वत:च्या नाही, तर शाळेच्या कर्जाची खंत वाटते, म्हणजे कमालच झाली. आपले दोषही विनोदविषय होतात, आणि ते आपल्याला हसवतातही. महाराष्ट्रीयनांत तेवढा दिलदारपणा, खिलाडूपणा नक्कीच आहे.

'पांढरी छत्री घेतलेले, टोपीतून पांढरी शेंडी दिसत असलेले 'नाना मास्तर' ('मुलांचा मित्र' या हस्तलिखित मासिकाचे मुख्य संपादक) हातात पिशवी घेऊन सावकाश जातात. दिलीप त्यांना 'जयहिंद' करतो. तसे करताच सर्वसाधारणपणे सगळ्यांना शेंगदाणे मिळतात. पण आज ते गळलेल्या आवाजाने 'जयहिंद' पुटपुटतात, व पावले ओढत पुढे जातात.(मुखवटा/निळासांवळा)

नाना मास्तर ही 'मुखवटा' ह्या कथेत येऊन जाणारी एक सामान्य व्यक्ती. कथेत तिला काहीही स्थान नाही. पण जी. एं.चे साडेचार ओळींचे निवेदन आणि त्यात येणारा कंस आपल्याला नाना मास्तरांचा दृक्-प्रत्यय देतो.

'मुलांचा मित्र' या हस्तलिखित मासिकाचा उल्लेख शाळकरी हस्तलिखित मासिकाचे आपले संदर्भ जागृत करतो, आणि त्या विश्वात रममाण झालेल्या नाना मास्तरांची कुवत, वकुब, त्यांचे एकूण पुचाट व्यक्तिमत्त्व आपल्याला प्रतीत होते. 'जयहिंद', शेंगदाणे, वाटाणे ह्या उल्लेखांनी जी. एं.नी नाना मास्तरांच्या व्यक्तिरेखेत उरलेसुरले रंग भरून, गांधीवादी विचारसरणीत तयार झालेल्या, सदैव मांगल्याच्या शोधात फिरणाऱ्या, स्वप्नाळू जगात वावरणाऱ्या, आदर्शवादाला जपणाऱ्या, स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यापाड्यांतून आढळणाऱ्या भोळ्याभाबड्या प्राथमिक मास्तराचे चित्र पूर्ण केले.

'आईने अनेकदा सांगितलेले मारुतीचे देऊळ त्याने मुद्दाम पाहिले होते. आपले कार्य होणार असेल, तर ती मूर्ती कोणालाही सहज उचलता येत असे, नाहीतर ती केसभरदेखील हलत नसे. (त्याने ती सहज उचलली होती व सदऱ्यावर शेंदराचा तेलकट डाग पाडवून घेतला होता.) (स्वामी/पिंगळावेळ)

जी. एं.चा हा कंस गूढ आहे, त्याचे कारण या कंसामागील जी. एं.चा उद्देश नेमका कोणता असावा, ते कळणे कठीण आहे.

इथे अंधश्रद्धाळूपणाबद्दल उपहास तर नाही ना? धार्मिक अंधश्रद्धांबाबतचा जी. एं.चा उपहासच पहिल्यावेळी जाणवतो. त्याने मूर्ती उचलताना शेंदराचा डाग पाडून घेतला हे नमूद करायलाही जी. ए. चुकत नाहीत.

जी. ए. स्वत: धार्मिक प्रवृत्तीचे नव्हते, पण प्रभाताईकरिता त्यांच्या सोबत देवळात जात असत. धारवाडमध्ये दर शनिवारी सप्तापूर मारुतीला प्रभाताईंचा नारळ ते स्वत: फोडून आणीत. वाममार्ग, चेटूक, जारणमारण, भुतंखेतं, अंगात येणं, सर्प असल्या गोष्टीत तर त्यांना विलक्षण रस होता. ते स्वत:ला वाममार्गावरील 'मायनॉर अथॉरिटी' असेही गमतीने म्हणायचे. या विषयावरील किती तरी पुस्तके त्यांनी वाचली होती. अशा परिस्थितीत वरील कंसामागे उपहासाची भावना नसावी, असे वाटते.

जर आपले काम होणार असेल, तर ती मारुतीची मूर्ती सहज उचलता येत असे, असा समज होता. त्या अनामिक प्रवाशाने ती सहज उचलली, पण त्याचे तर

कुठलेही काम झाले नाही, उलट तो गोत्यात आला. महंताच्या सापळ्यात अलगद सापडला. फसविला जाऊन जबरदस्तीने 'स्वामी बनला. तळघरात डांबला गेला अन् तिथेच संपला. मग ह्या कंसातून जी. एं.ना नेमके काय सांगावयाचे होते? हा प्रश्न पुन्हा गूढ बनतो.

जी. एं.च्या कथासृष्टीतील सर्वात औपरोधिक कथा दोन. 'माणूस नावाचा बेटा' आणि 'हिरवी मखमल, गोरा हात.' गंमत म्हणजे, 'हिरवी मखमल, गोरा हात' ह्या कथेत एकही कंस नाही, तर 'माणूस नावाचा बेटा' ही कथा जी. एं.च्या कथासृष्टीतील सर्वाधिक कंस असलेली कथा आहे. ह्या कथेत एकूण अकरा कंस आलेले आहेत आणि ह्या कंसांनी कथेतील उपरोधाची धार अधिक तीक्ष्ण करण्याचे कार्य केलेले आहे. कथेत येणारे हे कंस रसभंग तर अजिबात करत नाहीत, उलट कथेची रंगत वाढविण्याचे कार्य त्यांनी अचूक साधले आहे.

घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याचे उपद्व्याप करणाऱ्या केतकर शास्त्र्यांचे औपरोधिक चित्रण करताना पुढील कंस येतात. केतकरशास्त्र्यांच्या व्यक्तिरेखेला पूर्णत्व देत असतानाच, त्यांच्याकडे पाहाणाऱ्या लेखकाच्या दृष्टिकोणाचा प्रत्ययही हे कंस आपल्याला देऊन जातात.

'विशाल, पवित्र हिमालयाच्या पायथ्याशी गाढवाची दोन पिले होती. एकाचे नाव माणिक (मानेला उजव्या बाजूला हिसका) दुसऱ्याचे नाव मोती(आता डाव्या बाजूला हिसका).'

'दत्तूला वाटले, आता शेवटचा अंक येणार. बुवा उगाचच खोकणार. (ते खोकले). आता मान वेळावीत ते हसणार-- (ते हसले) व शेवटी दोनचार रुपये उसने मागणार.'

'माणूस नावाचा बेटा' या कथेतील उर्वरित कंस पुढीलप्रमाणे आहेत. त्यातील उपरोध वाचताक्षणीच जाणवण्याइतका सुस्पष्ट आहे. कथा मूळातून वाचत असताना तर हे कंस अधिकच परिणामकारक ठरतात. वाचकाला हसविण्याचे, पुनःप्रत्यय देण्याचे, विचारप्रवृत्त करण्याचे, त्याचे मानसिक संदर्भ जागृत करण्याचे अंगभूत सामर्थ्य ह्या कंसांमध्ये आहे.

'आमचा चरित्रनायक लहानपणी फार हूड. (केवढे कौतुक! लहानपणी बेडरपणे करवंदे शोधणारा, किंवा गटारात होड्या सोडणारा पोरगा चक्क पुढे रावबहादूर झाला, गावातील प्रत्येक टमरेल ज्याच्या कारखान्यात तयार झाले असा मोठा टिनपाट कारखानदार झाला, इत्यादी) बरे, ते पोर लहानपणी अगदीच बावळट असेल, आपल्या बरोबरीच्या मुलींची पोलकी ताठ तटाटू लागलेली पाहून त्यांनी सॅन्फोराइझ्ड कापड वापरावे असा सल्ला देण्याइतके मद्दड असेल, तरी लेखकाचे जेहत्ते ह्यॅ: ह्यॅ: असतेच. पुढील मोठेपणाची बीजे लहानपणी दिसलीच.'

'गायनामागे लागून आयुष्य विसकटणाऱ्या कलावंताला कणकवलीचा किराणा दुकानदारही वेडपट व्यसनी ठरवील. तर शिकण्यापेक्षा गुरे हाकणे पसंत करणाऱ्या पोरांसाठी दीडदमडी खेडेगावात शाळा घालून बसणारा ध्येयवादी ठरतो! जंत झालेल्या पोटांसारखी असह्य अवजड(काय लिहितो देव जाणे!)पुस्तके लिहिणारा उगाचच भाव खातो, पण नर्गिसला पद्मश्री मिळताच सात्विक संतापाचा वणवा पेटतो.'

'रेखेशी जवळ जवळ लग्न ठरले होते. 'आता बोहल्यावरून पळून जाऊ नको' असेही त्याने तिला बजावले होते. पण नाही. तो प्रसंगच आला नाही. एका इंजिनियरशी (इंजिनियरशी! सुंदर नाजुक पत्रे लिहिणारी, आर्त भावगीते म्हणणारी रेखा इंजिनियरबरोबर चौपाटीवर हिंडणार!) लग्न करून ती निघून गेली. आणि दत्तूने साऱ्या काळ्या आठवणी पत्त्यांप्रमाणे फेकून दिल्या. . . . . मोरेप्रमाणे!'

'. . . . . कमरेत आता काकडीसारखी मोडते की काय असे वाटणाऱ्या नटीचे चित्र देऊन नृत्यसंगीताचा आदर्श कुटुंबपट. भोकरवाडी (बुद्रुक) येथील रहिवाशांतर्फे परळ येथे सत्यनारायण.'

जी. एं.च्या कथासृष्टीत व्यभिचारी स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा मोठ्या संख्येनी आढळतात. वासनांचा धगधगता कल्लोळ तर किती तरी कथांतून आढळून येतो. निळासांवळा, पारवा, हिरवे रावे, रक्तचंदन ह्या कथाप्रवासात हे वासनाकुंड धगधगत्या स्वरूपात आढळते, तर काजळमायापासून (काजळमाया, रमलखुणा, सांजशकुन, पिंगळावेळ) त्याची आच हळूहळू मंदमंद होत गेलेली आढळून येते. जी. एं.च्या कथांतून वाचनांचा उत्कट अन् तीव्र प्रत्ययकारी आविष्कार आढळून येत असला तरी तो अत्यंत मोजक्या शब्दातून, संयमाने आणि प्रतिमांच्या समर्थ वापरातून साकारत असल्यामुळे जी. एं.च्या कथेला कुठेही सवंग बाजारूपणाचा स्पर्श होत नाही. वासनांचे चित्रण करताना जिथे कुणाही कथाकाराचा तोल सुटणे सहज स्वाभाविक आहे, तिथे जी. एं.चा संयम सुटलेला कधीच आढळत नाही, हे विशेष. जी. एं.च्या कथेचे हे निश्चितच मोठेपण आहे. त्याचबरोबर जी. एं.च्या शैलीचे हे बलस्थान आहे. जी. ए. शब्दसृष्टीचे जादुगार होते. त्यामुळेच त्यांना हे असाधारण यश प्राप्त झाले.

'माणूस नावाचा बेटा' ह्या कथेचा नायक आहे दत्तू जोशी. त्याच्या मनोव्यापाराचे चित्रण करताना जी. एं.चा कंस येतो तो असा--

'आता आपण बर्फाळ प्रदेशात असायला हवे होते. टिंग टिंग घंटा वाजवीत जाणाऱ्या गाडीतले संगीत हवे होते. बर्फावरून स्लेज घसरत जात आहे. आपल्या हाती कुणाचा तरी हात आहे.(सुधेचा की रेखेचा?)' (माणूस नावाचा बेटा/हिरवे रावे)

हा कंस दत्तू जोशीच्या व्यक्तिमत्त्वावर लख्ख प्रकाश टाकतो. दत्तू जोशीकडे आपण कोणत्या दृष्टिकोणातून पाहावयास हवे ते लेखक इथे सुचवून जातो.

सुधा ही दत्तूची पत्नी, तर रेखा ही लग्नाआधीची प्रेयसी. जवळजवळ ठरलेले

लग्न मोडून रेखा एका इंजिनियरशी लग्न करून दत्तूच्या आयुष्यातून निघून गेली, पण दत्तूच्या मनात मात्र तिला अढळ स्थान होते. त्यामुळेच दत्तू पूर्णपणे सुधाचा कधीच झाला नव्हता. . . . . होणार नव्हता. सुधाशी लग्न होण्यापूर्वी तो समोरच्या चाळीत राहणाऱ्या इंदिरेकडे आकर्षित झाला, अन् तिला भोगून मोकळा झाला.

त्यावेळी तो एकटाच राहात होता. इंदिरेच्या आसुसलेल्या नजरेने त्याला घायाळ केले. एक दिवस भर दुपारी तो तिच्याकडे गेला. निवांत वेळ. राजीखुषीचा मामला. जी. ए. वर्णन करतात..... 'तिच्या शुभ्र पुष्ट छातीवर त्याच्या शर्टाची बटने रुतली. तिच्या गळ्यात कुठल्या तरी संतबाबाचे चित्र असलेले लॉकेट होते. त्याचा तर पूर्ण आकार उमटला. दोन जळत्या वासनांच्यामध्ये अनासक्त संताची समाधी!'

त्यानंतर तो पुन्हा इंदिरेकडे वळला नाही. पण त्याला अर्थ नाही. मनात रेखेची स्मृती असतानाही त्याला इंदिरा केवळ आसुसलेल्या नजरेने विद्ध करू शकली, तिच्या भरगच्च आंब्यासारख्या शरीराचा मोह त्याला अनावर झाला आणि शेवटी जणू ओढल्यासारखा तो तिच्याकडे गेला. वासना भागविल्यानंतर मागाहून शरमण्यात अर्थ काय? दत्तू शरमला याचा अर्थ त्याचा तो स्वत:शीही प्रामाणिक नव्हता एवढाच होतो.

नंतर सुधा आली. दत्तूची राजरोस सोय झाली. आता निदान सुधाशी तरी प्रामाणिक निष्ठने संसार करायला काय हरकत होती? पण नाही. दत्तूच्या संभावित चेहेऱ्यामागे एक संधीसाधू बोका कायम दडलेला होता. मिळाली संधी की भागव दोन क्षणाची वासना. वर पुन्हा शरमणे. दत्तूचे हे शरमणे, हा कांगावा चीड आणतो. शेण खायचेच तर मग सरळ खा. त्यात शरमणे काय, कांगावा काय! हा खोटेपण झाला.

सुधा माहेर गेली हे दत्तूकडूनच निश्चित कळल्यावर वासंती घरी आली. तिला म्हणे सुधाला भेटायचे होते. वासंतीची कीर्ती जगजाहीर होती. तिच्या भटक्या आयुष्यावर कुणाचाच कसलाच दाब नव्हता. वासंतीने योग जुळवून आणला, दत्तूने त्याचा फायदा उठवला. वर पुन्हा शरमणे आहेच. ढोंगीपणा.

'कसले तरी धुंद अत्तर; आताशा ती ब्रा देखील रेशमीच वापरत असे की काय कुणास ठाऊक. ती जायला निघाली त्या वेळी तिच्या चेहेऱ्यावर विजयाचे कुत्सित स्मित होते. मांजर जिभल्या चाटते तसे! ते पाहून दत्तू शरमला. जास्त ताबा दाखवायला पाहिजे होता असे त्याला वाटले.'

लग्नाआधी इंदिरेला आणि लग्नानंतर वासंतीला भोगणाऱ्या दत्तूच्या मनात रेखा होती; तर घरात सुधा होती. तीन स्त्रियांना भोगणारा दत्तू यातील एकीशीही कृतज्ञ नव्हता, प्रामाणिक नव्हता. दत्तू उघडउघड संधीसाधू होता. त्याचा स्वभाव सूचित करण्याचे कार्य प्रस्तूत कंसाने साधले आहे.

'शॅलॉट' ह्या कथेतील अग्निहोत्री मास्तर आणि अंकलीकर वकिलाची बायको मोहना ही जोडी आपल्या कायम लक्षात राहते, ती जी. एं.च्या निवेदनसामर्थ्यामुळे!

मळकट धोतर नेसणारे, चाळीशीतले शूद्रासारखे दिसणारे अग्निहोत्री मास्तर. त्यांची ती हावरी, वखवखलेली नजर आणि तरुण, धुंद, डौलदार शरीराची मोहना. बरोबर साडेपाचला नृत्य शिकायला मोहना येई. ती आत येताच अग्निहोत्री दाराला कडी लावीत. ती आल्यावर थोडावेळ दणादणा पावले वाजत. जणू ती घुंगुर भरडीत असे. मग काही वेळा घुंगुर एकदम थांबत आणि बंद दारामागे मोहना आणि अग्निहोत्रींच्या शृंगाराला उधाण येई. काशीने एकदा फटीतून पाहिले- - - -

'लांब, गादीच्या खुर्चीवर अस्ताव्यस्त कपड्यांची मोहना पडली होती. आणि काळवंडलेले अग्निहोत्री अतृप्त भुताप्रमाणे तिच्या उत्सुक शरीरावरून वासनेची बोटे फिरवत होते.'

अशा ह्या मोहनेचे वर्णन करताना पुढील कंस येतो, तो तिच्य स्वभावावर प्रकाशझोत टाकून जातो.

'वास्तविक मोहना हजारात देखणी होती. ती रस्त्यावरून निघाली की तिच्याकडे निर्लज्ज आसक्तीने न पाहणारा पुरुष क्वचितच. तिचा चेहेरा लालसर गुलाबकळीप्रमाणे होता, आणि ती हसली(आणि पुष्कळांकडे पाहून हसत असे) की, तिच्या हसण्याला कळीप्रमाणेच वास असावा असे पाहणाऱ्याला वाटे.' (शलॉट/पारखा)

मोहना रूपयौवना होती व तिला त्याची जाणीव होती. स्थैर्य, पैसा, रूप, तारुण्य आणि मुबलक वेळ, मोहनाला हे सर्व लाभले होते. अंकलीकर वकिलाला प्रॅक्टीसपायी तिच्याकडे लक्ष पुरवायला फारसा वेळ मिळत नसणार, त्यामुळे मोहनाची वखवखलेली वासना ती चक्क अग्निहोत्रीसारख्या पाप्याच्या पितराकडून भागवून घेऊ लागली. शिवाय तिच्या दृष्टीने त्यात सुरक्षितताही होती. मोहनाच्या बाबतीत अग्निहोत्रीसारख्या भुक्कड माणसाचा संशय कोणाला स्वप्नातही येणे शक्य नव्हते. मोहनासारख्या लावण्यलतिकेने अग्निहोत्रीसारख्या फाटक्या माणसाला जवळ कसे केले? प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. अग्निहोत्रीजवळ पुरेसा मोकळा वेळ होता, तो हवा तेव्हा उपलब्ध होता, नको तेव्हा त्याला झिडकारता येत होते आणि मुख्य म्हणजे त्याला डोंबाऱ्याच्या माकडाप्रमाणे स्वत:च्या तालावर नाचवता येणे शक्य होते. शिवाय तो कुठे बभ्रा करण्याची सुतराम शक्यता नव्हती. अग्निहोत्रीकरता मोहना नव्हती, तर मोहनाकरता अग्निहोत्री होता. मोहना त्याला स्वत:च्या क्षणिक सुखासाठी हवे तसे नाचवीत होती अन् ते माकड नाचत होते.

मग मोहना रस्त्याने चालताना पुष्कळांकडे पाहून का हसत असे? आपल्याला पाहताच पुरुषांच्या नजरा चाळवतात, त्यांच्या डोळ्यांतून निर्लज्ज आसक्ती, वासना, लाचारी प्रकटते हे ती ओळखून होती. आपल्याकडे पुरुषांनी अगदी क्वचित खिळून जाऊनही पाहावे, आपल्या रूपाचे, शरीरसौष्ठवाचे कौतुक त्यांच्या नजरांतून वाचता यावे असे तर कुठल्याही सुंदर स्त्रीला स्वाभाविकपणेच वाटत असते. पुरुषांपासून उपद्रव

न होता त्यांनी ठराविक अंतर राखून आपल्या रूपयौवनाचे, सुडौल बांध्याचे मूक कौतुक नजरांतून व्यक्त केले, तर ते कुणा रूपगर्वितेला सुखावीत नाही? मोहनालाही हे कौतुक हवे होते. पुरुषांनी ते नेहमीच करीत राहावे म्हणूच ती पुष्कळांकडे पाहून स्मितहास्य करीत असावी. आपल्याकडे बुभुक्षितपणे, लाळगेल्या नजरेने पाहणारे सारे पुरुष आपल्या निकट येण्याचे धैर्य दाखवू शकत नाही, हे जाणण्याइतकी धूर्त ती नक्कीच होती. हजारो पुरुषांच्या हृदयसिंहासनावर आरुढ होऊन, नजरेच्या कटाक्षंनी त्यांना विद्ध करीत, स्मितहास्याने घायाळ करीत, रस्त्याने आपल्या लयबद्ध डौलदार चालीने जात असताना तिचा अहंकार सुखावला जात असे. हे सुखाचे मोरपीस ती कुरवाळीत चालत असे. इतके करूनही यापैकी कुणी धीटपणे कधी लगट करायची संधी साधलीच तर त्याला स्वीकारायला वा झिडकारायला मोहना स्वतंत्र होतीच! शिवाय ज्या पुरुषांबद्दल मोहनाला किंचित का होईना आकर्षण असेल, त्यांना ती आपल्या हसण्याने अप्रत्यक्षपणे सुचवीत होती, उत्तेजन देत होती. मोहनाच्या पुष्कळांकडे पाहून हसण्याचे अनेक पदर निघू शकतात. नाहीतर हक्काचा अग्निहोत्री आहेच!

'ती थोरली मुलगी पारू--(तिचे कोवळे, मऊ, मक्याच्या कणसातील केसासारखे हात! तिच्याकडून पायाचे तळवे चोळून घेत असता कापसासारखी झोप लागे) ती अशीच आपल्या बेशरम मार्गाने निघून गेली आणि सोनूला बरेच दिवस बाहेर तोंड दाखवायला जागाच उरली नाही.' (कसाब/काजळमाया)

'कसाब' या कथेतील सोनू आंगली त्याच्या लहानपणापासून आजतागायत कोसळत्या छपराखाली उभा आहे. नीतीमत्ता खुंटीला टांगून अनैतिक मार्गाने पोटाची खळगी नि शारीरिक भूक भागविणाऱ्या स्त्रियांच्या सहवासात त्याचे आतापर्यंतचे आयुष्य गेले. . . . . पुढचेही जाणार.

आई. . . . . बहीण. . . . . बायको. . . . . मुली-पारू, कमळी-सगळ्यांनीच जीवन जगण्याकरिता बेशरमपणाचा एकमेव मार्ग पत्करला. अंगी वकुब नसलला सोनू यापैकी कोणालाही रोखू शकला नाही. आपण लहानपणापासून या घाणीतच वळवळतोय ह्या जाणिवेने सोनूचा संताप संताप होतो, पण संताप शेळीवर काढण्यापलीकडे त्याच्या हातून काही होऊ शकत नाही. सोनू अगतिक होता, केविलवाणा होता, दुबळा होता. दुबळ्या सोनूचा दुबळा राग तितक्याच दुबळ्या शेळीवर निघतो. दाराशी बांधलेली मरतुकडी, मरायला टेकलेली शेळी नि घरात वावरणारा सोन यात सोनूच्या बायकोच्या, येसूबाईच्या लेखी फारसा फरक नव्हता. सोनूचे असणे आणि नसणे येसूबाईंच्या दृष्टीने सारखेच होते. उलट सोनूचे अस्तित्व तिच्या मार्गातील अडसर बनले होते.

गावातले घर फुंकून रोख पैसा गाठीला घेऊन मुंबईवाल्या केशवरावाच्या मदतीने तिला मुंबई गाठायची होती. याला कडाडून विरोध होता सोनूचा! घरात त्याचा प्राण गुंतला होता. जे घर वाचवायसाठी सोनूने धडपड चालविली होती, त्या घराला खऱ्या

अर्थाने घरपण नव्हतेच. घरातील स्त्रियांनीच त्याचे मांगल्य पार रसातळाला पोचविले होते. येसूबाई नि तिच्या मुली पारू, कमळी यांनी लाजलज्जा पार कोळूनच प्याली होती. पारू ज्या मार्गाने गेली त्याच मार्गावर कमळीनेही पाऊल टाकले आहे, नव्हे कमळी तर चक्क बाजारबसवी झाली आहे, हे सोनूला कळले तेही फार उशीरा. त्याच्या अंगाची शरमेनी लाहीलाही होते, पण त्याला आणखी धक्का बसतो तो येसूबाईशी भांडताना. कमळीचे वागणे येसूबाईला पूर्ण माहीत होते. येसूबाईच्या संमतीनेच कमळीने चक्क धंदा चालू केला होता. येसूबाई, कमळी यांच्या धंद्यावरच घरातली चूल पेटत होती, कारण घर चालविण्याकरिता लागणारे उत्पन्न सोनू कधी मिळवतच नव्हता. स्वत:चे पोट भरण्याइतकेही सामर्थ्य अंगी नसलेला सोनू, येसूबाईला नि मुलीना काय वेसण घालणार?

येसूबाई त्याच्यावर शब्द थुंकते, 'होय, कमळी जाते मारवाड्याकडे, काय म्हणणं आहे तुमचं? मी देखील केव्हाच लाज कोळून प्याले आहे, झालं समाधान? तसं केलं नसतं तर दारोदार परटं घेऊन भीक मागण्याची पाळी आली असती सगळ्यांवर! तुमचा पगार बघावा तर अगदी साहेबी! सहा महिन्यातून तुम्ही मोप शिप्तरभर दोन रुपये आणणार, मग आम्ही काय पोटाला बिब्बा घालायचा होय? म्हणे तीस वर्षे अब्रूने काढली! काढली असाल की, त्यात काय एवढं? दोन वेळ गिळायची ठीक व्यवस्था असली की अब्रू बासनातनं बाहेर येते कशाला शिंदळकी करायला?"

अशा ह्या कथेत आलेला हा कंस. सोनूच्या थोरल्या मुलीचे, पारूचे वेगळेपण सांगून जातो. पारूने बेशरमपणाचा मार्ग चोखाळला. तिने कुठला तरी परजातीचा लोखंडी सामानाचा दुकानदार गाठला. दिवस गेलेत. जाब विचारायला आरडत ओरडत सोनू त्याच्या घरी गेला, तेव्हा त्याने सोनूच्या तोंडावर बेगुमानपणे शंभर रुपये फेकले. सोनू चेकाळला, पण येसूबाईने त्याला आवरले व मखखपणे नोटा गोळ्या केल्या. एक दिवस पारू आपले पोर घेऊन घराबाहेर पडली ती परत आलीच नाही. पारूने जे केले त्यात तिचे कितपत चुकले? ज्या घरात पोटभर खायला मिळायची मारामार, तिथे लग्नाचे वय झाल्यावरही पारू घरातच कुचंबत होती. तिचा पाय घसरला याला ती एकटीच सर्वस्वी जबाबदार नव्हती. सोनू आणि येसूबाई हेही तितकेच जबाबदार होते. दुकानदाराने फेकलेल्या नोटा मखख चेहेऱ्याने काळजीपूर्वक गोळा करणारी येसूबाई ही ह्या प्रकारात जास्त दोषी ठरते. शारीरिक भुकेपोटी कुमारी मातृत्व भाळी आलेली पारू आपले अनौरस पोर घेऊन घराबाहेर पडते यातच तिचे वेगळेपण दिसून येते. पारूचे पुढे काय होते? . . . . . पारूमुळे काही दिवस सोनूला बाहेर तोंड काढायला जागा उरत नाही. शरमेचा एक डाग सोनूच्या चेहेऱ्यावर उमटवून पारू त्याच्या जीवनातून कायमचे काळे करते. आईबापाला, त्यांच्या दारिद्र्याला दोष न देता पारू स्वत:चा भोग भोगायला निघून जाते. हेच तिचे त्या घरातील इतर व्यक्तींपेक्षा वेगळेपण.

पण मग जी. एं.चा हा कंस काय साधतो? या कंसामुळेच सोनू, येसूबाई, कमळी यांच्यापेक्षा वेगळ्या असणाऱ्या पारूचे वेगळेपण नकळत आपल्या मनावर ठसते. पारूचा पाय घसरला असला तरी तिला वाचकाची सहानुभूती प्राप्त होते ती या कंसामुळे. पारूचा वेगळ्या पातळीवर विचार करायला लावण्याचे कार्य हा कंस करतो.

सोनू, आंगली नि पारू, बापलेकीतील मृदूमुलायम माया या कंसातून व्यक्त होते. सोनूचे दुखणारे तळवे पारूने आपल्या कोवळ्या मऊ हातांनी चोळून दिले, की त्याचा सारा शिणवटा नाहीसा होऊन त्याला शांत झोप लागत असे. सोनूला ही अशी माया फक्त पारूकडूनच लाभत असे. येसूबाईच्या लेखी त्याला पायातल्या खेटराइतकीही किंमत नव्हती. अन कमळी, दत्तू यांच्या लेखी त्यांच्या बाला 'आहे झालं आपला बा' एवढीच किंमत होती. सोनूशी मायेनी निगडित होती ती त्याची शेळी अन थोड्याफार प्रमाणात पारू. पारूही निघून गेल्यावर सोनू स्वत:च्याच घरात अधिकच कंगाल बनतो, उपरा ठरतो. येसूबाई तर त्याच्या मरणाची वाट पाहात असल्याचे फटकळपणे बोलून दर्शवित. सोनूची ती मरतुकडी, दुबळी, मरायला टेकलेली शेळी त्याच्याच जीवनाचे प्रतीक बनून जाते. शेवटी आज ना उद्या, बहुदा रात्रीतच सोनूच्या घरात शिरलेला साप -- केशवराव -- येसूबाईच्या संमतीनेच, सोनूचा बारीक एवढासा गळा आवळण्याचे ठरवून टाकतो. आधी सोनू नि त्याच्या मागोमाग शेळी यांना संपावेच लागणार....., घरातील कुणालाच ती दोघेही नको आहेत हाच त्यांचा दोष.

ह्या कंसातील जी. एं.ची सावरीच्या कापसासारखी मऊ भाषा वाचून मन थक्क होते. शब्दांवरची जी. एं.ची असाधारण हुकुमत या कंसातून प्रकर्षाने जाणवते, अन नकळतच हा कंस जी. एं.च्या आगळ्यावेगळ्या शैलीचा नमुना म्हणून दीर्घकाळ मनात घर करून राहतो.

जी. एं.च्या कथासृष्टीतील सर्वांत मोठा कंस येतो तो त्यांच्या 'वहाणा' ह्या उघडउघड चिंतनपर कथेत. 'वहाणा' ही कथा प्रतीकात्मक आहे. या कथेतील औषध-विक्रेता एजंट 'मी' आणि चौकसखोर चांभार ह्या दोन अलग व्यक्तिरेखा असल्या तरी कथा प्रतीकात्मक असल्यामुळे ह्या दोन व्यक्तिरेखांना दुसराही अर्थ आहे. चौकसखोर चांभार ही मीचीच जाणीव आहे. चांभार प्रश्नामागून प्रश्न विचारत जातो. म्हणून मी गतायुष्याचा वेध घेत जातो. निळ्या वहाणा, काळ्या वहाणा, लाल वहाणा ह्याही अस्तित्वाच्या शोधात स्वीकारलेली परिमाणे आहेत. मी हा इथे अस्तित्वाचा शोध घेणारा माणूस आहे. अपरिहार्यपणे जीवनाचा अनुभव घेत जायचे अन् एक दिवस अनिच्छेने, अकस्मात मृत्यूच्या गाडीत शिरायचे तेही अनवाणीच. जीवनाची संगती लावण्याच्या प्रयत्नात, शोधात एक दिवस काही न कळताच मरायचे, -एवढेच जीवनाचा अर्थ - हेच माणसाचे अस्तित्व. 'स्व'च्या अस्तित्वासाठी झगडत असताना अनेक वस्तू, व्यक्ती, फापटपसारा भोवती गोळा करत जायचा, गुंतवळ वाढवीत जायची, त्यात गुरफटत

असताना स्वत:चा अहंकार कुरवाळायचा, जीवनाच्या त्या प्रचंड गुंतवळींत आपल्या सर्व वासना, हर्ष-लोभ, नैसर्गिक प्रवृत्ती, भावना, जमतील तशा भागवायच्या आणि एक दिवस नकळत संपून जायचे.

चेंगटपणे चांभार चप्पल दुरुस्त करताकरता प्रश्न विचारतो- 'तुम्ही साहेब लई हिंडता - फार पाहिलं असेल बगा तुम्ही. काय काय पाहिलं?'

चांभाराला उत्तर देण्यासाठी नव्हे तर स्वत:च्याच समाधानासाठी औषध विक्रेत्याचे मन धडपडू लागले. खरेच की, खूपच काही काही पाहिले आपण. त्याचे अनावर मन गतकालीन आठवणींच्या गुंत्यात धडपडू लागले. 'काय भी पाहिलं नाही कसं व्हयील राव!' चांभाराचा चेंगटपणा वाढतच चालला. अरेबियन नाईट्समधल्या वाचाळ न्हाव्याचाच जणू दुसरा अवतार. विक्रेत्याचे मन आता गतजीवनातील अनुभवाच्या भोवऱ्यात सापडले. जणू चांभाराने त्याच्या बोटाला धरून त्याला त्या खोल अंधाऱ्या गुहेत नेले. डोळ्यावर आतल्या बाजूने पडदा पडला आणि पायऱ्या उतरून चांभारामागोमाग तोही गुहेत उतरला. म्हणून चांभार ही त्या औषधविक्रेत्याचीच जाणीव आणि स्वत:च्या अस्तित्वाचा शोधक तो स्वत:च.

इथून कथेतील उद्‌भुतरम्य विलक्षण निवेदनाला प्रारंभ होतो व पुन्हा त्याची सांगड वर्तमानाशी लेखक जोडून घेतो. डोळ्याच्या पडद्याआड जुन्या अंधाऱ्या गुहेत औषधविक्रेता आणि चांभार उतरलेत. इथून जाणीव आणि नेणिवेच्या खेळास प्रारंभ होतो. स्वप्नात जसे आपल्याला काहीबाही दिसते. अद्‌भुत, विलक्षण, रौद्रभीषण, काही सूचक प्रसंग, काही भूतकाळात घडून गेलेल्या घटना, तर काही आपल्याच मनाचे कल्पनारम्य विलक्षण खेळ, तर मध्येच वर्तमानातील आपल्या भोवतालच्या व्यक्ती, प्रसंग हजेरी लावतात. स्वप्नात एकामागोमाग दिसणाऱ्या मालिकेत जशी सुसंगती नसते, तशीच इथेही सुसंगती नाही.

औषधविक्रेता चांभारापुढे उभा आहे आणि चांभार त्याच्या वहाणा दुरुस्त करत आहे हा वर्तमान. त्याच वेळी मनाने तो हरवला आहे, आणि उघडउघड दिवास्वप्न पाहत आहे. भान विसरून तो गतकालीन गुहेत उतरला आहे. त्याच्या ह्या अस्तित्वाच्या शोधात पुढील कंस येतो.

'होय रे, हे सारं तुला दिसलं खरं, पण तू पाहिलंस काय?' तो भाजणारा प्रकाश माझ्या तोंडावर टाकून चांभार हसतो. व म्हणतो. त्याच्या पायाखालचे दगडी कासव मोठे मोठे होते आणि सरकत माझ्याजवळ येते. (अचानक त्या उघड्या, भयानक खडकांच्या छायेतून काटेरी झुडपातून, उन्हाने चिरडलेल्या मातीत पावले उमटवत, एकशे-दोनशे वर्षांचे प्रचंड कासव तुमच्याजवळ येते, मान ताणून तुमच्याकडे पाहते. त्याच्या डोळ्यात जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्याची मृत भावना दिसते. हजारो प्रश्नांची भुते दिसतात. जणू कोणी त्यांची उत्तरे देणारा आहे का, याचाच ते शोध करत असते.

पण तुम्हाला पाहून त्याची निराशा होते, मान आक्रसते आणि हा प्राचीन दीन राक्षस पुढे सरकतो.) हरमन मेलव्हिलच्या 'The encantadas' च्या वर्णनात चक्क तसे लिहिले आहे. मी ते पुस्तक देशपांडेला सप्रेम भेट दिले होते. नंतर तेच पुस्तक माझ्या नावानिशीवार मी जुन्या बाजारात पुन्हा विकत घेतले. मेलव्हिल ना? Sure, a great writer, one of the greatest. (वहाणा/हिरवे रावे)

स्वप्नातील ह्या दृष्यमालिकेत येणाऱ्या ह्या निवेदनाला खरे तर कंस घालण्याची आवश्यकता नव्हती. पायाखालचे दगडी कासव हळूहळू मोठे होते व सरकत औषधविक्रेत्याजवळ येते. ही गोष्टच अद्‌भुत कोटीतील, केवळ स्वप्नात दिसणारी. इथे नाहीतरी ती औषधविक्रेत्याला दिवास्वप्नातच दिसते आहे. त्याचेही हे स्वप्नरंजनच आहे. अद्‌भुत, वास्तव आणि अस्तित्वाचा शोध ह्यांचे इथे बेमालूम मिश्रण आहे. दगडी कासवावर चैतन्याचे रोपण केल्यावर जी.एं.ना हरमन मेलव्हिलचे स्मरण होते व म्हणून The encantadas मधील हरमन मेलव्हिलने केलेले वर्णन इथे कंसात अवतरते.

हा कंस वाचल्यावर जी. एं.च्या पत्रांचे स्मरण होते. आपल्या पत्रांतून जी. ए. असेच स्वैर संचार करीत. अनेक संदर्भ देत, ऐसपैस गप्पा मारत जी. ए. पत्र लिहीत. त्यामुळेच येऊ घातलेला जी. एं.च्या पत्रांचा संग्रह एक अमूल्य संदर्भग्रंथ ठरणार आहे.

या वाङ्‌मयीन संदर्भापुरताच हा कंस थांबत नाही, तर पुढे देशपांडेला सप्रेम भेट दिलेले ते पुस्तक औषधविक्रेत्याच्या हाती नावनिशीवार जुन्या बाजारात येते व तेच पुस्तक तो दुसऱ्यांदा विकत घेतो हेही सांगून जातो. पुस्तकांच्या बाबतीतील आपले सर्व मानसिक संदर्भ जागृत होतात न होतात तोच जी. ए. सांगतात, 'मेलव्हिल ना? Sure, a great writer, one of the greatest' आपले वाचन किती तोकडे आहे ह्याची स्वच्छ जाणीव जी. एं.चे वाक्य आपल्याला करून देते.

हि:हि:हि: खिदळत चांभार वहाणा पुढे टाकतो व कथेचा सांधा वर्तमानाशी जोडला जातो.

औषधविक्रेत्याला कोणीतरी ढकलते. त्याच्या वहाणा तुटतात व मागेच राहातात. (जीवनातले सगळे बरेवाईट अनुभव असे मागेच राहातात. बरोबर काही म्हणजे काहीच नेता येत नाही.) तो घोळक्यात सापडतो आणि स्टेशनकडे खेचला जातो. सगळ्यांना आत लोखंडी गेटात हाकलले जाते व दरवाजा खाडदिशी बंद होतो.

त्याची अपार जीवनेच्छा त्याला मागे खेचत असते आणि ती वेडी बेभान गर्दी त्याला पुढे रेटीत असते. आरडाओरडा करून तो आपले म्हणणे सांगायचा प्रयत्न करतो, पण त्याचे कुणी ऐकूनच घेत नसते, कुणाचेही त्याच्याकडे लक्ष नसते. (मरायला कुणीच तयार नसते, पण अपरिहार्यपणे प्रत्येकालाच त्याच्या ठरलेल्या वेळी मृत्यू येतोच. तो कुणाचेही काहीही ऐकून घेत नाही. सर्वांच्या बाबतीत मृत्यू कमालीचा तटस्थ, अलिप्त असतो. कुणाच्याही भावबंधनाच्या गुंतवळ्यात अडकून मृत्यू आपले दायित्व सोडत

नाही. म्हणूनच आपल्याला निमूटपणे, आक्रोशत मरावेच लागते.)

'तोच सिंहाच्या अंगाची, स्त्रीच्या चेहेऱ्याची (नाक थोडे फुटके) आगगाडी वळत वळत येते, व आम्ही आत कोंबले जातो.' (वहाणा/हिरवे रावे)

मृत्यूच्या गाडीचे वर्णन करतानाही जी. ए. कंसाचा वापर करतात. उघडच हा कंस औपरोधिक आहे. जी. एं.चा स्त्रियांकडे पाहण्याचा विशिष्ट तिरसट दृष्टिकोणच त्यातून प्रकर्षाने व्यक्त होतो. स्त्रीला जी. ए. अनेक कथांतून 'घोडी'ची उपमा देताना आढळतात. इथे 'स्त्रीच्या चेहेऱ्याची' असे वर्णन करताना लगेच (नाक थोडे फुटके) हा कंस घालायला ते चुकत नाहीत.

गाडी सिंहाच्या अंगाची म्हणजे चांगली भरभक्कम, शक्तीशाली, ऐटबाज होती, पण तिचा चेहेरा मात्र स्त्रीसारखा होता. इथे सिंहाचे शरीर असलेल्या फुटक्या नाकाच्या स्त्रीची प्रतिमा योजून जी. एं.नी त्या मृत्यूच्या गाडीचे भयावह विद्रूप रूप सूचित केले आहे. असे अजब अद्‌भुत प्राणी ग्रीक पुराणातून विपुलतेने आढळतात. जी. एं.च्या दांडग्या व्यासंगातूनच त्यांना ही अद्‌भुत प्रतिमा सुचली असावी. गाडीचा समोरचा चपटा भाग जी. एं.ना फुटक्या नाकासारखा भासतो, यात आपल्याला कोणताही जीवनानुभव अनेक पातळ्यांवरून घेणारे जी. एं.चे मन दिसून येते.

'सिंहाच्या ऐटबाज चालीप्रामणे ती विद्रूप स्त्रीच्या चेहेऱ्यासारखी मृत्यूची गाडी वळत वळत स्टेशनात येते, व सर्व आत कोंबले जातात. अंधार कोंदतो. हाकेला प्रतिसाद नाही. अंग बधिर होते. दृष्टीसमोर झिरझिरत पडदा पसरतो. मग सर्वत्र शांतता. आणि हे सारे पोटात घेऊन आगगाडी, काळ्याकभिन्न राक्षसांनी जिभा बाहेर काढल्याप्रमाणे दिसणाऱ्या लालसर, ओतीव पर्वतांच्यामधून, ग्रँड कॅनियनच्या जांभईत शिरते, आणि आंधळ्या अजगराप्रमाणे निर्विकार, अनिवार्य गतीने पुढे पुढे जाते.'

जी. एं.ची रंगसंवेदना, त्यांची चित्रकलेतील जाण आणि इंग्रजी वाङ्‌मयाचा त्यांचा गाढ व्यासंग, प्रिन्सिपाल ठकार ह्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेच्या माध्यमातून 'पडदा' ह्या कथेत व्यक्त झाला आहे. चित्र काढणे, वॉटर कलरमध्ये, ऑइल पेंटमध्ये चित्र रंगवणे हा जी. एं.चा आवडता छंद होता. 'डोहकाळिमा' चे मुखपृष्ठ जी. एं.नी काढलेल्या चित्रावरून तयार करण्यात आले आहे. जी. एं.च्या पडदा, गिधाडे, भेट, सांगाडा या कथांतून त्यांचे चित्रकलाप्रेम व चित्रकलेबाबतचा त्यांचा व्यासंग व्यक्त झाला आहे.

जी. एं.चे आवडते व्यसन सिगरेटचे! प्रिन्सिपाल ठकार पाइप ओढतात. व्यसन एकच-तंबाखू ओढण्याचे. जी. एं.ची ऐटबाज, नीटनेटक्या, टापटीप पोषाखाची आवड, रंगसंगतीची त्यांना असलेली जाण प्रिन्सिपाल ठकारांमध्येही आढळून येते. 'त्यांनी स्वतःच्या साऱ्या सूटांचा रंग सूर्याच्या बदलत्या आकाशात दहा वेळा तपासूनच पसंत करण्याची पद्धत ठेवली होती. जी. एं.चे ऐन तारुण्यातील व उमेदीच्या काळातील फोटो

पाहिलेत की त्यावरून त्यांचा कपड्यांबाबतचा चोखंदळपणा, नीटनेटकेपणाची जन्मजात आवड आणि साध्या, सौम्य रंगछटातील पण टापटीप, ऐटबाज पोषाख दृष्टीस पडतो. जी. एं.चे काव्यलोलुप मन, इंग्रजी वाङ्मयाचा गाढा व्यासंग, चित्रकलेची आवड, रंगसंवेदना, बागकामाची आवड, पोषाखाबाबतचा चोखंदळपणा, नीटनेटकेपणाची आवड, सिगरेटचे आवडते व्यसन हे सर्व आपल्याला प्रिन्सिपाल ठकारांमध्ये दिसून येते. साहजिकच 'पडदा' ह्या कथेतील प्रिन्सिपाल ठकारांच्या व्यक्तिमत्त्वात जी. एं.च्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक रंग आढळून येतात, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

खरे तर जी. एं.च्या कथेत पन्नास टक्के जी. ए. स्वत:च असतात. त्यांची जीवनदृष्टी, त्यांची लाडकी नियती, आवडनिवड, व्यासंग, छंद, त्यांच्या जिव्हाळ्याच्या गोष्टी, त्यांना ज्या गोष्टींबद्दल मनस्वी तिटकारा वाटत होता त्याबद्दल त्यांच्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून व्यक्त होणारी रोखठोक अभिव्यक्ती, ह्या सर्व गोष्टी आपल्याला त्यांच्या कथांतून स्पष्टपणे जाणवत राहतात.

कधीही मुलाखत देण्याच्या भानगडीत न पडलेले, प्रसिद्धी-माध्यमांपासून कटाक्षाने दूर राहिलेले, सभासमारंभ टाळत राहिलेले, माणसांच्या गर्दीपासून दूर, अलिप्त राहण्याचा सतत प्रयत्न करीत राहिलेले जी. ए. त्यांच्या पत्रांतून व कथांतून विलक्षण बोलके होतात. जी. एं.नी आपले सर्व व्यक्तिमत्त्वच कथेत झोकून दिले होते, असे मला प्रामाणिकपणे वाटते. कथाविष्कारानंतर, त्यांच्याजवळ जणू सांगण्यासारखे, बोलण्यासारखे काही राहातच नसावे. जणू ते रिते रिते होत असत. त्यामुळेच स्वत:च्या कथांबद्दल चर्चा करायला ते तयार नसत. कथाकार जी. एं.च्या दर्शनास येऊ इच्छिणाऱ्या सर्व भावूक रसिकांना त्यांनी फार कठोरपणे तोडून टाकले. पण खुशीत आल्यावर निकटवर्तीयांशी, जिवलग मित्रांशी ते क्वचित स्वत:च्या कथेबद्दल बोलत असत असेही कळले. 'मला जाणून घेण्याची उत्सुकता असेल तर माझ्या कथांतून जाणून घ्या. तिथे मीच आहे.' असे त्यांचे सांगणे असे, आणि ते खरे होते, हा मला आलेला प्रत्यय आहे.

सहाजिकच प्रिन्सिपाल ठकारांच्या नावडीतही जी. ए.च डोकावतात ते कंसातून.

'बाळने ज्या वेळी त्यांना त्याचे खोलीत (घाणेरडा शर्ट, भडक काळ्या रंगाची कार्डुराय पँट- त्याला पाहाताच उग्र वास यावा, त्याप्रमाणे त्यांचे डोके दुखू लागले होते.) आपण कॉलेज सोडणार आणि मुंबईला जाणार असे सांगितले, त्याच वेळी बाळ त्यांच्या आयुष्यातून निघून गेला होता.' (पडदा/निळासांवळा)

'आता पुणे कायमचे वर्ज्य झाले. लीला आता तेथे राहात होती. कॉलेजमध्ये आपण चार वर्षे एकत्र काढली. ती मराठी छान लिहीत असे, पण ट आणि र ही अक्षरे ती सारखीच लिहीत असे. तिने एकदा बालकवीची 'मरणाचे काढूनी घ्या मरण' ही ओळ लिहिली, आणि प्रोफेसरांनी (मध्ये भांग, मुलींच्या अस्तित्वाची दखल नाही, उर्मट, चित्रकला, काव्य, बाग या स्वत:च्याच जगात सदा मशगुल. त्यांना पेनमध्ये शाईतरी

भरता येत होती की नाही कुणास ठाऊक! पण मग बूट इतके झगझगीत कसे? आपणा दोघींनाही त्यांच्याविषयी वाटणारी जीवघेणी ओढ. . . . .) ती ओळ 'मटणाचे काढुणी घ्या मटण' अशी वाचून तिची खूप थट्टा केली. (शिक्षा/हिरवे रावे)

वरील कंसातील प्रोफेसरांचे वर्णन दुसऱ्या कुणाचे नसून खुद्द जी. एं.नी केलेले स्वत:चेच वर्णन आहे, असे विधान केल्यास वावगे ठरणार नाही. तन्मय होऊन जी. ए. शिकवीत असत अन् मुलींच्या अस्तित्वाची तर त्यांना दखल नसे. एकदा त्यांची बहीण त्यांच्या तासाला बसून आली तरी जी. एं.ना त्याचा पत्ता नव्हता, कारण मुलींच्या रांगांकडे त्यांनी पाहिलेच नव्हते.

मध्ये भांग. . . . . पण मग बूट इतके झगझगीत कसे? हे तर जी. एं.चेच वर्णन आहे. प्रा. म. द. हातकणंगलेकरांनी जी. एं.ची पत्रे ह्या लेखात जी. एं.च्या आणि त्यांच्या पहिल्या भेटीचे वर्णन केले आहे, त्याचे इथे स्मरण होते. 'इतक्यात हलक्या पावलांनी जवळ कुणीतरी येऊन उभे राहिले. सर्वसाधारण उंची, अतिशय टापटिपीचा पण फार आधुनिक नव्हे असा पाश्चात्य पोषाख, रुंद, आडवा चेहेरा, जाड भिंगाचा चष्मा, त्याआडचे सावध, संथ डोळे, मधोमध भांग असलेले, चापून बसवलेले भरगच्च केस, रुंद जिवणी, सिगरेटचा मुरलेला वास, हळू आवाजात सहजपणे बोलणे सुरू झाले. ते जी. ए. कुलकर्णी होते, हे काही वेळात स्पष्ट झाले.

प्रस्तुत वर्णन जी. एं.च्या ऐन तारुण्यातील आहे.त्यावेळी ते नुकतेच इंग्रजी घेऊन एम्. ए. झाले होते आणि नोकरीसाठी योग्य संस्थेच्या शोधात होते.

जी. एं.ना 'पुणे' शहर अजिबात आवडत नव्हते. शेवटी त्यांना पुण्यातच यावे लागले आणि जे पुणे त्यांना आवडत नव्हते, तिथेच त्यांचे निधन झाले. हीही नियतीच! जी. एं.ची 'पुण्या'विषयीची नावडही इथे 'शिक्षा' ह्या कथेत व्यक्त झाली आहे. याशिवाय पुण्याचे उल्लेख येतात ते 'सोडवण' आणि 'गिधाडे' या कथांत. 'शालू आता पुण्याला राजरोसपणे नरोत्तमाजवळ राहते.' (सोडवण). 'पुण्याला उतरताच त्याने कशीबशी चूळ भरली, आणि समोर दिसेल ते आठबारा आण्याचे वचावचा खाऊन घेतले. तोपर्यंत ती तरुणी कुठे बेपत्ता झाली होती. त्याने तिला एक शिवी हासडली व आपल्या ओळखीचे चुकून येथे कुणी नाही ना, हे हेरत तो हळूच मुंबईच्या गाडीत जाऊन बसला.' (गिधाडे). 'बाजूला लहान वर्तुळे असलेली, मोठ्या अक्षरात छापलेली शहरे, गावे अंगावर घेऊन गोमेच्या पायाची रेल्वे साऱ्या नकाशाभर हिंडत होती. त्यातील एकेका आडव्या रेषेवर पावले टाकत शोभा वरवर चालू लागली, ... मध्येच पुणे लागले. ती गोंधळून थबकली. पुण्याला नको, आता पुणे कायमचे वर्ज्य झाले . . . . . नाही, पुणे आता कायमचे बंद झाले! (शिक्षा)

पुण्याप्रमाणेच मुंबईही जी. एं.ना अजिबात आवडत नव्हती. 'हिरवी मखमल, गोरा हात' ह्या कथेत जी. एं.नी मुंबईतील बकाल जीवनाचे अत्यंत औपरोधिक वर्णन

केले आहे. मनाला ते पूर्णपणे पटते. 'साले हरामखोर, सापाच्या हृदयाचे गाव!' ही जी. एं.ची मुंबईबाबत उत्स्फूर्त, प्रामाणिक प्रतिक्रिया.

मुंबईत नोकरीनिमित्त जी. एं.ना अल्पकाळ वास्तव्य करावे लागले. १९४४ साली श्री. पां. ना. कुमठांच्या मित्राकडे काही दिवस व नंतर हॉटेलमध्ये काही काळ जी. एं.ना मुंबईला राहावे लागले. मुंबईला, तिथल्या धकाधकीच्या आयुष्याला जी. ए. कंटाळले व नोकरी सोडून ते बेळगावला परतले. चौपाटीवर, मलबार हिलवर श्री. कुमठांबरोबर फिरायला गेलेले असताना तिथल्या मोठमोठ्या इमारती, बंगले पाहून अनेकदा जी. ए. खंत व्यक्त करायचे. 'इथे इतक्या सुंदर इमारती आहेत, पण आपल्याला मात्र राहायला छोटंसं घरही नसावं ना!'

जी. एं.ना अत्यंत प्रिय असलेली शहरे दोन. धारवाड अन् बेळगाव. या दोन गावात जी. एं.चे आतडे गुंतले होते. धारवाड सोडणे त्यांना अतिशय जड गेले. पण एकदा धारवाड सोडावयाचे ठरल्यावर सारी आवराआवर त्यांनी एका निर्लेपपणे केली. घरातून शेवटचे बाहेर पडताना आपल्या खोलीत ते बराच वेळ सिगारेट ओढत नुसते उभे होते. जी. ए. इतके मनस्वी होते. नाइलाजाने ते पुण्याला गेले, पण पुणे काही त्यांना मानवले नाही.

जी. एं.च्या श्रेष्ठतम कथांपैकी एक 'प्रदक्षिणा'. जान्हवी-शांताक्का, रामकृष्ण-शांताक्का, राजाभाऊ-शांताक्का, आबाजी-शांताक्का यांच्या संभाषणातून आणि शांताक्कांच्या मनोव्यापारातून फ्लॅशबॅक पद्धतीने कथा साकारते. शांताक्कांची प्रदक्षिणा पूर्ण होते, तेव्हा तीस वर्षांच्या वैवाहिक जीवनाचे फलीत त्यांच्या हाती येते- शून्य! नवऱ्याने, दादासाहेबांनी सतत तीस वर्षे केलेली फसवणूक, वंचना, प्रतारणा त्यांना इतरांच्या बोलण्यातून हळूहळू कळून येते. दादासाहेबांनी आपल्याला दिले काय, तर लग्नाआधी जबरदस्तीने लादलेले पत्नीत्व अन लग्नानंतर तीस वर्षे लादलेलं कुंवारपण! तीस वर्षे दादासाहेबांच्या धाकात, त्यांच्या इच्छेप्रमाणे आपण फक्त पोटावारी राबलो. इतरेजनांना दिसायला जरी आपण घराची यजमानीण होतो, तरी दादासाहेबांच्या लेखी आपली किंमत गडी-माणसापेक्षा अधिक नव्हती. त्यांच्या भल्यामोठ्या वाड्याच्या वळचणीला आपण तीस वर्षे काढली एवढाच आपल्या आजवरच्या जीवनाचा अर्थ. जाताना त्यांनी घर राजाभाऊच्या नावावर करून आपल्या डोक्यावरचे छप्परही काढून घेतले. दरमहा पंचवीस रुपयांवर आपली बोळवण केली. एवढीच, फक्त एवढीच आपली किंमत. . . . . दरमहा पंचवीस रुपये, तेही रामकृष्ण अगर जान्हवीकडे राहिल्यास. एकामागोमाग झालेल्या आघातातून शांताक्का क्रमाक्रमाने गोठत जातात. त्यांच्या संवेदना हळूहळू बधिर होत जातात. या घरात तीस वर्षे वावरूनही या घराने आपल्याला काही दिले नाही, आपणही त्याला काही दिले नाही. . . . . फक्त एका शून्यात आणखी एक शून्य याप्रमाणे आपण या घरात राहिलो. सुन्न मनाने त्या आपल्या आयुष्यातील

घरपण सोप्यासोप्याने काढून टाकतात.

"त्यांनी स्वैंपाकघराचे दार ओढून घेतले. माजघर . . . . भिंतींवर रविवर्म्यांची जुनी चित्रे . . . . लक्ष्मीच्या चित्रावरची गंधगोळ्या वाळवून त्यांची केलेली माळ. . . . . त्यांनी केलेला दारावर असलेला मोरामोराचा, मणी आणि काचेच्या नळ्या यांचा बनवलेला पडदा. . . . . एक मोठा आरसा. . . . त्याला हजार चेहेरे. . . . . पण कसलीच स्मृती नाही. . . . . माजघराला चेहेरा नाही, पण आठवणींनी ते भरले आहे. . . . . खिडकीत शिसवी लाकडाची फणेरी पेटी (आईची) . . . . जिना. . . . . वरच्या बाजूला दादासाहेबांचे जग. . . . . जिन्याखालची आबाजींची लहान खोली. . . . . "(प्रदक्षिणा/काजळमाया)

शांताक्कांच्या या मनोव्यापारात आलेला कंस पहिल्या वाचनात मनाला निश्चितच खटकतो. एवढ्या सुंदर कथेत, कथा शिखरावर पोहोचली असताना कंसाचे हे ठिगळ का? असाही प्रश्न पडतो. ह्या ठिगळवजा कंसातून जी. एं.ना अनावरपणे काय सांगावयाचे आहे? हा कंस खरोखरच आगंतुक आहे का? या प्रश्नाचे उत्तर जी. एं.च्या कथा वारंवार वाचल्यानंतर अचानक हाती येते. जी. एं.च्या कथांतून ज्या महाकाव्याचा स्त्रोत हळुवारपणे पाझरतो आहे, ते महाकाव्य आपल्या सर्व सामर्थ्यानिशी या कंसाच्या पाठीशी उभे आहे हे लख्खकन जाणवते. (आईची) हा एक शब्द जी. एं.च्या कथांतून पाझरणाऱ्या 'आई' ह्या महाकाव्याची जाणीव देतो अन मग ह्या कंसाची पुण्याई कळून येते. 'खिडकीत शिसवी लाकडाची फणेरी पेटी(आईची).' इथे ती केवळ शिसवी लाकडाची फणेरी पेटी उरत नाही तर ती 'आईची' होती हे अतिशय महत्त्वाचे ठरते. त्या फणेरी पेटीला आईचा स्पर्श होता. आईची सारी माया आता त्या फणेरी पेटीच्या माध्यमातूनच शांताक्कांना लाभू शकत होती. आईचे अस्तित्व आता केवळ त्या निर्जीव फणेरी पेटीतूनच जाणवत होते. शांताक्का आणि त्यांच्या आई यांच्यातील सारे भावबंध त्या फणेरी पेटीत केंद्रित झाले होते. त्या पेटीला ऐतिहासिक, भावनिक महत्त्व प्राप्त झाले होते. ती साधी फणेरी पेटी नव्हती. आईने वापरलेली अन आईकडून तिच्या मायेसकट शांताक्कांकडे आलेली ती आईची फणेरी पेटी होती.

जी. एं.च्या कथेतील एक अनोखे बलस्थान म्हणजे बहीण-भावाची माया! त्यांच्या कथांतून अनेक बहिणी आपल्याला वेगवेगळ्या परिस्थितीत भेटतात, पण त्यांची जातकुळी एकच आहे. भावावर जीवापाड प्रेम करण्याचा समानधर्म सर्व बहिणींमध्ये आढळतो. भाऊही बहिणीसाठी झिजताना, तीळतीळ तुटताना आढळतात. व्यक्तिगत जीवनात जी. एं.ना लाभलेली बहिणींची मायाच त्यांच्या कथांतून भेटणाऱ्या बहिणींमधून पाझरताना आढळते. मायेचा हा सौंदर्यकंद जी. एं.च्या एखाद्या तरी कथेतील कंसातून अवतरला नसता तरच नवल. 'वहाणा' ह्या एकमेव कथेतील कंसातून तो तसा अवतरला आहे. सदर कथेतील नायकाच्या मनोव्यापाराचे निवेदन करताना प्रस्तुत कंस

आला आहे.

'मी माझ्या बहिणीला संध्याकाळी येतो म्हणून सांगितले होते. (ती लहानपणी अतिशय व्रात्य होती. माझ्यावर तिचा फारच जीव. एकदा मी सुट्टीत घरी आल्यावर तिने जिन्याच्या वरच्या पायरीवरूनच माझ्यावर झेप घेतली. थोडक्यात बचावली, नाही तर डोकेच फुटायचे. मुंबईला ट्रामखाली सापडलेल्या त्या पोरासारखे फुटके टरबूज.) ती आता वाट पाहील. भोळी मुलगी. फार फार वाट पाहील.' (वहाणा/हिरवे रावे)

तसे पाहिले तर हे निवेदन परिपूर्ण आहे. या निवेदनात कंस आला नसता तरी चालले असते. एकप्रकारे हा कंस निवेदनाची गती खंडीतच करतो, पण जी. एं.ना त्याचे काय? त्यांनी कधीच वाचकाची वा कथेचीही पर्वा केलेली दिसत नाही. त्यांनी कथेवर नेहेमीच प्रचंड मेहनत घेतली हे तर खरेच, पण कथा साकारत असे ती मात्र खास जी. एं.च्या तब्बेतीनेच. त्याबाबतीत त्यांनी कधीच तडजोड केली नाही, वा वाचकांची पर्वाही केली नाही.

निवेदन खंडीत करून आलेला हा कंस आपल्याला त्या बहिण-भावातील मायेचा प्रत्यय तर देतोच, पण निवेदनातील 'भोळी मुलगी. फारफार वाट पाहील.' हे वर्णनही अर्थपूर्ण करतो. या कंसामुळेच ती भोळी बहीण आणि तिचे फार फार वाट पाहाणे मनाला एकदम पटते. याचाच अर्थ निवेदन खंडीत करून आलेला कंसही अखेर अर्थपूर्ण ठरतो तो असा. या कंसामागील जी. एं.चे कोमल मन जाणवल्यावाचून राहात नाही.

'दमून गेलेल्या अंगाने ती अंथरुणावर पडली की तिला कृतार्थ वाटे, भावाच्या बायकोशी (देखणी, तसे रूप आपणाला हवे होते) केलेल्या ईर्ष्येचे सार्थक वाटे.' (वस्त्र/रक्तचंदन)

'वस्त्र' ह्या कथेतील मिस् मेरी डिसोझा ही जी. एं.च्या कथासृष्टीतील एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा. एकाकी, एकटी स्त्री. एकदा भावाच्या बायकोने तिचे कपडे रस्त्यावर फेकून दिले, तेव्हा ती जी भावाच्या घरातून बाहेर पडली ती कायमचीच. पंधरा वर्षे निघून गेली, पण तिने भावाच्या घराकडे कधी चुकूनही माघारपावले वळवली नाहीत. फार स्वाभिमानी, बाणेदार बाई. आपले कपडे रस्त्यावर फेकलेले पाहताच तिने ते गोळा केले व वहाणा घेण्यासाठी देखील त्या घरात पाऊल न टाकता स्टेशन गाठले. एका छोट्याशा गावात माळरानावरील दोन छोट्याशा इमारतींच्या हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून दाखल झाली; टक्केटोणपे खाऊन तिने सगळे काम शिकून घेतले व अशिक्षित असूनही ती त्या हॉस्पिटलमध्ये सुपरवायझर होऊन बसली. रखरखत्या माळरानावरील त्या हॉस्पिटलमध्ये मिस् डिसोझाने आपले सर्वस्व ओतले. रोग्यांच्या जेवणापासून डॉक्टरांच्या खोलीत साबणाची वडी आहे की नाही येथपर्यंत तिला सारे पाहावे लागे. डॉक्टर घरी गेल्यावर तर त्या छोट्या होमची सर्व जबाबदारी तिच्यावरच पडे. कुठल्याही कामाला तिने कधी नाही म्हटले नाही की माघार घेतली नाही. त्यावेळी ज्याच्या त्याच्या

तोंडी मिस् डिसोझाला विचार, मिस् डिसोझाला सांग असे घोळत असे.

अतिश्रमांनी थकलेली मिस् डिसोझा जेव्हा अंथरुणावर पडत असे, तेव्हा कृतार्थतेच्या भावनेनी तिचे मन भरून येत असे. तिला तिची कर्मभूमी लाभली होती व तिथे ती कुणीतरी होती. त्या माळरानावर तिच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त झाला होता. श्रमांनी काही माणूस मरत नाही, पण अतिश्रम करून का होईना मिस् डिसोझाच्या भणंग, एकाकी जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त झाली होती. अस्तित्वाला काही तरी अर्थ असणे, हे कधी कधी मानवी जीवनात फार आवश्यक ठरते. भावाचे घर सोडताना मिस् डिसोझाचे आयुष्य जणू एक पोकळी होती; पण त्यावेळी तिची पाठ ताठ होती आणि अंगावरील मास लोखंडाचे होते. त्यामुळेच स्वकर्तृत्वावर ती ठामपणे त्या माळावर उभी राहिली. सहाजिकच भावाच्या बायकोशी केलेल्या ईर्ष्येचे सार्थक झाल्यासारखे तिला वाटे. पण त्याच वेळी हटकून तिला तिचे देखणे रूप आठवे, आणि सूक्ष्म असूयेनी तिचे मन आक्रसे.

जी. एं.चा हा कंस मिस् डिसोझाच्या मनाचा एक पदर उलगडून दाखवतो. भावाच्या बायकोचे देखणेपण तिला मनात खुपत होते. तिच्या देखणेपणामुळेच मिस् डिसोझाला स्वत:त काही तरी कमतरता असल्याचे जाणवत होते. मिस् डिसोझा ठेंगणी, गोरी, ओठावर लव असलेली, ओबडधोबड शरीराची होती. भावाच्या देखण्या बायकोपुढे वावरताना तिचे मन आतल्या आत संकोचत असे, शरमत असे. मिस् डिसोझा दूर निघून गेल्यावरही त्या देखणेपणाने तिचा पिच्छा सोडला नव्हता.

लाचारी, मिंधेपणा टाकून स्वाभिमानाने, ताठ मानेने जगता आले, पण रूपाचे काय? वहिनीशी ईर्ष्या करता आली. 'स्व'चा शोधही घेता आला. अस्तित्वाला अर्थही प्राप्त झाला. हे सर्व आपल्या हातात होते. अपार ढोरमेहेनत करून हे आपण मिळवले. पण तिच्यासारखे रूप कोठून मिळवणार? देखणेपणा जन्माबरोबरच घेऊन यावा लागतो. आपण फाटकेच जन्माला आलो. ह्या एका बाबतीत आपल्याला तिच्यावर मात करणे या जन्मात शक्य नाही. तसे देखणे रूप आपल्यालाही हवे होते. खरेच हवे होते.

मिस् डिसोझाच्या मनातील असूया, मत्सर, लालसा ह्या स्त्रीसुलभ भावना व्यक्त करण्याचे कार्य ह्या कंसाने. साधले आहे.

'तोच विजूची नजर पाळण्याकडे गेली आणि ती खाली वाकून पाहू लागली. रंगीत तुकड्यांच्या दुपट्याखाली तिची मुलगी मुठी आवळून एवढीशी झोपली होती. (मुले झोपली असता मुठी का झाकतात?)' (निरोप/पारवा)

प्रस्तुत कंसाचा कथेशी काडीचाही संबंध नाही. मग ह्या कंसाचे प्रयोजन काय? प्रयोजन काहीच नाही. इथे जी. ए.आपल्या पोलादी पडद्याआडून बाहेर येऊन त्यांच्या नकळतच खास त्यांच्या वाचकांशी संवाद साधून जातात. जी. ए. इथे आपल्याला भेटलेत हे ओळखण्याची जाण मात्र असावयास हवी.

ह्या कंसातून जी. एं.च्या कोमल मनाचा एक नाजुक थरथरता पदर आपल्याला जाणवून जातोच. लहान चिमुकली मुले कुणाला आवडत नाहीत? जी. एं.नाही ती निश्चितच आवडत असणार यात संशय नाही. जी. एं.च्या भगिनी सौ. नंदा पैठणकर ह्यांच्या मुलींना (चि. मुग्धा व चि. मनिषा) जी. एं.च्या मायेचा अमोल ठेवा लाभला होता. आपल्या ह्या भाच्यांवर जी. एं.चा किती लोभ होता त्याची कल्पना श्री. अप्पा परचुरे ह्यांच्याशी बोलताना मला आली. त्यांच्याशी बोलत असताना अपरिहार्यपणे माझ्या अंतर्मनात जी. एं.च्या कथासृष्टीतील 'मामा'ची व्यक्तिरेखा तरळत होती.'तुती', 'कैरी' ह्या कथांतून साकारलेला श्रीपूमामा त्यावेळी मला जी. ए. मध्ये दिसत होता. खास मुग्धासाठी जी. एं.नी बालसाहित्य निर्माण केले. अमृतफळे, ओंजळधारा, बखर बिम्मची आणि मुग्धाची रंगीत गोष्ट. मुग्धा खरोखरच भाग्यवान, की तिला असा अलौकिक मामा मिळाला. 'बखर बिम्मची' आणि 'मुग्धाची रंगीत गोष्ट' ह्या तर जी. एं.नी मुग्धाला सांगितलेल्या व तिच्यासाठी स्वत:च्या आवाजात टेप करून दिलेल्या कॅसट्स. पुढे त्या कॅसेट्सवरूनच परचुरेंनी पुस्तके काढलीत. केवळ मुग्धामुळे, मुग्धासाठी हे बालसाहित्य निर्माण झाले अन् त्यामुळे नकळत मराठी बालवाङ्मयाचे दालन समृद्ध बनले.

खरी गोष्ट एवढीच की ज्या थोड्या भाग्यवंतांना जी. एं.चा सहवास लाभू शकला, त्यांनी जी. एं.च्या मातीच्या पायासकट जी. ए.मधला तुमच्या आमच्यासारखा सामान्य माणूस अनुभवायला मिळाला. जी. एं.नाही आपल्यासरखेच रागलोभ होते. ते अत्यंत मायाळू होते. ज्यांच्या वाट्याला जी. एं.ची माया आली, त्यांना ती अपार लाभली. ते जी. एं.चे देणे होते, अगदी भरभरून.

धारवाडला जी. एं.च्या शेजारच्या छोट्या मुलाला जी. एं.चा इतका लळा लागला होता की, तो जी. ए. कॉलेजमधून परतण्याच्या वेळी त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसे. जी. ए. घरी येताच त्यांच्या मागोमाग तोही घरात येई. मग त्याचे आणि जी. एं.चे भावविश्व फुलून येई. जी. एं.नी त्याला काहीतरी खायला दिल्यावर ते खाऊनच मग तो घरी जाई व मगच त्याचे घरी खाणे होई. जी. ए. परत येईपर्यंत तो स्वत:च्या घरी काहीही खावयास तयार नसे. जी. ए. बागेत काम करीत असतील तर त्याचाही मुक्काम जी. ए.बरोबर त्यांच्या बागेत. जी. ए. बागेतील माती उकरीत असतील तर, त्याचेही शेजारीच माती उकरणे चालू असे. दाराशी जी. एं.ची वाट पाहात बसणाऱ्या त्या लहान मुलाकरता जी. ए. फक्त त्याचे 'काका' होते. 'मराठीतील सर्वश्रेष्ठ कथाकारा'चा त्या मुलाला पत्ता नव्हता, तो फक्त जी. एं.ची माया जाणत होता. एका हाडामासाच्या सामान्य माणसाची सामान्य माया! जी. ए. कुलकर्णी ही हाडामासाची व्यक्ती असामान्य, अलौकिक, आभाळातून पडलेली नव्हतीच मुळी. तीही तुमच्या आमच्यासारखीच, रागलोभ असलेली सामान्य व्यक्ती होती. खुद्द जी. ए. हे उत्तम

प्रकारे जाणून होते. 'प्रवासी' ह्या कथेत जटाधारी गीतकाराच्या माध्यमातून जी. ए. आपल्या वाचकांना सांगतात.....

'मी जगेन तर गीत गाणारा म्हणूनच जगेन. त्याखेरीज मला काय किंमत आहे? हे दुबळे पाय, हे निरुपयोगी हात! एखाद्या रक्तशोषकापेक्षा मला जास्त मोल नाही. मी तुझ्या बोराकडे हावरेपणानं पाहताच तू मला हसलास. मी एखाद्या क्षुद्र माणसासारखा वागलो, नाही? अरे, माझी गीतं काढून घेतली, तर मी क्षुद्रातला क्षुद्रच माणूस आहे. काही काळापूर्वी मी पंचपक्वान्नं बाजूला सारून उपाशीच गीत गात राहिलो असतो; आता मी एका रानबोराकरता क्षणभर प्राण टाकला! आता धडपड करून हे असलं आयुष्य वाढवू? नाही, आता मला किंचितही वात सारायची नाही. आता सारं संपलं आहे व मला शांतपणे जाऊ दे. तूही आता तुझ्या मार्गाने निघून जा.'

कथेतही जी. ए. वाचकाला असेच भरभरून अनुभव देतात, की त्यामुळे प्रसंगी वाचकाची दमछाक होते. जी. एं.ची कथा निव्वळ मनोरंजन म्हणून वाचण्यासाठी नसतेच, तर ती अनुभवायची असते, आणि हा कथानुभाव पचविणे खरोखरच फार कठीण काम आहे. पण एकदा का वाचकाला जी. एं.नी झपाटले की मग मात्र त्याची सुटका नाही. जी. एं.च्या 'कथे'ची मग झिंग चढते. सहन होत नसले, पचवायला कठीण असले, मन खिन्न, उदासवाणे करणारे असले, तरी वाचक एखाद्या ओढाळ गुराप्रामणे जी. एं.च्या कथेकडे धाव घेतो. कथा वाचून संपल्यावरही ती आपला पिच्छा सोडीत नाही. म्हणजे कथा वाचताना क्लेष अन् कथा वाचून झाल्यावरही क्लेष. तरीही ह्या जिवघेण्या हलाहलाकडे मन धाव घेतच राहाते, कारण एकच. त्या कथेतील अस्सलपणा! जीवन दुःखमय आहे, हा एकच चिद्घोष जी. एं.च्या कथेतून ऐकू येत असतो. मानवाच्या चिरंतन दुःखाची एकच कथा जी. ए. लिहीत राहिले, पण त्यांची प्रत्येक कथा दुःखाचा एक नवा आविष्कार, एक नवा पैलू प्रकट करीत असे. आपण मानवी दुःखाची एकच एक कथा सातत्याने आविष्कृत करीत आहो याचीही कल्पना जी. एं.ना होती. म्हणून 'रक्तचंदन'च्या अर्पणपत्रिकेआधी त्यांनी टॉलस्टायचे एक वाक्यच उद्धृत केले --- Happy families are all alike; every unhappy family is unhappy in its own way हाच जी. एं.चा शोधविषय होता. जीवन जाणून घेण्याचा हाच त्यांचा मार्ग होता. जीवनातील शोकात्मिकेकडेच त्यांचे मन धाव घेत असे. असंतुष्ट, अपयशी, दुर्दैवी व्यक्ती आणि त्याचे कौटुंबिक, सामाजिक जीवन जाणून घेऊन, त्याच्या वेदनेला कथाबद्ध करण्याचा जी. एं.नी सातत्याने प्रयत्न केला. याचा अर्थ जी. ए. विकृत मनोवृत्तीचे, केवळ दुःख, शोकांतिकाच आवडणारे होते असा मुळीच होत नाही. त्यांच्या कथांतून येणाऱ्या दुर्दैवी, अपयशी, खुज्या नियतीपुढे मोडून पडणाऱ्या व्यक्तीरेखांच्या वेदनांना चित्रित करून जी. एं.ना मोठा आनंद होत होता, एक विकृत समाधान त्यांना लाभत असे मुळीच नाही. उलट जी कथा वाचकाला

सुन्नबधिर करते, डोकेदुखी देते, क्लेष देते, जी दीर्घकाळ त्याला छळत राहाते, ती निर्माण करणाऱ्या निर्मात्याला निर्मितीच्या किती कळा सहन कराव्या लागल्या असतील याची नुसती कल्पना करून पाहा. आपली ही असाधारण कथासृष्टी निर्माण करताना जी. एं.नी स्वत:च्या व्यक्तिरेखांच्या ठसठसत्या वेदना भोगल्यात हे सत्य आहे. जी. एं.च्या कथेतून आपल्या अंत:करणाला भिडणारा, झाकोळणारा, ग्रासणारा मानवी दु:खाचा काळाकुट्ट दाहक भाग हा तर त्यांच्या स्वत:च्या जीवनाचा घटक बनून गेला. आपल्या शेकडो व्यक्तिरेखांची दु:खे स्वत: भोगणाऱ्या, सहन करणाऱ्या, पचविणाऱ्या जी. एं.ना केवढ्या प्रचंड मानसिक ताणाला तोंड द्यावे लागले असेल, याचीही नुसती कल्पना केली तरी मनाचा थरकाप उडतो.

स्वत:ला भोगाव्या लागणाऱ्या वेदनांची जी. एं.ना पूर्ण कल्पना होती. प्रत्येक कथा, त्यातील व्यक्तिरेखा, त्यांची दु:खे जी. एं.चा शारीरिक, मानसिक छळ करायची. जी. एं.चे हे व्रतच होते. आपल्या व्यक्तिरेखांची दु:खे जी. ए. स्वत: भोगतात. त्यांच्या दु:खांशी जी. ए. समरस होतात, याची कल्पना काही समीक्षकांना व रसिकांनाही आलेली होती. एवढ्या प्रचंड ताणतणावाखाली जी. एं.च्या कथासृष्टीतील एकेका शिल्पाकृतीची उभारणी होत होती. स्वत:ला भोगाव्या लागणाऱ्या असाधारण दु:खाला खुद्द जी. एं.नीच त्यांच्या 'प्रवासी' ह्या कथेत 'जटाधारी गीतकाराच्या' मुखाने वाचा फोडली आहे---

'..... त्या वेळच्या माझ्या गीतात धार, धग होती. परंतु त्याच्यातील आनंद त्या माणसांना पेलवेना. त्यातील दु:ख सहन होईना. आपणाला काहीसुद्धा दिसत नाही, अशी काही माणसांची तक्रार असते. माझं दुर्दैव निराळंच होतं. मला अती दिसत असे. दाहक द्रवाच्या थेंबाप्रमाणे माझे शब्द हाडापर्यंत जळत जाऊन हाडात उतरत. परंतु त्या माणसांना नेमकं तेच नको होतं. पृष्ठभागावर ओरखडा न उठवता सळ्ळदिशी सरकणारा नटवा सुबक आनंद, किंचित ओलसरपणा निर्माण करून क्षणात पुन्हा हवेत वाफ होऊन जाणारं आटोपशीर समजूतदार दु:खं त्यांना हवं होतं. त्यांची भूक केवळ चुरमुरे-बत्ताशांची होती. आता माझ्याकडे बघ म्हणजे तुला माझं दु:ख समजेल---'

'पाहिलंस? कमरेपर्यंत मला असे सर्वत्र डोळे आहेत. त्यांना पापण्या नाहीत व त्यांना वस्त्रांचा आडोसा अडवत नाही. त्यामुळं मला अती दिसतं. प्रत्यक्ष ती भोगणाऱ्यापेक्षाही जास्त उत्कटपणं मला त्यांची सुखदु:खं भोगावी लागतात. शब्द म्हणजे क्षुद्र रिते शिंपले असं हताशपणं वाटावं, असल्या यातना, असले परके आनंद मला पेलावे लागतात. आणि तू म्हणतोस, प्रत्यक्ष ओठांचा स्पर्श माझ्या गीतापेक्षा जास्त जिवंत असतो म्हणून ! अरे, नुसते ओठाला ओठ भिडणं एवढंच ज्याला माहीत असते, त्याला ओठाला ओठ भिडवण्याचं खरं सुख पुरं माहीत नसतं! पण मला अनेकदा वाटतं मात्र, तेवढ्यावरच समाधान मानणाऱ्यांपैकी मी झालो असतो, तरी माझी निर्मम यातना

चुकली असती. माझ्या वाट्याला रांगणारं, सरपटणारं सामान्य सुख जास्त आलं असतं!'

जी. एं.चा म्हणून जो खास वाचकवर्ग आहे, त्याला जी. एं.नी आपली कथासृष्टी निर्माण करण्याकरिता स्वत: किती यातना भोगल्या असतील याची कल्पना येऊ शकते. परकायाप्रवेशाप्रमाणे या सर्व व्यक्तिरेखांची दु:खे भोगणे हे सामान्य काम नाही. हे हलाहल पचवून जी. एं.नी जे अमूल्य कैलास-लेणे निर्मिले, त्याबद्दल आम्ही जी. एं.चे कायम ऋणी आहोत. जी. एं.नी आमच्याकरिता काय भोग भोगलेत? जी. एं.च्याच शब्दात 'यात्रिक' ह्या कथेत त्यांचा सॅन्को डॉनला जे म्हणतो, तेच आम्ही जी. ए.बाबत म्हणतो.....

'.....तुम्ही तर आम्हा सगळ्याच तरुणांचे बदलीबळी आहात. एखाद्या मेंढीवर आपली सारे पापे लादून तिला वाळवंटात सोडून देण्याची पद्धत पूर्वी कुठल्यातरी धर्मात होती ना, तसेच आम्ही सगळ्यांनी आमच्यात जे जे जिवंत होते ते तुम्हाला अर्पण केले. तुम्ही किती थोर आहात हे मी तुम्हाला यापूर्वी कधीच सांगितले नाही, कारण ती देखील तुम्हांला एक कुचेष्टाच वाटली असती. पण तुम्ही आम्हा साऱ्यांचा वनवास भोगला, वणवण हिंडलात..... तुमची सावली अंगावर पडली तरी ताज्या मनाला अभिमान वाटावा असे तुम्ही....'

जी. एं.च्या स्वभावातील विक्षिप्तपणा, तऱ्हेवाईकपणा यांच्या जोडीलाच एक बालकही जी. ए.मध्ये कायम दडलेला होता. म्हणूनच जी. एं.ना कुतूहलजनक मजेदार कूटप्रश्न पडतात.

'सारे तत्त्वज्ञ हडकुळे का असतात, हे गूढ मला कधी उलगडले नाही' (इस्किलार). 'मुले झोपली असता मुठी का झाकतात?' (निरोप). 'या पाऊलवाटा नेहमीच अशा तिढ्या वळणाने का बरे जातात? सरळ धाग्यासारखी एकही पाऊलवाट कधी दिसत नाही हे कसे?' (ठिपका). 'बातम्या काही नसतानाही हे शहाणे लोक दररोज चार सहा पाने जशीच्या तशीच कशी काय भरून काढतात....' (स्लीला). 'माणसाला काय आवडावे यालाही मर्यादा हवी. उद्‌बत्तीचा वास, ताज्या दुधाचा वास, खाताना हात राडेराड करणारे ते थबथबीत कुरूप फळ आंबा, उसाचा रस, एखाद्या सभेला जाऊन घाणेरड्या घोळक्यात मढ्याप्रमाणे उभे राहणे, चिकट, गुळचट बासुंदी मोठ्या चवीने ओरपणे, अरबिंदोचे पिठाळ लेखन, शेंगदाणे, चुरमुरे खाणे, असल्या गोष्टी माणसांना आवडतात तरी कशा?' (पुरुष). 'एक प्रचंड अंडे उकडून ठेवले आहे अशा चमत्कारिक पद्धतीनेच लोणी दुकानात मांडायला पाहिजे की काय?'

(हिरवी मखमल, गोरा हात)

जी. एं.च्या ह्या वरील प्रश्नांना काय उत्तर आहे? ह्या प्रश्नांमधून आपल्याला जाणवते ते जी. ए.मधील बालसुलभ कुतूहल आणि त्यांची व्यक्तिगत आवडनिवड. पिंडे पिंडे मतिर्भिन्न: जी. एं.ना जे आवडत नव्हते त्याबद्दल ते अत्यंत तिखट, उपहासगर्भ

शब्दात आपली नावड व्यक्त करीत. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य लेखकाला निश्चितच आहे आणि जी. एं.नी स्वत:चे मन मोकळे करण्याकरिता त्याचा पुरेपूर उपयोग केला. कागद म्हणजे जणू आपला जिव्हाळ्याचा मित्र असल्याच्या कल्पनेनेच जी. ए. आपले अंत:करण कागदावर मोकळे करत जातात. 'कैरी' ह्या कथेत जाधवमास्तराच्या रूपाने जी. ए.च आपल्याला सांगतात----- 'आणखी एक तुलाच म्हणून सांगतो. मी पुष्कळ लिहितोसुद्धा. कागद आपलं म्हणणं फार शांततेनं ऐकून घेतो. मी तोतरा आहे, मी पानी म्हणतो म्हणून तो मला हसत नाही....' जी. ए. जाणून घेण्याकरिता, जी. एं.ची आवडनिवड जाणून घेण्याकरता त्यांच्या कथांच अशा उपयोगी पडतात. जी. एं.च्या पावलांचे आवाज ऐकू यायला कान मात्र तयार असावे लागतात.

☆☆☆



REFBK-0026129

काळीजवेध

प्रा. धनंजय आचार्य हे जी. एं.नी
झपाटलेले एक विलक्षण झाड....
जी. एं.च्या कथा म्हणजे जुन्या सागवानी
पेटीत जतन करून ठेवलेल्या रेशमी
वस्त्रासारखा सुरेख धुंद वास असणाऱ्या कथा....
जी. एं.च्या कथा म्हणजेच जी. ए. या
दृष्टिकोणातून प्रा. आचार्यांना जी. ए. जसे दिसले,
तशीच त्यांनी भरलेल्या आणि मोकळ्या सोडलेल्याही जागा
आणि त्यांची विविध वैशिष्ट्ये यांची त्यांनी घेतलेली ही नोंद....
जी. एं.च्या कथातील मृत्यू, त्यातील दांपत्यजीवन, त्यांचे बालविश्व, प्राणी
आणि पक्षी यांचं जग.
आणि एकूणच काही सांगून नित्याहूनही अधिकच काही सुचवून जाणाऱ्या,
स्वतःच निर्माण केलेल्या अणि जिवापाड तो पोलादी
पडदा जपणाऱ्या, एक व्रतस्थ जीवन
जगणाऱ्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे अलवार
पदर हळुवारपणे उलगडून दाखविण्याचा मराठीतील हा एक अनोखा प्रयत्न....
जी. एं.चे अभ्यस्त शब्द, एका वाक्यात तीन तीन
विशेषणे वापरण्याची त्यांची लकब, त्यांचे आवडते शब्द, आवडता निळा रंग,
त्यांच्या व्यक्तींचे हुळहुळून हसणं, इतकंच काय
त्यांच्या कथांतील कंसंही आचार्यांच्या नजरेतून सुटत नाहीत !
'निळासावळा' ते 'पिंगळावेळ' यातील
मराठी भाषेला अंजठा-वेरूळची लेणी बहाल
करून मानदंड ठरलेली, प्रचंड शिलाखंडात
कोरलेली जी. एं.ची विलक्षण कथाशिल्पे
आणि त्यांची तशीच विलक्षण प्रतिमासृष्टी
या सर्वांचा प्रा. आचार्यांनी घेतलेला हा 'काळीजवेध'.
आपल्या आवडत्या लेखकावर देहभान
विसरून आणि आसासून किती आणि
कसं प्रेम करावं याचा एक आदर्श
वस्तुपाठ म्हणून हा 'काळीजवेध' रसिकांच्या प्रदीर्घ स्मरणात राहील....

प्रल्हाद वडेर